३२६८
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. ३२६



# महाराष्ट्राची शोकांतिका

## अरुण सारथी

REFBK-0025632

संदर्भ निबंध
३२९९
२५६३२
१७५८८

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 JUL 1988
16 OCT 1988
17 OCT 1990
26 DEC 1990
13 JAN 1991
20 JAN 1993
16 APR 1994
23 APR 1994

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

# महाराष्ट्राची शोकांतिका

( एका सामान्य माणसाचे मनोगत )

अरुण सारथी

REFBK-0025632

अस्मिता प्रकाशन / पुणे ३०.

■ प्रकाशक :
ग. वा. बेहेरे
अस्मिता प्रकाशन
४५८/२ सदाशिव पेठ
पुणे ३०

■ मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ
पुणे २

■ © अरुण सारथी

■ पूर्वप्रसिद्धी : साप्ताहिक सोबत

■ पहिली आवृत्ती : एप्रिल १९८८

■ मुखपृष्ठ :
सुभाष अवचट

■ मुखपृष्ठ छपाई :
रविराज प्रिंटरी, पुणे २

■ मूल्य : पंचवीस रुपये

# महाराष्ट्राची शोकांतिका

( एका सामान्य माणसाचे मनोगत )

हे एका सामान्य माणसाचे मनोगत आहे. आज भारतात सर्वत्र असत्य, अशिव, आणि असुंदर यांचे साम्राज्य पसरलेले आढळते. पंजाब, बंगाल, त्रिपुरा, आसाम, बिहार, आंध्र असे अनेक भाग अशांत आहेत. असुरक्षिततेची भावना सर्वत्र दिसून येते. अधून मधून जातीय दंगे उफाळून येत असतात. दैन्य आणि हलाखी पहाण्यास आपण सरावलो आहोत. तथापि पाच हजार वर्षांची परंपरा असलेल्या, अहिंसा आणि सत्य यांचा संदेश देणाऱ्या बुद्ध आणि गांधी अशा महात्म्यांना जन्म देणाऱ्या देशात अशी परिस्थिती का निर्माण व्हावी याचा योग्य दिशेने शोध घेण्यास मात्र राजकारणी आणि विचारवंत तयार नसावेत असे दिसते. सत्ता आणि पैसा यांच्यामागे लागलेल्या राजकारण्यांना ते परवडणारे नाही. तर विचारवंत पाश्चात्य संस्कृतीने भारले गेले असल्याने, अथवा सत्ताधीशांच्या आश्रयाने राहण्याची त्यांनी संवय लावून घेतल्यामुळे किंवा आपल्याला कोणी जातीयवादी म्हणेल काय या धास्तीने पोखरले गेले असल्यामुळे त्यांना येथील संस्कृतीचे सम्यग्दर्शन होऊ शकत नाही किंवा करून घेण्याची इच्छा नाही. त्यामुळे राजकारणी आणि विचारवंत जे बोलतात किंवा लिहितात त्याचा वास्तवाशी ताळमेळ जमत नाही आणि सामान्य माणूस अधिकच गोंधळून जातो.

हल्ली प्रत्येक ज्ञानशाखेला 'डिसिप्लीन' असे म्हणतात. साहजिकच अशा बौद्धिक 'शिस्तीत' वाढलेल्या विद्वानांना त्या 'शिस्तीच्या' गृहीतकृत्यापासून रेसभरही ढळणे म्हणजे अब्रह्मण्यम वाटते. त्यामुळे नवा, ताजा आणि स्वच्छ दृष्टिकोन किंवा मूलभूत विचार यांचा आढळ भारतात क्वचितच होतो. सहसा असे आढळते की, ज्ञान पाश्चात्य विद्या-विभूषित विद्वान संशोधक वृत्ती बाणवून घेण्याऐवजी कसबी कारागीर बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून असतात. साहजिकच भारताचा आत्मा जाणून घेऊन प्रगत पाश्चात्य ज्ञान भारताला कशा तऱ्हेने उपकारक ठरेल याचा मूलभूत विचार करण्याऐवजी आपल्या कसबाचे प्रदर्शन करण्यातच त्यांना इतिकर्तव्यता वाटते. शिक्षण, वैद्यक, न्याय इत्यादि क्षेत्रे सोडा पण फंडामेंटल रिसर्च इन्स्टिटयूटस्मधून मूलभूत संशोधन; किती होते हाच संशोधनाचा विषय ठरावा. आपल्या बौद्धिक जीवनात या उणीवा सामान्य माणूस दूर करू शकत नाही पण हेरू शकतो. प्रस्तुत लेखनाचा हाच हेतू आहे.

ज्ञान प्राप्त होते; पण शहाणपणा रेंगाळतो अशी एक इंग्रजी म्हण आहे. हा शहाणपणा सामान्य माणसाला असू शकतो कारण वास्तवाचे चटके त्यालाच बसत असतात आणि

त्याच्या उमजशक्तीवर कोणत्याही 'शिस्तीचे' अवजड ओझे नसते. अथवा पुरोगामित्वाची झूलही त्याला पांघरायची नसते. हॅन्स ख्रिश्चन अँडरसन यांची एक सुंदर परीकथा आहे. त्या परीकथेत राजाने एक अदृश्य पोषाख परिधान केला आहे अशी स्वतःची प्रचंड फसवणूक समस्त प्रजाजन करून घेत असतात. त्या अदृश्य पोषाखात राजाची मिरवणूक निघाली असता एक लहान मुलगा 'राजा नागडा' म्हणून ओरडतो आणि मग सर्वचजण राजा नग्न आहे असे म्हणण्याचे धाडस करतात. आज भारतात राजकारणी आणि विचारवंत यांनी असत्य आणि अर्धसत्य सांगून प्रचंड फसवणुकीचे ( Big Fraud ) वातावरण निर्माण केले आहे. अशावेळी 'राजा नग्न आहे' हे म्हणण्याचे धाडस सामान्य माणूसच करू शकतो. माझी लेखन–भूमिका तीच आहे.

आज जी प्रचंड फसवणूक चालू आहे तिचा आणि संगणकीय तमोयुगाकडे चालू असलेल्या आपल्या वाटचालीचा निश्चित संबंध आहे असे मला वाटते. सर्वंकष असुरक्षिता आणि सौंदर्यदृष्टी, बुद्धिवाद व सर्जनशीलता यांचा अभाव, हे तमोयुगाचे सहप्रवासी. या सर्वांचा शोध घेण्याचा प्रयत्न मी केला आहे. भारतातील अहिंदू संस्कृती; लोकशाही, समाजवाद, साम्यवाद आदी पाश्चात्य राजकीय संकल्पना; पाश्चात्य देशांची परिपक्व राजनीती, तर भारताशेजारच्या देशांची संधीसाधू राजनीती आणि येऊ घातलेली तंत्रवैज्ञानिक क्रांती, यांच्या आव्हानांना संगणकीय तमोयुगाकडे वाटचाल करणाऱ्या मरगळलेल्या हिंदू संस्कृतीचा बचावात्मक प्रतिसाद हे आजच्या भारताचे चित्र आहे. अमेरिकेने जबरदस्तीने जपानच्या भूमीवर पाऊल ठेवल्यावर १९ व्या शतकात थोडेसे अशाच तऱ्हेचे आव्हान जपानपुढेही उभे राहिले होते. पण जपानने पाश्चात्य संस्कृती आत्मसात करून पाश्चात्य आणि जपानची संस्कृती यांचा मिलाफ ( synthesis ) आणि त्याचबरोबर आपलाही कायापालट घडवून आणला. याउलट बचावात्मक भूमिका घेणारा देश नेहमीच अनुकरणाच्या मागे असतो या न्यायानुसार, भारत फक्त अनुकरणात धन्यता मानत आहे आणि त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या बौद्धिक गुलामगिरीचे ओझे अभिमानाने खांद्यावर मिरविण्यात धन्यता मानत आहे. या प्रक्रियेत भारताने 'खेचर' संस्कृतीला आपलेसे केले. यापैकी काही पैलूंचा विचार मी माझ्या कुवतीप्रमाणे केला आहे.

बुद्धिवाद आणि सौंदर्यदृष्टी यांच्या आधाराने युरोपने तमोयुगातून आपली सुटका करून घेतली. या प्रक्रियेची सुरुवात मानवतावादाने झाली. मानवी जीवन सुंदर आहे, मानवी भावना सुंदर आहेत या श्रद्धेतून मानवी मूल्यांना अधिष्ठान प्राप्त झाले. डान्टेने आपल्या 'डिव्हाईन कॉमेडी'मध्ये मानवी प्रेमाचे महाकाव्य रचले आणि तेथूनच वाङमयीन प्रबोधनाला सुरुवात झाली असे मानतात. सुंदर पहावे, सुंदर करावे या वृत्तीतून निरनिराळ्या कलांच्या संवर्धनाला जबरदस्त प्रेरणा मिळाली. आज भारतात बुद्धिवादाला फाटा मिळाला आहे. गुंड आणि राजकारणी यांच्या दृष्टीने निरुपद्रवी असण्यावर मानवी जीवनाची शाश्वती अवलंबून आहे. सिमेंटची जंगले, झोपडपट्ट्या आणि अधिकाधिक कडवा होत जाणारा जीवन संघर्ष यांनी आपली सौंदर्यदृष्टी मारून टाकली आहे. आज

दुसऱ्याच्या कुरूपतेत आपण आपले सौंदर्य शोधीत आहोत. त्यामुळे दैन्य किंवा झोपडपट्टयातील जीवन यांनी आपण शहारून जात नाही. जीवनसंघर्ष इतका बिकट झाला आहे आणि सर्वंकष असुरक्षितता इतकी वाढली आहे की, मानवी मूल्ये, सौंदर्यदृष्टी आणि बुद्धिवाद यांना आपण पारखे झालो आहोत. राहिले आहे ते फक्त जगणे, आणि त्यासाठी आपण कोणतीही तडजोड करण्यास तयार आहोत. अव्वल इंग्रजी काळात आपण निव्वळ जगण्यापलीकडे काहीतरी करू पहात होतो. पण तेवढा अपवाद वगळता आज हजार वर्षांहून अधिक काळ भारत निव्वळ जगण्यासाठी धडपड करीत आहे. या दृष्टिकोनातून गांधीजींनी आणि गांधीवाद्यांनी स्थापलेल्या आश्रमाची अस्तित्वासाठी धडपड अभ्यासनीय आहे.

वास्तविक स्वातंत्र्यपूर्व काळात भारताचा झगडा जेवढा इंग्रजांविरुद्ध होता तेवढाच आंतरिक म्हणजे स्वतःविरुद्धही होता व तो जास्त महत्त्वाचा होता हे १९ व्या शतकातील नेत्यांना उमजत होते. पण विसाव्या शतकात इंग्रजांविरुद्धच्या झगड्याचे उदात्तीकरण झाल्यानंतर आंतरिक झगडा मागे पडला. तथापि त्या काळात स्वातंत्र्याच्या उर्मीने राष्ट्रप्रेम, स्वार्थत्याग, आत्मत्यागाची तयारी अशा काही उदात्त प्रेरणांचे दर्शन घडविले. स्वातंत्र्यानंतर ज्या वर्गाच्या हातात सत्ता गेली त्या वर्गाला शतकानुशतके जगण्यापलीकडे काहीच माहीत नसल्यामुळे स्वातंत्र्यानंतर पुन्हा जगण्याचे राजकारण सुरू झाले आणि हिंदू संस्कृतीचा जुना आजार बळावला. आज चाळीस वर्षे सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष निव्वळ अस्तित्वासाठी धडपडत आहेत. या अस्तित्वाचा मूलाधार म्हणजे निवडणुकीतील मते आणि केवळ तेवढ्यासाठी सर्वांनीच नीतिमूल्ये पायदळी तुडवली आहेत. सामान्य माणूसही आपल्याला जमेल तेवढे राजकारण्यांचे अनुकरण करीत आहे.

आंतरिक झगड्याचे भान न राहिल्यामुळे स्वातंत्र्योतर काळात भारत सांस्कृतिक अरिष्टातून (crisis) जात आहे. नीतिमूल्ये, बुद्धिवाद, राष्ट्रीय चारित्र्य, नेतृत्व, सर्जनशीलता या सर्वच बाबतीत आज पेचप्रसंग निर्माण झाला आहे. यातच देशाच्या शोकांतिकेचे मूळ आहे. या शोकांतिकेला सत्तालोलूप राजकारणी, कसबी विचारवंत व 'मला काय त्याचे' ही वृत्ती या सर्वांचाच हातभार लागला आहे. त्याचा महाराष्ट्रापुरता आढावा मी घेतलेला आहे. यावर उपाय सापडण्यासाठी हिंदू संस्कृती आणि हिंदू व्यक्तिमत्त्व यांचा शोध घेणे आवश्यक आहे. कारण आज भारतात हिंदूंच्याच हातात सत्ता आहे. पण असा वस्तुनिष्ठ शोध घेण्याचा प्रयत्न विशेष कोठे दिसून येत नाही. तथापि जेव्हा केव्हा जातीय दंगलींच्या अथवा पंढरपूरच्या विठोबाची शासनातर्फे होणाऱ्या पूजेच्या निमित्ताने विचारवंत आणि राजकारणी यांना हिंदुत्वाबद्दल विचार करणे अनिवार्य होते त्यावेळी ते जे बोलतात किंवा लिहितात त्यात जुजबीपणा आणि हिंदू भयगंड यांचेच दर्शन होते. मागे अशाच एका संदर्भात भारतातील मुसमानांच्या अंगात हिंदूंचेच रक्त आहे ही वस्तुस्थिती बोलून दाखविण्यास न्या. छगला यांच्यासारख्या मुसलमानांचीच गरज पडली. कोणीही हिंदू हे धाडस करू शकला नाही.

हिंदूच्या भयगंडाबद्दल मी जे लिहिले आहे ते काहीजणांना अतिरंजित वाटण्याचा संभव आहे. त्याच्या पुष्टचर्थ एका पुस्तकातील काही मनोरंजक भागाचा उल्लेख येथे करणे आवश्यक वाटते. काही दिवसांपूर्वी सुधीर काकर यांचे Shamans, Mystics and Doctors हे पुस्तक वाचनात आले. त्यात भूतबाधा व त्यावरील उपचार यांचे मानसशास्त्रीय विश्लेषण आहे. भरतपूरनजिकच्या बालाजी मंदिरात भूत उतरवण्याचे उपचार त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यांना असे आढळले की, २८ पैंकी १५ रुग्णांना मुसलमान भुतांची बाधा झाली होती. मुसलमान भुते ही सर्व भुतात अत्यंत कडवी व दुष्ट समजली जातात. त्यातही 'सय्यद' भूत सर्वांत खाष्ट समजले जाते. मुसलमानांची दहशत हिंदू मनात किती खोलवर रुजली आहे याचे इतके झगझगीत उदाहरण सापडणे दुरापास्त.

या लेखात अनेक विषयांना स्पर्श केला आहे. पांडित्य, विद्वत्ता किंवा संशोधकवृत्ती यांचा माझा दुरान्वयानेही संबंध नाही. भारतासमोरील समस्यांच्या बाबतीत कशा तऱ्हेने विचार व्हावयास पाहिजे याची फक्त दिशा दाखवण्याचा प्रयत्न व्यावहारिक शहाणपणाच्या (Common Sense) मर्यादेत राहून केला आहे. हे करीत असाता देवदूतदेखील जेथे पाय टाकायला धजणार नाहीत अशा तज्ज्ञांच्या राखीव कुरणात मी आवेशाने घुसलो आहे. गेल्या कित्येक वर्षांच्या बेचैनीने हे वेडे धाडस करायला मला प्रवृत्त केले आहे. काही काही प्रसंग मनावर कोरून राहिले आहेत. दक्षिणेत प्रवास करीत असताना वडा—सांबार खाऊन टाकलेल्या पानांना चिकटलेले सांबार चाटणारी मुले पाहिली. चर्चगेट स्टेशनच्या बाहेर एक उकीरडा होता. तो विंचरून त्यातील खाण्याचे पदार्थ हुडकून पोट भरणारी मुले पाहिली. रामेश्वरला महारोग्यांच्या रांगा आणि त्यांना दान करून पुण्यसंचय करणारे भाविक. असे अनेक प्रसंग. पण ह्या प्रसंगांपेक्षाही कशाने जर जास्त बेचैनी आली असली तर हे प्रसंग निर्विकारपणे पाहणाऱ्या माणसांनी. दैन्य आपल्याला सतावीत नाही. आपल्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून आपण त्याचा स्वीकार केला आहे. हे असे का याचे उत्तर विचारवंतांकडून मिळेल म्हणून आशा करीत होतो आणि ते मिळाले नाही, की अधिकच बेचैन होत होतो. पण विचारवंतांच्या बोलण्याचे विषय वेगळे. राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, जातीयवाद, रा. स्व. संघ, जनसंघ, समाजवाद आणि निवडणुका. आणि त्यांच्या विवेचनाच्या मागचे सूत्र म्हणजे हिंदूंच्या नबळाईचे उदात्तीकरण. माझ्यासारख्या सामान्य माणसाला या प्रश्नाचे उत्तर सापडणे दुरापास्त. पण त्याचे मूळ मात्र सापडले आहे. ते म्हणजे मी व माझी संस्कृती. प्रत्येक देशातील कोणत्याही समस्येचे मूळ अखेर तेथल्या संस्कृतीतच शोधावे लागते. निव्वळ अतिरिक्त उत्पादनाचा सिद्धांत किंवा उत्पादनाच्या साधनांतील बदल त्यांचे समाधानकारक उत्तर देऊ शकत नाही. या संस्कृतीच्या काही अंगांचा एका विशिष्ट कालखंडापुरता वेध घेण्याचा केलेला हा प्रयत्न.

हे केवळ मनोगत आहे. त्याला खोली, उंची, रुंदी काहीही नाही. असला तर वैचारिक गोंधळही असू शकेल. आज जी गोंधळाची परिस्थिती आहे तिचे प्रतिबिंब त्यात पडणे अपरिहार्य आहे. पण सामान्य माणूस कोणत्या दिशेने विचार करीत आहे हे वास्तवाला

चिमटयाने दूर करून आपणच तयार केलेल्या वैचारिक कुंपणात राहणाऱ्या विचारवंतांच्या कानावर जावे व त्याची त्यांनी दखल घ्यावी यासाठी ही धडपड. त्याकडे वाचक सहानुभुतीने आणि विचारवंत क्षमाशीलतेने पाहतील अशी आशा.

या लेखातील काही संदर्भ तपासून पाहाण्यासाठी आवश्यक ती पुस्तके, संदर्भग्रंथ मिळू शकली नाहीत. काही पुस्तके वाचल्याला तर प्रदीर्घ कालावधी लोटला आहे. लेखातील काही उल्लेख निव्वळ स्मरणशक्तीवर विसंबून केले आहेत. त्या सबंधात काही चुका राहून गेल्या असल्याची शक्यता आहे. त्याबद्दल आगाऊच दिलगीरी व्यक्त करतो. ज्ञात्यांनी त्या लक्षात आणून दिल्यास आभारी होईन.

शेवटी आभारप्रदर्शन. माझ्या एका ज्येष्ठ सहकाऱ्याच्या उत्तेजनाशिवाय या लेखातील एकही ओळ लिहिली गेली नसती. श्री. ग. वा. बेहेरे यांनीही कोणतेही वलय नसलेल्या एका सामान्य माणसाचे लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे धाडस केले आहे. या दोघांचेही आभार मानणे औपचारिक ठरेल. तेव्हा त्यांच्यासंबंधी कृतज्ञता व्यक्त करून हे प्रास्ताविक संपवतो.

**अरुण सारथी**

# महाराष्ट्राची शोकांतिका

' महाराष्ट्राची शोकांतिका ' हा शोधनिबंध ' सोबत 'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला होता. त्यावरच्या प्रतिक्रिया कौतुकाच्या होत्याच. परंतु अभिनव दृष्टिकोनातून महाराष्ट्राच्या शोकांतिकेचे जे दर्शन अरुण सारथी यांनी घडवले त्यातील नेटकेपणाबद्दल अभिनंदनही होते. हा निबंध पुस्तकरूपाने छापावा असे पुष्कळांनी सुचवल्यावरून उशीरा का होईना, पण त्या निबंधाला पुस्तकरूप लाभले आहे.

एखाद्या विषयाचा मूलगामी अभ्यास करून, त्यासाठी भरपूर माहिती गोळा करून, त्याचा ऐतिहासिक अन्वयार्थ लावू शकणारे विचारवंत दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. आणि म्हणून अशा शोधनिबंधाचे महत्त्व आगळे ठरते. अरुण सारथी हे उघड-उघड टोपण नाव आहे. आणि टोपण नाव घेण्याचा उद्देशही उघड आहे. गांधीयुग हे एक तमोयुग होते, असे जे या पुस्तकात सांगितले आहे त्याला वैचारिक पातळीवर उत्तर देता येईल व ते द्यायला हरकतही नाही. पण अलीकडे असहिष्णुता वाढू लागली आहे. माणसे एकदम मुद्द्यावरून गुद्द्यावर येतात. सत्याचे संरक्षण सत्ता करतेच असे नाही. अशा वेळेला टोपण नाव घेणे हे आवश्यक होऊन बसते. खरे तर एकोणिसशेवीस या सालापासून गांधीयुग सुरू झाले आणि एकोणिसशे-एकोणपन्नास साली ते संपुष्टात आले. या कालखंडात दुसरे महायुद्ध घडले, साम्राज्यशाही छिन्नविच्छिन्न झाली आणि सर्व राष्ट्रांनाच स्वातंत्र्याची प्राप्ती झाली. हिंदुस्थानही याच कालखंडात स्वतंत्र झाला, या घटनेचा गांधींशी, स्वातंत्र्यविषयक चळवळीशी, अहिंसेशी म्हणण्याजोगा काहीही संबंध नव्हता. स्वातंत्र्य जणू काही आपल्यावर लादले गेले आणि तेही इंग्रजांना पसंत असणाऱ्या

अटींवर. गांधीयुगातच देशाची फाळणी झाली, संपत्तीचा नाश झाला, मनुष्यहत्या झाली आणि गांधीजींच्या अहिंसेचा आणि हिंदू-मुसलमान अनुनयाचा पुरता फजितवडा उडाला. या कालखंडाचा खराखुरा साद्यंत इतिहास जेव्हा कधी लिहिला जाईल तेव्हा जावो, पण या पुस्तकाने त्या इतिहासाची दिशा स्वच्छ दाखवून दिली आहे. कित्येक दिवसांत असे मूलगामी विवेचन आपल्याला वाचायला मिळाले नव्हते, असा अभिप्राय महाराष्ट्रातील काही विचारवंतांनी दिला.

अरुण सारथी यांना घटना आणि तिचा अन्वयार्थ कसा लावावा, याचे शास्त्र चांगले अवगत आहे. अरुण सारथींच्या लेखनात निर्भय आवेष असला तरी पूर्वग्रह नसल्याने त्या लेखनाचा दर्जा उंचावला आहे. जेव्हा कधी गांधीयुगाचा खरा इतिहास लिहिला जाईल तेव्हा आणखी विदारक सत्ये बाहेर येतील. ज्ञान आणि पांडित्य या दोन्ही गोष्टींची गांधीयुगात चेष्टा झाली. त्याउलट सांगकाम्या, मद्दड डोक्याच्या, अनुयायांना महत्त्व आले. या देशातील समाजकारण नासून जायला जी महत्त्वाची कारणे झाली त्यात ज्ञान व पांडित्य यांचा द्वेष हे महत्त्वाचे कारण आहे. गांधीयुगाचा आवेष आता ओसरला आहे, पण गांधीयुगात लावलेल्या कल्पवृक्षाच्या झाडाला कडू जहर फळे आली आहेत. आज आपले शासन अत्यंत सामान्य दर्जाच्या माणसांच्या हातात गेले आहे. एकदा मिडीऑकर लोकांची सवय झाली की, स्वतंत्र प्रज्ञेची माणसे नकोशी होतात.

अरुण सारथी यांनी मांडलेल्या अभ्यासपूर्वक शोधनिबंधाला सर्व तऱ्हेच्या शुभेच्छा.

—ग. वा. बेहेरे

# अनुक्रमणिका

१. स्वातंत्र्यपूर्व काल–अद्‌भुत पर्व- १–१७

भारतीय प्रबोधन (२–७)
गांधीयुग (७–११)
अद्‌भुत पर्व आणि महाराष्ट्र (१२–१७)

२. तमोयुगाकडे वाटचाल (१८–११३)

अद्‌भुत पर्वाची अखेर (१८)
इंग्रजी आणि देशी राज्यकारभार (१९)
स्वातंत्र्य एक : बौद्धिक आपत्ती (२०–२३)
दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाची गरज व नेहरू (२३–२४)
भ्रष्टाचार की दिशाहीनता (२४–२७)
तमोयुगाची सुरुवात (२७–३१)
नवा सत्ताधारी वर्ग (३१–३३)
महाराष्ट्राच्या नेतृत्वाची शोकांतिका (३४–३५)
मध्यमवर्ग (३५–४२)
नवा मध्यमवर्ग (४२–४४)
सामाजिक आदर्शांचा अभाव ? (४४–४६)
राजकीय सरंजामशाही आणि दलित (४६–५१)

महाराष्ट्रातील बौद्धिक जीवन :

शिक्षणक्षेत्र (५१-५९)
वृत्तपत्रे (५९-६६)
विद्वान आणि विचारवंत (६६-७३)

बौद्धिक गुलामगिरी

राज्यशास्त्र (७३-७४)
अर्थशास्त्र (७४-७५)
न्यायपद्धती (७५-७९)
इतिहास (७९-८४)
वैचारिक दास्य (८४-८८)
बुद्धिमंताची लाचारी (८८-९२)
साहित्यादि कला (९२-११०)
समारोप (११०-११२)
El Dorado (११२)

३. महाराष्ट्राची शोकांतिका

गांधी आणि गांधीवाद (११४-१४०)

# शुद्धिपत्र

सहज लक्षात येणाऱ्या, तसेच अनुस्वार आणि विरामचिन्हे यांच्या चुका दुरुस्त केलेल्या नाहीत.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६ | ५ | १८१४ | १८२४ |
| ७ | खा. १ | १९२७ | १९२० |
| २४ | १४ | फक्त सामाजिक | राजकीय |
| २८ | ३ | त्यातूनच | त्यातूनच सरंजामशाहीचा उदय झाला |
| २९ | खा. ६ | व तो न्यायच | व तो न्याय्यच |
| ४६ | खा. ८ | असते | नसते |
| ४९ | खा. ९ | त्यांच्या | त्यांच्या तोलाच्या |
| ५० | ८ | तिडके | तिरपुडे |
| ५५ | ३ | प्रगत | प्रगत अभ्यासक्रम ठेवावा लागेल. दुसरा प्रश्न असा की, सबंध राज्यभर एकाच |
| ५५ | १० | हा अभ्यासक्रम | हा अभ्यासक्रम झेपणारा नाही अशी सुप्त कबुली होती. पहिली गोष्ट म्हणजे अभ्यासक्रम |
| ७३ | ४ | ' नियतीचा | ' नियतीशी |
| ९२ | खा. ११ | निष्कर्ष | निकष |
| ९३ | खा. ९ | रॉबिन्सनने | रॉबिन्सने |
| ९५ | १९ | थकले | चकले |
| ९७ | ४ | थकलेच | चकलेच |
| १०३ | १० | संस्कृत | स्वकृत |
| १०४ | खा. ५ | नवलाईवर | नबळाईवर |
| ११५ | २० | मोडून | मांडून |
| ११६ | ३ | शकलो | शकू |
| [illegible] | [illegible] | [illegible]ंसेवकांनी | संघ स्वयंसेवकांनी |
| [illegible] | [illegible] | [illegible] | चुकतोस |

# एक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२६९
ग्रं. क्र. २५६३२


श्री. अ. र. अंतुले यांनाच मुख्यमंत्रिपदावर राहू द्यावे असे आवाहन करणारे पत्रक प्रा. टोपे, पं. महादेवशास्त्री जोशी प्रभृतींनी काही वर्षांपूर्वी काढले होते. त्याचा अधिक्षेप करणारा 'विचारवंतांचे वमन' या मथळ्याचा अग्रलेख महाराष्ट्र टाईम्सच्या संपादकांनी लिहिला होता. तेव्हापासूनच या विषयावर लिहिण्याचे माझ्या मनात घोळत होते. श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या 'सोबत'च्या १९८१ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'आजच्या महाराष्ट्रातील बौद्धिक शोकांतिका' या लेखाने त्याला चालना मिळाली. प्रस्तुत लेखात श्री. पाध्ये यांच्या लेखाला फक्त उत्तर नसून त्यांनी जी व्यथा व्यक्त केली आहे त्याच्या अनुरोधाने काही विचार मांडला आहे, काही प्रश्न उपस्थित करणार आहे, काहींची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणार आहे.

वस्तुतः श्री. पाध्ये यांच्यासारख्या व्यासंगी विचारवंतानेच या शोकांतिकेचा उगम व वाटचाल यांचा शोध घेणे आवश्यक होते. पण समाजाला वाळवी लागली आहे तिचे वर्णन काय करणार असे म्हणून लेखाचा शेवट केला आहे. म्हणून महाराष्ट्रातील विचारवंत मार्गदर्शन करतील व एका महत्त्वाच्या विषयाला चालना मिळेल या आशेने माझ्यासारख्या सामान्य वाचकाला प्रस्तुत लेखाचा प्रपंच करावा लागत आहे. ही अपेक्षा कदाचित फोलही ठरेल अशी भीती वाटते, कारण 'सोबत'च्याच दिवाळी अंकात माझे हिंदुत्ववाद्यात अधःपतन होत आहे अशी खंत व्यक्त केली होती. पण एकाही निधर्मीवाद्याला मला अधःपातापासून वाचविण्याची गरज भासली नाही.

श्री. पाध्ये यांनी बौद्धिक जीवनाची जी शोकांतिका वर्णन केली आहे ती महाराष्ट्राच्या सर्वंकष शोकांतिकेचाच एक भाग आहे. मराठी माणसाची आज प्रत्येक क्षेत्रात पीछेहाट आढळून येते. त्याने अभिमान बाळगण्यासारख्या दोन–चार गोष्टी वगळल्या तर सर्वच, क्षेत्रांत तो परावलंबित्वाचे लाचार जिणे जगत आहे. यापैकी एक अभिमानास्पद गोष्ट राम मनोहर लोहिया यांनी १९४६ साली पुण्याला एका भाषणात मुद्दाम उल्लेखिली होती. ती म्हणजे मुलींनी सर्रास सायकलीवर बसणे – आता स्कूटरवर बसतात. यात आणखी दोन गोष्टींची भर घालता येईल. त्या म्हणजे सहकारी साखर कारखाने आणि मुंबईमधील रसाच्या गुऱ्हाळाची महाराष्ट्रीयांची मक्तेदारी. यात आणखी घाऊक भाजी बाजार, फुलांचा व्यापार अशा काही गोष्टी शोधून शोधून घालता येतील.

महाराष्ट्राच्या शोकांतिकेची मुख्य कारणे आर्थिक व राजकीय आहेत व त्यांचा संबंध पर्यावरणामुळे विशिष्ट मनोवृत्ती बनते त्याच्याशीही जोडला जातो. या सर्वांचा साकल्याने

# शुद्धिपत्र

सहज लक्षात येणाऱ्या, तसेच अनुस्वार आणि विरामचिन्हे यांच्या चुका दुरुस्त केलेल्या नाहीत.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६ | ५ | १८१४ | १८२४ |
| ७ | खा. १ | १९२७ | १९२० |
| २४ | १४ | फक्त सामाजिक | राजकीय |
| २८ | ३ | त्यातूनच | त्यातूनच सरंजामशाहीचा उदय झाला |
| २९ | खा. ६ | व तो न्यायच | व तो न्याय्यच |
| ४६ | खा. ८ | असते | नसते |
| ४९ | खा. ९ | त्यांच्या | त्यांच्या तोलाच्या |
| ५० | ८ | तिडके | तिरपुडे |
| ५५ | ३ | प्रगत | प्रगत अभ्यासक्रम ठेवावा लागेल. दुसरा प्रश्न असा की, सबंध राज्यभर एकाच |
| ५५ | १० | हा अभ्यासक्रम | हा अभ्यासक्रम झेपणारा नाही अशी सुप्त कबुली होती. पहिली गोष्ट म्हणजे अभ्यासक्रम |
| ७३ | ४ | ' नियतीचा | ' नियतीशी |
| ९२ | खा. ११ | निष्कर्ष | निकष |
| ९३ | खा. ९ | रॉबिन्सनने | रॉबिन्सने |
| ९५ | १९ | थकले | चकले |
| ९७ | ४ | थकलेच | चकलेच |
| १०३ | १० | संस्कृत | स्वकृत |
| १०४ | खा. ५ | नवलाईवर | नबळाईवर |
| ११५ | २० | मोडून | मांडून |
| ११६ | ३ | शकलो | शकू |
| १३९ | ३ | स्वयंसेवकांनी | संघ स्वयंसेवकांनी |
| १३९ | खा. ७ | चकतोस | चुकतोस |

# एक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२६९
ग्रा. क्र. २५६३२
मं. खंड केंद्र घाटे
शाखा

श्री. अ. र. अंतुले यांनाच मुख्यमंत्रिपदावर राहू द्यावे असे आवाहन करणारे पत्रक प्रा. टोपे, पं. महादेवशास्त्री जोशी प्रभृतींनी काही वर्षांपूर्वी काढले होते. त्याचा अधिक्षेप करणारा 'विचारवंतांचे वमन' या मथळ्याचा अग्रलेख महाराष्ट्र टाईम्सच्या संपादकांनी लिहिला होता. तेव्हापासूनच या विषयावर लिहिण्याचे माझ्या मनात घोळत होते. श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या 'सोबत'च्या १९८१ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या 'आजच्या महाराष्ट्रातील बौद्धिक शोकांतिका' या लेखाने त्याला चालना मिळाली. प्रस्तुत लेखात श्री. पाध्ये यांच्या लेखाला फक्त उत्तर नसून त्यांनी जी व्यथा व्यक्त केली आहे त्याच्या अनुरोधाने काही विचार मांडला आहे, काही प्रश्न उपस्थित करणार आहे, काहींची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करणार आहे.

वस्तुतः श्री. पाध्ये यांच्यासारख्या व्यासंगी विचारवंतानेच या शोकांतिकेचा उगम व वाटचाल यांचा शोध घेणे आवश्यक होते. पण समाजाला वाळवी लागली आहे तिचे वर्णन काय करणार असे म्हणून लेखाचा शेवट केला आहे. म्हणून महाराष्ट्रातील विचारवंत मार्गदर्शन करतील व एका महत्त्वाच्या विषयाला चालना मिळेल या आशेने माझ्यासारख्या सामान्य वाचकाला प्रस्तुत लेखाचा प्रपंच करावा लागत आहे. ही अपेक्षा कदाचित फोलही ठरेल अशी भीती वाटते, कारण 'सोबत'च्याच दिवाळी अंकात माझे हिंदुत्ववाद्यात अधःपतन होत आहे अशी खंत व्यक्त केली होती. पण एकाही निधर्मीवाद्याला मला अधःपातापासून वाचविण्याची गरज भासली नाही.

श्री. पाध्ये यांनी बौद्धिक जीवनाची जी शोकांतिका वर्णन केली आहे ती महाराष्ट्राच्या सर्वंकष शोकांतिकेचाच एक भाग आहे. मराठी माणसाची आज प्रत्येक क्षेत्रात पीछेहाट आढळून येते. त्याने अभिमान बाळगण्यासारख्या दोन–चार गोष्टी वगळल्या तर सर्वच, क्षेत्रांत तो परावलंबित्वाचे लाचार जिणे जगत आहे. यापैकी एक अभिमानास्पद गोष्ट राम मनोहर लोहिया यांनी १९४६ साली पुण्याला एका भाषणात मुद्दाम उल्लेखिली होती. ती म्हणजे मुलींनी सर्रास सायकलीवर बसणे – आता स्कूटरवर बसतात. यात आणखी दोन गोष्टींची भर घालता येईल. त्या म्हणजे सहकारी साखर कारखाने आणि मुंबईमधील रसाच्या गुऱ्हाळाची महाराष्ट्रीयांची मक्तेदारी. यात आणखी घाऊक भाजी बाजार, फुलांचा व्यापार अशा काही गोष्टी शोधून शोधून घालता येतील.

महाराष्ट्राच्या शोकांतिकेची मुख्य कारणे आर्थिक व राजकीय आहेत व त्यांचा संबंध पर्यावरणामुळे विशिष्ट मनोवृत्ती बनते त्याच्याशीही जोडला जातो. या सर्वांचा साकल्याने

विचार करावयाचा म्हणजे एक प्रबंधच होईल. ते काम माझ्या कुवतीबाहेरचे आहे. त्यामुळे या अनेक अंगी शोकांतिकेच्या काही भागावरच प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणार आहे. या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, काही बाबतीत महाराष्ट्राची शोकांतिका ही राष्ट्रीय शोकांतिकेचाच एक भाग आहे तर काही बाबतीत तिचा संदर्भ महाराष्ट्रापुरताच मर्यादित आहे. त्यामुळे प्रस्तुत विवेचनाला काही ठिकाणी राष्ट्रीय परिमाण प्राप्त झाले आहे तर काही भागाचा संदर्भ महाराष्ट्रापुरताच मर्यादित आहे

महाराष्ट्राच्या, कदाचित भारताच्याही, बौद्धिक शोकांतिकेवर विचार करताना बौद्धिक क्षेत्रातील किंवा त्याच्यावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या घटकांचे विश्लेषण करणे अपरिहार्य ठरते. हे घटक म्हणजे १) शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथ, व्याख्याने, मासिके, साप्ताहिके, दैनिके, प्रदर्शने, रंगमंच, सिनेमा इ. २) लेखक, विचारवंत, प्राध्यापक, कलाकार इ. ३) ज्यांच्याशिवाय ही व्यासपीठे वैराण वाळवंटे बनतील असे विद्यार्थी, वाचक, श्रोते, प्रेक्षक इ. या घटकांचे विश्लेषण सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीच्या संदर्भात करण्याची नितांत आवश्यकता आहे. श्री. पाध्ये यांचा लेख वाचताना एक गोष्ट सहजच लक्षात आली की, बौद्धिक शोकांतिकेच्या संदर्भात स्वातंत्र्यपूर्व काल व स्वातंत्र्योत्तर काल असे दोन कालखंड त्यांना अभिप्रेत आहेत व पहिल्या कालखंडाच्या तुलनेत त्यांना दुसऱ्या कालखंडात ही शोकांतिका प्रतीत होते. प्रस्तुत लेखातही प्रामुख्याने या दोन कालखंडाच्या संदर्भातच बौद्धिक क्षेत्रातील महत्त्वाच्या घटकांचा घेण्याचा परामर्ष प्रयत्न केला आहे. या दोन कालखडांची तुलना करणे आवश्यकही आहे.

श्री. पाध्ये यांनी स्वातंत्र्यपूर्वकाल १९२० पर्यंतच सीमित ठेवला आहे. परंतु 'यथार्थ दर्शन' (परस्पेक्टिव्ह) होण्यासाठी एकोणिसाव्या शतकातील बौद्धिक जीवनाचा धावता आढावा या ठिकाणी घेणे इष्ट ठरेल.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यानंतर इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली व पाश्चात्य तत्त्वज्ञान, वाङ्मय, इतिहास, संस्कृती यांची ओळख भारतीयांना झाली. याचा परिणाम म्हणजे भारतीय तत्त्वज्ञान व संस्कृती यांचा पुनर्विचार सुरू झाला. प्रथम बंगालमध्ये व नंतर भारतात इतरत्र ही चळवळ पसरली व ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज. आर्यसमाज, रामकृष्ण मिशन, थिऑसॉफिकल सोसायटी आदी संस्था स्थापन झाल्या. परंतु या सर्व चळवळी सुशिक्षित व उच्चभ्रू वर्गापुरत्याच मर्यादित होत्या, व त्यांचा उगम पाश्चात्यांचे अनुकरण अथवा विरोध यांमध्ये होता. या चळवळींची पाळेमुळे हिंदुसमाजात कुठेच रुजली नव्हती. त्यांची स्फूर्ती उघड उघड परकीय होती व हाच या सर्व चळवळींचा दुबळेपणा होता. त्यामुळे या चळवळींचा परिणाम आधुनिक भारत निर्माण करण्यात न होता, भारतात बहुजन समाजाशी फटकून राहणारा असा भारतीय समाजात एक आधुनिक वर्ग निर्माण होण्यात झाला. चातुर्वर्ण्य मानणाऱ्या हिंदू संस्कृतीशी हे सुसंगतच होते.

१८५७ साली मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे विद्यापीठे स्थापन झाली. त्यांना जोडलेल्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओढा प्रामुख्याने वाङमय व कायदा

यांच्या अभ्यासाकडे असे व सरकारी नोकरी अथवा वकिली करणे ही त्यांची महत्त्वाकांक्षा असे. याचा परिणाम असा झाला की, सुशिक्षित वर्ग विज्ञानाभिमुख होण्याऐवजी त्याच्यात चाकरमनी वृत्ती निर्माण झाली. पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव ही वैशिष्टये असलेला सुशिक्षित वर्ग संस्काराने हिंदूच राहिला व त्या संस्कृतीशी विसंगत नसलेली अशी पाश्चात्य संस्कृतीची अंगे आत्मसात करू लागला. त्याचे परिणाम तीन झाले :

१) सुशिक्षित वर्गाचे प्रबोधन फक्त वैचारिक पातळीवरच होऊ शकले व त्यामुळे त्याची उक्ती व कृती यांच्याच अंतर राहिले. न्या. रानडे यांनी बालकुमारिकेशीच दुसरा विवाह केला आणि केशव चंद्रसेन यांनी आपल्या मुलीचा विवाह ब्रह्मसमाजाच्या तत्त्वाविरुद्ध बालपणीच केला. आजच्या बौद्धिक शोकांतिकेचे मूळ काही अंशी या प्रवृत्तीत शोधावे लागेल.

२) पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणाने बौद्धिक जीवनातील अनेक दालने, जी हिंदू संस्कारांशी विसंगत नव्हती अशी विकसित होऊ लागली. अशामध्ये साहित्य व कला यांचा प्रामुख्याने अंतर्भाव करावा लागेल.

३) पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्काने सबंध समाजाचे जीवन उन्नत होण्याऐवजी त्यांची व्याप्ती फक्त सुशिक्षित उच्चवर्णीयांपुरतीच मर्यादित राहिली. व बहुजनसमाज व सुशिक्षित वर्ग यांच्यातील सांस्कृतिक दरी अधिकाधिक वाढत गेली.

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, सर्वसाधारणपणे जित समाजातील उच्चवर्गीय हे आपापल्या परीने राज्यकर्त्या वर्गाचे अनुकरण करीत असतात. साहजिकच इंग्रजी राज्य स्थापन झाल्यानंतर सुशिक्षित वर्गाच्या सुसंस्कृत जीवनाबद्दलच्या कल्पनाही बदलू लागल्या. नाटकशाळा ठेवणे, कोठीवरची गाणी ऐकणे, तमाशा, उरूस, जत्रा यांना हजर राहणे या गोष्टींची प्रतिष्ठा नष्ट होऊन 'काव्यशास्त्रविनोदेन' जीवन व्यतीत करणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण समजले जाऊ लागले. इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनाने मराठी वाङ्मय समृद्ध होऊ लागले. साहित्य संमेलने भरू लागली, नाटके लिहिली गेली, त्यांचे प्रयोग होऊ लागले. चर्चा, वादविवाद हे धर्मग्रंथापुरते मर्यादित न राहता त्यांची व्याप्ती इतर क्षेत्रापर्यंत वाढली. इतिहास व अर्थशास्त्र यांच्या अभ्यासाने भारतीय पारतंत्र्याचा अन्वयार्थ निराळ्या तऱ्हेने लावण्यात येऊ लागला.

दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, रमेशचंद्र दत्त आणि इतर कित्येकांनी आर्थिक शोषण आणि विकास यांकडे लक्ष वेधले. आधी राजकीय सुधारणा की, सामाजिक सुधारणा यांवर वाद खेळले गेले. विल्यम जोन्सपासून व्हिन्सेन्ट स्मिथपर्यंत अनेकांनी भारताच्या प्राचीन इतिहासाचा शोध घेतला व तो अत्यंत उज्ज्वल असल्याचे दाखवून दिले. प्रिन्सेपने ब्राम्ही लिपी वाचण्याची पद्धत शोधून अशोकाचे व इतर शिलालेख उजेडात आणण्यास मदत केली. इंग्रजी इतिहास व राज्यशास्त्र यांच्या अध्ययनाने स्वातंत्र्य, राजकीय हक्क यांची जाणीव होऊन त्यांच्या प्राप्तीसाठी चळवळी संघटित करण्यात येऊ लागल्या. थोडक्यात

भारतामध्ये अभूतपूर्व असे बौद्धिक अभिसरण सुरू झाले होते. पण त्यांच्या मर्यादा व वैशिष्टये लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

१) इंग्रजी भाषा हा त्याचा मूलाधार होता.

२) ते उच्चवर्णीयांपुरते मर्यादित होते. युरोपातही प्रबोधन सुरुवातीला उच्च वर्गीयांपुरतेच मर्यादित होते. पण तिथे जातिव्यवस्था नसल्यामुळे त्याची व्याप्ती हळूहळू सर्व थरापर्यंत पोहोचली. भारतात प्रबोधन काही जातींपुरतेच वैचारिक स्तरावरच मर्यादित राहिले. आणि उच्चवर्गीय व हलक्या जाती यांच्याबरोबरीने सुशिक्षित व अडाणी हा भेद जातिभेदाच्या समकक्ष असा निर्माण झाला.

३) भारतीय जातिव्यवस्थेवर त्याचा कोणताही परिणाम झाला नाही. पण तिचे समर्थन करणे शक्य नाही व अस्पृश्यता हा कलंक आहे अशी जाणीव मात्र निर्माण झाली.

४) उच्चवर्णीय आणि बहुजनसमाज या दोहोंच्याही सरंजामी मनोवृत्तीत बदल घडून आला नाही (सरंजामीवृत्ती हा शब्द उच्चनीचतेच्या कल्पनेतून हुकुमत गाजवणे व गाजवून घेणे या अर्थाने योजला आहे.)

५) इंग्रजीसारख्या समृद्ध भाषेतील वाङ्मयाच्या अध्ययनामुळे बौद्धिक जीवनाचा दर्जा सर्वसाधारणपणे उच्च राहिला.

६) युक्तिवादाला युक्तिवादानेच उत्तर देण्याच्या राज्यकर्त्यांच्या परंपरेच्या अनुकरणाने भारतातही स्थूलमानाने तिचाच अवलंब करण्यात येत होता. अमर्याद सत्ता हाती असतानाही सरकार कोणत्याही धोरणाचे समर्थन करताना युक्तिवादाचाच आधार घेत असे. १९०४ सालचा विद्यापीठ कायदा पास करून घेण्यापूर्वी लॉर्ड कर्झनने एका परिषदेत भाषण करताना जो युक्तिवाद केला होता तो आज ऐंशी वर्षांनंतरही बोधप्रद वाटतो. श्री. पाध्ये यांनी विद्यापीठाबद्दल लिहिले असल्यामुळे हा उल्लेख मुद्दाम केला आहे. कर्झनच्या युक्तिवादाचा संदर्भ पुढे येईलच.

७) दैनिके आदी संपर्कमाध्यमांची संख्या मर्यादित असल्यामुळे त्यातील विचारांची दखल घेणे सर्वसामान्य वाचकांच्याही आवाक्यात होते.

८) सर्वात अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारताच्या बौद्धिक जीवनात, अँग्लो-सॅक्सन समाजाचे खास वैशिष्टय म्हणून गणला गेलेला, व्यवहारवाद (प्रॅग्मॅटिझम) प्रकर्षाने आढळतो. भावविवशता, भाबडेपणा, व्यक्तिपूजा, भोळसट आशावाद (ईश्वरी प्रेरणेचा–डिव्हाइन डिस्पेन्सेशन–सिद्धांत लक्षात घेऊनसुद्धा) यांचा अभाव हे या कालाचे एक प्रमुख वैशिष्टय होते. सुशिक्षित समाजाला आर्थिक व राजकीय प्रश्न व त्यांचे जटिल स्वरूप यांची सुस्पष्ट जाणीव होती. याच प्रश्नावर लक्ष केन्द्रित केल्यामुळे सामाजिक प्रश्नाबद्दल थोडीशी अनास्था असली तरी सामाजिक परिषदा भरत होत्या. ज्योतिबा फुलेसारख्यांनी स्त्रीशिक्षण व अस्पृश्यता या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा क्रियाशील प्रयत्न केला.

९) इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून सुरुवात झालेल्या साहित्यनिर्मितीत सर्जनशीलता

दृगोच्चर होऊ लागली. हरी नारायण आपटे, केशवसुत, बालकवी ठोमरे, इत्यादींच्या साहित्यकृती, किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी यांची नाटके ही त्यांची काही उदाहरणे. कारागीर, रंगारी म्हणून संबोधल्या जाणाऱ्यांना शिल्पकार व चित्रकार म्हणून मान मिळू लागला. बालगंधर्वासारख्या रंगमंचावरील कलावंतांना प्रतिष्ठा लाभली. संगीत हे केवळ कोठीवरचे गाणे न राहता ते बैठकीत आले. ना. गोखले यांनीही संगीत शिकण्याचा प्रयत्न केला होता अशी एक आख्यायिका सांगितली जाते.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात रुजलेल्या प्रबोधनाच्या बीजाला धुमारे फुटतील अशी लक्षणे दिसू लागली होती. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांतील सर्जनशीलता हे प्रबोधनाचे एक प्रमुख लक्षण मानले जाते बुद्धिनिष्ठ संशोधन व विज्ञानाभिमुखता ही त्याची आणखी दोन लक्षणे. आणि रुढीग्रस्त समाजातील मानवांचे बौद्धिक विमोचन ही त्यांच्या मागची प्रेरणा आहे. या दिशेने एकोणिसाव्या शतकात वैचारिक स्तरावर बरीच प्रगती झाली होती. पुढे राजकीय चळवळीवरच लक्ष केन्द्रित झाल्यामुळे प्रत्यक्ष सामाजिक जीवनात तिचा ठसा फारच अस्पष्ट उमटला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस तर सामाजिक सुधारणाच्या बाबतीत उदासीनताच नव्हे तर विरोधही प्रकट करण्यात येऊ लागला. स्वतःच्या मुलींची लग्ने त्या कालाच्या मानाने पुष्कळच उशीरा करणाऱ्या लो. टिळकांनी संमतीवयाच्या कायद्याला विरोध केला हे त्याचेच एक उदाहरण. शिवाय जातिव्यवस्थेची पाळेमुळे इतकी खोल गेली होती की, कालांतराने ब्रह्मसमाज व आर्यसमाज याही जातीच बनल्या.

या ठिकाणी ही गोष्ट अर्थातच लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये मध्ययुगातून अर्वाचीन युगात संक्रमण होत होते व संक्रमणकालात अशा विसंगती नेहमीच आढळतात. युरोपातही प्रबोधनकालात निव्वळ बुद्धिवादावर भर देण्यात येत नव्हता तर चर्च किंवा धर्मगुरू यांच्याऐवजी बायबलला प्रमाण मानण्यात येत होते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रबोधनाच्या दृष्टीने १८५७ चे बंड ही भारताच्या इतिहासातील अत्यंत दुर्दैवी घटना होती. इंग्रजांचे राज्य ज्या कालात भारतात स्थापन झाले तो काल युरोपच्याही इतिहासात अत्यंत महत्त्वाचा होता. फ्रेंच राज्यक्रांती होऊन गेली होती. नेपोलिअनचा पाडाव झालेला होता. पण फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम पुसून टाकणे १८१५ मध्ये व्हिएन्ना येथे जमलेल्या मुत्सद्द्यांना शक्य झाले नव्हते. युरोपात नवे वारे खेळू लागले होते. लोकशाही, समाजवाद, राष्ट्रवाद, उदारमतवाद इ. फ्रेंच राज्यक्रांतीतून निर्माण झालेले नवे विचारप्रवाह दृग्गोचर होत होते व त्यांनी प्रभावित झालेले इंग्रज राज्यकर्ते भारतात नवीन कल्पना राज्यकारभारामध्ये राबविण्याचा प्रयत्न करीत होते.

बेंटिकच्या आमदानीतील सुधारणा हा अपघात नव्हे. भारतात समानतेची कल्पना प्रथम जी आणली गेली ती १८३३ च्या चार्टर ॲक्टने. परिच्छेद ८७ मध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, कोणाही एतद्देशियास निव्वळ धर्म, जन्मस्थान, वंश अथवा वर्ण या कारणावरून कंपनीच्या नोकरीत प्रतिबंध रहाणार नाही. (इंग्रज राज्याची ही खूण लोकहितवादींनी

बरोबर ओळखली होती. एका पत्रात ते लिहितात की 'कालांतराने गवर्नरीची कामेदेखील नेटिवांवर सोपविली जातील' आणि इंग्रजी राजवटीतच चंदुलाल त्रिवेदी या भारतीयाची गवर्नर म्हणून नेमणूक झाली होती.) एलिफन्स्टन, मन्रो, मेटकाफ, मालकम यांसारखे कर्तबगार व भारतीयांबद्दल सहानुभूती असणारे अधिकारी कंपनी सरकारच्या नोकरीत होते. ३१ डिसेंबर १८१४ च्या मिनिटमध्ये मन्रो लिहितो की, कालांतराने भारतीयांचे प्रबोधन होऊन ते स्वतःचे सरकार बनवू शकतील आणि अशा वेळी इंग्रजांनी या देशातून पाय काढून घेणे दोघांच्याही दृष्टीने उत्तम ( बेस्ट ) होईल. वर उल्लेखिलेल्या लोकहित-वादींच्या लिखाणात याच भावनेची प्रतिध्वनी आढळतो.

या कालात (१८५७ पूर्वीच्या) सुशिक्षित भारतीय व इंग्रज राज्यकर्ते यांच्यात सामाजिक सुधारणांच्या बाबतीत सहकार्याची भावना आढळते. काही बाबतीत तर, विशेषतः दुष्ट चालीरीतींच्या संबंधात सरकार भारतीयांच्या पुढे एक पाऊल जाण्यास तयार होते. कायद्याने सतीची चाल बंद करण्यास राजा राममोहन रॉय यांचा विरोध असतानाही बेंटिकने तसा कायदा केला. त्याचप्रमाणे बालहत्या बंद करण्यात आली. ठगीचा नायनाट करण्यात आला. (सर्व आधुनिक साधने हाताशी असतानाही उत्तर भारतातील दरोडे-खोरीचा बीमोड करण्यात आजच्या सरकारला यश येऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर इंग्रजी शासनाचे मूल्यांकन व्हावे), पुढे पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नाने विधवा विवाहाचा कायदा संमत झाला.

१८५७ चे बंड झाले नसते तर सामाजिक सुधारणांना अधिकच वेग आला असता. पण बंडानंतर धार्मिक संबंधात ढवळाढवळ न करण्याचे धोरण इंग्रजांनी स्वीकारले, कारण सामाजिक सुधारणांपेक्षा साहजिकच साम्राज्य त्यांना अधिक महत्त्वाचे होते. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत जो धसका राज्यकर्त्यांनी घेतला तोच राजकीय पुढाऱ्यांनी घेतला. राजकीय आंदोलनात लोकांचा पाठिंबा असेल तर त्यांच्या धार्मिक समजुतींना धक्का लावणे चुकीचे आहे हा समज रूढ झाला. मला पुष्कळदा वाटते की, १८५७ चे बंड झाले नसते तर कदाचित अस्पृश्यता, विधवांचे केशवपन, हिंदु–मुसलमानातील बहुपत्नीत्वाची पद्धत, जबानी तलाक पद्धतीसारख्या बऱ्याच गोष्टी कायद्यानेच बंद करण्यात आल्या असत्या. समान नागरी कायदाही करण्यात आला असता आणि 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी कदाचित लिहिलीच गेली नसती. अर्थात हा जर तरचा प्रश्न झाला.

असे जरी असले तरी आर्थिक बाबतीत जो विचार १९२० पर्यंत मांडण्यात येत होता त्या दिशेने आर्थिक प्रगतीसाठी कसून प्रयत्न झाले असते तर आर्थिक परिस्थितीच्या दबावाखाली सामाजिक सुधारणांनीही वेग पकडला असता. पहिल्या महायुद्धात गरजेपोटी काही आर्थिक मागण्यांना मान्यता देणे इंग्रज सरकारला भाग पडले होते. आणि सामाजिक सुधारणांना आवश्यक असलेली वैचारिक बैठकही तोपर्यंत तयार झालेली होतीच. देवाला जर अस्पृश्यता मान्य असेल तर मी देवालाही देव मानणार नाही असे उद्गार लो. टिळकांनी काढले होते. गांधींच्या अस्पृश्यता विरोधी मोहिमेला त्यामुळेच पुढे विरोध

झाला नाही. म. गांधींनी वास्तविक एक पाऊल आणखी पुढे जाऊन जातिभेदाला विरोध करणे आवश्यक होते. पण जातिभेद हा ते कलंक मानीत नसल्यामुळे सामाजिक सुधारणेची हानीच झाली. २ गांधीयुग.

१९२० पर्यंत भारताच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक व बौद्धिक इतिहासाच्या प्रवाहात सातत्य व सुसंगती आढळून येते. आणि तो ओघ स्वतःच्या प्रकृतिधर्माप्रमाणे नैसर्गिकरित्या वाहात राहिला असता तर आर्थिक दृष्टचा प्रबळ आणि संसदीय राज्यपद्धतीवर आधारित असा बुद्धिनिष्ठ आधुनिक भारत निर्माण झाला असता व तशी लक्षणे १९१९ च्या मॉंटफर्ड सुधारणांच्या संदर्भात अमृतसर येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात सुधारणा राबविण्याचा जो ठराव पास झाला त्यावरून स्पष्ट दिसतात. लो. टिळकांनी कॉंग्रेसांतर्गत राजकीय पक्ष स्थापन करून निवडणुकी लढविण्याचा निर्णय घेतला होता.

१९२० सालानंतर हे सर्वच चित्र एकदम पालटले. 'तो आला, त्याने पाहिले व त्याने जिंकले' या चालीवर म. गांधींनी विश्वास बसणार नाही अशा थोड्या कालावधीत राजकारणाची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. लो. टिळकांच्या निधनामुळे म. गांधींच्याकडे निर्विवाद राजकीय नेतृत्व अत्यंत सुलभतेने आले. गांधीजींचे राजकारणातील महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी राजकीय व आर्थिक प्रश्न अत्यंत भयावह पद्धतीने सुलभ करून टाकले. जनसामान्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी असे थोडेसे सुलभीकरण आवश्यकही असते. पण नेत्यांना व समाजातील प्रबोधित वर्गाला या प्रश्नांच्या जटिल स्वरूपाची जाण असणे अत्यंत आवश्यक असते. सुदैवाने हे प्रश्न खरोखरच सोपे आहेत अशी म. गांधींची स्वतःची खात्री होती. त्यांना भारताच्या आर्थिक व राजकीय समस्यांचा कधीच उलगडा झाला नाही. उलट अशा समस्यांची उकल ज्या ज्या वेळी दृष्टीपथात आली त्या त्या वेळी त्याला त्यांनी मोडताच घातला.

१९१९ चा सुधारणा कायदा ज्या वेळी अंमलात आला त्यावेळी सत्तेच्या वाटणीत आपल्यालाही वाटा मिळावा म्हणून अनेक राजकीय गटांची धावपळ सुरू झाली होती. या सर्वांच्या राजकीय आकांक्षांचा समन्वय घडवून आणणे हे मुत्सद्देगिरीचे काम होते. त्यासाठी देवघेवीच्या वृत्तीची व व्यावहारिक दृष्टिकोनाची जरुरी होती आणि म. गांधींना हे केव्हाच जमणारे नव्हते. सर्वंकष सत्ता ज्याला हवी असते त्याला त्याला संघर्षाचे वातावरण सदोदित ठेवणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे १९२०, १९३०, १९४० अशी दहा दहा वर्षांच्या अंतराने त्यांनी चळवळीची योजना केली. १९२२ ते १९२८, म्हणजे 'चौरीचौरा' घटनेनंतरच्या कालात ज्या वेळी संघर्षाचे वातावरण निवळले होते त्या काळात गांधीजींच्या निर्विवाद नेतृत्वाला पायबंद बसला होता. पुन्हा जेव्हा संघर्षाचे वातावरण निर्माण झाले त्या वेळीच त्यांचे राजकीयदृष्टचा पुनर्वसन झाले. बॅ. जयकरांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे की, म. गांधींनी थोडासा व्यवहारी दृष्टिकोन ठेवला असता तर १९३५ चा कायदा १९३० सालीच अस्तित्वात येऊ शकला असता. हा इतिहास थोडक्यात देण्याचे कारण एवढेच की, सर्वसाधारणपणे १९२७ ते १९४७ पर्यंत देशात जे

संघर्षाचे वातावरण राहिले त्यामुळे म. गांधींना राजकीय नेतृत्व आपल्या हाती एकवटता आले.

म. गांधींची दुसरी कामगिरी म्हणजे त्यांनी राजकारणात भक्तिमार्ग आणला. गांधीजींच्यावर विश्वास ठेवा, त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे निष्ठापूर्वक अनुकरण करा म्हणजे त्यांच्या प्रसादाने स्वातंत्र्याचा मंगल कलश आणला जाईल अशी एक भावना जनसामान्यात बळावली. भक्तिमार्गात सामान्य माणसाला काही विधींची जरुरी असते व ती गरज चरखा व सूतकताईने भागविली. हे सर्व भारतीय संस्कृतीला धरूनच होते. कारण 'संभवामि युगे युगे' हे भारतीयांच्या हाडीमाशी खिळले आहे. द्वापारयुगातील चक्रधारी मोहन व कलियुगातील विसाव्या शतकातील चरखाधारी मोहनदास यांची सांगड घालणे हे भारतीय भाबडेपणाला शोभेसेच होते.

गांधीजींच्या जीवनाचा विचार करताना मला नेहमीच वाटते की, आपल्या व्यक्तिमत्त्वात ते कृष्ण, येशू ख्रिस्त व महमद पैगंबर यांचा मिलाफ करण्याचा प्रयत्न करीत असावेत. कारण ते कर्मयोगी होते. ख्रिस्ती धर्मातील काही कल्पना त्यांनी स्वीकारल्या होत्या व महमद पैगंबराप्रमाणेच श्रद्धावानांचा सेनानी होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा होती. कारण बऱ्याच ठिकाणी त्यांनी स्वतःच उल्लेख सेनानी म्हणून केला आहे. अर्थात हे श्रद्धावान शांततेचे सैनिक होते हा एक मुख्य फरक होता. कार्लाईलचा Hero and Heroship या ग्रंथात संग्रहित केलेल्या महमदावर दिलेल्या व्याख्यानाचा आपल्यावर प्रभाव पडल्याचे गांधींनी आपल्या आत्मचरित्रात आवर्जून नमूद केले आहे. हे सर्वच बुद्धिवादाला हानिकारक होते.

वर लिहिलेच आहे की, गांधीजींनी राजकरण सुलभ करून टाकले. राजकीय हक्क, नागरी स्वातंत्र्य, जबाबदार राज्यपद्धती, आर्थिक शोषण, असमतोल विकास वगैरे ज्या चर्चा १९२० सालापूर्वी चालत असत त्या जनसामान्यांच्या डोक्यावरून जात असत. सत्तांतराच्याच मार्गाने हळूहळू स्वातंत्र्यप्राप्ती होईल अशी तोपर्यंत राजकीय पुढाऱ्यांची श्रद्धा होती. गांधीजींनी हे सर्व एका झटक्यात बदलून टाकले. प्रियकरच केवळ प्रेयसीला आश्वासने देऊ शकेल अशा तऱ्हेची आश्वासने त्यांनी जनतेला द्यावयास सुरुवात केली. त्यांचा मार्ग अनुसरला तर एका वर्षात स्वराज्य मिळवून देण्याचे त्यांनी वचन दिले. असहकाराने एका वर्षात स्वराज्य ही कल्पनाच इतकी भुरळ घालणारी होती की सर्वसामान्य माणूस तिने पार भारून गेला. भारतीय जनता नेहमीच त्रात्याच्या शोधात असते. असा त्राता तिला गांधींच्या रूपाने लाभला आहे अशी श्रद्धा निर्माण झाली व तो काहीतरी चमत्कार करून स्वातंत्र्य आणणार अशी खात्री पटली. गांधीजींनी स्वराज्य हे अगदी हाताशी आलेले फळ करून टाकले.

जनमानसावर पूर्ण पकड बसण्यासाठी आणखीही एका आयुधाचा गांधीजींना उपयोग झाला, व हे आयुध सर्वच महात्म्यांनी वापरले आहे. वेदांना श्रुती म्हणतात. बुद्धाला बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली. येशू ख्रिस्ताला 'देवाचा मुलगा' ही उपाधी होती.

गॅब्रिएलने महमदाला कुराण ऐकविले. विसाव्या शतकात 'देव माझ्याशी बोलला' हे गांधीजींना म्हणणे शक्य नव्हते. त्याची भरपाई त्यांनी 'आतल्या आवाजाने' केली. याच्याच जोडीला उपोषणे, दुसऱ्यांच्या पापासाठी प्रायश्चित्ते (ही ख्रिस्ती धर्मातील कल्पना आहे. येशू ख्रिस्ताला उद्देशून– 'हे पहा देवाचे कोकरू, की, जे सर्व जगाच्या पापाचा भार आपल्या डोक्यावर घेत आहे' असा उल्लेख 'नव्या करारा'त आहे) याचाही अंगीकार केला. आणि हे मार्ग फक्त म. गांधींनाच उपलब्ध होते.

वास्तविक पाहता गांधीजींच्या भारतीय राजकारणातील उदयापूर्वीच, कित्येक शतके निद्रिस्त असलेला भारतीय समाज जागा होऊ लागला होता. त्याला खडबडून जागा करण्याचे सामर्थ्य गांधीजींच्यात निश्चित होते पण ते करण्याऐवजी त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाने त्याला एक प्रकारची झिंग आणली आणि भारतीय राजकारणात, जगाच्या इतिहासातील एका अद्‌भुत पर्वाला सुरवात झाली. राजकारणातील या 'रोमँटिक' कालाचे पडसाद जीवनाच्या इतर क्षेत्रातही उमटले.

एक अपार असा उत्साह लोकांच्या मनात दाटला होता. आणि त्याचे कारण निव्वळ महात्मा गांधींच्या मोठेपणात नव्हते. टिळक, आगरकर हीही मोठी माणसेच होती. न्या. रानडे तर त्यांच्याहूनही मोठे होते. ग. त्र्यं. माडखोलकरांनी त्यांना एका लेखात प्रेषित म्हणून गौरविले आहे. डॉ. आंबेडकरांनीही 'रानडे, गांधी आणि जीना' या पुस्तकात त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त केला आहे. त्यांचा व्यापक दृष्टिकोन फक्त राजा राममोहन रॉय यांच्यात आढळतो. पण या सर्वांचा दृष्टिकोन बुद्धिवादाकडे झुकणारा होता.

गांधीजींचे निर्विवाद प्रभुत्व याचे मूळ त्यांनी सामान्य माणसाच्या भावनांना आवाहन ज्या स्तरावर केले त्यात आढळते. मनुष्य जीवन हे तीन स्तरांवर जगले जाते. पाशवी, हलक्या स्तरावरील मानवी व उच्च स्तरावरील मानवी. पाशवी प्रेरणांचे उन्नत्तीकरण आणि मानवी स्तरावरील प्रेरणांचे अधिकाधिक मानवीकरण (ह्यूमॅनिझम) यांची प्रबोधनाला अत्यंत गरज असते. सातत्य टिकविण्यासाठी नर-मादी संबंध सर्वच योनीत आढळतात, इतकेच नव्हे तर वनस्पती जीवनातही आढळतात. पण या संबंधाचे उन्नतीकरण मानवाने पति-पत्नी, प्रियकर-प्रेयसी यांच्या प्रेमात केले. गांधीजींनी वैयक्तिक आयुष्यात आपल्या पत्नीला कशी वागणूक दिली हे या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहे.

राजकारणातही गांधीजींचे आवाहन होते ते हलक्या स्तरावरील मानवी प्रेरणांना होते. मानवात विधायक व विध्वंसक अशा दोन्ही प्रेरणा असतात. विधायक प्रेरणांना काही वेळेला विध्वंसक प्रवृत्तीची गरज असते. कारण जे त्याज्य आहे, जे कालबाह्य झालेले आहे त्याचा विध्वंस केल्याखेरीज नवीनाचा स्वीकार करता येत नाही. या दोहोंचा मेळ घालणे हे केवळ महापुरुषांनाच शक्य असते. बुद्धाला ती दृष्टी होती. आणि आधुनिक भारतात राम मोहन रॉय व न्या. रानडे यांना होती. अशांच्याकडून स्फूर्ती घेऊनच समाजाचे पुढारी समाजाची प्रगती घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असतात. गांधीजींच्याकडून ही अपेक्षा करणे व्यर्थ होते. सरंजामी वातावरणात गेलेले बालपण, त्यानंतर त्यांनीच वर्णन केलेले

अनुभव यातून एक न्यूनगंड व एकारलेले व्यक्तिमत्त्व तयार होत होते.

गांधीजींचा हा न्यूनगंड त्यांच्या सबंध आयुष्यात उच्चगंडाचे स्वरुप घेऊनच बाहेर पडतो. त्यांनी आपल्या राजकीय जीवनात विरोध कधीच सहन केला नाही, समान पातळीवर इतरांशी संवाद साधणे त्यांना कधीच शक्य झाले नाही. राजकीय दृष्ट्या दुबळे असलेल्यांना नेस्तनाबूत करण्यात त्यांनी नेहमीच आनंद मानला. सुभाषचंद्र बोस यांना त्यांनी दिलेली वागणूक पुष्कळ काही सांगून जाते. राष्ट्रवादी जीनांना त्यांनी नेहमीच अव्हेरले. तर जातीय जीनांना त्यांनी कायदे आझम म्हणून गौरविले आणि त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आटापिटा केला. नैतिक जीवनही ते खालच्या बौद्धिक स्तरावरच जगले. ब्रह्मचर्य ही एक मानसिक अवस्था असते हे त्यांना कधीच समजले नाही. त्यामुळे इंद्रियदमनाचा स्वतःवर केलेला अत्याचार हा शेवटी शेवटी त्यांनी ब्रह्मचर्याचे जे विकृत प्रयोग केले त्यात परिणत झाला.

ज्या बौद्धिक पातळीवर ते जीवन व्यतीत करीत होते त्या पातळीवरून त्यांनी जे आवाहन केले ते साहजिकच भारतीयांच्यातील विध्वंसक प्रवृत्तीला होते. असहकार हा सहकार्यापेक्षा सोपा असतो. कायदे पाळायला लावणे हे कायदा मोडण्यापेक्षा अतिशय अवघड असते. दया ही मानवतेपेक्षा अहंकार सुखावणारी असते. आणि गांधीजींचे आवाहन या सहज साध्य गोष्टींना होते. साधकाच्या दृष्टीने इंद्रियसंयमनापेक्षा इंद्रियदमन, संयत गृहस्थाश्रमी जीवनापेक्षा ब्रह्मचर्य, शहाण्या स्वार्थापेक्षा आंधळा स्वार्थत्याग हे अधिक सुलभ असतात, तर सामान्य माणसाला या गोष्टी अशक्यप्राय असल्यामुळे त्यांचा आविष्कार ज्यांच्या जीवनात आढळतो त्यांच्याबद्दल विलक्षण आकर्षण व श्रद्धा वाटते. आणि यामुळे साधकाचा अहंकार सुखावतो व त्याने प्रत्यक्ष जीवनात जे गमावलेले असते त्याची पुरेपूर भरपाई झाल्यासारखे त्याला वाटते. गांधीजींचे आवाहन याही वर्गाला होते व अशा व्यक्ती त्यांच्या आश्रमवासी झाल्या. विनोबा भावे हे त्यांपैकी एक. अशा तऱ्हेने महात्मा गांधी, त्यांचे आश्रमवासी साधक, देशभक्तीने भारल्यामुळे कोणताही त्याग करण्यास तयार असलेले भारतीय यांची एक साखळी तयार झाली व तिने भारतीयातील विध्वंसक वृत्तीचा असा प्रचंड प्रवाह निर्माण केला की, त्यात इंग्रजांचे राज्य नामशेष होणार याबद्दल कोणालाही शंका राहिली नाही.

गांधीजींनी या विध्वंसक शक्तीबरोबर विधायक प्रवृत्तींनाही संघटित करण्याचा प्रयत्न केला असता तर भारताचा कायापालट झाला असता, कारण विधायक प्रवृत्ती बुद्धिनिष्ठेतून निर्माण होते. चरखा व सुतकताई यांना विधायक कार्य म्हणणे म्हणजे त्या शब्दाची चेष्टाच होय. आणि अशा तऱ्हेच्या 'विधायक' कार्याचे सूत्र गांधीजींच्या नीतिविषयक कल्पनांना शोभणारेच होते. स्वतःचे पोट भरण्यास आठ तास काबाडकष्ट करावे लागले म्हणजे थकून गेल्यामुळे माणसाला पापविचार मनातदेखील आणायला उत्साह वाटणार नाही अशी त्यांची श्रद्धा होती.

गांधीजींनी संघटित केलेली विध्वंसक शक्ती, निर्माण केलेला भक्तिभाव, सामान्य

माणसाला सहज साध्य अशा प्रेरणांना केलेले आवाहन, आत्मक्लेशाला दिलेले अवाजवी महत्त्व, राजकीय व आर्थिक प्रश्नांचे केलेले सुलभीकरण, त्यांची त्राता व युग पुरुष अशी निर्माण झालेली प्रतिमा, सतत तापत ठेवलेले संघर्षाचे वातावरण, स्वातंत्र्य अगदी हाताशी आले आहे असा निर्माण केलेला आभास, त्यांनी स्थापन केलेले आश्रम व त्यात गांधीजींनी घालून दिलेला कार्यक्रम आचरणात आणणारे अंतेवासी स्त्रीपुरुष, यांनी एक झपाटलेले वातावरण निर्माण झाले. याच काळात कम्युनिस्ट पार्टी पण स्थापन झाली व मार्क्स आणि त्याचे खलिफा लेनिन आणि स्टॅलिन यांचे विचार प्रसृत होण्यास सुरुवात झाली. एकाचवेळी दोन प्रेषित व त्यांचे भक्त यांनी सबंध जीवन ढवळून काढले. शब्दप्रामाण्यवादाने बुद्धिवादावर मात केली. काँग्रेसमधील मतभेद गांधींच्या आदेशाने सुटू लागले तर कम्युनिस्ट मार्क्स–स्टॉलिन–लेनिन यांचा शब्द प्रमाण मानू लागले. मुसलमानांच्या बाबतीत बुद्धिवादाचा प्रश्न कधी उपस्थितच होऊ शकत नव्हता. श्रद्धेने विवेकबुद्धीची जागा घेतली व या गदारोळात भारतात मूळ धरू लागलेल्या प्रबोधनाची वाताहात झाली.

श्रद्धेने भारून टाकलेल्या या युगात सामान्य माणूसही झपाटून गेला. एका हातात गीता, कुराण व बायबल व दुसऱ्या हातात चरखा घेऊन इंग्रजांचे राज्य बुडविण्यास निघालेल्या या महात्म्यावर परदेशातील लोकही पुष्पवृष्टी करीत आहेत हे दृश्य पाहून एका अपार श्रद्धेने तो या घडामोडीकडे पाहू लागला. त्याला काहीतरी भक्तिभावाने ऐकावयाचे होते. ते ऐकल्यानंतर महात्मा गांधी की जय म्हणून हात जोडावयाचे होते किंवा इन्किलाब झिंदाबाद म्हणून ओरडायचे होते. रोखठोक व्यवहारवादाची जागा स्वप्नरंजनाने घेतली होती व हे स्वप्न स्वतंत्र भारतातील सुखी जीवनाचे होते. सुशिक्षित भारतीयाला सर्वच वादांमध्ये रस निर्माण झाला होता, व कोणता वाद भारताला अधिक फलदायी याची माहिती करून घेण्याची त्याला उत्सुकता होती. त्यामुळेच 'वाद विवेचन माला' तोटयात गेली नाही. 'तिरंगी नवमतवाद,' 'मराठे आणि इंग्रज,' 'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र' अशा पुस्तकातही त्याला गोडी वाटत होती.

दुर्लभ अशा गोष्टी हस्तगत झाल्याच आहेत अशा कैफात भारतीय जनता होती. अडथळा फक्त इंग्रजांचा होता. व महात्मा गांधींनी चमत्कार घडवून स्वातंत्र्य मिळविले म्हणजे भारतात नंदनवन अवतरणार अशी तिची खात्री होती. सेतू बांधला जात असताना खार आपल्या कुवतीप्रमाणे वाळू आणून टाकत होती. त्या खारीच्या भावनेने सामान्य माणूस आपल्या ताकदीप्रमाणे स्वातंत्र्यासाठी काहीतरी करू इच्छित होता. राजकीय हक्क, लोकशाही, संसदीय पद्धत, आर्थिक विकास या क्लिष्ट व न समजणाऱ्या गोष्टीसाठी भांडण्यापेक्षा 'सायमन परत जा.' हे ओरडणे त्याला अधिक आकर्षक वाटत होते. शाळा–कॉलेजात न जाणे, खादी वापरणे, सुतकताई करणे, कायदा मोडणे, मूठभर मीठ उचलणे यांनी स्वातंत्र्य जवळ येणार आहे व आपला उद्धार होणार आहे असे त्याला मनोमन पटले होते. राष्ट्र उभारणीसाठी योजनाबद्ध रीतीने अपार कष्ट करावे लागतात, शिस्तबद्ध जीवन व्यतीत करावे लागते याची त्याला सुतराम कल्पना नव्हती. स्वतःला काहीतरी

नाकारले म्हणजे झाले यापलीकडे त्याच्या मनात दुसरे काहीही नव्हते.

या 'अद्भुत' वातावरणाचा परिणाम एकंदर बौद्धिक व सांस्कृतिक जीवनावर आढळून येतो. वाङ्मय, वर्तमानपत्रे, मासिके, ही सर्वसामान्य माणसाची बौद्धिक गरज भागविणारी साधने. शिल्पकला, चित्रकला ही त्यामानाने अतिशय लहान असा रसिक वर्गाची क्षेत्रे. या क्षेत्रात सर्जनशीलता किती आढळते, तंत्रावर किती भर होता, अनुकरण किती होते यासंबंधी त्या त्या विषयातील तज्ज्ञांनीच लिहिणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही राष्ट्राच्या बौद्धिक व सांस्कृतिक जीवनाचा दर्जा प्रत्येक क्षेत्रात सर्जनशीलता किती आढळते यावरच अवलंबून असतो. ३. अद्भुत पर्व व महाराष्ट्र

इतर क्षेत्रात भाबडेपणा, भावविवशता, भोळसट ध्येयवाद लोकानुरंजन, ऐतिहासिक घटनांचे आणि व्यक्तीचे उदात्तीकरण या गोष्टी आढळतात. दैनिके आणि नियतकालिके ही सर्वसामान्य माणसाच्या बौद्धिक जीवनाची प्रमुख अंगे. त्यांचा विचार करताना असे आढळते की, त्यांपैकी प्रत्येकाचे नाव एक विवक्षित पक्ष किंवा व्यक्ती यांच्याशी निगडीत राहिले. नवयुग म्हणजे अत्रे, विविधवृत्त म्हणजे तटणीस, दात्यांचा काळ, नवऱ्यांचा प्रभात, किर्लोस्कर प्रकाशने म्हणजे शं. वा. कि. अशी समीकरणे झाली होती. पुण्याचा सकाळ, ज्ञानप्रकाश, प्रभात, केसरी, लोकशक्ति, मुंबईचा लोकमान्य, नवाकाळ, प्रभात, नवशक्ति, इंग्रजी दैनिके, मासिकात किर्लोस्कर प्रकाशने, चित्रमयजगत, साप्ताहिकात विविधवृत्त, नवयुग, चित्रा, धनुर्धारी, मौज असा एकंदर आटोपशीर संसार होता. यामध्ये काहींचा उल्लेख राहून गेला आहे. यांपैकी प्रत्येकाला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व होते व सर्वांचा परमार्ष घेणे सामान्य वाचकाला शक्य होते. दुसरे म्हणजे निव्वळ लोकरंजन आणि नफा कमावणे हा यांचा हेतू नसे, तर काही ध्येय किंवा दृष्टिकोन समोर ठेवून यांपैकी बऱ्याच जणांचे कार्य चालले होते. पटलेल्या गोष्टी भाविकपणे किंवा निर्भीडपणे दुसऱ्याला पटवून देणे व विरोधी मतांवर कडवेपणाने हल्ला करणे, प्रसंगी व्यक्तिगत, निंदानालस्ती, चारित्र्यहनन अशा तऱ्हेचे या संपर्क माध्यमाचे परस्पर संबंध होते. ती चालविणारांच्यात निष्ठा, कळकळ आणि श्रद्धा होती. त्यामुळे कडाक्याचे वाद चालत. ते काही वेळा खालच्या पातळीवर गेले तरी त्यात प्रामाणिकपणा होता. व त्यामुळे सर्वसामान्य वाचकही त्यात गुंतला जात होता. तोही आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यास उत्सुक असे.

पण काही अपवाद वगळता या माध्यमांची प्रेरणा बुद्धिवादाऐवजी व्यक्तिपूजेत होती. गांधीजींचे भक्त, सावरकरांचे भक्त, मार्क्स–स्टॅलिन–लेनिन यांचे भक्त आणि या सर्वांचे आणि एकमेकांचे तितकेच कडवे विरोधक अशी बहुरंगी लढत होती. तीत कडवेपणा होता, पण खोटेपणा नव्हता. लोकांची सहानुभूती मिळविण्यासाठी योग्यायोग्य आयुधांचा वापर केला जात होता. पण विक्रेत्याचा भाडोत्री आवेश नव्हता. असे जरी असले तरी याचा सर्वसाधारण वाचकावर साकल्याने जो परिणाम झाला तो प्रबोधनाच्या दृष्टीने अत्यंत हानिकारक होता. ज्या आवेशाने हल्ले–प्रतिहल्ले केले जात होते त्यातून बोध घेण्याऐवजी साठमारी पाहिल्याचाच आनंद होत असे. पंचरंगी क्रिकेट सामने व अशा तऱ्हेच्या वादात

फारसा फरक नव्हता. राष्ट्रीय चळवळीत अनुस्यूत असलेल्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नाचे यथायोग्य आकलन होण्याऐवजी तिच्या कडेकडेने चाललेल्या आकर्षक चकमकीतच सामान्य माणूस गुंग होऊन गेला होता.

प्रत्यक्ष स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ज्या वेळी हे प्रश्न आ वासून उभे राहिले, त्या वेळी काहीतरी अघटित, कल्पनातीत घडत आहे. अशा कल्पनेने तो बावचळून गेला. पण अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी जी उमेद लागते ती त्याने भावनेच्या भरी पडून आधीच गमावली होती. भ्रमनिरास किंवा फार उशीरा आलेली जाण यांची परिणती माणसाला हतबद्ध किंवा ' सिनिक ' बनवते. व त्यातच राष्ट्राच्या ऱ्हासाची बीजे असतात.

साहित्यात फडके, खांडेकर, माडखोलकर या मातबर कादंबरीकारांच्या लेखनात सर्जनशीलता किती आणि निव्वळ उथळ चित्रण किती यावर कोणी समीक्षकाने प्रबंध लिहिला आहे का याची मला माहिती नाही. पण एक सामान्य वाचक म्हणून एवढेच वाटते की, खांडेकरांचा भाबडा ध्येयवाद, फडके याचे मध्यमवर्गीय तरुण-तरुणींच्या प्रेमाचे उथळ चित्रण व माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्यातील व्यक्तिचित्रे यांना फक्त तत्कालीन महत्त्व आहे. क्षणिक हुरहुर वाटायला लावणे, आपल्याला प्रत्यक्ष जीवनात जो त्याग करता येत नाही किंवा आनंद उपभोगता येत नाही त्याचे चवीने वाचन करणे किंवा प्रत्यक्ष जीवनात ज्या व्यक्ती आढळतात त्यांचे चेहरे कादंबऱ्यात सापडल्याचा आनंद होणे अशा तऱ्हेचा खालच्या स्तरावरील रसास्वाद वाचकांना देणे एवढीच या कादंबरीकारांची कामगिरी. वर लिहिलेच आहे की, गांधींनी राजकारण सुलभ करून टाकले होते. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही राजकारणाप्रमाणेच अत्यंत उथळ झाला होता. त्याचे प्रतिबिंब या कादंबरीलेखनातही आढळते.

फडके, खांडेकर, माडखोलकर या तिघाही लेखकांच्या कादंबऱ्यात समान सूत्र आढळते. ते म्हणजे सुलभ समस्यांची सुलभ मांडणी व त्याची सुलभ सोडवणूक. लहान मुलाला एखादे सोपे कोडे घालावे व नंतर ते आपणच सोडवून दाखवावे या बौद्धिक पातळीवर लेखक--वाचक संबंध येतात. मानवी जीवन अतिशय गुंतागुंतीचे असते. त्याचा वेध घेताना स्वतःच्या सहानुभूतीच्या कक्षा व्यापक करून त्या कादंबरीतील पात्रांच्या व्यक्तिरेखेपर्यंत भिडविणे व त्याचा आस्वाद वाचकापर्यंत पोचविण्याची ताकद असणे, वाचकाची अभिरुची अधिकाधिक प्रगल्भ करणे, त्याच्यातील मानवतेच्या मूल्यांना आवाहन करणे, यांचा सर्वच लेखनात अभाव जाणवतो. राजकारणाप्रमाणेच सपक, सुलभ, अल्पजीवी, बालसुलभ आनंद देणारे आणि तरीही प्रासंगिक महत्त्वामुळे वाचकांना भारून टाकणारे असे त्याचे वर्णन करता येईल. वाचकाला खालच्या बौद्धिक स्तरावर आणण्यास सुरुवात झाली होती व तिचा कळस गाठला तो सानेगुरुजींच्या भाबड्या व भावविवश लेखनाने.

सानेगुरुजींच्या जीवनाबद्दल मला नितांत आदर आहे. समीक्षकांचे मत काहीही असले तरी त्यांची ' शामची आई ' हे मराठी साहित्याचे लेणे आहे असे माझे मत आहे. शोकांतिकेला लागणारा कोणताही मसाला न वापरता साध्यासुध्या कौटुंबिक समस्यातून वाच-

काला करुणाप्रवण करून त्याच्या डोळयाला पाणी आणणे व कुटुंबापुरत्या का होईना पण त्याच्या सहानुभूतीच्या कक्षा व्यापक करणे हे त्यांनी साध्य केले. माझ्या पिढीतील प्रत्येकाच्या मनाच्या कप्प्यात 'शामची आई' रेंगाळत आहे. अशीच भावना प्रा. वसंत बापट यांनी आकाशवाणीवरील एका भाषणात व्यक्त केली होती.

पण हा अपवाद सोडला तर सानेगुरुजींनी आम्हाला हळवे, भावविवश व्हायला, आई-वडिलांच्या मायेच्या पंखाखाली राहून क्रांतिकारकांच्या आठवणींनी गहिवरायला, चारदोन दिवस शाळा-कॉलेजला बुट्टी मारून स्वातंत्र्य जवळ आणल्याच्या आणि राष्ट्रकार्य केल्याच्या समाधानात दंग व्हायला, चार–दोन आडबाजूची स्टेशने जाळल्याच्या बातमीने शौर्यगाथा वाचल्यासारखे वाटायला, निरुपद्रवी बुलेटिन वाचून किंवा वाटून वीरकृत्य केल्याच्या आवेशात राहायला, भूमिगतांचा जो लपंडाव इंग्रजांबरोबर चालला होता त्याने भारून जायला आणि इंग्रज जाताच इथे लोकराज्य व सुराज्य नांदणार ही श्रद्धा बाळगायला शिकविले. थोडक्यात गांधीजींच्या विध्वंसक कार्यक्रमातील जो भाग त्यांच्यातील स्त्री–हृदयाला आणि बालमनाला झेपला तेवढा टिपून त्यांनी आमच्या संस्कारक्षम मनावर बिंबवला.

राष्ट्रभक्ती सुलभ झाली तर राष्ट्र उभारणीची कल्पनाही आम्हाला येऊ शकली नाही. प्रत्यक्ष जीवनात जी आव्हाने येतात ती स्वीकारायला अपेशाने खचून न जाता पुन्हा उमेदीने लढण्यास जी जबरदस्त मानसिक ताकद लागते ती असणारे सकस व्यक्तित्व या कालातील लेखनाने निर्माण होणे निव्वळ अशक्य होते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर जो भ्रमनिरास झाला तो पचवून पुन्हा हिमतीने उभे राहणे आम्हाला अशक्य झाले. पण आम्ही तसेच पिचत राहिलो तर सानेगुरुजींनी आत्महत्या करून त्यातून स्वतःची सुटका करून घेतली. स्वातंत्र्यानंतरच्या भ्रमनिरासातून निर्माण झालेल्या औदासिन्यात आजच्या बौद्धिक शोकांतिकेचे मूळ शोधावे लागेल. तुरुंगातून सुटल्यानंतर 'पुनश्च हरि ॐ' हा अग्रलेख लिहिणारे लो. टिळक आणि १९४२ चा 'लपंडाव' इंग्रजांनी एकतर्फी संपविल्यानंतर 'माझ्यासमोर अंधेर दिसत आहे' हे उद्‍गार काढणारे बाळासाहेब खेर हे त्या त्या काळाचे प्रतिनिधित्व करतात. या दृष्टिकोनातून या कालातील इतर लेखनाचे मूल्यमापन होण्याची गरज आहे. कारण प्रचलित जीवनाचे प्रतिबिंब कोणत्याही तऱ्हेच्या लेखनात अपरिहार्यपणे पडते. त्या दृष्टीने नाथमाधव, हडप, ना. ह. आपटे वगैरेंच्या लेखनाचा विचार अवश्य आहे.

सर्वच समीक्षकाच्या मते १९२० पर्यंतचा काळ नाट्यलेखनाच्या दृष्टीने उत्कर्षाचा होता. त्यानंतर याही क्षेत्रात उतरणीचा काळ सुरू झाला. सिनेमाची स्पर्धा साधारण १९३० सालानंतर जाणवू लागली. त्यामुळे सिनेमा त्याचे कारण होऊ शकत नाही. मग त्याचा संबंध राजकारणाचा जो उथळ खळखळाट सुरू झाला होता त्याच्याशी जोडता येईल काय ? कोल्हटकर, खाडिलकर लिहीत राहिले पण त्यांच्या लेखनातील कलात्मकता ओसरू लागली होती. कदाचित वयाचा परिणाम असू शकेल ! पण वरेरकरांची

प्रचारकी नाटके, माधवराव जोशी यांच्या नाटकातील खालच्या दर्जाचा विनोद, वीर वामनराव जोशी यांच्या नाटकातील भडक व्यक्तिरेखा आणि उदात्त भावना, उमाजी नाईक व तंट्या भिल्ल यांचे उदात्तीकरण, यांचा संबंध राजकारणात रोमँटिक काल सुरू झाला होता त्याच्याशीच जोडावा लागेल.

वा. वा. भोळे यांच्या अरुणोदय नाटकात तर उघड उघड राष्ट्राचे स्वातंत्र्य व जनतेचे हक्क हीच मध्यवर्ती कल्पना आहे. तर टेंबे यांच्या 'पटवर्धन' नाटकात स्वदेशी कापडाचा पुरस्कार केला आहे असे एका ठिकाणी मी वाचले आहे. राजकारणात जे भक्तियुग सुरू झाले होते त्याला अनुसरून अनेक भक्तिरसप्रधान नाटके या कालात लिहिली गेली स. अ. शुक्लांनी मीराबाई, स्वर्गावर स्वारी, संगीत सत्याग्रही ही नाटके लिहिली. त्यातल्या शेवटच्या नाटकाचे नावच राजकारणाचा प्रभाव दर्शविते. कीचकवध नाटकात भीम स्वपराक्रमाने कीचकाचा वध करतो तर भक्तिरसप्रधान नाटकात सर्वसाधारणपणे परमेश्वर अवतार घेऊन संकटातून सुटका करतो अशा तऱ्हेची मांडणी आढळते. अशा तऱ्हेची नाटके स्वकर्तृत्वावरचा विश्वास उडवून राजकारणातील गांधीसांप्रदायाची प्रेरणा बळकट करीत होती.

'रुद्रास आवाहन' या कवितेत हीच भावना आढळते. भावकवितेला बहर याच कालात आला. काव्यक्षेत्रातही हा काल रोमँटिक समजला जातो. भा. रा. तांबे हे त्याचे अध्वर्यू. भावविव्हल होणे ही एक फॅशन होती. मध्यमवर्गीय सामान्य माणसाच्या भावनांना आवाहन करणाऱ्या कवितांना त्यांनी सुरुवात केली. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' असा जीवनाला सामोरा-जाणारा दृष्टिकोन ठेवणाऱ्या कवितांची जागा 'जन पळभर म्हणतील हाय हाय' अशा भावविवश कवितांनी घेतली. जीर्ण पाने गळलीच पाहिजेत. त्यांना विसरून जायला पाहिजे. नव्या पालवीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच जग सुंदर राहील हा विचार अशा कवितेत आढळत नाही. याउलट कुसुमाग्रजांच्या कवितेतील,

सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते ।
उठतील त्या ज्वालामधुनी भावी क्रांतीचे नेते ।।

या ओळी नुसताच भविष्यकाळाचा वेध घेत नाही तर मृत्यूच्या कल्पनेचे उदात्तीकरण वास्तवाच्या पायावर करतात.

गांधी युगातील भोळसट आशावाद आणि भावविव्हलता, तांबे यांच्याच कवितेतील एका कडव्यात नेमकेपणाने व्यक्त झाली आहेत.

वाटले उतरता नाथ तुम्ही खाली
दे असहकारिता हाक तुम्हा ज्या काली ।।
हंबरडा फोडी आर्त महात्मा जेव्हा ।
आघात झेलिले घोर उरावर तेव्हा ।
त्या यज्ञे द्रवुनि गमे धावला देवा ।

ऐकिली आर्त किकाळी
दे असहकारिता हाक तुम्हा ज्या काली ।।

तांबे यांनी जो संप्रदाय रूढ केला त्याची परिणती रविकिरण मंडळात झाली आणि 'मैतरणी, बिगी बिगी चाल' किंवा 'जशी हौशी पित्याच्या श्रमपरिहारा करीं, तशी न ती वदनातील भाकरी' अशा ओळी रसिक आनंदाने वाचीत होते. राजकारणाप्रमाणेच साहित्यातही सर्वच 'खोटं खोटं' सामान्य माणसाला भुरळ घालीत होते.

गांधीयुगात सर्वात मोठी हानी पोहोचली असेल तर निबंधलेखनाला. लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, ज्योतिबा फुले, बाळशास्त्री जांभेकर, चिपळूणकर, आगरकर, टिळक आणि या सर्वात श्रेष्ठ न्या. रानडे यांनी निबंधलेखनाची जी परंपरा निर्माण केली ती १९२० नंतर जवळजवळ खंडित होते. यानंतर नाव घेण्यासारखे निबंधकार म्हणजे न. चिं. केळकर, बॅ. सावरकर, श्री. म. माटे आणि वि. रा. शिंदे. यांपैकी पहिले तीन राजकीय दृष्टचा अस्पृश्य तर शिंदे ब्राह्मणाळलेले म्हणजे धड मराठाही नाहीत आणि धड ब्राह्मणही नाहीत. शिवरामपंत परांजपे यांचा उल्लेख केला नाही कारण त्यांचे लेखन गद्यकाव्य या प्रकारात मोडेल. निबंधलेखक हा स्वतःची मते तौलनिक दृष्टचा मांडत असल्यामुळे विनोबा, जावडेकर, स. ज. भागवत, दादा धर्माधिकारी आदि आचार्य मंडळींचा त्यात अंतर्भाव होत नाही. कारण ते गांधीवादाचे भाष्यकार म्हणूनच गणावे लागतील.

तर्कशुद्धता हा वैचारिक निबंधलेखनाचा पाया गृहीत धरला जातो. पण गांधीयुगात इंग्रजांशीच नव्हे तर सर्वच क्षेत्रांत आपण बुद्धिवादाशी असहकारिता पुकारली होती. त्यामुळे दोन्ही बाजू पाहू शकणाऱ्या केळकरांच्या लिखाणावर 'म्हटले तर पुरुष म्हटले तर स्त्री' अशी अनुदार टीका करण्यात आली, तर हप्त्याहप्त्याने स्वराज्य या इंग्रजांच्या धोरणाची 'हप्त्याहप्त्याने आलिंगन' अशी संभावना करण्यात आली. कोणत्याही घटनेकडे गंभीरपणे पाहण्याची क्षमता आपण गमावली होती व तिची जागा अभिनिवेश किंवा टवाळखोरीने घेतली होती. हा अभिनिवेश १९ व्या शतकातही आढळतो. त्याला अपवाद फक्त रानडे यांचा. पण तो अभिनिवेश १९ व्या शतकातील शैलीचा एक आवश्यक भाग होता असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही.आशय आणि मांडणी बुद्धिवादावर आधारलेली होती.

आगरकर आणि टिळक यांच्यातील वादाने काही वेळेला हलकी पातळी गाठली असली तरी दोघांतील मतभेद तात्त्विक होते. व त्याचा पाया बुद्धिवादी होता. अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये 'ज्युनिअसच्या पत्रांनी' वादविवादांच्या शैलीवर जो ठसा उमटविला होता त्याचा काही प्रमाणात आपल्या लेखकांच्या शैलीवर परिणाम झाला असावा अशी काही माझी समजूत आहे. पण विसाव्या शतकात ती शैली कालबाह्य झाली आणि आशय व शैली दोन्हींचाही आधार बुद्धिवादच होता. दुर्दैवाने आपल्याकडे गांधीयुगात त्याला स्थान नव्हते.

निबंधलेखनाची हलाखी ही महाराष्ट्रातील बौद्धिक जीवनाच्या शोकांतिकेची सुरुवात होती. 'यंत्राने बेकारी का वाढते ?' या प्रश्नाला आपल्याकडे उत्तर 'चरका चला चला

हे होते. 'गाय– एक उपयुक्त पशू' यातील विवेचनाला उत्तर म्हणजे दहा–पंधरा मरतुकड्या गायींना पाळणाऱ्या चौंडेमहाराजांना 'गो सेवक' का अशीच काही तरी पदवी देणे हे होते. या हलाखीला पाध्ये यांचाही थोडासा हातभार लागलेला आहे. स्टॅलिन क्रूरकर्मा होता हे निर्विवाद. पण हे गृहीतक धरून त्यांनी अभिनिवेशाने जे लेखन केले त्यात स्टॅलिनच्या धोरणांना समजून घेण्याचा कुठे प्रयत्न होता का ? त्याचे अवजड उद्योगधंद्यावर भर देण्याचे धोरण हे इतिहासानेच बरोबर ठरवले याची त्यांनी दखल घेतली आहे काय ? कारण रशियाची औद्योगिक प्रगती एवढ्या प्रमाणावर झाली नसती तर युद्धात त्याला जर्मनीला तोंड देता आले असते काय ? आज भारतात जमीनदारांचे वर्तन, विशेषतः बिहारसारख्या मागासलेल्या भागात, आढळून येते. त्याच्या अनुभवावरून 'कुलक्स'च्या बाबतीत कोणत्या सौम्य धोरणाचा उपयोग झाला असता ? भांडवलदारी राष्ट्रांनी रशियावर जी सर्वंकष असुरक्षितता लादली होती तिचा त्याच्या क्रूरपणाशी संबंध जोडता येतो का ? अशा क्रूरकर्म्याच्या नेतृत्वाखाली रशियन जनता प्राणपणाने लढली, त्याचे इंगित जाणून घ्यावेसे त्यांना वाटले का ?

प्रत्येक प्रश्नाकडे चिकित्सक बुद्धीने पाहण्याची सवय आपण गांधीयुगात सोडून दिली होती. निबंधलेखनाचा ऱ्हास हा बुद्धिवादाला तिलांजली देण्याच्या प्रवृत्तीतून निर्माण होतो. एकदा ही प्रक्रिया सुरू झाली की, ज्या वेळी वास्तवजीवनात आव्हाने उभी राहतात त्यावेळी बुद्धीचा उपयोग करून त्यातून मार्ग काढण्याऐवजी विचारवंत हताश होऊन बसतात व समाजही त्याच मार्गाने जातो. पाकिस्तानचेच उदाहरण घ्या. पाकिस्तान देऊन टाकावे असा विचार प्रा. माटे मांडीत होते. त्याची दखल महाराष्ट्रातील किती विचारवंतांनी घेतली होती ? माटे यांचे विवेचन अत्यंत तर्कशुद्ध असे. पाध्ये यांनी त्याचा प्रतिवाद अथवा पाठपुरावा केल्याचे माझ्या तरी वाचनात आले नाही. स्टॅलिनपेक्षा हा विषय भारतीयांच्या दृष्टीने कमी महत्त्वाचा होता का ?

रोमँटिक कालात निबंधलेखन मागे पडून त्याची जागा लघुनिबंध घेतात असे दिसते. इंग्रजी वाङमयातही लँब आणि हॅझलिट हे लघुनिबंधकार रोमँटिक काळातच उदयाला आले. लघुनिबंधकांना माझा विरोध नाहीच उलट जीवनाकडे खेळकर दृष्टीने पाहणे हे गंभीरपणाने पाहण्याइतकेच आवश्यक असते. पण याही क्षेत्रात ना. सी. फडके यांचा अपवाद वगळता इतरांचे लेखन सामान्य दर्जाचेच आहे. याही क्षेत्रात कृत्रिमता बळावली आणि त्याचा कळस गाठला तो अनंत काणेकर यांच्या 'चला, आता आपण जरा खेळकर दृष्टीने जीवनाकडे पाहू' या शैलीने लिहिलेल्या लघुनिबंधांनी.

□ □

# दोन

तमो युगाकडे वाटचाल.

१ अ. मुन पर्वाची अखेर

राजकारणात व त्याच्या अनुषंगाने इतर क्षेत्रांत जे रोमँटिक युग सुरू झाले त्याच्या अखेरीची सुरुवात गांधीजींच्या हयातीतच झाली. मागे लिहिले आहेच की, भारताच्या राजकीय प्रश्नांचा उलगडा त्यांना कधीच झाला नाही. कोणत्याही प्रश्नाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी जी बुद्धिवादावर आधारित वैचारिक बैठक लागते तिचा त्यांच्यात संपूर्ण अभाव जाणवतो. हिंदु–मुस्लिम संबंधाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन सर्वस्वी ‘रोमँटिक’ होता. भारताच्या इतिहासात या प्रश्नाकडे व्यावहारिक दृष्टीने पाहण्याचा पहिला व शेवटचा प्रसंग म्हणजे १९१६ सालचा लखनौ करार व त्याचे श्रेय राजकारणाकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहणाऱ्या लो. टिळक व जीना यांचेकडे जाते. गांधीजींना पाकिस्तानच्या मागणीमागील प्रेरणा व तिचे स्वरूप यांचे आकलन कधीच झाले नाही. त्याची परिणती जीनांनी दिलेल्या ‘प्रत्यक्ष कृतीच्या’ हाकेत झाली. हिंदु-मुसलमानांचे दंगे सुरू झाले. अनेक माणसे मारली गेली. आणि संसार उद्ध्वस्त झाले. स्त्रियांची अब्रू लुटली गेली. ही स्वातंत्र्यासाठी दिलेली किंमत नव्हती तर माणुसकीच्या मूल्याची होळी होती. त्यावेळी एका सुशिक्षित बंगाली मुलीने तिच्या वडिलांना लिहिलेले पत्र वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले होते ते इतक्या वर्षांनंतरही माझ्या मनात घर करून बसले आहे. त्याची आठवण झाली की, गलबलल्यासारखे होते. तिचे वडील सध्याच्या भारतात आले असताना बंगालमध्ये दंगा उसळला. तेव्हा तिने त्यांना कळवले होते की, ‘आईचा निका कालच लागला माझा उद्या आहे. तुम्ही परत येऊ नका. आलात तर तुम्हाला मारून टाकतील.’

ही नुसती सुरुवात होती. प्रत्यक्ष स्वातंत्र्य मिळाल्यानंतर केवळ हिंदु-मुस्लिम संबंधाच्याच बाबतीत नव्हे तर प्रत्येक क्षेत्रातच भ्रमनिरासाचा काल सुरू झाला. ‘रोमँटिक’ युगातील धुंदी उतरू लागली व त्याचे प्रतिबिंब इतरत्रही दिसू लागले. जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील सर्जनशीलतेचा अभाव, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, धर्माचा पगडा, विज्ञान पराङ्मुखता, बुध्दिनिष्ठेचा अभाव इत्यादी तमोयुगाची लक्षणे मानली जातात. आपली त्याकडे झपाट्याने वाटचाल चालू आहे व अधःपाताच्या गर्तेत आपण खोल जात आहोत असे मला वाटू लागले आहे व या दृष्टिकोनातून सद्यःकालातील बौध्दिक घटकांच्या अवस्थेचा परामर्ष राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात घेणे इष्ट ठरेल

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही आली म्हणजे दरडोई एक मत मिळाले. पण नोकरशाहीची चौकट तशीच राहिली. इंग्रज राज्यकर्ते व भारतीय राज्यकर्ते यांच्या राज्यकारभाराच्या कल्पना सर्वस्वी भिन्न होत्या. कार्यक्षमता, व सत्ता ही अखेर लोक-

कल्याणासाठी राबवायची असते ही श्रद्धा अशी दोन प्रमुख वैशिष्ट्ये, इंग्रजांनी केलेले आर्थिक शोषण लक्षात घेऊनही, इंग्रजी राज्यकारभारात अनुस्यूत होती. याउलट सत्तेचा उपयोग व्यक्तिगत फायद्यासाठी आणि भाचेपुतणेगिरीसाठी करावयाचा असतो., लोककल्याणाची फक्त आश्वासने द्यावयाची असतात अशी वृत्ती स्वतंत्र भारतातील राज्यकर्त्यांत हळूहळू बळावू लागली. नोकरशाहीची चौकट तशीच राहिल्यामुळे स्वतंत्र भारतातील नोकरशहा हे लोकसेवक न बनता लोकांचे भाग्यविधाते बनले. इंग्रजी राज्यकर्त्यांना न्यायाची बूज असल्यामुळे त्यांचा वचक नोकरशहांवर असे. तर भारतीय राज्यकर्त्यांना स्वार्थ आणि सत्ता यापलीकडे दुसरे कोणतेच ध्येय नसल्यामुळे नोकरशहा जिथे राज्यकर्त्यांचे हितसंबंध गुंतलेले नसतील अशा बाबतीत बेफिकीर बनले. इंग्रजी परंपरेत वाढलेले सनदी अधिकारी जोपर्यंत सरकारी नोकरीत होते तोपर्यंत त्यांचा थोडासा वचक भारतीय राज्यकर्त्यांवरही असे. पण ते निवृत्त झाल्यावर सनदी नोकरांची नवी पिढी बोटचेपी निघाली. यातून सामान्य माणसात एक प्रकारची हताशपणाची भावना बळावू लागली. ती हळूहळू वाढत जाऊन 'सर्वच चोर आहेत' अशा निष्कर्षाप्रत तो आला. न्याय मिळण्यासाठीही वशिला लागतो हा हरघडी अनुभव येऊ लागला. भ्रष्टाचार वाढीला लागला व आज तर तो शिष्टाचार बनला आहे, राज्य करताना काही नैतिक मूल्ये पाळणे आवश्यक असते याची जाणीवही आता राज्यकर्त्यांना उरलेली नाही व सामान्य जनतेच्या हातात या परिस्थितीकडे हताशपणे पाहण्यापलीकडे काही नाही.

राज्यकारभाराच्या बाबतीत आणखी एक फरक म्हणजे पूर्वी इंग्रज राज्यकर्ते व सनदी नोकर यांच्यामध्ये समन्वय आढळत असे. सरकारी धोरण व त्याची अंमलबजावणी यामध्ये सुसूत्रता असे. स्वातंत्र्यानंतर सरकारी धोरण, त्याची अंमलबजावणी करणारी नोकरशाही, लोकप्रतिनिधी व जनता यांचे परस्पर संबंध यामध्ये एक प्रचंड गोंधळाचे वातावरण निर्माण झालेले आहे व लोकशाही राबवताना राज्यघटनेबरोबरच ज्या प्रथा (कन्व्हेन्शन्स) निर्माण होणे आवश्यक असते, त्या नसल्यामुळे त्यांचे नेमके स्वरूप आकलन करून घेणे विचारवंतानांही कठीण होऊन बसले आहे. राज्यपुरस्कारांबद्दल जी चर्चा झाली त्यात याच गोंधळाचे प्रतिबिंब पडले होते.

इंग्रजी आमदानीत कायदेमंडळात जी चर्चा चालत असे तिचा आधार युक्तिवाद असे. सरकारही युक्तिवादानेच टीकेला उत्तर देत असे. त्यामुळे तेथील वादविवादांचा दर्जा अतिशय उच्च असे. ना. गोखल्यांच्या भाषणांचा धाक सरकारलाही असे. कारण 'आमच्याजवळ सत्ता आहे, तेव्हा आम्ही म्हणतो ते प्रमाण' ही वृत्ती सरकार दाखवत नसे. स्वातंत्र्यानंतर विधिमंडळातील बहुमत हाच युक्तिवाद ठरल्यानंतर चर्चेचा दर्जा काय राहणार हे उघडच आहे. अर्थात नाथ पै, भूपेश गुप्ता यांसारखे संसदपटू याही परिस्थितीत संसदेत आपली छाप पडत असत. जे विधिमंडळात होते तेच ग्रामपंचायतीपर्यंत चालू आहे आणि यातून विद्यापीठाची सीनेटस्‌देखील सुटली नाहीत. कारण आता प्रत्येक ठिकाणी हात वर करणाऱ्यालाच मागणी आणि त्यामुळे किंमत आहे. लोकशाहीची जी

दुरवस्था आज भारतात आढळते तिचे कारण नीट समजवून घेण्यासाठी १९२० ते १९४७ या कालातील स्वातंत्र्यलढ्याचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे.

श्री. पाध्ये यांनी आजच्या बौद्धिक जीवनाची जी शोकांतिका वर्णन केली आहे तिचे मूळ भारतीय स्वातंत्र्यात शोधावे लागेल. गांधीजींनी राष्ट्रीय चळवळीचे ध्येय व साधन ही अत्यंत सुलभ करून टाकली होती. स्वातंत्र्याच्या अमूर्त कल्पनेने भारतीय जनता भारली गेली होती व इंग्रजांना घालवून स्वातंत्र्य मिळविणे एवढे एकच ध्येय तिच्यासमोर होते. भारतासमोरील खरेखुरे आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्न अडगळीत टाकले गेले. 'चरका चला चलाके...' 'झंडा उंचा रहे हमारा' वगैरे गाणी म्हणणे, पिकेटिंग करणे, हरताळ पाडणे, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअल्ली भूमिगत असल्याच्या कल्पनेने भारून जाणे, जयप्रकाश पकडले गेल्याच्या बातमीने अस्वस्थ होणे, प्रभातफेऱ्या काढणे, या सर्वांत एक बालसुलभ 'थ्रिल' होते व त्यात सानापासून थोरापर्यंत भाग घेत होते. 'मंतरलेले दिवस' असे या सबंध कालाचेच सार्थ वर्णन करता येईल. राजकीय भातुकलीचा खेळ चालू होता. लेखक, कवी, वर्तमानपत्रकार, संपादक सर्वचजण त्यात रममाण झाले होते. रुसवेफुगवे, भांडणे, चर्चा, वादविवाद चालू होते. खेळ रंगात आला होता. सरहद्दीवर माणुसकीचा मुडदा पडत होता पण आम्ही निःशंक होतो. खेळत असताना दरवाजावरून जाणाऱ्या स्मशानयात्रेचे जेवढे कुतूहल लहान मुलांना असते तेवढ्याच कुतुहलाने आम्ही या घटनेकडे पाहत होतो. म. गांधींना एकट्यालाच तेवढा नोआखली व चितगाव येथील आक्रोश ऐकू येत होता. आणि अशा वेळी कोणीतरी वडीलधाऱ्या माणसाने 'जेवायचे झाले आहे, उठा आणि पाटपाणी घ्या' असे सांगून बेरंग करावा अशा तऱ्हेने इंग्रज सरकारने '१९४८ सालच्या आत आम्ही भारत सोडणार, तुमचा कारभार तुम्ही करा' असा निर्वाणीचा आदेश दिला आणि आमचा स्वातंत्र्याचा खेळ अचानक संपला होता. २ स्वातंत्र्य: एक बौद्धिक आपत्ती.

आम्ही स्वतंत्र झालो. पण स्वातंत्र्य मिळाल्यामुळे जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावयास पाहिजे, तिचा कोठे मागमूसही नव्हता. स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद होणे साहजिकच होते पण तो व्यक्त करण्याच्या पद्धतीत परिपक्वतेचा अभाव संपूर्णपणे जाणवत होता. १५ ऑगस्ट १९४७ च्या रात्री ज्या तऱ्हेने तो साजरा झाला त्याची मला आजही शरम वाटते. सरहद्द जळत होती आणि आम्ही वाजंत्री, ढोल, ताशे, तुताऱ्या, लेजीम, गुलाल यांसह मिरवणुका काढून आनंदोत्सवात दंग झालो होतो. साधी मिरवणूक काढून गांभीर्याने स्वातंत्र्यदिन साजरा करता आला असता. सहजच मला दुसऱ्या एका मिरवणुकीची आठवण होते. जर्मनीचा पराभव झाल्याचा आनंद साजरा करण्यासाठी पुण्याला इंग्रजांनी एक मूक मिरवणूक काढली होती. बरोबर फलक होते. 'जर्मनीचा पराभव झाला आहे. आम्ही अजूनही जपानशी लढत आहोत.'

१९४७ सालपर्यंत प्रश्न सोपे करून टाकले होते व त्यामुळे त्याची उत्तरेही सोपी होती. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जबाबदारी आली. रोमँटिक युग संपले होते. खऱ्याखुऱ्या

राष्ट्रीय जीवनाला सुरुवात झाली होती आणि आता राष्ट्रासमोर उभे राहिलेले प्रश्न बिकट होते. भारतीय स्वातंत्र्य, पाकिस्तानची मागणी यांसारखे गुंतवून टाकणारे प्रश्न संपून आर्थिक विकास, शांतता व सुव्यवस्था, निर्वासितांचे पुनर्वसन, दलितांच्या समस्या यांसारखे रुक्ष, गद्य, नीरस व जटिल प्रश्न राष्ट्रासमोर उभे राहिले. विचारवंतांना व बुद्धिवंतांना हे एक प्रचंड आव्हान होते. पण आपल्याला ते पेलले नाही. समस्यांचे यथा-योग्य आकलन व त्यावर उपाय सुचविण्यात विचारवंत अपयशी ठरले.

हे प्रश्न सोडविण्यासाठी दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाची गरज होती व त्या युद्धाचे नेतृत्व विचारवंतांनी करावयाचे होते. त्यासाठी मिशनरी वृत्तीने काम करू शकणाऱ्या भार-तीयांची एक प्रचंड संघटना करणे आवश्यक होते. पण एम. एन. रॉयसारख्यांनीदेखील पक्ष मोडून टाकला व माणूस सुधारला तरच राष्ट्र सुधारेल असा स्वप्नरंजनात्मक विचार मांडावयास सुरुवात केली. वस्तुतः माणूस सुधारतो तो निव्वळ उपदेशाने नव्हे तर जबाब-दारीच्या जाणीवेतून स्वतःची नैतिक–आर्थिक उन्नती करून घेण्यासाठी प्रयत्नशील होतो तेव्हाच. आणि तो समाजात राहात असल्यामुळे या प्रयत्नांना सामाजिक संदर्भ येतो. समाजाला ध्येयपूर्तीसाठी संघटित करणे, सहकार्याची भावना निर्माण करणे, शिस्तपाल-नाची सवय लावणे, शहाणा स्वार्थत्याग शिकवणे व या सर्वांतून नैतिक व आर्थिक अभ्यु-दयासाठी आवश्यक असलेल्या जबाबदारीची जाणीव निर्माण करणे ही अपेक्षा विचारवंत आणि लेखक यांच्याकडून होती आणि आम्ही नेमके तिथे कमी पडलो.

स्वातंत्र्य ही एक बौद्धिक आपत्ती ठरली. पंचवीस वर्षे आम्ही बालसुलभ 'थ्रिल अनुभवले. त्याच्यापासून स्वातंत्र्याने आम्हाला वंचित केले. झपाटून गेलेलो असल्यामुळे त्या काळात काहीतरी बौद्धिक उलाढाल चालू होती. अर्थात त्या काळात जे बौद्धिक संघर्ष झाले त्यांचे स्वरूप बालबोध होते. श्री. पाध्ये यांनी हिटलर–स्टॅलिन करारावर केलेला हल्ला आणि कर्णिकांनी त्याला दिलेले उत्तर ही चमकदार मारामारी होती. रिंगणाबाहेरील लोकही श्वास रोधून या कुस्तीतला आनंद लुटत होते. असे निरनिराळे फड चालू होते. अत्रे–फडके, अत्रे–माटे, नवयुग–विविध वृत्त, सानेगुरुजी–श्री. के. क्षीर-सागर इ. जत्रेतील उत्साह आमच्या अंगात संचारला होता. जत्रेत 'बैल घ्यावा की माकड की पिपाणी' असा पेच लहान मुलाला पडतो त्याप्रमाणे कुठला 'वाद' भारताला तारेल असा विचार आम्हाला पडला होता. पण हा उत्साह जीवनातील जबाबदाऱ्या उचलण्यास मदत करणारा नव्हता. पंचवीस वर्षांत आमची कोणतीच वाढ झाली नव्हती.

१८८० साली रिपनला समजले होते की स्थानिक स्वराज्य संस्था भारतीयांना नीट चालवता आल्या तरच इथ लोकशाही दृढमूल होईल. भारतीयांचे विमोचन केवळ सह-कार्यातून होईल हे कर्झनसारख्यालादेखील समजत होते आणि १९०४ साली सहकारी सोसायट्यांचा कायदा त्याच्याच अंमलात पास झाला. स्थानिक स्वराज्य संस्था किंवा सहकारी संस्थांचे जाळे विणण्याऐवजी मार्क्स, गांधी की सावरकर श्रेष्ठ, कोणता 'वाद' अधिक चांगला या विषयावर कुस्त्या खेळत होतो अर्थात बौद्धिक वादविवादांचे महत्त्व मी

मुळीच कमी मानत नाही. ते अत्यंत आवश्यक असतात. विचारमंथनातूनच शेवटी मानव अधिकाअधिक सुसंस्कृत होत जातो. इंग्लंडमध्येही शॉ आणि चेस्टरटन यांची अशीच प्रेक्षणीय लढत कित्येक दिवस चालू होती. पण शॉ निव्वळ या लढतीत गुंतलेला नव्हता. फेबिअन सोसायटीचा सभासद म्हणून त्याने जे कार्य केले, सामाजिक दंभावर जे आसूड ओढले ते महत्त्वाचे होते. वादविवाद हा इंग्रजी समाजाचा व विचारवंतांचा विरंगुळा होता. जीवनसर्वस्व नव्हते. सामाजिक जबाबदाऱ्यांना ते पाठमोरे झाले नाहीत. विधायक दृष्टि-कोनाचा सतत पाठपुरावा केला. जीवनाच्या कोणत्या क्षेत्रात कोणते बदल पाहिजेत त्याबाबत मते व्यक्त केली.

आमच्याकडील सांस्कृतिक व राजकीय जीवनाचे पुढारी मात्र, खेळात रममाण झालेली मुले तेवढ्यापुरते खेळालाच सर्वस्व मानतात त्याप्रमाणे वादविवाद व स्वातंत्र्याचे नारे यांनाच सर्वस्व समजून चालले होते. पंचवीस वर्षे आम्ही 'बाल'च राहिलो. त्या खेळांच्या आठवणीने श्री. पाध्ये यांना आजही भरते येते. पण तो खेळ होता हे त्यांना आजही उमजलेले नाही ही खरी शोकांतिका आहे. इंग्रजांशी असहकार, न्यायालयावर आणि शाळाकॉलेजावर बहिष्कार इ. गोष्टी मला समजू शकतात पण त्याच्याच जोडीने भारती-यांच्यात सहकार, तंटे न्यायालयाबाहेरच सोडविणे, टि. म. वि. च्याच वा. वि. ला निदान खाजगी नोकरीत प्राधान्य, भारतभर राष्ट्रीय शाळा स्थापन करणे, पर्यायाने समांतर शासन निर्माण करणे या गोष्टी आम्ही करू शकलो नाही. नेमकी या ठिकाणीच राजकीय पुढारी, विचारवंत आणि लेखक यांना एक प्रचंड विधायक चळवळ उभारायची होती. पण ते सर्वच 'खेळात' रमलेले. या कालात डोके थाऱ्यावर असणाऱ्या मोजक्याच व्यक्ती होत्या. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर पहिले नाव र. धों. कर्वे यांचे घ्यावे लागेल. राजकारणात केळकर, मुंजे, जयकर आणि १९२५ पर्यंत जीना. साहित्यात केतकर आणि वा. म. जोशी. बौद्धिक क्षेत्रात एम. एन. रॉय यांचे अनुयायी आणि प्रा. माटे. आणखी अशी काही बोटांवर मोजण्यासारखी काही नावे असतील. पण बाकी सर्वत्र अंधारच होता.

स्वातंत्र्याने जर काही उद्ध्वस्त केले असेल तर लेखक, विचारवंत, निस्वार्थ बुद्धीने राजकारणात पडलेले राजकीय नेते आणि त्यांनी भारून टाकलेला सामान्य माणूस यांचे भावविश्व. हा तडाखा इतका जबरदस्त होता की, त्यातून आपण केव्हाच सावरलो नाही. सानेगुरुजींना ते असह्य होऊन त्यांनी जीवनयात्रा संपवली. बाकीच्यांना काय चालले आहे याची समजच राहिली नाही. एक प्रचंड गोंधळ माजला व या गोंधळाचे प्रतिबिंब जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पडले. आपल्याला काय पाहिजे आहे, आपण काय करीत आहोत, आपण योग्य दिशेने जात आहोत काय, कशाचा काहीच बोध होत नव्हता. सगळीकडे धुराळा उडालेला होता, नीट दिसत नव्हते, आपण आपल्यालाच हरवून बसलो होतो. याचे मुख्य कारण म्हणजे स्वातंत्र्याच्या रोमँटिक कल्पनेने आपल्याला पंचवीस वर्षे पछाड-लेले (ऑब्सेशन) होते. पारतंत्र्याच्या इमल्याची एकएक वीट पाडण्याच्या मनोरंजक खेळात गुंग झालो होतो आणि हा सबंध इमला शेवटी एकदम पडला म्हणजे 'किती

मज्जा ' या बालसुलभ आनंदाच्या कल्पनेत रममाण झालो होतो. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताची उभारणी कशी करावयाची याचा वास्तवतेवर आधारलेला आराखडा मात्र आमच्याकडे नव्हता. अण्णा कर्वे आणि र. धों. कर्वे यांचे पीक भारतीय भूमीत उगवू शकले नाही. तण मात्र खूप माजले होते व त्यावरच आम्ही बेहद्द खूष होतो.

अर्थात भावविश्व उद्ध्वस्त होण्याचा तडाखा सर्वच जणांना एकाच वेळी बसला असे नव्हे. काहींना स्वातंत्र्यापूर्वीच हिंदु-मुसलमानांच्या दंगलीने बसला. त्यात गांधीजी प्रमुख होते व तो सोसण्यासाठी त्यांनी ब्रह्मचर्याच्या विकृत प्रयोगांना सुरुवात केली. काहींना तो नंतर बसला. त्यांचे अग्रणी सानेगुरुजी. अशाच काही व्यक्ती म्हणजे जयप्रकाश आणि अच्युतराव पटवर्धन. त्यांनी राजकारण-संन्यास घेतला. लेखकांमध्ये खांडेकर. काही जणांना हा तडाखा सोसवला तो त्यांनी आपले लक्ष पुढील दहा–बारा वर्षे स्वातंत्र्यासारख्याच भाषावार प्रांतरचनेच्या अमूर्त कल्पनेत स्वतःला रमवल्यामुळे. १९६० नंतर तेही संपले. तेव्हा अधूनमधून कुठे स्वतंत्र विद्यापीठाची मागणी, कुठे नामांतर, कुठे आणखी काही, असे नवे खेळ खेळून स्वतःची व लोकांची निराशा त्यात बुडविण्याचा प्रयत्न केला. पुढे काही दिवस आणीबाणी पुरली. पण या प्रदीर्घ कालात समाजाला विधायक दृष्टिकोन देऊन सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी किती चळवळी संघटित करण्यात आल्या ? वैयक्तिक स्तरावर शिवाजीराव पटवर्धन, बाबा आमटे, गोदावरी परुळेकर, ताराबाई मोडक अशा काही व्यक्तींचे प्रयत्न आणि म्हैसाळ येथे झालेला प्रयोग सोडले तर हाती काहीच लागत नाही.

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाची जरुरी होती व ती तळागाळातल्या माणसाला ' स्वतंत्र ' करण्यासाठी. पण त्याचे नेतृत्व करण्याऐवजी पं. नेहरूंनी लोकशाही समाजवाद व निधर्मी राज्य या रोमँटिक कल्पनात स्वतःला गुरफटवून घेतले व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावून गेलेल्या जनतेला या भ्रमांनी पछाडले. ' रोमँटिक, ' व ' पछाडणे ' हे शब्द हेतुपूर्वक वापरीत आहे. कारण या कल्पनांना वास्तवात उतरवण्यासाठी जी वैचारिक बैठक आणि त्याच्याच जोडीने कृती यांची आवश्यकता असते, तिला अनुकूल अशी आमची मनोवृत्ती नव्हती, व ती निर्माण करण्यासाठी आवश्यक वस्तुनिष्ठता व विधायक दृष्टिकोन आमच्या नेत्यांजवळ नव्हता. या सर्वांची वासलात स्वातंत्र्यलढ्यात लागली होती आणि त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी लागणारी उमेद आम्ही केव्हाच गमावली होती. कारण स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर स्वातंत्र्याची मधुर फळे आम्हास चाखावयास मिळतील अशी आमची अपेक्षा होती. पण अनुभव उलटा आल्याबरोबर आम्ही गलितगात्र झालो. स्वातंत्र्य म्हणजे घाम आणि रक्त आटवून राष्ट्राची पुनर्बांधणी याची कल्पना आम्ही कधीच करू शकलो नव्हतो.

अशा परिस्थितीत देशाचे नेतृत्व नेहरुंच्याकडे आले. त्यांची तुलना वॉल्टर स्कॉटने रंगविलेल्या मध्ययुगीन रोमँटिक सरदारांशी करण्याचा मोह मला होतो. त्याला साजेसे रार्जबिंडे व्यक्तिमत्त्व, राहणीचा बाज, साहसी वृत्ती, प्रचलित कालाला अनुरूप असलेल्या लोकशाही, समाजवाद आणि निधर्मी राज्य या मूल्यांचे वेळी अवेळी ' प्रदर्शन, ' असहाय्य

लोकांच्या कळवळयाने क्षणिक क्षुब्ध होणे, स्त्रीदाक्षिण्य इ. पण या गोष्टींनी सामान्य माणूस कितीही भारला गेला असला तरी भारताची पुनर्रचना घडवून आणण्यास त्या पुरेशा नव्हत्या. त्यासाठी गरज होती ती भारताचे भवितव्य डोळयांसमोर ठेवून आणि साधने व साध्य यांचा मेळ घालून लोकशाही, समाजवाद व निधर्मी राज्य या कल्पना प्रत्यक्षात उतरवणाऱ्या समर्थ प्रशासकाची. एकदा नेहरूंना लोकशाही यशस्वी होण्यासाठी विरोधी पक्षांचीही योग्यतऱ्हेने वाढ होईल असे वातावरण निर्माण करण्याबद्दल जयप्रकाशजींनी आवाहन केले होते. पण राष्ट्राआधी पक्ष ठेवणाऱ्या नेहरूंनी 'मी विरोधी पक्ष वाढविण्यासाठी काँग्रेसचा पंतप्रधान झालो नाही', अशी ग्लॅडस्टन किंवा डिझरेली यांच्या तोंडी शोभणारी भाषा वापरली होती. एका नव्या राष्ट्राच्या नेत्याकडून ही अपेक्षा नव्हती.

या पार्श्वभूमीवर लॉर्ड डफरीनने भारतीय काँग्रेसच्या स्थापनेसंबंधात जी भूमिका बजावली ती अत्यंत बोधप्रद आहे. वेडरबर्न ह्यांनी काँग्रेसचे संस्थापक ह्यूम यांचे जे चरित्र लिहिले आहे त्यात अशी आठवण दिली आहे की, डफरीनने ह्यूमला सूचविले की, इंग्लंडमध्ये विरोधी पक्षाचे जे कार्य आहे ते करणारी कोणतीही संस्था भारतात नाही. तेव्हा ह्यूम यांनी फक्त सामाजिक कार्य करणारीही संस्था काढावी. तेव्हा ह्यूमनी राष्ट्रीय सभा स्थापन केली.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजवाद–लोकशाही–निधर्मीराज्यप्रतिपालक नेहरूंची स्थापना दिल्लीच्या तख्तावर झाली व ही घोषणा दिल्यानंतर त्यांच्या पक्षाचे सुभेदार, मनसबदार त्या त्या भागांचा कारभार पाहण्याच्या बाबतीत मुखत्यार होते. त्यामुळेच पाटबंधारे प्रकल्प वगैरेंच्या बाबतीतील कटकटी अजूनही चालू आहेत. राष्ट्राआधी पक्ष ठेवल्यामुळे सत्ता आणि त्यामुळे निवडणुका यांना अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. निवडणुका व पैसा यांचे समीकरण रूढ करण्याचे श्रेय नेहरू यांचेच. त्यामुळे साहजिकच जे सुभेदार, मनसबदार भल्याबुऱ्या मार्गाने जास्तीत जास्त मते आणि पैसा गोळा करतील त्यांना काँग्रेसपक्षात वजन प्राप्त झाले. सुरुवातीला डॉ. आंबेडकर, डॉ. शामाप्रसाद मुकर्जी, चिंतामणराव देशमुख यांच्यासारखी माणसे सरकारात होती. पण ती बाहेर पडल्यानंतर जो गोतावळा नेहरूंभोवती जमला त्यात लालबहादुर शास्त्री यांच्यासारखे काही अपवाद सोडले तर संजय गांधी यांनी जी माणसे जमा केली त्यांचे पूर्वसुरी शोभतील अशीच होती. सहसा ही माणसे बहुजनसमाजातील पुढारी असत. पर्याप्ततः लोकशाहीचे एक बाह्य लक्षणही फलद्रूप झाले. प्रत्यक्षात मात्र राजकीय तमोयुगाचे बीजारोपण झाले होते. त्याला फळे आली श्रीमती इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत.

नेहरू स्वतः सुसंस्कृत आणि काही मूल्ये मानणारे असल्यामुळे त्यांच्या ह्यातीत त्यांनी निर्माण केलेल्या अनिष्ट प्रवृत्तींना काही मर्यादा पडल्या होत्या. पण लालबहादुर शास्त्री यांच्या मृत्यूनंतर त्या मोकाट सुटल्या व आता तर त्यांची अशी बेफाम घोडदौड सुरू झाली आहे की, त्याचे पर्यवसान शेवटी कशात होणार आहे याची कल्पनाही करणे अशक्य आहे.

स्वातंत्र्यानंतर बहुजनसमाजाच्या पुढाऱ्यांच्याकडे नेतृत्व आले त्यांची बौद्धिक कुवत

ज्या समाजाचे ते नेतृत्व करीत होते त्याचा डोळस स्वार्थ समजण्याइतकीही नव्हती. जास्तीत जास्त जमीन मिळवणे, सीलिंगमधून सुटण्यासाठी लटपटी करणे आणि वैयक्तिक स्वार्थ साधणे एवढेच त्यांचे ध्येय होते. त्यामुळे राज्य चालविण्यासाठी जो व्यापक आणि उदार दृष्टिकोन लागतो (लार्ज अँड लिबरल आयडियाज) त्यांचा संपूर्ण अभाव या राज्यकर्त्यांमध्ये आढळतो. मध्यंतरी अंतुले राजवटीविरुद्ध टीका करताना प्रा. ग. प्र. प्रधान यांनी असे उद्‌गार काढले होते की 'प्रत्येक माणसाला किंमत असते' हा वॉलपोलचा सिद्धांत अंतुलेंनी आत्मसात केला आहे. प्रधानांचा रोख अर्थातच भ्रष्टाचाराविरुद्ध होता. आजच्या बौद्धिक शोकांतिकेचेच हे एक उदाहरण आहे.

भारतामध्ये सर्वच क्षेत्रात जो अधःपात आढळतो तो निव्वळ भ्रष्टाचारामुळेच नव्हे. त्याचे कारण राज्यकर्त्यांमध्ये आढळणारे कल्पनादारिद्रय, ध्येयशून्यता, आणि व्यापक व उदार दृष्टिकोनाचा अभाव आणि हे जर विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांना समजत नसेल तर त्याचा अर्थ असा करावा लागेल की, सरकार आणि विरोधी पक्ष या दोघांचाही भारताचा अधःपात घडवून आणण्याचा जणू एक कटच झाला आहे आणि ही समज त्यांना नाही ही वस्तुस्थिती आहे. जनता पक्षाचा दोन वर्षांचा कारभार हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. अलीकडील एक उदाहरण म्हणजे प्रा. मधू दंडवते यांनी आयुर्विमा कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे अध्यक्षपद स्वीकारले ही बातमी. मी जेव्हा हे वाचले तेव्हा हतबद्ध झालो. दंडवते महाशय आता विमाकर्मचाऱ्यांच्या अवास्तव मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी कटीबद्ध होणार ! नाहीतर विरोधी पक्षांना मते कशी मिळणार ?

वॉलपोलने भ्रष्टाचार केला ही गोष्ट इतकी खरी आहे की, पीअर्स एनसायक्लोपिडिआमध्ये त्याची फक्त चार ओळीतच जी माहिती दिली आहे तीत याचा आवर्जून उल्लेख केला आहे. पण वीस वर्षांच्या अवधीत आर्थिक धोरण आखून त्याने इंग्लंडची भरभराट घडवून आणली. वॉलपोलचे एकट्याचेच उदाहरण कशाला. सबंध अठराव्या शतकात इंग्लंडमधील राजकारणात भ्रष्टाचार ही ' पद्धत झाली होती. पण त्याच काळात इंग्लंडने त्रिखंड साम्राज्य स्थापन केले होते. याउलट भारतात रामराज्य, ग्रामराज्य, भूदान, संपूर्ण क्रांती असल्या अर्थविहिन व कल्पनादारिद्रय स्पष्ट करणाऱ्या गोष्टींचीच चलती होती. म. गांधी; जयप्रकाश, विनोबा भावे यांची जर ही अवस्था तर बहुजनसमाजातील कार्यकर्त्यांची काय परिस्थिती असेल.

या ठिकाणी भ्रष्टाचार आणि राष्ट्राची अधोगती यांतील परस्परसंबंधाविषयी थोडे विवेचन आवश्यक आहे. भारतात इंग्रजी सत्तेचा पाया घालणारे क्लाईव्ह व हेस्टिंग्ज दोघेही भ्रष्टाचारी होते. इतकेच नव्हे तर संपूर्ण ईस्ट इंडिया कंपनीचा व्यवहार भ्रष्टाचाराने भरलेला होता. आणि तरीही भारतावर कंपनीची सत्ता स्थापन करण्यात ते यशस्वी झाले. याउलट भ्रष्टाचाराने आपला संबंध देश पोखरला गेला असून त्याचे परिणाम आपण हरघडी अनुभवत आहोत. हा फरक का ? याचे कारण म्हणजे क्लाईव्ह, हेस्टिंग्ज आणि ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर भारतात इंग्रजी सत्ता स्थापन करण्याच्या

आपल्या अंगीकृत कार्याशी प्रामाणिक होते. व ते पार पाडत असताना वैयक्तिक स्वार्थही साधत होते. आपल्या देशावरील त्यांची निष्ठा संशयातीत होती. म्हणजेच त्यांच्याबाबतीत भ्रष्टाचार आनुषंगिक होता, उद्दिष्ट नव्हते. याचा अर्थ अंगीकृत कार्य इमानेइतबारे पार पाडले जात असेल तर त्याला भ्रष्टाचारांमुळे फारशी इजा पोहोचत नाही. याउलट भारतात अंगीकृत कार्यावर कोणाचीही निष्ठा नसून भ्रष्टाचार हेच उद्दिष्ट आहे. त्यामुळे राज्यकर्त्यांचा राज्य करण्यावर विश्वास नाही. विद्यार्थ्यांची शिकण्यावर तर प्राध्यापकांची शिकवण्यावर निष्ठा नाही. कर्मचाऱ्यांना आपण कामासाठी आहोत याची जाणीव नसते. दुष्काळनिवारणासाठी नेमलेल्या यंत्रणेला दुष्काळ निवारण हे आपले कर्तव्य वाटत नाही. डॉक्टरांना रोग्यांना जगवणे किंवा इंजिनिअर्सना कमी खर्चात उत्तम निर्मिती करणे हे आपल्या व्यवसायातील आव्हान वाटत नाही. निष्ठाहीनतेने आपल्या सबंध समाजाला ग्रासले असून त्यातूनच आपल्या सर्व समस्या निर्माण झाल्या आहेत, म्हणजे भ्रष्टाचार हा खरा रोग नसून कर्तव्यच्युती हा खरा रोग आहे. समाजपुरुषाला लागलेल्या या रोगाचे मूळ सापडते ते स्वातंत्र्योत्तर कालातील राजकारणात. सत्ताधारी वर्गाने सत्ताधिष्ठित राजकारणाऐवजी निवडणुकीतील यश आणि त्यातून केवळ वैयक्तिक लाभ हे साध्य मानून अनेक तडजोडी केल्या. मार्क्सने म्हटल्याप्रमाणे राज्यकर्त्यांच्या सवयी समाज ताबडतोब आत्मसात करतो. त्यानुसार येनकेन प्रकारेण आर्थिक दृष्टया लाभ मिळविणे हे प्रत्येकाने आपले साध्य ठरविले. त्यात बळी पडला तो निष्ठेचा. कोणत्याही तऱ्हेची सामाजिक बांधिलकी न मानणाऱ्या संस्कृतीचे वारसदार आपण. त्यात भल्याबुऱ्या मार्गाने आर्थिक लाभ मिळविण्याच्या व्यसनाने पछाडल्यानंतर समाज अधोगतीकडे वेगाने दौडू लागल्यास त्यात आश्चर्य नाही. इंदिरा गांधी म्हणत असत की, कोणत्या देशात भ्रष्टाचार नाही ? खरी गोष्ट आहे. पण इतर देशात भ्रष्टाचाराने कंत्राट मिळविल्यानंतर जे. जे. मृत्युकांडासारखी प्रकरणे, बांधल्या जात असलेल्या इमारतींच्या कोसळलेल्या स्लॅब्स किंवा खचलेले पूल असे प्रकार फारसे झाल्याचे वाचायला मिळालेले आठवत नाही. आणि असे काही प्रकार झालेच तर सबंध समाज खवळून उठतो व त्यावर व्यावहारिक तोडगा काढला जातो; निव्वळ भावनिक नव्हे.

भ्रष्टाचारही कसा सुसह्य होऊ शकतो, पण दिशाहीनता नाही, हे एका उदाहरणावरून स्पष्ट होईल. एखाद्या भूभागाचा किंवा क्षेत्राचा विकास करण्याच्या महत्त्वाकांक्षेने भारलेल्या व्यक्तीने असा विकास साधत असताना चार पैसे गाठी मारले तर तो भ्रष्टाचार सुसह्य होईल. कारण या प्रक्रियेत त्याने त्या भागाचा किंवा क्षेत्राचा विकास साधलेला असतो – जे एक निरंतरचे योगदान असते – आणि हजारोंच्या पोटापाण्याची सोय केलेली असते आणि हा भाग सर्वात महत्त्वाचा असतो. याउलट विकास कामात अडथळे आणून पैसा कमावणे हा निर्भेळ भ्रष्टाचार – ज्यामुळे राष्ट्र अधोगतीला जाते. इतर विकसित-देशात पहिल्या प्रकारचा भ्रष्टाचार जास्तकरून आढळतो तर भारत आणि इतर विकसनशील देशात दुसऱ्या प्रकारचा. म्हणजे आपल्या अधोगतीला भ्रष्टाचार कारणीभूत नसून

राज्यकर्ता पक्ष, विरोधी पक्ष आणि सामान्य माणूस यांची दिशाहीनता त्याला जबाबदार आहे. आणि याची जाणीव विरोधी पक्षाला नाही. अर्थात् हे भ्रष्टाचाराचे समर्थन नव्हे तर दिशाहीनतेपेक्षा भ्रष्टाचार काही वेळेला कसा कमी अनिष्ट (लेसर इव्हल) असू शकतो याबद्दल मतप्रदर्शन. दिशाहीनताच, मग ती सत्तेच्या बाबतीत असो अगर विरोधातील असो, भ्रष्टाचाराला परिपूर्ण करते.

आपल्या येथील आणि इंग्लंडमधील परिस्थिती यांतील आणखी एक फरक लक्षात घेण्यासारखा आहे. वर लिहिलेच आहे की, सबंध अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये भ्रष्टाचार हीच पद्धती होती. पण अखेर या पद्धतीविरुद्ध उभे राहिले ते या पद्धतीपासून लाभ करून घेणारेच. आणि शेवटी त्यांच्याच प्रयत्नाने १८३२ साली इंग्लंडमध्ये पार्लमेंटच्या सुधारणेचा कायदा पास झाला. पण सत्तेकरता सत्ता आणि विरोधाकरता विरोध या चक्रात सापडलेले सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यात त्या तोलाचे पुढारी निर्माण करण्याची क्षमता दिसत नाही.

आज जो राज्यकर्ता वर्ग आहे त्याचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे सत्तेपलीकडे ध्येय नसल्यामुळे आपली सत्ता कोणी हिरावून घेईल काय,अशा धास्तीत ही मंडळी सदैव असतात. त्यामुळे आपल्याला सत्तेवर राहण्यास मदत करतील अशी भलीबुरी माणसे सभोवती गोळा करणे हे भारतीय राजकारणाचे एक गमक बनले आहे, अर्थात अशी मदत केवळ निरनिराळ्या भागातील वजनदार मंडळीच करू शकतात की, जी योग्यायोग्य मार्गाने त्यांच्या विभागातील मतदारांवर दडपण आणू शकतात. पण या वजनदार लोकांनाही ते मागतील ती किंमत द्यावी लागते. आणि ही किंमत म्हणजे या वजनदार मंडळींना त्यांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यास व ते वाढविण्यास मदत करणे व तसे ते करीत असताना त्यांच्या सुक्तासूक्त मार्गाकडे दुर्लक्ष करणे. या ठिकाणी नियमांची अंमलबजावणी करणाऱ्या नोकरदाराचा अडथळा होऊ शकतो. तेव्हा नोकरदारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण करून (बदल्या, पदावनती, पदोन्नती न देणे वगैरे मार्गांनी) त्यांचे नीतिधैर्य खच्ची करणे व त्यांच्यात कर्तव्यनिष्ठेऐवजी लाचारी निर्माण करून त्यांना विभागीय नेत्यांच्या हितसंबंधाना धक्का पोचणार नाही अशा तऱ्हेने राज्यकारभार करावयास लावणें ही पद्धती रूढ झाली. कालांतराने न्यायालयांच्या बाबतीतही हाच प्रयोग सुरू झाला.

ही वजनदार मंडळी खेड्यामध्ये बव्हंशी जमीनदार, बागाईतदार असतात व निरनिराळ्या कारणांनी त्यांची आपापसात वैरे असतात व त्यामुळे तेही असुरक्षिततेच्या भावनेनेच जगत असतात. बेकारीसारख्या समस्या व इतर कारणांमुळे मध्यमवर्गही असुरक्षिततेचे जीवन जगत आहे. भांडवलदार व कामगार यांनाही आज सुरक्षिततेचे वातावरण पारखे झाले आहे. तर खेड्यांतील लहान शेतकरी, मजूर आणि हरिजन यांनाही असुरक्षिततेच्या भावनेने ग्रस्त केले आहे. सबंध देशातच असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा तऱ्हेने दिल्लीपतीपासून तो खेड्यातील हरिजनांपर्यंत प्रत्येकजण राज्यकर्त्यांच्या स्वनिर्मित असुरक्षिततेच्या भावनेचा बळी ठरला आहे.

अशा तऱ्हेच्या सर्वंकष असुरक्षितता हे तमोयुगाचे प्रधान लक्षण होते. रोमन साम्राज्याच्या पतनानंतर युरोपमध्ये सर्वसामान्य माणसाला जी असुरक्षितता वाटू लागली त्यातूनच सरंजामशाहीची प्रमुख वैशिष्टये म्हणजे तळागाळातल्या भूदासापासून तो राजापर्यंत जमिनीबाबतच्या हक्कांच्या संदर्भात व एकनिष्ठेच्या पायावर उभारलेली एक उतरंड, आपापल्या विभागात प्रबळ असलेली जमीनदार मंडळी, केंद्रसत्तेचा दुबळेपणा, निर्नायकी. राज्यसत्तेचा अभाव जाणवणे. खाजगी न्यायालये की, ज्या ठिकाणी वजनदार माणसाला हवा तोच निर्णय मिळण्याची खात्री, ही होत व येथूनच तमोयुगाला सुरूवात होते.

भारतात आज हीच राजकीय परिस्थिती दिसते. तमोयुगात परस्पर संबंध हे बऱ्हंशी जमिनीच्या संदर्भात बांधलेले होते. कालमानाने आज त्यात बदल घडून असे संबंध सत्ता व व्यक्तिगत निष्ठा यांभोवती बांधले गेले आहेत. केंद्रसत्तेचा प्रभाव कोठेच जाणवत नाही. राज्य चालू आहे का नाही याचा संभ्रम पडतो. प्रादेशिक नेते केन्द्रिय नेत्यांवर वारंवार निष्ठा व्यक्त करून आपापल्या विभागात मन:पूत कारभार करण्यास मोकळे आहेत. प्रादेशिक नेत्यांनीही आपल्याशी एकनिष्ठ राहणाऱ्या जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील नेत्यांचे एक कडे आपल्याभोवती निर्माण केले आहे. व हीही सर्व मंडळी आपल्या एकनिष्ठेचे व प्रादेशिक नेत्यावर असलेल्या श्रद्धेचे व विश्वासाचे वेळी अवेळी प्रदर्शन करीत असतात व हा विधी यथासांग पार पाडल्यावर सर्वचजण आपापला स्वार्थ साधण्यास मुक्त असतात. सत्तेचे विकेंद्रीकरण हे अखेर स्वार्थाचे विकेंद्रीकरण ठरले. काही ठिकाणचे नेते (विरोधी पक्ष) अशी एकनिष्ठा व्यक्त करण्यास नाकबूल असतात. अशा तऱ्हेने डोईजड होणाऱ्यांचा, त्यांच्या अमलाखालील प्रजाजन व इतर प्रादेशिक नेते यांच्या मदतीने पाडाव करणे व आपल्याशी एकनिष्ठ राहणाऱ्याची स्थापना करणे हाही या राजकीय खेळीचा एक भाग असतो.

तमोयुगाचे आणखी एक लक्षण म्हणजे धार्मिक श्रद्धा व विज्ञानपराङ्मुखता. असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासलेला मनुष्य हा नेहमीच त्यातून सुटका होण्यासाठी व मन:शांतीसाठी धर्माकडे वळतो. कारण असुरक्षितता हताशपणा निर्माण करते व माणसाचा स्वकर्तृत्वावरचा विश्वास उडवते. ज्यावेळी मनुष्य काही ध्येयप्राप्तीसाठी झगडत असतो त्यावेळी त्याचा पराभवदेखील अधिक अवसान देतो. पण ज्यावेळी तो जाणूनबुजून अनैतिक मार्गाचा अवलंब करून स्वार्थ साधण्याच्या मागे असतो त्यावेळी तो दैवी अथवा असुरी, जी साधने हाताशी असतील त्यांचा अवलंब करतो. व या मन:स्थितीतूनच तो धार्मिक विधी, तीर्थक्षेत्रांना भेटी, नवस, पिरावर चादर चढविणे, ज्योतिषी, मांत्रिकांचे सहाय्य घेणे, अभिषेक करणे वगैरे गोष्टींच्या आधीन होतो.

आजकाल भारतात बुवा, आश्रम, ज्योतिषी, तांत्रिक यांचे जे उदंड पीक आले आहे व त्यांच्यामागे सुशिक्षित मनुष्यही जातो त्याचे कारण म्हणजे सर्वंकष होत असलेली असुरक्षिततेची भावना व माणसाचा स्वत:च्या कर्तृत्वावरील विश्वास उडणे ही होत. मध्यंतरी महाराष्ट्र टाईम्समध्ये एक लेख आला होता. त्यात आजकालचे तरुण देवाधर्माच्या मागे

का लागतात असा प्रश्न उपस्थित केला होता. त्याचे उत्तर अगदी सोपे आहे. असुरक्षिततेची भावना. अर्थात या ठिकाणी हे स्पष्ट केले पाहिजे की, मी धार्मिक भावनेच्या विरुद्ध नाही. कारण निःस्वार्थपणे अंगीकृत कार्यात रममाण होणाऱ्यांना धर्म हे वरदान ठरते तर स्वार्थाकरिता उपयोग करणाऱ्यांचा धार्मिक बाजार समाजाला शापवत ठरतो.

आर्थिक क्षेत्राकडे पाहिले असता दोन गोष्टी सहजच लक्षात येतात. त्या म्हणजे त्या क्षेत्रातील प्रगती व तणाव. भारतात आज लोकशाहीचा निदान देखावा तरी दिसत असेल तर ते श्रेय नेहरू यांचे. पण याबाबतीतदेखील नेहरूंचा दृष्टिकोन रोमँटिकच होता. रशियातील आर्थिक नियोजनाने ते भारून जाऊन त्यांनी त्याचा पाया भारतात घातला. पण त्याच्याच बरोबरीने लोकशाहीच्या बाह्याविष्काराचा मोहही त्यांना सुटत नव्हता. कामगार संघटना, त्यांचे भांडवलदाराबरोबरचे संघर्ष, सामुदायिक सौदा, संप, टाळेबंदी, व्यवसायस्वातंत्र्य हा सर्व प्रकार तितकाच रोचक होता. या दोहोंची सांगड घालण्याचा प्रयत्न करून त्यांनी ' सोशालिस्टिक पॅटर्न ' ही एक नवी कल्पना प्रसवली व तीतच आजच्या आर्थिक तणावाचे बीज आहे.

आर्थिक नियोजनाला चालना देऊन भारताची बऱ्याच आर्थिक क्षेत्रात प्रगती घडवून आणून त्यांनी लोकशाहीचा पाया घालण्यास सुरुवात केली, कारण आर्थिक विकासच लोकशाहीला परिपोषक असे वातावरण निर्माण करतो. आर्थिकदृष्ट्या प्रगत असलेल्या देशातच आज लोकशाही सुखाने नांदताना दिसते हा अपघात नव्हे. पण आर्थिक विकास घडवून आणत असताना आर्थिक न्यायाचे तत्त्व योग्य तऱ्हेने अमलात न आणल्याने सामाजिक जीवनात हताशपणा, असुरक्षितता, लाचारी आणि मुजोरपणा, भ्रष्टाचार, बेशिस्तपणा, उर्मटपणा, बेफामपणा (डेस्परेशन) यांचे साम्राज्य आढळते. आणि हे अपश्रेयही नेहरूंचेच. याची कारणे दोन--

१) नियोजन करीत असताना आर्थिक विकासाशी संबंधित असलेल्या सर्वच घटकांवर नियंत्रणे आवश्यक असतात व यांपैकी सर्वात प्रमुख लोकसंख्या नियंत्रण. पण हे लोकशाही (मूलभूत हक्क), निधर्मी राज्य (मुसलमानांना कसे दुखवायचे), साम्यवादी (लोकसंख्येचा आर्थिक प्रगतीला कधीच अडथळा होत नाही) व भारतीय संस्कृती (हिंदु, मुस्लिम व ख्रिश्चन परंपरा) यात कुठेच बसत नव्हते. त्यामुळे पुढील तीस वर्षे, हिंदू मध्यमवर्गीयांचा अपवाद वगळता, सर्वांनीच प्रचंड प्रमाणावर ' वीण ' करण्याचा साम्यवादी, सांस्कृतिक व मूलभूत हक्क पुरेपूर व मनमुराद उपभोगला.

२) दुसरे म्हणजे झगडून मिळतो तो न्याय व तो न्यायच असतो या जुनाट अर्थशास्त्रीय तत्त्वांचा अवलंब. कामगार, कारकून व मालक यांच्या संघर्षातून अथवा लवाद पद्धतीतून जे वेतन ठरते ते न्याय्यच असते अशी एक धारणा भारतीय अर्थव्यवस्थेत आज दृढमूल झालेली दिसते. त्याचे कारण आर्थिक जीवन हे न्यायाच्या नैतिक अधिष्ठानावर उभे करण्याचा प्रयत्न नेहरूंनी कधीच केला नाही.

या ठिकाणी एका गोष्टीचे स्मरण देणे आवश्यक आहे. ना. म. जोशी यांच्या अध्यक्षते-

खाली इंग्रजी राजवटीत जे 'पे कमिशन' नेमण्यात आले होते त्यानंतर म्हणजे साधारण १९४८ सालच्या सुमारास सर्वच क्षेत्रात वेतन सारखे होते. सरकारी कचेऱ्या, बँका, पोस्ट ऑफिसे, विमा कर्मचारी, कॉर्पोरेशन या क्षेत्रात सर्वांचे पगार साधारण एकाच पातळीवर होते, आणि आज सर्वत्रच असमानता आढळते व प्रत्येक क्षेत्रातील कर्मचारी राष्ट्रीय उत्पन्नातील जास्तीत जास्त फायदा ओरबडण्याच्या प्रयत्नात आहे. म्हणजे वेतन-समानता हे आर्थिक न्यायाचे तत्त्व स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी सर्वसाधारणपणे अंमलात होते. मग आज अशी अराजकता आर्थिक क्षेत्रात का ? याचे आणखी एक कारण म्हणजे नेहरूंच्या राजकीय विरोधकांनीही हळूहळू बोकाळत चाललेल्या आर्थिक अनीतीला राजकीय महत्त्वाकांक्षेपायी वेग दिला व आता तिने भस्मासुराचे स्वरूप धारण केले आहे.

प्रत्येक कामाचे शास्त्रीय मूल्यमापन करून त्याचे वेतन राष्ट्रीय उत्पन्नाच्या संदर्भात ठरवणे, एखाद्या विशिष्ट उद्योगधंद्याच्या नव्हे, व या प्रकारे खाजगी व सरकारी क्षेत्रात वेतनसमानता आणून तिची सांगड शेतमालाच्या किमतीशी, व शेतमजूर, असंघटित वर्ग व बेकार यांच्या निर्वाहवेतनाशी घालणे, अशा तऱ्हेचा व्यापक आर्थिक दृष्टिकोन मांडून आर्थिक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील होणे व त्यासाठी विरोधकांचे सहाय्य घेऊन राष्ट्रीय धोरण आखणे याची जरुरी होती. पण हे नेहरूंच्या हातून घडू शकले नाही. सोशालिस्टिक पॅटर्न, कल्याणकारी राज्य अशा आकर्षक शब्दांच्या मोहजालात ते सदैव गुंतून राहिले. याचा परिणाम असा झाला की, संघर्ष, क्वचित प्रसंगी हिंसाचारही केल्याखेरीज न्याय मिळू शकत नाही असा अनुभव येऊ लागला. संघर्ष आणि न्याय यांची सांगड जनमानसात घातली गेली, आणि समाजातील इतर घटकांच्या तुलनेत अवाजवी वेतन मिळत असले तरी संघर्षामधून आणखी वेतन मिळू शकले तरीही तो न्याय असे 'जंगल कायद्याला' अनुरूप असे समीकरण रूढ झाले व राजकीय फायद्यासाठी कामगार पुढाऱ्यांनी त्याचा पाठपुरावा केला. आयुर्विमा किंवा बॅन्क कर्मचाऱ्यांच्या लढ्याला नैतिक मूल्ये मानणाऱ्या समाजवाद्यांनीही पाठिंबा द्यावा हे त्याचेच उदाहरण आहे. अशी कित्येक उदाहरणे देता येतील.

ज्यावेळी आर्थिक न्यायाचे तत्त्व संघर्षाच्या पायावर उभे राहते त्यावेळी ज्याची संघर्ष ताकद जास्त त्याला फायदा मिळणार आणि ज्याची ताकद कमी आहे त्याच्यावर अन्याय होणार हे उघड आहे. म्हणजेच ज्याच्याजवळ ताकद जास्त तो प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे दुबळ्यांचे शोषण करणार. आज असा संघर्ष सर्वगामी झालेला आहे व त्याचा परिणाम म्हणज दुबळे अगतिक झाले आहेत, तर संघर्षात प्रत्यक्ष भाग घेणाऱ्यांत संघर्षाच्या वातावरणाने असुरक्षितता निर्माण झाली आहे. यात भर पडली आहे ती सतत वाढत जाणाऱ्या लोकसंख्येच्या प्रश्नाची. कामगार कल्याणाचे कायदे असूनसुद्धा कामगार आणि मालक या दोघांनाही आज असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासले आहे तर शेतमजूर आणि असंघटित कामगार अगतिकतेचे जिणे जगत आहेत. यातून मार्ग काढावयाचा असेल तर कल्याणकारी राज्याची कल्पना, लोकशाही, आर्थिक न्याय व प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास

यांच्याशी सुसंगत अशा तऱ्हेने मांडावी लागेल. कल्याणकारी राज्य म्हणजे 'नागरिकास स्वकर्तृत्वावर विसंबून, दैवी आपत्ती सोडून, इतर मानवनिर्मित समस्यांवर तोडगा शोधता येण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे आणि दैवी आपत्तीचा तडाखा सहन होण्यासाठी सामाजिक सहानुभूतीची उपलब्धी करून देणे.' केवळ अशा समाजातच आत्मविश्वास असलेले नागरिक निर्माण होऊ शकतात. असे नागरिक दैवी अथवा असुरीमार्ग, वशिलेबाजी, लाचारी, दैववाद यांपासून मुक्त होऊ शकतात व केवळ तेच राष्ट्राचे बौद्धिक व सांस्कृतिक जीवन उन्नत करू शकतात.

सामाजिक परिस्थितीबद्दल थोडक्यात लिहिणे अशक्य आहे. कारण धर्मभेद, जातीभेद भाषाभेद, पंथभेद यांचा समन्वय घडवून आणून राष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यास आवश्यक असलेल्या विधायक राजकीय मुत्सद्देगिरीच्या अभावामुळे सामाजिक वातावरण विलक्षण गोंधळाचे व तणावांचे झाले आहे. त्यामुळ प्रस्तुत लेखातील प्रतिपादनाच्या दृष्टीने आवश्यक अशा वैशिष्टयांचाच फक्त उल्लेख केला आहे.

भारतीय समाज एकसंध घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील होण्याऐवजी राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष राजकीय फायद्यासाठी निरनिराळ्या भेदाभेदावर भर देऊन ते अधिक दृढमूल करीत आहेत. त्यामुळे प्रत्येक जात, पंथ इ. अधिकाधिक आपापल्या कोशात शिरून जातीत जास्त राजकीय व आर्थिक फायदा उठविण्याचा प्रयत्न करीत आहे. राष्ट्रीय जीवन अधिक उन्नत व विकसित होण्यासाठी व्यापक दृष्टिकोन आणि बुद्धिवाद यांचा आश्रय घेण्याची अत्यंत आवश्यकता असते. पण आजकाल बुद्धिवाद मागे पडला असून जातीय भावनांना आवाहन, आक्रस्ताळेपणा, नैतिक मूल्याचा ऱ्हास, मानवतावादाचा अभाव, आपले हितसंबंध गुंतले नसतील अशा प्रश्नाबाबत बेफिकिरी, राज्यकर्त्यांच्या आश्रयाने गुंडांचा दहशतवाद, विद्वानांचा आणि विचारवंतांचा भाडोत्रीपणा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे वैचारिक निर्भयतेचा अभाव अशा अनेक बुद्धिवादाला हानीकारक असलेल्या गोष्टींचे साम्राज्य पसरलेले दिसते. बुद्धिवादाच्या पिछेहाटीला गांधीयुगापासूनच सुरुवात झाली व तिने आज भयावह असे स्वरूप धारण केले आहे.

ध्येयशून्य, स्वार्थी व सत्तेसाठीच सत्तेकरता हपापलेला आणि त्यामुळे असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासलेला राज्यकर्ता वर्ग, त्यांच्या स्वार्थाला खतपाणी घालून त्यांच्या सहाय्याने अनेक अनैतिक मार्गांनी पैसा मिळविणारा धनिक वर्ग, संघर्षमय व असुरक्षित असे कामगार जगतातील वातावरण. नीतिधैर्य खचलेला व त्यामुळे भ्रष्ट झालेला नोकरवर्ग, आत्मसंतुष्टता व असमाधान यांच्या द्वंद्वात सापडलेला मध्यमवर्ग, वैचारिक गोंधळामुळे दिशाहीन बनलेले विद्वान, विचारवंत, लेखक, कवी, ज्यांना कोणीच वाली नाही असा खेड्यापाड्यातील दलित वर्ग, असहाय्य मजुरवर्ग, या सर्वांनी मिळून सबंध सामाजिक जीवनाचे तमोयुगसदृश असे एक साचलेले डबके बनवले आहे. या डबक्याचा प्रवाह बनविण्यासाठी युरोपमध्ये पंधराव्या–सोळाव्या शतकात ज्याप्रमाणे प्रबोधनाची चळवळ झाली तशी भारतात व्हावयास पाहिजे. पण युरोपात स्वमतासाठी जिवंत जाळून घेण्यास तयार

होणारे क्रियाशील विचारवंत निपजले. भारतात आज स्वतःला जाळून घेण्याची जरुरी नाही. फक्त क्षणिक स्वार्थच बाजूला ठेवण्याची आवश्यकता आहे. पण कीड लागलेल्या या समाजात तेवढीदेखील उभारी धरणारे विचारवंत नाहीत. केवळ सरपटणारे प्राणीच आहेत, आणि जे थोडेसे आहेत ते क्रियाशील नाहीत तर केवळ कीर्तनकार आणि प्रवचन-कार आहेत. या वातावरणाचा परिणाम जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर कसा झाला आहे याचा आढावा उद्बोधक ठरेल व तो फक्त महाराष्ट्राच्याच संदर्भात घेणार आहे. पण त्यासाठी महाराष्ट्रातील परिस्थितीचे वर्णन करणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यकर्ते व इंग्रज राज्यकर्ते यांच्या कारभाराच्या कल्पना भिन्न होत्या हे वर दिलेच आहे. त्याप्रमाणेच त्यांच्या सुसंस्कृतपणाच्या कल्पनाही भिन्न होत्या. सांस्कृतिक पातळी हा शब्द मुद्दामच वापरत नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या लगतच्या काळात बाळासाहेब खेर, कन्हय्यालाल मुन्शी अशी विद्वान व सुसंस्कृत माणसे अधिकारपदावर होती. पण त्यानंतर काही अपवाद वगळता मंत्र्यांपासून तो थेट ग्रामपंचायतींच्या सभा-सदापर्यंत जे लोकप्रतिनिधी किंवा अधिकारपदस्थ आहेत त्यांचा सुसंस्कृतपणाशी आणि उच्च अभिरुचीशी कितपत संबंध आहे हा संशोधनाचादेखील विषय होऊ शकणार नाही. एकच उदाहरण देतो. पं. नेहरू तुरुंगात असताना लॉर्ड वेव्हेलनी त्यांना एक कवितासंग्रह भेट म्हणून पाठवला होता. तर आजच्या राज्यकर्त्यांच्या संस्कृतीचे वर्णन त्यांच्यापैकी एकाने ' रम, रमा व रमी ' असे केले होते. याचा मुद्दाम उल्लेख करण्याचे कारण असे की, या गोष्टी व पैसा यांसाठीच त्यांना सत्ता हवी असते. त्यांचे अनुकरण समाजातील इतर स्तरावरही जमेल अशा बेताने चालू आहे.

भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाची सूत्रे संपूर्णपणे मराठा वर्गाच्या हातात आली. या वर्गाचे प्रबोधन वैचारिक पातळीवरही झालेले नाही. त्यामुळे एका बाजूला ब्राह्मणांबद्दल असूया व दुसऱ्या बाजूला हरिजनांबद्दल तिरस्कार असे या वर्गाचे वर्णन करता येईल. परिणामी ब्राह्मण व तत्सम वर्गातील जे बुद्धिवादी व विचार-वंत भाडयाने जाऊ इच्छितात त्यांना आश्रय देऊन मिंधे करणे व त्यांचे करवी प्रशस्ती करवून घेऊन त्यात गौरव मानणे अशीही एक प्रवृत्ती आढळते. हा समाजही एकसंध नाही. यात शहाण्णव कुळीपासून अनेक पोटजाती आहेत. त्यात 'पदर' पाहिल्याखेरीज बेटीव्यवहारही होत नाही. साळचामाळचाचे सहाय्य घेऊन ग्रामपंचायतीपासून ते राज्य-सरकारपर्यंत बहुसंख्य स्थाने याने काबीज केली आहेत. यांचा बौद्धिक वकूब अत्यंत बेताचा आहे, त्यामुळे व्यापारी व भांडवलदार आणि शेतकरी वर्ग यात एक मूलभूत आर्थिक संघर्ष आहे हे याला कधीच समजले नाही. ते समजायला पस्तीस वर्षे आणि शरद जोशीं-सारखा ब्राह्मणच लागला.

येवढयानेच थांबले नाही, तर शरद जोशी शेतकऱ्यांचा म. गांधी होऊ पहात आहेत व त्यांना विध्वंसक मार्गाने नेत आहेत हेही त्याला उमजत नाही. विधायक मार्गाने, शहाण्या स्वार्थानेच त्यांचे हित होऊ शकेल हे अजूनही त्यांच्या लक्षात येत नाही. सहकारी

चळवळीतूनच त्यांचा उद्धार होऊ शकेल. पण हे त्यांना पटणार नाही. कारण सहकारी चळवळ म्हणजे पैसा खाण्याचा मार्ग हे समीकरण त्यांनीच रूढ केले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून ब्राह्मण वर्गाला नेस्तनाबूत करण्याचेच राजकारण या वर्गाने केले. सत्ता आणि स्वार्थ यापलीकडे या वर्गाच्या राजकारणाला कोणतीही दिशा नव्हती.

या वर्गाची ऐतिहासिक परंपरा पाहिली तर सत्ताधिशांची चाकरी व वतनदारीसाठी आपापसातील वैर यापलीकडे दुसरे काहीच सापडत नाही. शिवाजी महाराजांना सुरुवातीला विरोध याच लोकांनी केला होता. मराठा वर्गात कोणी संत झाला नाही. तुकारामबोवांना मारून मुटकून मराठा ठरविण्याचा प्रयत्न चालू आहे. पण तो यशस्वी झाला तरी त्यांच्या परखड वृत्तीवरून ते या समाजाचे प्रतिनिधित्व करतात असे मानता येणार नाही. महर्षी वि. रा. शिंदे सोडले तर या वर्गाने कोणी समाजसेवक निर्माण केला नाही. पण यांच्या लेखी शिंदे 'ब्राह्मणाळलेले' होते. सामाजिक जबाबदारीची जाणीव या वर्गास मुळीच नाही. ती जाणीव असलेली ज्योतिबा फुले, गाडगे महाराज, भाऊराव पाटील ही सर्व मंडळी मराठेतर होती. या वर्गाला जातीचेदेखील हित समजत नाही. ते समजत असते तर मोठ्या शेतकऱ्याने लहान शेतकऱ्याला गिळले नसते. या वर्गाची महाराष्ट्राला देणगी म्हणजे भास्करराव जाधव, जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, यशवंतराव चव्हाण व मोहिते, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई आणि अनेक पाटील मंडळी. या सर्वांच्या ऐतिहासिक कार्याचे एकदा मूल्यमापन व्हावेच. त्याची तुलना लोकहितवादी गोपाळराव देशमुखांपासून ते चिंतामणराव देशमुखांपर्यंतच्या मराठेतर पुढाऱ्यांनी जे योगदान दिले त्याच्याशी करणे विलक्षण प्रत्ययकारी ठरेल.

ज्योतिबा फुले व शाहूमहाराज यांच्या कार्याबद्दल हा वर्ग गहिवरून बोलतो पण त्यांचे अस्पृश्यता निवारण्याचे कार्य त्याने कितपत जाणवून घेतले आहे, किती खेड्यांतून अस्पृश्यांना सवर्णांच्या विहिरीवर पाणी भरता येते याचाही शोध व्हावा.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हा वर्ग सत्तेवर आला. पण याच्यासमोर स्वार्थापलीकडे कोणतेही ध्येय नव्हते व असा समाज कोणतीही उभारी धरू शकत नाही. मराठावर्गाची पर्यायाने महाराष्ट्राची ही शोकांतिका आहे. जो आपला वैयक्तिक स्वार्थ साधून देईल त्याच्या आश्रयाने रहाणारा हा समाज कणाहीन, लिबलिबीत आणि आत्मविश्वास नसलेला असा आहे. स्वातंत्र्यानंतर तीस वर्षांहून अधिक काळ महाराष्ट्रात स्वतःबद्दल दबदबा निर्माण केलेल्या आणि हिमालयाच्या हाकेला सह्याद्री धावून जाण्याची वल्गना करणाऱ्या या वर्गाची खरी लायकी काय आहे हे श्रीमती इंदिरा गांधींनी

'जोहार मायबाप जोहार
बहु भुकेला झालो
तुमच्या उष्टयासाठी आलो.'

...३

अशी त्याची अवस्था करून दाखवून दिली आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, या समाजाचे बल संख्येत आहे, आत्मविश्वासात नव्हे.

आमच्या शेजारी एक प्यून राहात होता. लाडात आल्यावर तो आपल्या बायकोला म्हणत असे "भिक्ये, तुला काय ठावं हाय; माज्याबिगार सायबाचं लई अडतंया." आपल्यावाचून कुणाचे तरी 'लइ अडतंय' हा खरा–खोटा समज म्हणजे मराठी माणसाच्या अस्मितेची हद्द. शिवाजीचा अपवाद वगळता ही मराठ्यांची पूर्वपरंपराच आहे. शहाजीवाचून निजामशाहीचे अडत होतें, मोरे, घोरपडे यांच्याशिवाय आदिलशहाचे तर महादजी शिंद्याशिवाय दिल्लीच्या बादशहाचे. यांच्यापैकी कोणालाही अत्युच्चपदी किंवा कोणातरी महापदी असलेल्यांच्या बरोबरीचा होण्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. कोणाचा तरी कर्तबगार अथवा विश्वसनीय दुय्यम बनणे हेच मराठी माणसाचे उद्दिष्ट. इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासून १९२० पर्यंतच्या काळ सोडला तर महाराष्ट्रात हीच परंपरा चालू आहे. १९२० सालापासून महाराष्ट्राच्या राजकारणात बहुजन समाजाचे महत्त्व वाढले व स्वातंत्र्योत्तर कालात तर मराठा आदी वर्गाच्या हातात राजकीय सत्ताही आली. तेव्हापासून कुणाच्यातरी कृपेने दुय्यम बनण्याची जीवघेणी स्पर्धा पुन्हा सुरू झाली व आपल्यावाचून 'लई अडतंय' ही भावना मराठी नेतृत्वाला भावू लागली. त्यातूनच महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ असल्याची, हिमालयाच्या सहाय्याला सह्याद्री धावल्याची, गृहखाते, अर्थखाते, परराष्ट्रखाते अशी हलवाहलव झाली तरी, नेत्यांनी सोपविलेले कार्य इमानेइतबारे बजावण्याची भाषा, अभिमानाने बोलली जाऊ लागली. 'वसंतदादा खरे आमचेच, ते विरोधात काही काल गेले हेच आश्चर्य" ही इंदिरा गांधींची भाषा, मराठी नेतृत्वाला सुखावून गेली, शरद पवारही आपल्यावाचून 'लई अडतंय' या गोड गैरसमजातून पुन्हा काँग्रेसवासी झाले. कोणाच्या तरी कृपेने दुय्यम स्थान मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेचे परिणाम दिसण्यास वेळ लागला नाही. दुय्यम स्थानासाठी अनेक स्पर्धक असल्याने सह्याद्रीची पर्वती करण्यास, दादांना राजकारणातून निवृत्त करण्यास, राष्ट्रीय नेतृत्वास वेळ लागला नाही. आज शरद पवारांना झुलवत ठेवण्यात आले आहे. तर शंकरराव चव्हाणांना, पंतप्रधानांची भेट मिळणेही मुष्किल होत आहे. आपल्यावाचून 'लई अडतंय' या गैरसमजात समाधान मानून दुय्यम स्थान स्वीकारण्याच्या वृत्तीतून महाराष्ट्राच्या नेतृत्वाची शोकांतिका उद्भवली. परिणामी आज महाराष्ट्रात शासन ठप्प झालेले आढळत आहे.

महाराष्ट्राच्या शोकांतिकेचे प्रतिनिधित्व प्रामुख्याने ग्रामीण भागात काँग्रेस करीत असली तर शहरी भागात ते प्रतिनिधित्व शिवसेना करते. शिवसेना स्थापन झाली तेव्हा महाराष्ट्राची स्वातंत्र्योत्तर कालातील गरज भागवणारी शक्ती निर्माण होत आहे अशीच भावना बहुसंख्य मराठी माणसांची झाली होती. पण त्याच शिवसेनेला ज्याची दखल घेतलीच पाहिजे असे उपद्रवमूल्य असलेली संघटना असे स्वरूप का प्राप्त झाले? आंध्रमध्ये तेलगू देशम् पक्ष सत्तेवर आला. महाराष्ट्रात शिवसेना हे का साध्य करू शकली

नाही ? वास्तविक महाराष्ट्रात एक नवी शक्ती निर्माण होऊ घातली आहे याची जाणीव यशवंतराव चव्हाणांनाही झाली होती. ठाणे नगरपालिकेची निवडणूक शिवसेनेने जिंकल्या-नंतर यशवंतरावांना प्रश्न करण्यात आला की, 'पुढे काय ?' त्यावर ते उद्गारले होते की 'पुढे कल्याण.' पण शिवसेना तिथेच थबकली. याचे कारण म्हणजे मराठी माणसांच्या हितापेक्षा संघटनेच्या हितालाच प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे सुरुवातीला शिवसेनेला 'वसंतसेनेचे' रूप धारण करावे लागले. नक्की आठवत नाही पण साधारण ६८–६९ साल असावे. मराठी माणसाला नोकऱ्यात प्राधान्य मिळाले पाहिजे असे नारे शिवसेना लावत होती. त्याचवेळी माझ्या आठवणीप्रमाणे इंदु ग्रुपच्या काही गिरण्या बंद करून मालकांनी हजारो मराठी मजूर बेकार केले होते. पण त्यासंबंधात शिवसेनेने अवाक्षरही काढले नव्हते. हा सर्वच प्रकार मराठी माणसाला संशयास्पद वाटू लागला त्यामुळे शिवसेना मूळ धरू शकली नाही. मुंबई महानगरपालिकेच्या मागील निवडणुकीत शिवसेनेला भर-घोस मतदान झाल्यानंतर 'इतक्या दिवस इतरांनी खाल्ले, आता आम्हाला खाऊ द्या' ही शिवसेनेच्या एका नेत्याची प्रतिक्रिया पुष्कळ काही सांगून जाते. या निवडणुकीत इतर भाषिकांनीही शिवसेनेला मतदान करून मराठी माणसाचे हित हा शिवसेनेचा निव्वळ बहाणा असल्याच्या वस्तुस्थितीवर शिक्कामोर्तबच केले. कोणत्याही कार्यक्रमाऐवजी निव्वळ घोषणा आणि उखाणे यांच्यावरच गुजराण करणारी शिवसेना आजवर आपण धास्ती निर्माण केली आहे याच समाधानात असावी असे दिसते. ही पण महाराष्ट्राची परंपरा आहे. मराठ्यांच्या धास्तीने अलीवर्दीखानाने बंगालमध्ये मराठा खंदक खणला होता. बंगाली स्त्री मुलाला जोजविताना 'लवकर नीज, नाहीतर मराठा तुला घेऊन जाईल' असे म्हणत, अशी अशी आख्यायिका सांगितली जाते, तर होळकरांच्या स्वाऱ्यांना कंटाळून रजपूत राजांनी इंग्रजांचे संरक्षण मागितले होते. या सर्व घटना मराठी माणसाच्या अभि-मानाचाच विषय आहेत. शिवसेनेचे सध्याचे विधायक कार्य म्हणजे सत्तेवर आल्यानंतर शिक्षा देण्यासाठी, शिवसेनेला त्रास देणाऱ्या पोलिसांची काळी यादी तयार करणे. या परिस्थितीत मुंबई आणि इतरत्र मराठी माणसाची गळचेपी आणि शिवसेनेच्या मराठी माणसाचे हित रक्षण करण्याच्या घोषणा या दोन्ही गोष्टी सारख्याच जोराने चालू असल्याबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

मध्यमवर्ग हा कोणत्याही समाजाचा कणा मानला जातो व कोणत्याही समाजाचे भवितव्य अखेर मध्यमवर्ग ज्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व बौद्धिक आकांक्षा बाळगतो त्यांवरच अवलंबून असते. इंग्रजी साम्राज्य जे जगभर पसरले ते सरंजामशाही संपून इंग्लंडमध्ये मध्यमवर्गाच्या हातात सत्ता आली तेव्हाच. फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती यांचे पुढारी मध्यमवर्गीयच होते. तर जर्मनीमध्ये नाझीझमचा उदय झाला त्याचे मूळ १९३० च्या आर्थिक अरिष्टाने तेथील मध्यमवर्ग नामशेष झाला या घटनेत शोधण्यात येते.

श्रीमंत वर्ग फक्त आर्थिक हितसंबंध सुरक्षित राखण्याच्या मागे असतो. जमीनदार

अधिक जमीन मिळविण्याच्या मागे असतो तर गरीब 'आज'च्याच चिंतेत असल्यामुळे त्याला 'उद्या'ची चिंता करण्यास फुरसत नसते किंवा अज्ञानामुळे त्याला त्याची जाणीवही नसते. भवितव्याची चिंता फक्त मध्यमवर्गीयालाच असते व राष्ट्रीय जीवनाचाही तो त्या दृष्टिकोनातून विचार करू शकतो. त्यामुळे मध्यमवर्ग ज्या वेळेला दिशाहीन, मनोधैर्य खच्ची झालेला व हताश बनतो तेव्हा त्या समाजाची स्थिती सुकाणू तुटलेल्या नौकेसारखी होते व तेथूनच सामाजिक अध:पतनाला सुरुवात होते. त्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात मध्यमवर्गाचे काय स्थान होते हे पहाणे अपरिहार्य आहे.

इंग्रजी राज्याच्या सुरुवातीपासून ते स्वातंत्र्य मिळेपर्यंत सर्वसाधारणपणे महाराष्ट्राच्या बौद्धिक व राजकीय जीवनाची सूत्रे मध्यमवर्गाच्याच हातात होती. लोकहितवादीपासून ते साने गुरुजींपर्यंत देशाच्या भवितव्याची चिंता करणारे देशभक्त या वर्गातूनच आले. आता ही परंपरा काही अपक्ष व्यक्तींपुरतीच मर्यादित आहे. दुर्दैवाने महाराष्ट्रातील आर्थिक वर्गीकरण हे जातिव्यवस्थेलाच धरून झाले होते. मध्यमवर्गामध्ये मुख्यत: ब्राह्मण, सारस्वत पाठारे प्रभू, कायस्थ प्रभू अशा अल्पसंख्य. जमातींचा समावेश होतो. त्यांच्या पाठीशी ज्ञानसाधना, समाजसेवा, त्याग आणि व्यापक दृष्टिकोन यांची परंपरा होती. त्यामुळे या वर्गातून कार्यकुशल व राजकारणाला दिशा देणारे पुढारी मिळू शकले असते. कांग्रेसमध्ये जो मध्यमवर्ग राहिला होता त्याचेही थोडेसे बौद्धिक अवमूल्यन गांधीयुगात झाले होतेच. पण परिस्थितीशी जमवून घेण्याच्या या वर्गाच्या प्रवृत्तीमुळे स्वातंत्र्यानंतर येणारी आव्हाने या वर्गाने समर्थपणे पेलली असती. त्यामुळे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे भवितव्य ठरविण्याच्या कार्यात या वर्गाचा सहभाग अत्यंत मोलाचा ठरला असता.

लोकशाहीचा स्वीकार केल्यानंतर महाराष्ट्राच्या भवितव्याची सूत्रे मराठा व तत्सम जातीच्या हातात जाणे अपरिहार्य होते. त्यांच्या परंपरेचे वर्णन वर केले आहेच. महाराष्ट्रातील आर्थिक वर्गीकरण हे जातिनिहाय बनल्यामुळे व नवे राज्यकर्ते दिशाहीन असल्यामुळे येथील राजकारणाने जातीय वळण घेतले व मध्यमवर्ग सत्तेच्या रिंगणाबाहेर फेकला गेला. ब्राह्मण वर्गाबद्दल बोलायचे तर गांधीवधोत्तर झालेल्या जाळपोळ आणि दंगलीने या वर्गाचा स्वातंत्र्याचा कैफ पार उतरला. ही दंगल म्हणजे ब्राह्मण जमातीविरुद्ध धुमसत असलेल्या संतापाचा उस्फूर्त उद्रेक नव्हता तर आत्मविश्वास नसलेल्या व न्यूनगंडाने पछाडलेल्या समाजाने हाती आलेल्या सत्तेच्या संरक्षणाखाली उगवलेला सूड होता. हा उद्रेक जर इंग्रजी राजवटीत झाला असता तर मराठा समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण म्हणून तरी त्याचे समर्थन होऊ शकले असते. पण हा समाज ही हिंमत त्यावेळी दाखवू शकला नसता. कारण आपल्या कृत्याचे परिणाम भोगण्यासाठी जी मानसिक तयारी लागते ती या समाजाची नव्हती व आजही नाही. हे इंदिरा गांधींनी व राजीव गांधींनी सिद्ध करून दाखविले आहे. आत्मविश्वास नसलेल्या समाजाच्या हातात सत्ता आली तर तिचा त्याला कैफ चढतो व तो दिशाहीन होतो व ती गेली तर तो पांगळा बनतो. याउलट आत्मविश्वास असलेला समाज प्रसंगी अरेरावीने वागला तरी त्याच्या राजकारणाला

दिशा असते. इंग्रजांची राजवट हे याचे उत्तम उदाहरण.

गांधीवधोत्तर दंगलीने महाराष्ट्रातील राजकारणाची दिशा स्पष्ट झाली. मध्यमवर्गाला यापुढे राजकारणात स्थान नाही हे स्पष्ट झाले. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर माडखोलकरांचे 'मराठी राज्य होणार की मराठा राज्य' या प्रश्नाला यशवंतरावांनी दिलेल्या उत्तरात फक्त सौजन्यच होते. वस्तुस्थितीचे दर्शन नव्हते. बराचसा बुद्धिवादी मध्यमवर्ग काँग्रेसमधून आधीच बाहेर पडला होता. जो राहिला होता तो हळूहळू विरोधी पक्षात गेला. शेवटी जो मध्यमवर्ग काँग्रेसमध्ये राहिला तो बुद्धिवादापेक्षा काँग्रेसनिष्ठाच जोपासणारा होता. त्यांपैकी काहीजणांना सुरुवातीला काँग्रेसमध्ये अधिकारस्थाने दिली गेली. पण लवकरच बेरजेचे राजकारण सुरू झाल्यावर त्यांना वजा करण्यात आले.

मध्यमवर्गाचा महाराष्ट्राच्या राजकारणातून लोप होणे ही घटना, त्यामुळे अटळ ठरलेल्या सार्वत्रिक अध:पाताच्या प्रतिक्रियेची सुरुवात होती. कारण सत्ताधारी अथवा विरोधी पक्षीयांच्या राजकारणात सक्रिय भाग न घेणारा पण काही निष्ठांची कास धरणारा असा फार मोठा मध्यमवर्ग होता. 'बेरजे'ऐवजी विधायक राजकारणाचे कार्य सुरू झाले असते व त्यात या वर्गाची गुंतवणूक घडवून आणण्याचे हेतूपूर्वक प्रयत्न करण्यात आले असते तर त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक जीवन फार वेगळ्या तऱ्हेने विकसित झाले असते. अशी गुंतवणूक निव्वळ मुंबईतील काँग्रेस कचेरीला टिळक भवन किंवा एखाद्या स. गो. बर्वे यांना मंत्रिमंडळात घेऊन होणे शक्य होते. पण ही उदाहरणे निदान एवढे तरी दर्शवतात की, यशवंतरावांना असे काही तरी व्हावयास पाहिजे याची उथळ का होईना पण जाणीव होती. सह्याद्री हिमालयाच्या हाकेला धावून गेल्यानंतर तेही संपले.

लोकशाहीचे अस्तित्व आणि बळ स्थानिक स्वराज्य संस्थांवर अवलंबून असते. ग्रामपंचायतीपासून ते राज्यसरकारपर्यंत सामाजिक जबाबदारीतून कारभार होण्यास, सहकारी सोसायटयांपासून तो बॅन्कांपर्यंत स्वच्छ कारभार चालण्यास मध्यमवर्गाचा उपयोग होऊ शकला असता आणि भ्रष्टाचार आवाक्यात राहिला असता. कारण समाजात परंपरा, सवय आणि थोडासा भित्रेपणा, यांमुळे नैतिक मूल्ये मानणारे व सेवाभावी वृत्तीचा अंगीकार करू शकणारे बहुसंख्य लोक याच वर्गातून येतात आणि सामाजिक जीवनाला हाच वर्ग दिशा देऊ शकतो. स्वातंत्र्यचळवळीत हाच वर्ग बहुसंख्य होता. परंतु आज मध्यमवर्गाला राजकीय कारभार तर सोडाच पण गल्लीबोळातल्या उत्सवातूनही हद्दपार केले गेले आहे. कारण जमा झालेली वर्गणी आणि झालेला खर्च यांचा हिशेब ठेवण्याच्या बाबतीत हाच वर्ग जागरूक असतो.

मध्यमवर्ग सार्वजनिक जीवनात हद्दपारीचे जिणे जगत आहे. ज्यांना समाजासाठी काहीतरी केल्याखेरीज अगदीच स्वस्थ बसवत नाही ते मग व्याख्यानमाला, ग्रंथालये, कुठे स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थी तयार कर, असे काही तरी करून स्वत:ला रमवून घेतात. ग्राहक पंचायत हा असाच एक मार्ग, पण चालू असलेल्या अध:पाताला आपण आळा घालू शकत नाही, आपल्याला सार्वजनिक जीवनात स्थान आपल्या जातीमुळे नाही, आपल्या

बौद्धिक लायकीप्रमाणे आपल्याला सामाजिक दर्जा नाही, एवंच महाराष्ट्रात आपली स्थिती दुय्यम नागरिकासारखी आहे आणि मुसलमानी राज्यात 'काफर' हे अभिधान तक्रार न करता हिंदू स्वीकारत त्याप्रमाणे 'भटुरगा' हा शब्दप्रयोग मुकाटचाने ऐकावा लागतो ही खंत त्याला नेहमीच व्यथित करते. मी जानवे तोडले. मांसाशन केले तरी मला ब्राह्मण्य सोडत नाही. मग मीही त्याला अधिकच चिकटतो.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर साधारण एक पिढीपर्यंत या वर्गाने नैतिकमूल्ये जपण्याचा प्रयत्न केला. पण हळूहळू त्याचे वैय्यर्थ जाणवू लागले व आता त्याचा दृष्टिकोन संपूर्ण जडवादी बनला आहे. पैसा मिळवणे हे त्याचे ध्येय बनले. भल्याबुऱ्या मार्गाची जाणीव आता त्याने सोडून दिली आहे. डॉक्टर, एंजिनिअर आता त्याला फक्त पैशासाठीच व्हायचे आहे. त्याच्या मूल्यमापनात आता प्राध्यापकाचा पेशा बराच खाली आहे. त्यापेक्षा विमा किंवा बॅंक कर्मचाऱ्याचा पेशा त्याला जास्त महत्त्वाचा वाटतो. मध्यमवर्गाची नीतिभ्रष्टता नेहमीच परिपूर्ण असते. कारण तो खालच्या वर्गातल्या लोकांप्रमाणे 'साहेब, बक्षीस' असे मागत नाही तर, नीतिभ्रष्टतेचे तत्त्वज्ञान बनवतो. (फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये रॉबेसपिअरने असेच 'भया'चे तत्त्वज्ञान बनवले होते.) दुसरे म्हणजे बुद्धीचा उपयोग करून त्यात एक पद्धत आणतो. आज काही काही खात्यात भ्रष्ट नसलेली माणसे चालत नाहीत हा या 'पद्धतीचाच' परिणाम.

□ □

# तीन

गेल्या पंधरा-वीस वर्षांत इन्कम टॅक्स, सेल्स टॅक्स, अबकारी, कस्टम्स इ. खाती व स्मगलर्स, भांडवलदार यांनी जी समांतर अर्थव्यवस्था निर्माण केली आहे, ती याच वर्गाच्या जीवावर. या वर्गाच्या सहकार्याशिवाय ही समांतर अर्थव्यवस्था एका दिवसात कोलमाडून पडेल. मध्यमवर्ग भ्रष्टाचारी बनण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्याल वाटणारी आर्थिक असुरक्षितता. भवितव्याचा विचार करणारा फक्त मध्यमवर्गच असतो. त्यामुळे भ्रष्टाचाराने तो स्वतःच्या वृद्धापकालाची तरतूद करीत असतो व ती करीत असताना त्यावेळी किमतीची पातळी काय असेल याबद्दलही त्याचे गणित असते. शिवाय राजकीय फायद्यासाठी काही जातींवर दलितावस्था वंशपरंपरा लादून व त्यांचे कैवारी म्हणून आपली प्रतिमा निर्माण करून एकगठ्ठा मतांची सोय करण्याचे जे राजकारण सुरू झाले आहे, त्यामुळे आपल्या पुढच्या पिढीच्या भवितव्याबद्दल तो साशंक आहे व त्याची सोय करणे हेही त्याचे एक इतिकर्तव्य बनले आहे व त्यासाठी भ्रष्टाचाराच्या गंगेत हात बुडवून घेण्याइतका दुसरा कोणताही सोपा मार्ग नाही. कारण राज्यकर्ता वर्गही भ्रष्टाचारीच आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्याच्या साशंकतेचा पुरावा, या वर्गाचा राखीव जागांना असलेला विरोध, कुटुंबनियोजनाबाबतची जागरुकता व परदेशी स्थायिक होण्याची प्रवृत्ती यांतून दृग्गोचर होते. इथे किंवा परदेशात दोन्ही ठिकाणी दुय्यम नागरिकत्वाची भूमिका बजावयाची, मग परदेशात निदान भौतिक सुखसाधनांचा तरी सुकाळ आहे.

सुरुवातीला पैसा मिळवून 'फर्निश्ड' ब्लॉक, गाडी, टी. व्ही. भविष्यनिर्वाहाची तरतूद एवढीच या वर्गाची अपेक्षा होती. एखादा समाज ज्यावेळी जाणीवपूर्वक स्वतःचे नैतिक अवमूल्यन करून घेतो तेव्हा त्याच्या अधःपाताच्या मर्यादाच नष्ट होतात. त्यामुळे सुखाच्या भैतिकसाधनांकडून तो हळुहळु सुखाच्या शारीरिक साधनांकडे वळू लागला आहे. आजकाल अधिकारपदस्थांची, पैशाबरोबरच, शारीरिक सुखाचीही सोय करावी लागते. 'सोसायटी गर्ल्स' ही एक नवी संस्था रूढ होऊ लागली आहे.

मध्यमवर्ग हा कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ठरवीत असतो. ज्यावेळी मध्यमवर्ग फक्त शारीरिक किंवा हलक्या स्तरावरील बौद्धिक आनंदाचीच क्षमता विकसित करतो तेव्हा या समाजाचा बौद्धिक व सांस्कृतिक दर्जाही खालावतो. कारण नाटक, ललित लेखन, काव्य इ. चा हाच प्रमुख आश्रयदाता असतो त्यामुळे त्याला रिझविण्यासाठी हवे तसे लेखन केले जाते. 'कॅबेरे' लोकप्रिय होतात. पण हे सर्व करीत असतानाही या वर्गाला आपण जे करीत आहोत ते योग्य नाही अशी सूक्ष्म टोचणीही असते. त्याच्यावर

उतारा म्हणून स्वतःच्या बौद्धिक जीवनाचा दर्जा उच्च आहे याचे प्रदर्शन करून स्वतःला व परिचितांनाही फसविण्याची त्याला मानसिक गरज भासते. मग तो 'मार्क्स आणि मानव' अशी पुस्तके आपल्या 'बुक रॅक' मध्ये शोभेची वस्तू म्हणून कुणालाही सहज दिसेल अशा तऱ्हेने ठेवतो. कुमार गंधर्वांचे गाणे, कृष्णमूर्तींची व्याख्याने, अशांसारखी बौद्धिक 'रेचके' अधूनमधून घेऊन आपला मानसिक कोठा साफ ठेवण्याची खबरदारी घेतो.

खरे पाहिले तर मध्यमवर्गाची स्थिती आज खरोखरीच चांगली आहे. पण त्याच्या जीवनात कोणतेही आव्हान नाही, कोणतेही 'थ्रिल' किंवा कोणतीही गुंतवणूक नाही. आव्हान असेलच तर ते भवितव्याचे व त्याचे परिणाम वर वर्णन केले आहेतच. पूर्वी घरात मिळवणारा एक व खाणारी तोंडे अनेक अशी परिस्थिती असताना मुलाबाळांचे शिक्षण आणि लग्नकार्ये यातही एक आव्हान असे. कारण सुसंस्कृत माणसाला दुसऱ्या कोणासाठी तरी त्याग करण्यात जीवनसाफल्य वाटते. स्वदेशी वस्तू किंवा खादी वापरणे यातही एक 'थ्रिल' होते. तर स्वातंत्र्य या भावनेत एक गुंतवणूक होती. आज त्यातले काय उरले आहे ? मिळवती नवरा–बायको, आटोपशीर संसार यामुळे आर्थिक स्वास्थ्य आहे. पण मध्यमवर्गीय समाधानी नाही.

राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्याला सहभागी करून घेण्यात आले असते, त्याच्यावर जबाबदारी पडली असती किंवा आपल्या शुद्ध चारित्र्याचे फळ त्याला दृश्य स्वरूपात दिसले असते तर त्याची एक महत्त्वाची मानसिक गरज भागली असती. पण त्याची जात आडवी येते. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत तो काहीतरी थ्रिल' शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयाला आज दारू पिण्याचे किंवा चोरट्या आयातीच्या वस्तू वापरणे आणि त्यापेक्षाही त्यांचे 'प्रदर्शन 'करण्यात 'थ्रिल' वाटत असते. अमेरिकेत दारूबंदी झाल्यानंतर दारू पिण्याचे व्यसन बेसुमार वाढले. त्याची कारणमीमांसा फॉकनेर या अमेरिकन लेखकाने फक्त एका वाक्यात केली आहे. तो म्हणतो 'इट लूक्ड स्मार्ट टू ड्रिंक.' आपल्याकडील मध्यमवर्गाची परिस्थिती तीच आहे. पण या व्यसनातही त्याने ब्राह्मणी संस्कार आणले आहेत. फुकट मिळाले की, आडवा हात मारणे ही ब्राह्मणांची परंपरा. त्यामुळे स्वतःचा पैसा खर्च करावयाचा असेल तेव्हा तो बेताने पितो पण फुकट प्यायल्यानंतर त्यांची अवस्था काय होते ते अशा पार्ट्यांना हजर असतात त्यांना माहिती आहेच. काहीजण मटका, जुगार, रेस, यात आपला जीव रमवतात.

अशा तऱ्हेने आपल्या जीवनात कृत्रिमपणे 'थ्रिल' निर्माण करून स्वतःपुरतेच किंवा कुटुंबापुरते एक मर्यादित विश्व तयार करून तो आत्मसंतुष्टता जोपासत आहे. समाजजीवनात कोणतेही स्थान नसलेल्या मध्यमवर्गाने अखेर आत्मसंतुष्टतेच्या कोशात स्वतःला गरफटवून घेतले आहे व तो ज्या भ्रष्टाचारी जीवनपद्धतीचा एक घटक आहे त्याची टोचणी नष्ट करण्याचा तो हमखास मार्ग आहे. 'मला काय त्याचे' या वृत्तीतूनच आत्मसंतुष्टता येते व त्यातून पुन्हा भ्रष्टाचारी वृत्तीलाच उत्तेजन मिळते.

रांगेचे नियम प्रामाणिकपणे पाळू इच्छिणाऱ्या माणसासारखी मध्यमवर्गाची आज

स्थिती झाली आहे. बस आली की, रांग मोडून बसमध्ये घुसण्याची वृत्ती पाहिली की, आपणही तेच करतो. मग वृद्ध, महिला, लहान मुले यांना अन्याय होतो त्याचा आपण विचार करीत नाही. त्याप्रमाणे जे भ्रष्टाचारी नाहीत तेही आता या साथीला बळी पडू लागले आहेत. मला काही वेळा वाटते की, भ्रष्टाचाराच्या ऑक्टोपसच्या विळख्यातून सुटण्याचा आता एकच मार्ग राहिला आहे. तो म्हणजे भ्रष्टाचाराला कायदेशीर स्वरूप देणे. कोर्टात ज्याप्रमाणे प्रत्येक मुकादम्यासाठी स्टँप फी असते त्याप्रमाणे कामाच्या स्वरूपाप्रमाणे लाचेचे अधिकृत कोष्टक तयार करावे व त्यावर इन्कम टॅक्स आकारू नये.

एकदा आर्थिक अभ्युदय एवढेच साध्य ठरल्यानंतर याही समाजाचा अधःपात होणे साहजिकच आहे. अनेक विद्वान व विचारवंत भाड्याने जाण्यास सुरुवात झाली. मराठा राज्यकर्त्यांनाही हा प्रकार सुखप्रद वाटत होता. कारण ज्या वर्गाबद्दल त्यांना अत्यंत असूया होती, त्यांच्यातील श्रेष्ठींना पदरी बाळगूनच त्यांचा अहंकार सुखावणार होता. पूर्वीच्या संस्थानिकांना घोडे, कलावंतिणी, गायक, पहिलवान वगैरेचा षोक होता, तर नवीन राज्यकर्त्यांना त्यांच्या कृपादृष्टीसाठी आसुसलेल्या विद्वानांचा. मध्यमवर्गाचे, सेल्फ-कन्टेंड ब्लॉक, टी. व्ही. फ्रीज, मुलांना परदेशी पाठविणे, चांगली पगारी नोकरी एवढेच ध्येय राहिल्यानंतर स्वार्थ–त्याग, प्रामाणिकपणा, स्वाभिमान या गोष्टी त्यांच्या शब्दकोशातून हद्दपार झाल्या असल्यास नवल नाही. जगणे एवढेच ध्येय त्याच्यासमोर राहिले. या वर्गाला समाजात पूर्वी जे उच्च स्थान होते ते गमावल्याची भरपाई अधिकाधिक पाश्चात्य धर्तीचे जीवन जगण्यास सुरुवात करून त्याने केली, व एका नव्या तऱ्हेने आपल्यातील व बहुजन समाजातील अंतर कायम ठेवले. एका दृष्टीने असे अंतर निर्माण करणे या समाजावर लादले गेले आहे, कारण बहुजन समाजही त्याला त्याच्या जातीमुळे आपल्यात सामावून घेण्यास तयार नाही. एका उच्चकुलोत्पन्न 'ज्यू' सदृश राजकीय अस्पृश्यवर्गाच्या उदयाला सुरुवात झाली आहे.

मध्यमवर्गाच्या आणखी एक–दोन वैशिष्ट्यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यापैकी पहिले म्हणजे ब्राह्मण व तत्समवर्ग कुटुंबनियोजन करीत असल्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात या वर्गाची वाढ होणार नाही. कालांतराने हा वर्ग इतका लहान होणार आहे की, त्यांच्यातून समाजाला आवश्यक इतके कार्यक्षम प्रशासक मिळणे शक्य होणार नाही. इतर जमातीतही आता मध्यमवर्ग निर्माण होत आहे. पण त्याच्या बाबतीत दोन अडचणी आहेत. पहिले म्हणजे या वर्गाचा उदय, भ्रष्टाचार हा सामाजिक जीवनाचा एक अपरिहार्य भाग आहे, अशी सार्वत्रिक समजूत रूढ झाली तेव्हाच्या वातावरणात झाला आहे. त्यामुळे चांगले–वाईट याची जाणीवच त्याला नाही. दुसरे म्हणजे त्याच्या मागे कार्यक्षमता, सामाजिक जबाबदारी, कर्तव्यबुद्धी, राष्ट्रहित असल्या भ्रामक (!) कल्पनांची कोणतीही परंपरा नाही. याचा परिणाम म्हणजे प्रशासनात अत्यंत अकार्यक्षमता व बेफिकिरी येणे अनिवार्य आहे. आज ही प्रक्रिया सुरू झालेली आहेच व त्याचा आपल्याला हरघडी अनुभव येतोच आहे.

दुसरे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात सरकारविरोधी राजकारणात पड-लेला ब्राह्मण वर्ग इतका पोळून निघाला आहे की, राजकारणाची आता त्याने हाय खाल्ली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालात अनेकांनी आपल्या संसारावर निखारे ठेवून राष्ट्रकार्य केले पण त्याची किंमत राहिली नाही. त्याला उद्देशूनच 'त्यागाची मूर्ती संपत्तीच्या गादीवरच खुलून दिसते' असा मार्मिक अभिप्राय तात्यासाहेब केळकर यांनी व्यक्त केला होता. स्वातंत्र्योत्तरकालात या वर्गाने नैतिक मूल्याचे खूळ आपल्या मानगुटीवर ठेवल्यामुळे विरोधी पक्षात जाण्याखेरीज त्याला पर्याय उरला नाही. कारण सत्ताधारी पक्षात स्वार्थाचे राजकारण सुरू झाले. अशा तऱ्हेने राजकारणाने पोळलेल्या व्यक्तींची उदाहरणे डोळ्या-समोर असताना या वर्गाला चर्चेपलीकडे राजकारणात स्वारस्य उरले नाही. त्यामुळे एस. एम. जोशी, मधु दंडवते, लिमये, ना. ग. गोरे अशी माणसे राजकारणातून निवृत्त झाल्या-वर विरोधी पक्षातूनही हा वर्ग नामशेष होईल. विठ्ठलराव गाडगीळांसारखी सत्ताधारी पक्षाशी काहीही करून जमवून घेणारी व्यक्ती सोडली तर या वर्गातील राजकीय कार्य कर्त्यांच्या मुलांना आता राजकारणाचा उबग आला आहे.

याउलट सत्ताधारी पक्षात सत्तास्थाने वंशपरंपरा जात आहेत. म्हणजे एका बाजूला स्वार्थ साधण्याची परंपरा जोमाने वाढत असताना दुसऱ्या बाजूला त्या स्वार्थावर अंकुश चालविणारांची परंपरा खंडित होत आहे. त्यामुळे यापुढे महाराष्ट्रातील राजकारणाला,- स्वार्थ साधण्याच्या बाबतीत मतभेद असणाऱ्या गटांचे डावपेच, असे स्वरूप येणार आहे. हे टाळावयाचे असेल तर दलित आणि ब्राह्मण व तत्सम वर्ग यांना सार्वजनिक जीवनात स्थान मिळाले पाहिजे. तेथे फक्त मराठा वर्गाची मिरासदारी असता कामा नये. कारण महाराष्ट्रातील एकंदर खेदजनक परिस्थितीबद्दल पोटतिडकेने लेखन करणाऱ्यात ब्राह्मण व तत्सम वर्गच प्रामुख्याने आहे.

गेल्या वीस पंचवीस वर्षात मध्यमवर्गाचे स्वरूप बदलत चाललेले दिसते. पूर्वीच्या मध्यमवर्गाचे स्वरूप शहरी आणि उच्चवर्गीय (ब्राह्मण आणि तत्सम वर्ग) असे होते. शाळामास्तर आणि कारकून हे त्यातील प्रमुख घटक. थोडी डॉक्टर, वकील मंडळी आणि लहान व्यापारी हेही त्यात मोडत असत. पापभीरू आणि कामाविषयी तत्पर असे या वर्गाचे सर्वसाधारण वर्णन करता येईल. परंपरागत मूल्ये जतन करणाऱ्या या वर्गामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण अत्यल्प होते. मध्यमवर्ग भ्रष्ट झाल्याखेरीज समाजात भ्रष्टाचार मूळ धरू शकत नाही. त्यामुळे सणावारी पोस्त, तलाठ्याची बक्षिशी, काटेकोरपणे अंमल-बजावणी केली जात असलेली बांधकामखात्यातील लाचलुचपत, अबकारी खात्यातील वर-कमाई अशा काही क्षेत्रांपुरतेच भ्रष्टाचाराचे क्षेत्र मर्यादित होते. विद्वत्ता, प्रामाणिकपणा, सचोटी, स्वार्थत्याग इ. गुणांना मान होता. लाचलुचपत असली तरी ती करणाऱ्याबद्दल बरे बोलले जात नसे. स्वातंत्र्योत्तर काळात बदललेल्या आर्थिक आणि राजकीय परि-स्थितीमुळे मध्यमवर्गाची जडणघडण पार पालटून गेली. साखर कारखाने, सहकारी सोसा-यट्या, ग्रामीण बँका, कुळकायदा, औद्योगिक विकास, शिक्षणप्रसार, सेवाक्षेत्रांचा विस्तार

इ. मुळे मध्यमवर्ग निव्वळ शहरी आणि उच्चवर्गीय न राहता ग्रामीण आणि इतरवर्गीय असेही त्याचे स्वरूप बनले. हा नवा मध्यमवर्ग संख्येने इतका प्रचंड आहे की, जुना मध्यमवर्ग त्यामध्ये प्रायः लुप्त झाला आणि नव्या मध्यमवर्गाची वैशिष्टचे ही एकूण मध्यमवर्गाची लक्षणे बनली. नवा मध्यमवर्ग हा त्यापूर्वी प्रायः शेतीशी निगडीत होता. साहजिकच शेतीशी सुसंगत अशीच या वर्गाची संस्कृती होती. त्या संस्कृतीची वैशिष्टये म्हणजे संयुक्त कुटुंब पद्धती आणि सरंजामी वृत्ती. दूरदृष्टी, कार्यक्षमता, शिस्त व वक्तशीरपणा यांची शेतीसाठी आवश्यकता नसल्यामुळे त्यांचा अभाव हेही कृषीसंस्कृतीचें एक वैशिष्टच. शिवाय शेती हा सर्वस्वी कौटुंबिक मामला असल्यामुळे त्यात सामाजिक मूल्ये उत्क्रांत होण्यास अवसर नसतो. या वर्गाचे संख्याबल अधिक असल्यामुळे लोकशाहीनंतर या वर्गाच्या हातात राजकीय सत्ताही आली. आर्थिक नियोजन आणि लोकशाही यांमुळे स्वातंत्र्योत्तर काळात जी आव्हाने निर्माण झाली त्यांना या नव्या सत्ताधारी वर्गास तोंड द्यावयाचे होते. त्यासाठी कार्यक्षमता, शिस्त, दूरदृष्टी, सामाजिक सद्‌भाव यांची जरूरी होती. पण या वर्गाला त्याची जाणीवही नसल्यामुळे नव्या आव्हानांना तो आपल्या कृषि–संस्कृतीनिशी सामोरा गेला. म्हणजे आव्हाने नवी पण ती पेलण्यासाठी जुन्याच जीवनपद्धतीचा अवलंब. या विसंगतीतूनच आजची भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. बदललेल्या परिस्थितीत संयुक्त कुटुंबपद्धतीने भाचेपुतणेवादाचे आणि सरंजामी वृत्तीने भपका आणि बडेजावाचे रूप घेतले. कार्यक्षमता, शिस्त, दूरदृष्टी, सामाजिक सद्‌भाव या गोष्टी सार्वजनिक जीवनातून हद्दपार झाल्या. शेतीमध्ये ज्याप्रमाणे शेतापासून जास्तीत जास्त उत्पन्न घेणे ही एकच दृष्टी असते त्याप्रमाणे आपल्या हाती मंत्रिपद, अधिकारपद, सहकारी सोसायटी, बॅन्क, साखर कारखाना, शिक्षण संस्था जे काय असेल त्यातून कोणत्याही नीतिमूल्याची चाड न बाळगता जास्तीत जास्त स्वतःचा आणि नातेवाइकांचा फायदा करून घेणे हे एकच उद्दिष्ट या वर्गाने समोर ठेवले. अर्थात उद्योगधंद्यातही हीच दृष्टी असते. पण औद्योगिक क्षेत्रात भर शोषणावर असल्यामुळे आपल्या कृतीच्या प्रतिक्रियेचें आपल्यावर काय परिणाम होतील याचे भान ठेवावे लागते. याउलट शेती हा संपूर्णपणे व्यक्तिप्रधान व्यवसाय असल्यामुळे त्यात सामाजिक बेफिकिरीही अनुस्यूत असते. सामाजिक बेफिकिरी हेही या वर्गाचे आणखी एक व्यवच्छेदक लक्षण बनले. एवंगुण विशिष्ट नवा मध्यमवर्ग आज सर्व मोक्याच्या ठिकाणी आहे. मंत्री, अधिकारी, निरनिराळया मंडळाचे अध्यक्ष, साखर कारखान्यांचे संचालक, शिक्षणसंस्थांचे चालक या वर्गातून येतात. सेवाक्षेत्रातही हा वर्ग बहुसंख्येने आहे. या सर्वांचे ध्येय एकच आहे. ते म्हणजे वैयक्तिक लाभ उठवणे. ते करीत असताना शेतात बांधावरून होणाऱ्या हिरीरीच्या तंटयाचे स्वरूप सार्वजनिक जीवनातील मतभेदांना येताना दिसते. दादा–पवार, दादा–चव्हाण, इ. वाद किंवा साखर कारखान्यांच्या निवडणुका यात कोणता तात्त्विक मतभेदाचा भाग असतो, किंवा सार्वजनिक हितसंबंध गुंतलेले असतात ? नव्या आर्थिक नीती-मुळे नियंत्रणे, परवाने यांचा सुळसुळाट झाला. वैयक्तिक लाभ उठविण्याच्या दृष्टीने ही

पर्वणीच होती. त्यातून लाचलुचपत, भ्रष्टाचार याचा भस्मासूर निर्माण झाला. हे सर्व चालू असतानाच नव्या राजकीय नीतीला अनुसरून आर्थिक व सामाजिक न्यायाचा वरकरणी उद्घोष करण्याची या वर्गाला जरूर भासू लागली. या विसंवादातून सामाजिक दंभ निर्माण झाला. त्यात बळी गेला तो निष्ठेचा. आज काही अपवाद वगळता कोणाही व्यक्तीला अगदी वरवर जरी खरवडले तरी तेथे एक 'सिनिक' आढळेल. सचोटी, प्रामाणिकपणा, तत्परता, निरलसता, सामाजिक सद्भाव, निष्ठा या सर्व गोष्टी त्याच्या उपहासाचा विषय झालेल्या आढळतील. गांधीयुगात भारतीय समाज रोमँटिसिझमने भारला गेलेला असला तर स्वातंत्र्योत्तर कालात त्याला सार्वत्रिक 'सिनिसिझमने' पछाडले आहे. "बछडा माझ्या ताब्यात आहे, तेव्हा गाईला कोण विचारतो?" हे बन्सीलाल यांनी संजय व इंदिरा गांधी यांच्या संदर्भात काढलेले उद्गार किंवा काँग्रेसजनांच्या मालकीचे दारूचे गुत्ते, या वर्गाच्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करतात. यात आशेचा किरण एवढाच की, अशा भयावह परिस्थितीतही काही समाजसेवाभावी व्यक्ती टिटवीप्रमाणे अधोगतीचा महासागर उपसण्यात तनमन वेचीत आहेत. जुन्या मध्यमवर्गाने आपल्या पारंपरिक लवचिकपणाने या नव्या संस्कृतीशी जमवून घेतले. मुसलमानी अंमल, पेशवाई, इंग्रजी राज्य या सर्वांशीच या वर्गाने जमवून घेतले होते. एन्. सी. जोशी, मुकुंद अभ्यंकर प्रभृतींच्या पुणे विद्यापीठातील कारवाया हे याचे एक ठळक उदाहरण. आज जुन्या पिढीतील मूल्ये मानणाऱ्या पालकाला, त्यामुळेच, प्रत्येक घरात 'तुम्ही आयुष्यात काय मिळवलेत' हाच प्रश्न नवी पिढी विचारताना आढळेल. परिणामी सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेला कोणीही वाली उरला नाही.

आजच्या परिस्थितीचे विश्लेषण करताना सर्रास असे सांगितले जाते की, आज समाजासमोर टिळक, गांधी यांसारखे उत्तुंग आदर्श नाहीत. त्यामुळे अधोगती चालू आहे. हा निव्वळ बकवास आहे. शिवाजीसमोर मोरे, घोरपडे यांचेच आदर्श होते. पण त्याने आपले आदर्श पुराणात शोधले. आणि शिवाजीसारखा आदर्श समोर असताना संभाजी मुघलांना जाऊन का मिळाला? (वसंत कानेटकर याचे उत्तर सावत्र आईच्या छळामुळे असे देतील!) रानडे, टिळक, गोखले यांच्या समोर चाकरमान्यांचेच आदर्श होते. आगरकरांनी एम. ए. झाल्यानंतर आईला लिहिलेल्या पत्रात तिने त्यांच्याकडून कोणतीही अपेक्षा धरू नये असे बजावले होते, त्यांच्यासमोर कोणाचा आदर्श होता? वस्तुस्थिती अशी आहे की, आदर्श व्यक्ती निर्माण होतात त्या अनुकूल परिस्थिती आणि वैयक्तिक गुण यांच्या संयोगातून. आज परिस्थिती फार बिघडली आहे आणि ती बिघडण्यास प्रत्येकाचाच हातभार लागलेला आहे. टिळक, गांधींचे गुण असलेली व्यक्ती अस्तित्वात असली, आणि तशी नसण्याचे कारण नाही, तरी अनुयायी न मिळाल्यामुळे तिला एकांतवासाचेच जिणे जगावे लागेल. आज आदर्श निर्माण न होण्याचे खरे कारण म्हणजे मध्यमवर्गाला कोणतीही मूल्ये उरली नाहीत आणि त्याने अधोगतीचा मार्ग जाणीवतः स्वीकारला आहे हे होय. आणि वर आमच्या समोर आदर्श नाहीत ही या वर्गाचीच

उलटी बोंब. खरे तर, भ्रष्टाचार, लाचलुचपत यात फारतर दहापाच टक्केच लोक असतील. पण बाकीचे लोक त्यात गुंतलेले नाहीत हा आदर्शच नव्हे काय? वस्तुतः काही भव्य, दिव्य करावयाचे असेल तर एकवेळ आदर्शाची गरज भासेल. पण स्वातंत्र्योत्तर कालात ती गरज उरली नाही. गरज उरली आहे ती फक्त आपले कर्तव्य बजावण्याची. कार्यालयात वेळेवर जाणे, नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे करणे, भ्रष्टाचार न करणे, सार्वजनिक जीवनात शिस्त पाळणे, निरलसता, यांसाठी समाजात टिळक–गांधी जन्मावे लागतात काय? उद्या एखादा बाहेरख्याली माणूसदेखील आपल्या वर्तनाचे समर्थन, समाजात टिळक–गांधी नाहीत म्हणून करू लागेल! वस्तुतः वर उल्लेखिलेल्या साध्या गोष्टी प्रामाणिकपणाने पाळल्या तर सामाजिक परिस्थिती क्रांती घडून आल्याप्रमाणे पालटेल. पण आपल्यालाच ती नको आहे. अधोगतीच आपल्या पचनी पडली आहे आणि आपण त्याचा भरपूर आर्थिक लाभ उठवत आहोत. त्यातूनही कोणाला आदर्शच हवे असतील तर भ्रष्टाचारावरची नजर दूर केली तर आजही ते आढळतील. एसेम जोशी, ना. ग. गोरे, ग. प्र. प्रधान, दोन्ही हातांनी देणग्या उधळणारे पु. ल. देशपांडे आणि अशाच अनेक व्यक्ती यांच्याकडे आपण काणाडोळा का करतो? मी या बाबतीत अनेकांशी चर्चा केली. त्या सर्वांचे म्हणणे असे की, सगळीकडेच भ्रष्टाचार चालला आहे. बेफिकिरीही आहे. आपण एकटे काय करणार? एकंदर वातावरण बदलले तर आपणही बदलू याचा गर्भितार्थ हा की, सर्व जग सुधारल्यानंतर शेवटची सुधारणारी व्यक्ती मी असेन. पहिली नव्हे. आता प्रत्येकालाच जर सुधारणारी शेवटची व्यक्ती व्हावयाचे असेल तर सामाजिक ऱ्हास अटळ आहे. त्यापेक्षा या ऱ्हासातच आपले हितसंबंध गुंतले असल्याची कबुली देणे प्रामाणिकपणाचे ठरेल. समाजासमोर आदर्श नसल्याचा हंबरडा निव्वळ कांगावा आहे.

समाजापुढे आदर्श नाहीत असा युक्तिवाद करणाऱ्यांनी मानवाच्या इतिहासाचे एक सूत्र लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ते म्हणजे ज्या समाजात जोम (vitatlity) असतो तोच समाज प्रगती करू शकतो. समाजात आदर्श व्यक्ती आहेत याच एका कारणामुळे कोणत्याही समाजाची प्रगती होत नसते. नैतिक मूल्ये मानणाऱ्या सत्प्रवृत्त व्यक्तींना समाज आदर्श मानतो. पण तेवढयाने भागत नाही तर त्याच्याच बरोबरीने त्या नैतिक मूल्यांचा कडवेपणाने ( ruthlessly ) पुरस्कार होणे अधिक अगत्याचे असते. व समाजात जोम असेल तरच ते शक्य आहे. जोम असलेल्या राष्ट्राचा प्रतिनिधी आणि जोम नष्ट झालेल्या राष्ट्राचा प्रतिनिधी हे एकाच समस्येला वेगवेगळया तऱ्हेने कसे सामोरे जातात याचे एक उदाहरण उद्‌बोधक ठरेल. सतीच्या प्रथेला राजा राम मोहन रॉय व बेंटिक या दोघांचाही विरोध होता. पण सती कायद्याने बंद करण्यास रॉय अनुकूल नव्हते. तर बेंटिकने कडवेपणाने ती पद्धत कायदा करून बंद केली. नुकतेच राजस्थानमधील देवराला या गावी एक स्त्री सती गेल्याची घटना घडली. त्या संदर्भात सत्ताधारी पक्षातील अनेकांच्या मुलाखती टी. व्ही. वर दाखविल्या गेल्या. पण त्यांच्यापैकी एकजणही

या घटनेने हादरलेला दिसला नाही. कारण–पुन्हा निवडून यायचे आहे ना ! आज भारतात सर्वच क्षेत्रात ऱ्हास दिसत असला तर त्याचे कारण समाजासमोर आदर्श नाहीत हे नव्हे तर तत्त्वाने झपाटून जाऊन कडवेपणाने त्याचा प्रसार करणाऱ्या शक्ती आपल्या समाजातील जोम नष्ट झाल्यामुळे निर्माण होऊ शकत नाहीत हे होय. त्यामुळेच आर्थिक, सामाजिक न्याय, निधर्मी राज्य इत्यादी तत्त्वे आपण स्वीकारली असली तरी त्यांना कोणी वाली उरलेला नाही. अजून आपण समान नागरी कायदा करू शकलो नाही. तर मुसलमानांनी डोळे वटारताच सर्व नैतिक मूल्ये गुंडाळून शाहबानो प्रकरणी एक विधेयक आणून जातीयवाद्यांचा अनुनय केला. जोम नष्ट झालेल्या समाजात कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वाचा ( guiding principle ) अभाव असल्यामुळे हाती असलेली सत्ता, सत्तेला माहीत असलेल्या एकाच मार्गाने जाऊ शकते. तो मार्ग म्हणजे मुजोरीचा. त्यामुळेच भारतात आज सर्वत्र मुजोरीचेच साम्राज्य आढळते. घराबाहेर पाऊल टाकल्यानंतर पावलोपावली मुजोरीच आढळते. हा मला वाटते प्रत्येकाचाच अनुभव असावा. दिशाहीन सत्ता नेहमीच भ्रष्ट करते. सत्तेला किंवा विरोधालाही दिशा मिळते ती कर्तव्याच्या जाणीवेने, सत्तेपासून पळून जाऊन नव्हे. ती दिशाच आपण आज हरवली आहे.

महाराष्ट्रातील दलितांची परिस्थिती नीट समजण्यासाठी येथील राजकीय सरंजामशाहीचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण सरंजामशाहीत दलित वर्गाची परिस्थिती नेहमीच अत्यंत शोचनीय असते. महाराष्ट्राच्या राजकीय शोकांतिकेची सुरुवात एका दृष्टीने १९३७ सालीच झाली. वीर नरिमन यांच्या ऐवजी सत्तेच्या कुंकवाचा धनी म्हणून राहाणाऱ्या बाळासाहेब खेरांची मुंबई प्रांताचे पंतप्रधान म्हणून निवड झाली. स्वातंत्र्यानंतरही तेच मुख्य प्रधान झाले. या दोन्ही मंत्रिमंडळात कॉंग्रेस श्रेष्ठींशी ज्यांची निष्ठा संशयातीत होती अशा कन्हय्यालाल मुन्शी व मोरारजीभाई देसाई यांचेच वर्चस्व होते. वीर नरिमन यांची निवड न होण्याचे कारण म्हणजे ते स्वतंत्रबुद्धीचे होते व कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी गांधीजींवर कडाडून टीका केली होती व या पाखंडाचे प्रायश्चित मिळणे अटळ होते. म्हणजे मुख्य प्रधानाची निवड करताना कर्तृत्व आणि स्वतंत्रबुद्धी यापेक्षा एकनिष्ठा हाच निकष लावला गेला.

या ठिकाणी एक प्रश्न उपस्थित होऊ शकतो की, सर्वच लोकशाही देशात पक्षसंघटना शिस्तपालनाच्या तत्त्वावर उभी असते का ? याला असे उत्तर देता येईल की, तेथील संघटना पक्षाशी व त्यांच्या कार्यक्रमाशी एकनिष्ठा या पायावर आधारलेली असते. वैयक्तिक निष्ठेवर नव्हे. दुसरे म्हणजे तिथे पक्षांतर्गत लोकशाहीचेही तत्त्व पाळले जाते. भारतात गांधीजी वैयक्तिक निष्ठेवर भर देत असत. पट्टाभींचा पराभव त्यांनी वैयक्तिक पराभव मानला होता व लोकशाही मार्गात कॉंग्रेसचा अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या सुभाषबाबूंना काम करणे अशक्य करून राजीनामा देण्यास भाग पाडले. अर्थात ही नुसती सुरुवात होती. स्वातंत्र्यानंतर ही प्रवृत्ती अधिकच बळावली. भाषावार प्रांतरचनेच्यावेळी श्रेष्ठींनी सांगितले तर तोंडाला डांबरदेखील फासून घेईन असे मोरारजीभाईंनी जाहीर

केले. आता तर एकनिष्ठेचा रोग इतका बळावला आहे की, पूर्वी पेशवाईची वस्त्रे सातारला जाऊन आणत त्याप्रमाणे प्रत्येक राज्याचा सुभेदार दिल्लीला जाऊन इंदिराचरणारविंदी आपली निष्ठा प्रथम वाहून मगच मुख्य प्रधानकीवर आरूढ होत असे. आता राजीव चरणी.

भारताची राज्यघटना निम-संघराज्यीय ( क्वेसाय फेडरल ) आहे असा घटनातज्ज्ञांचा अभिप्राय आहे. तर प्रत्यक्षात आज ती निमसरंजामशाही (क्वेसाय-फ्यूडल ) पद्धतीने राबवण्यात येत आहे. सरंजामशाहीचे आणखी वैशिष्टच म्हणजे बड्या जमीनदारांचे प्रस्थ व त्यांची अधिकाधिक जमिनीबद्दल स्पर्धा. भांडवलशाही अर्थव्यवस्था ज्याप्रमाणे कामगारांच्या शोषणावर उभी असते त्याप्रमाणे सरंजामशाही समाज दलित आणि शेतमजूर यांच्या शोषणावर आधारित असतो. महाराष्ट्रातील सत्ताधारी वर्ग हा मुख्यतः बड्या शेतकऱ्यांचा आहे त्यामुळे त्याची सुबत्ता शेतमजूर व दलित यांच्या शोषणावर अवलंबून आहे.

दुसरे म्हणजे सरंजामी मनोवृत्तीच्या या समाजाच्या पचनी समानतेची कल्पना अजूनही पडलेली नाही. त्यामुळे दलितांच्या प्रश्नाला शोषणाबरोबरच पूर्वीपासूनच जातीय नीचत्वाची भीती प्राप्त झालेली आहे. तिची तीव्रता या समाजाच्या लेखी किंचितही कमी झालेली नाही. तिसरे म्हणजे मराठा समाजाला दलित वर्ग आता जी जागृती दाखवीत आहे तीही विशेषशी रुचत नाही. कारण निव्वळ स्वार्थापोटी राजकीय न्यूनता प्रचंड उत्साहाने आपल्या अंगी वागवणारा समाज आपल्यापेक्षा जे दुर्बल आहेत त्यांच्याकडून तशाच तऱ्हेच्या न्यूनतेची अपेक्षा करतो. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्राचे औद्योगीकरण जर झपाट्याने झाले तर दलितांना व्यवसायावर अवलंबून राहावे न लागता ते उद्योगधंद्यांत समावले जाऊन मानाचे जिणे जगू शकतील. आज शहरातून दलितांची स्थिती त्यामानाने बरीच सुधारलेली दिसते. पण अधिक जमीन आणि साखरकारखान्यापलीकडे सत्ताधारी पक्षाला कशात रस नाही.

दलितांच्या प्रश्नाला आणखी एक मिती आहे ती म्हणजे त्यांची राजकीय शक्ती भारतात कोठेही जाणवत नाही. प्रत्येक खेड्यात हा अल्पसंख्य आहे. म्हणजे ग्रामपंचायतीपासून ते देशाच्या राजकारणात कुठल्या तरी पक्षाचे पारडे जड करण्यापलीकडे त्यांची राजकीय शक्ती नाही. त्यामुळे सवर्णांना मुसलमानांच्याबद्दल जी भीती वाटते ती या समाजाबद्दल वाटत नाही. याचे ठळक उदाहरण म्हणजे पुणे करार. मॅक्डोनल्ड निवाड्याप्रमाणे दलितांना स्वतंत्र मतदार संघ मिळाले होते. त्याविरुद्ध गांधीजींनी प्राणांतिक उपोषण सुरू केले. जातिनिहाय मतदारसंघ हे खरोखरच राष्ट्रहिताच्या विरोधी होते तर गांधीजींनी त्याविरुद्धही उपोषण करावयास हवे होते. पण ते केले नाही. कारण स्पष्ट आहे. मुसलमानांनी त्याची दखल घेतली नसती आणि अशा उपोषणात गांधीजींचे काही बरेवाईट झाले असते तर हिंदू ज्या भागात बहुसंख्य आहेत अशा भागात मुसलमानांवर अत्याचार झाले असते तर त्याचा सव्याज बदला मुसलमानांनी ते ज्या भागात बहुसंख्य आहेत तिथे घेतला

असता. याउलट दलित हे प्रत्येक भागात अल्पसंख्य आहेत त्यामुळे आंबेडकर असला धोका पत्करणार नाहीत ही गांधीजींची खात्री होती. कारण त्यामुळें काय होऊ शकले असतें हे नामांतराच्या चळवळीत जी दंगल उसळली तिच्यावरून सहज समजण्यासारखे आहे. महाराष्ट्रातील राजकीय सरंजामशाहीची जी वैशिष्टचे उल्लेखली आहेत त्याच्या संदर्भात दलितांची स्थिती तपासणे आवश्यक आहे.

आंबेडकरांनी दलितांना संघटित केले खरे पण त्या संघटनेचा कणा मोडला तो पुणे कराराने. हजारो वर्षे सवर्णांनी टाकलेल्या तुकड्यावर जगायला लावला गेलेला हा वर्ग पुणे करारानंतर सवर्णांनी टाकलेल्या राजकीय उष्टयावरच जगणार हे निश्चित झाले होते. समाजातील कोणत्याही घटकाचे स्थान हे त्याला जी राजकीय अथवा आर्थिक इच्छा असते त्यावरच अवलंबून असते. अशी राजकीय शक्ती होण्याची संधी या समाजाला पुणे कराराने गमवायला लागली. त्यानंतर या संघटनेला जो काय थोडासा राजकीय जीव उरला होता त्याचा शेवट दैवदुर्विलासाने आंबेडकरांच्या करवीच घडवून आणण्यात आला. धूर्त सवर्णांनी भारतीय राज्यघटनेचे पितृपद आंबेडकरांना बहाल केले. आणि येणे प्रकारे त्यांच्यातील उदात्ततेला सुखवून घटनेनेच दलित हा स्वतंत्र मतदार संघ राहू शकणार नाही अशी तरतूद केली. त्यानंतर यथासांग त्यांचा 'आधुनिक मनू' म्हणून गौरव केला व ठिकठिकाणी त्यांचे पुतळे उभे केले. घटनेतील तरतुदीचे फळ आंबेडकरांना लगेचच मिळाले. १९५२ च्या निवडणुकीत मुंबईसारख्या राजकीय दृष्टया जागृत असलेल्या मतदार संघातून हा 'आधुनिक मनु' नारायणराव काजरोळकरांसारख्या सामान्य वकुबाच्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांकडून पराभूत झाला.

या ठिकाणी एक आक्षेप घेता येईल. तो असा की, दलितांना स्वतंत्र मतदारसंघ दिला असता तर आधीच हिंदु-मुसलमान अशा तऱ्हेने विभागलेल्या भारतीय समाजात फुटीरपणाची वृत्ती आणखी वाढली असती. या आक्षेपातच आपण भारतीय परिस्थितीकडे कसे रोमँटिक दृष्टीने पाहात होतो याचे दर्शन होते. भारतीय समाज मुळातच फुटलेला होता व त्याला एकात्म बनवणे हे आपले ध्येय होते; वस्तुस्थिती नव्हती. अशी एकात्मता निर्माण होण्यासाठी प्रत्येक घटक एक राजकीय शक्ती असण्याची गरज असते. कारण राजकीय शक्ती असलेल्या घटकांच्या बाबतीतच त्यांना समजून घेण्याची, त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याची, वेळप्रसंगी त्यांना झुकते माप देण्याची इतरांना निकड भासते. या वृत्तीतूनच परस्पर सामंजस्य व विश्वास निर्माण होतात व कालान्तराने असे घटक एकात्म होतात. या संबंधात, जातीयवादी अली बंधू व जातीय, (राष्ट्रवादी नव्हे,) जीना यांच्याशी गांधीजी किती अतिरेकी उदारपणे वागत असत हे सर्वश्रुत आहेच. खरे तर दलितांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यापेक्षा देशाची फाळणी होणे हे गांधीजींच्या दृष्टीने कितीतरी पटीने भयानक संकट होते पण त्याविरुद्ध त्यांनी उपोषण केले नाही.

भारतीय राज्यघटना संमत झाल्यावर दलित एक राजकीय शक्ती नसल्यामुळे त्यांना पालापाचोळयापलीकडे किंमत नाही. फक्त त्यांच्या मतासाठी त्यांना अधून मधून आश्वा-

सने आणि त्यांच्या पुढाऱ्यांना सत्तेचे तुकडे यापलीकडे काही मिळत नाही. आज महाराष्ट्राच्या विधानसभेत चाळीस–पन्नास दलित असते तर सत्तेसाठी इंदिरा गांधींच्या पुढे लोटांगणे घालणाऱ्या मराठा व तत्सम समाजाने सत्तेसाठीं त्यांच्या नाकदुऱ्या काढल्या असत्या. दलितांना न्याय देण्याची सर्वांना खरोखरीच इच्छा असेल तर दलित एक राजकीय शक्ती बनणे आवश्यक आहे व त्यासाठी त्यांचा वेगळा मतदारसंघ असण्यापलीकडे दुसरा कोणता पर्याय नाही. हे झाले म्हणजे ज्याप्रमाणे गायकवाड, धनगर होळकर आणि मराठ्यातील हलक्या जातीचे शिंदे या राजघराण्यात किंवा वैश्य गांधी आणि ब्राह्मण राजगोपालाचारी यांच्यात बेटी व्यवहार होऊ शकतो त्याप्रमाणे सवर्ण व अस्पृश्य यात प्रथम वरच्या स्तरावर व नंतर हळूहळू खालच्या स्तरावर बेटीव्यवहाराला सुरुवात होण्याची शक्यता आहे व शंभर एक वर्षांनी या भेदाची तीव्रता खूपच कमी झालेली असेल. बेटीव्यवहार रूढ झाल्याखेरीज कोणताही समाज एकात्म होणे शक्य नाही.

एका दृष्टीने पाहिले तर भारतातील प्रत्येक जातीजमातीला इतरांबद्दल संशय वाटत असतो व अशा तऱ्हेने सबंध भारतातच संशयाचे व त्यामुळे जातीय तणावाचे वातावरण आहे. मराठा जातीलाही आता तिच्या महाराष्ट्रातील स्थानाबद्दल हळूहळू शंका निर्माण व्हावी अशी परिस्थिती होत आहे. त्यामुळे राखीव जागांना हाही वर्ग आता विरोधाची भूमिका घेऊ लागला आहे. पूर्वी राखीव जागांमुळे काही ब्राह्मण व तत्सम जातीतील लोकांनाच नोकऱ्यांबाबत अडचण निर्माण होत असे व ही तर आनंदाचीच गोष्ट होती. पण आता मराठा समाजातही मध्यम वर्ग निर्माण झाला आहे व सर्वसाधारण जागा गुणवत्तेप्रमाणे ब्राह्मण व तत्सम वर्ग यांची मक्तेदारी बनतील तर राखीव जागा दलितांना मिळतील अशा भीतीने मराठा वर्ग ग्रस्त होऊ लागला आहे. दलितांच्या प्रश्नाला आणखी एक फाटा फुटू पाहात आहे व खेड्यापाड्यातील दलितांचे जीवन अधिक असुरक्षित बनण्याची शक्यता आहे.

दलित हे राजकीय शक्ती बनू न शकल्याने साहजिकच दलितांची संघटना राजकीय पायाऐवजी व्यक्तिनिष्ठेच्या आधाराने उभी राहिली. त्यामुळे आंबेडकरांच्या पश्चात त्यांच्या पुढाऱ्याच्या अभावी हा वर्ग पुन्हा असंघटित झाला. दलितांच्याबद्दल दलित लेखक व इतरही बरेच काही लिहीत आहेत. पण त्यातून या समाजाला नेमके काय पाहिजे आहे याचा काहीच बोध होत नाही. त्यांना दलितांचा प्रश्न तरी नीट समजला आहे काय असा धाष्टर्याचा प्रश्न विचारण्याचा मोह आवरत नाही. दलित पुढारी फक्त स्वार्थापलीकडे दुसरे काही साधू इच्छित आहेत असे दिसत नाही. दलित लेखक फक्त जखमाच दाखवत हिंडत आहेत. या समाजाची उन्नती घडवून आणण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत असे दिसत नाही. कुठल्यातरी फौंडेशनची शिष्यवृत्ती मिळाली म्हणजे त्यांचे हात स्वर्गाला पोचल्याच्या आनंदात ते मग्न असतात. अन्यायाविरुद्ध सबंध दलित वर्गाला पेटविण्याची त्यांची कुवत नाही. धूर्त सवर्ण, अशांना आपल्यामध्ये बसवून त्यांचे भरपूर कौतुक कर-

तात, दलित समाजाला सोसाव्या लागणाऱ्या यातनांबद्दल हळहळ व्यक्त करतात. नंतर स्वतःच्या उदार दृष्टिकोनाबद्दल समाधान पावतात.

या वर्गातले जे लोक शिकून पुढे येतात त्यांचा, जे लोक हीनदीन जीवन जगत आहेत त्यांच्याशी नुसताच संबंध तुटतो असे नव्हे तर त्याची त्यांना लाज वाटते. तेही पांढरपेशे बनतात व अधूनमधून पोटतिडिकेने व्याख्याने देतात, सवर्ण दयाबुद्धीचे प्रदर्शन करतात. दलितांचा प्रश्न तेथल्या तेथेच राहतो. आणखी एक अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे राजकीय फायद्यासाठी सर्वच पक्षांचे कार्यकर्ते दलितांनी वंशपरंपरा दलितच राहावे याबद्दल अत्यंत जागरूक असतात. जगजीवनराम, तपासे, तिडके, रूपवते आदि मंडळींनाही त्यांची खंत नाही. कारण ते दलित राहिले तरच त्यांना आर्थिक व राजकीय फायदे उपटता येतात.

वास्तविक कायद्यानेच या लोकांना दलित, समाजाला उपलब्ध असलेल्या सवलतीपासून वंचित करण्यात आले पाहिजे व या सवलती व राखीव जागा इ. जे परिस्थितीने दलित आहेत त्यांना फक्त ठेवल्या पाहिजेत. म्हणजे हळूहळू दलितांची संख्या घटत जाईल व शेवटी ' दलित ' हा भारतीय समाजव्यवस्थेला शरम आणणारा शब्द फक्त शब्दकोषातच राहील. कारण या प्रक्रियेने कोणीच दलित उरणार नाही. पण असे काही करण्याऐवजी सर्वचजण एका ढोंगात सामील होऊन दलितांचे प्रश्न सोडविण्याचे नाटक करीत आहेत.

दलितांची खरी लढाई दोन आघाडयांवर आहे. ती सवर्णांच्या विरुद्ध आहेच. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा झगडा त्यांच्या स्वतःविरुद्ध आहे. आज पहिली गरज आहे ती निरनिराळ्या दलित जमातींच्या अंतर्गत ज्या उच्चनीचतेच्या कल्पना आहेत त्या घालवून त्यांचे एकीकरण घडवून बेटीव्यवहाराला सुरुवात करणे. दुसरी गरज म्हणजे या समाजाचे प्रबोधन घडवून आणण्याची. खुळचट चालीरीती, अंधविश्वास, स्वतःला कमी लेखण्याची प्रवृत्ती, दैववाद यांपासून मुक्त करण्याची. तिसरी म्हणजे दलित समाजातील महिलांचे स्थान उंचवण्याची. कारण स्त्रीला मानाचे स्थान मिळाल्याखेरीच कोणताही समाज सुसंस्कृत होऊ शकत नाही.

आज दलित स्त्रीचे स्थान दलित समाजात काय आहे ? मादी आणि हक्काची मोलकरीण म्हणून ? आणि तसे असेल तर, दलितांना समाजात स्थान मिळाले पाहिजे म्हणून भांडणारे, त्या दृष्टीने काही चळवळ करीत आहेत काय ? निदान अशा चळवळीची आवश्यकता आहे अशी जाणीव तरी दाखवित आहेत काय ? आणि सर्वांत महत्त्वाची गरज म्हणजे खेडयापाडयातील दलित वर्गाचा आत्मविश्वास जागा करण्याची. पिढयान्‌पिढया अन्याय सहन करणाऱ्या या समाजाची अन्यायाची जाणीवच नष्ट झाली आहे. त्यांना अन्यायाच्या भावनेने पेटवून विधायक कार्यासाठी संघटित करण्याची चळवळ झाल्याखेरीज या समाजाचा उद्धार होणार नाही.

हे काम प्रचंड आहे. त्यासाठी गाडगे महाराज किंवा भाऊराव पाटील यांच्या जिद्दीने काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची गरज आहे आपल्या जखमांचे प्रदर्शन करणाऱ्या,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२६९
२५६३२
विषय ८४७८८
शाखा



आक्रस्ताळेपणाने परमेश्वराला शिव्या देणाऱ्या किंवा निव्वळ संतापाने डोक्यात राख घालणाऱ्यांची नव्हे. भडक भाषणे करून काहीच साधले जाणार नाही. एक साधा उपाय आहे. शहरामध्ये स्थायिक झालेल्या आणि सुस्थितीत असलेल्या प्रत्येक दलिताने आपल्या खेडचातील एक मुलगा दत्तक घेण्यास सुरुवात करावी आणि वेळीअवेळी दलितांच्याबद्दल कळवळा दाखविणाऱ्यांनाही या चळवळीत सामील होण्यास भाग पाडावे. म्हणजे खरे दलित-मित्र किती आणि दिखाऊ किती हेही उघडकीला येईल. अशा चळवळीत सक्रीय भाग घेऊनच दलितांचे प्रश्न सोडविण्यास मदत करता येईल. नामांतराच्या चळवळीला पाठिंबा देऊन किंवा कोरडचा सहानुभूतीने प्रवचन करून नव्हे. दलितांचे पुढारी हे करू शकले तर सवर्णांच्या विरुद्धचा झगडा अगदीच सोपा आहे. कारण आत्मविश्वास असलेल्या समाजाला कोणीही दडपू शकत नाही.

भारतातील परिस्थितीच्या अंतर्गत महाराष्ट्रातील व सामाजिक परिस्थितीच्या काही ठळक वैशिष्टचांचे जे वर्णन केले आहे त्याच्या संदर्भात बौद्धिक जीवनाचा आलेख काढला म्हणजे महाराष्ट्राच्या शोकांतिकेचे चित्र बरेच स्पष्ट होईल.

शिक्षणक्षेत्र हे कोणत्याही समाजाच्या बौद्धिक जीवनाचा मूलाधार. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास घडवून आणून त्यांच्यात मानवी जीवनाच्या उच्च स्तरावरील आनंदाचा आस्वाद घेण्याची कुवत निर्माण करणे; उदा, आर्किटेक्ट आणि इंजिनिअर यांनाही आपल्या व्यवसायाकडे निव्वळ पैसा मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, कला म्हणून पाहण्याची दृष्टी देणे; पर्यायाने सबंध समाजाचे बौद्धिक जीवन उन्नत करणे हा शिक्षणाचा मूलभूत हेतु आहे. आपल्याकडे काय दृश्य दिसते ? पाश्चात्य विद्याविभूषित तज्ज्ञांच्या विद्वत्तेने भारले गेलेले, शिक्षणाच्या उद्देशांबाबत अनभिज्ञ किंवा उदासीन असलेले, पैशाच्या उपलब्धतेच्या दृष्टिकोनातूनच प्राय: शिक्षणाकडे पाहणारे, राष्ट्रीय एकात्मतेसारख्या भारताच्या दृष्टीने अग्रीम महत्त्वाच्या प्रश्नाकडे अत्यंत ओबडधोबड ( क्रूड ) दृष्टिकोन बाळगणारे आणि बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे पण त्या समाजाच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीने कशा तऱ्हेचा शिक्षणक्रम आवश्यक आहे याची सुतराम कल्पना नसणारे राज्यकर्ते; आणि पाश्चात्य देशांनी केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा बारकाईने अभ्यास केलेले पण भारतातील. विशेषत: खेडचातील, परिस्थितीची यथायोग्य कल्पना नसल्याने तिच्याशी कसा मेळ घालता येईल यांची सुस्पष्ट कल्पना नसणारे शिक्षणतज्ज्ञ, यांच्या तावडीत शिक्षणक्षेत्र सापडले आहे. शिक्षणाबद्दल लिहिताना या विद्वानांनी वेळोवेळी वाचलेले विद्वत्ताप्रचुर प्रबंध, विशद केलेल्या रम्य कल्पना, आदर्शात मारलेल्या भराऱ्या यांच्यापेक्षा प्रत्यक्ष चित्र काय आहे हेच पाहण्याचा प्रयत्न करणार आहे.

शिक्षणाचे प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक, व महाविद्यालयीन असे तीन भाग आहेत. प्राथमिक अवस्थेत मुलांचा कल कुणीकडे आहे, त्याच्यात कोणते सुप्त गुण आहेत याचा शोध घेऊन त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास होण्याच्या दृष्टीने पायाभरणी करावयाची असते. त्याचबरोबर समानता, प्रामाणिकपणा, करुणा, सहानुभूती, धैर्य,

दुसऱ्याच्या दुःखाने सद्गदित होणे, शिस्त, अन्यायाची चीड, संकटात सापडलेल्यांना मदत करणे अशा तऱ्हेच्या शाश्वत मूल्यांचे त्याच्यावर संस्कार घडवून आणणे याचीही जरुरी असते. पाचव्या वर्षांपासून मुलाच्या समजण्याचा कुवतीत आठवड्यालादेखील बदल होत असतो. तेव्हा शिक्षणक्रम आखताना मुलाला द्यावयाचे ज्ञान व त्याची बौद्धिक क्षमता यांचाही मेळ घालावयाचा असतो आणि हे करीत असताना अभ्यास व मनोरंजन यांची सांगड घालणे अवश्य असते. पण आता पाठ्यपुस्तकांचे सरकारीकरण झाले आहे. अर्थातच राज्यकर्त्यांच्या 'क्रूड' कल्पनांचे प्रतिबिंब या पुस्तकात आढळते.

भारत हे निधर्मी राज्य आहे तेव्हा एखाद्या धड्यात अब्दुल किंवा महमद घातलाच पाहिजे. प्रांतभेद विसरायला पाहिजे तेव्हा शिक्षकाचे नाव शास्त्री असायलाच पाहिजे आणि विविधतेत एकात्मता असल्यामळे नाडकर्णी आणि सक्सेना यांना मित्र म्हणून दाखवायलाच पाहिजे. राष्ट्रभक्ती वृद्धिंगत व्हावी म्हणून पटेलांचे चरित्र यावयास पाहिजे. पटेल म्हणजे पोलादी पुरुष आणि बार्डोली सत्याग्रह या कल्पना अनायासेच येतात. सात वर्षे वयाच्या मुलाला वल्लभभाई पटेल हे पोलादी पुरुष होते आणि इंग्रज सरकारने वीस टक्के सारा वाढवला हे शिकविले जाते तेव्हा आपण त्याचा बौद्धिक विकास घडवून आणतो की, पोपटपंची शिकवतो ? कारण 'पोलादी पुरुष' किंवा टक्केवारी' या कल्पना सात वर्षे वयाच्या शहरातील 'सर्वसाधारण' मुलांनाही झेपणारी नाही. खेड्यापाड्यात काय परिस्थिती असेल !

असला बौद्धिक अत्याचार करून आपण विद्यार्थ्यांना शिक्षणद्वेष्टे बनवित आहोत की, बौद्धिक खुजेपणाचे रोपण करीत आहोत अशी भीती एक पालक म्हणून मला वाटते. या पुस्तकातून बहुसंख्य धडे मुलांना कंटाळवाणे वाटतील असेच असतात. हल्ली पाचव्या वर्षापासून मुलांना 'जोक्स' सांगण्याचा नाद लागतो, नव्हे ते व्यसनच असते. ते साधारण बारावीपर्यंत टिकते. त्याचे कारण कंटाळवाणा अभ्यासक्रम असू शकेल काय ? आम्हाला श्रावणाची गोष्ट, चांदोबाचा अंगरखा, अशा मनोरंजक गोष्टी होत्या. मृगजळ या गोष्टी-मधील 'हरीण हरिणीला म्हणाला तू पाणी पी. हरिणी हरिणाला म्हणाली तू पाणी पी. पाणी कुणीच प्याले नाही आणि दोघेही एकमेकांच्या गळ्यात गळा घालून मरण पावली.' हा मजकूर लहानपणी प्रथम वाचला तेव्हा मनात जी कालवाकालव झाली तिचा परिणाम अजूनही ताजा आहे. आमच्या मुलांना असे काही वाचायला मिळणार आहे की, रेशनच्या दुकानात जसा किडकाच माल मिळतो तसे किडकेच किंवा न पचणारे असेच काहीतरी त्यांना वाचायला मिळणार आहे ?

पटेल किंवा सुभाषबाबू किंवा टिळक यांच्या आयुष्यात मुलांना रोमहर्षक वाटतील अशा काहीच घटना घडल्या नाहीत का ? दादाभाई नौरोजींवर जो धडा आहे त्यात 'ही टोल्ड ऑन द फ्लोअर ऑफ दी हाऊस' अशी इंग्रजी पुस्तकात वाक्यरचना आहे. जमशेटजी टाटांना 'जीनिअस' असे म्हटले आहे. नशीब, विद्यार्थ्यांचे त्यांच्या शिक्षकांचे आणि पालकांचेही ! शिक्षणतज्ज्ञांनी यावर लिहावे अशी अपेक्षा आहे.

दुसरा घटक म्हणजे शिक्षक. संसाराला हातभार हे मुख्य ध्येय असलेल्या शिक्षिका नवी पिढी कशी तयार करीत असतील याची कल्पना प्रत्येक पालकाला असेलच. माझ्या लहानपणी प्रत्येक शाळेत निदान दोनचार शिक्षक तरी 'गुडबाय मिस्टर चिप्स' मधील चिप्सचा वारसा सांगणारे होते, व त्यांच्याबद्दल अजूनही भारावून बोलणारे भेटतात. आज असे किती शिक्षक आहेत ? तिसरा घटक म्हणजे पालक. आई आणि बाप दोघेही सर्वसाधारणपणे नोकरी करणारे. त्यामुळे बालवयात जे संस्कार घरी होणे आवश्यक असते ते होत नाहीत, व मुलांच्यावर जास्त छाप आजूबाजूच्या जीवनाचीच असते. संध्याकाळी कामावरून दमून घरी आल्यानंतर मुलगा शाळेतील गमती जमती सांगताना शिक्षकांच्याबद्दल अनादराने बोलतो त्याबद्दल हसून पालक त्याला उत्तेजनच देत असतात. शिवाय बहुतेक पालकांना चलाखपणा (स्मार्टनेस) आणि बौद्धिक हुषारी (इंटीलिजन्स) यांतील फरक समजात नाही. त्यामुळे चलाखपणाला हुषारी समजून त्याला उत्तेजन देतात. कंटाळवाणा अभ्यासक्रम, शिक्षकाबद्दल अनादर असलेले विद्यार्थी, आस्था नसणारे शिक्षक व चलाखपणाला उत्तेजन देणारे पालक असा एकंदर थाट प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत आढळतो.

माध्यमिक शिक्षणाबाबत थोडक्यात एवढेच म्हणता येईल की, नव्या अभ्यासक्रमाचा उद्देश शाळांना विचारवंत किंवा शास्त्रज्ञ यांचे कारखाने बनविण्याचा असावा असे वाटते, व असा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी साठ साठ विद्यार्थी एकेका शिक्षकाला वळायचे असतात. त्यांपैकी बहुसंख्य शिक्षकांना 'शिकवण्या' मध्ये जास्त रस असतो. यात भरीला आणखी बरेचसे कारकुनी काम असते. एखाद्या शिक्षकाला वर्गात शिकवण्यात रस असला तरी विद्यार्थ्यांना नसतो. कारण वस्तुनिष्ठ प्रश्नामुळे रिकाम्या जागा भरा, जोडचा जुळवा असे प्रश्न विषय न समजता यांत्रिकपणे सोडवून पास होता येते. सत्रपद्धतीमुळे ज्ञानसाधना निदान एक वर्षापुरती का होईना पण अखंड साधना असते ही जाणीवच नष्ट झाली आहे. कारण ब-यापैकी विद्यार्थी सहामाही परीक्षा झाल्याबरोबरच '१०५ मार्क मिळाले मी पास झालो आहे. आता अभ्यास करायची जरुरी काय ?' असा प्रतिप्रश्न पालकांनाच विचारतो. वार्षिक परीक्षेत नापास होण्याची भीतीच राहिलेली नाही. आणि शाळांनाही ते परवडणारे नाही. कारण जास्त विद्यार्थी नापास झाले तर खालच्या वर्गातून वर येणारे विद्यार्थी व नापास झालेले विद्यार्थी या सर्वांना बसण्यास पुरेशी जागाही नसते.

या सहा वर्षांच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना विचार (आयडियाज्), संकल्पना नीट समजावून घेणे व त्यातून एक तर्कशुद्ध संगती (लॉजिकल सीक्वेन्स) शोधून काढून, त्यांना आपल्या बौद्धिक अनुभवाचा भाग बनवणे या प्रक्रियेला कुठेच सुरुवात होत नाही. ज्ञान-साधना कशी करतात याची माहिती होण्याऐवजी या कालात एकमेकाशी संबंध नसलेल्या माहितीच्या तुकड्यांपुरतेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांचे जग मर्यादित असते. त्यामधून आवडीच्या विषयाचेदेखील एकसंध चित्र विद्यार्थ्यांसमोर उभे रहात नाही. त्याच्याच जोडीला नीरस आणि काही काही विषयात तर चुकीच्या आणि विपर्यस्त माहितीने भर-

लेली पुस्तके हेही या अभ्यासक्रमाचे एक वैशिष्टच आहे.

या ठिकाणी मला एक प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. त्याची चर्चा मी अनेक शिक्षक आणि एक दोन शिक्षणतज्ज्ञ यांच्याबरोबर केली. पण मला कोणाकडूनही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. तो म्हणणे ११ + ४ ही पद्धती अंमलात असताना जो शिक्षणक्रम होता त्यात वाईट काय होते आणि नवीन अभ्यासक्रमात चांगले काय आहे ? जुन्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याला अभ्यासासाठी अनेक पर्याय होते. ६४ कलापैकी कोणत्याही सात कालामध्ये उत्तीर्ण झाले म्हणजे झाले असे त्यावेळी शिक्षक म्हणत असत. टार्यपिंग, टेलरिंग, ड्रॉइंग असे कितीतरी विषय होते. आता सर्व विषय सक्तीचे आहेत. नवगणित आणि शास्त्रसुद्धा. पुष्कळ विद्यार्थी असे असतात की, ज्यांना गणित आणि / किंवा शास्त्र या विषयात खरोखरीच गती नसते, त्यांच्यावर या विषयांची सक्ती का ? तसेच ज्यांना कारकुनी, टर्निंग, फिटिंग असे किंवा यासारखे व्यवसायविषय पुढील अभ्यासासाठी निवडावयाचे असतील त्यांना या क्लिष्ट विषयांची सक्ती का ? पूर्वी म्हणजे १९७५ पर्यंत हे विषय सोडण्याची सवलत होती. इंग्रजीदेखील सक्तीचा विषय नव्हता. त्यावेळी देशाचे काय नुकसान झाले व १९७५ पासून नव्या अभ्यासक्रमाने देशाची काय प्रगती झाली हे मला कुणी समजावून देईल काय ? वस्तुस्थिती अशी आहे की , फटक्यासरशी नव्या शिक्षणपद्धतीने शिक्षणाला हरि नारायण आपटे यांच्या काळात नेऊन ठेवले. त्यांच्या-वेळी बी. ए. ला गणीत सक्तीचा विषय होता. पण आपटे यांना गणित जमत नसल्यामुळे ते बी. ए. होऊ शकले नाहीत. आपटे या कालात असते तर ते एस्. एस्. सी. पण झाले नसते. याबाबतीत माझा एक अनुभव सांगतो. माझ्या घरी भांडी घासायला एक बाई येत असे. तिची मुलगी जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे सहजपणे एस्. एस्. सी. झाली. पुढे तिचे लग्न ज्या मुलाशी झाले तोही असाच खेडयांतला एस्. एस्. सी. होऊन नंतर बी. कॉम. झालेला. त्याला बँकेत नोकरी मिळाली. भांडी घासणारी एक मुलगी आणि तशाच जीवनाला सरावलेला एक मुलगा सुस्थित झाले. पण याच मुलीची धाकटी बहीण आठवीत नवगणिताच्या कचाटयात सापडली. तिने शाळा सोडली. व नंतर ती म्हशीच्या मागे हिंडून शेण गोळा करत असे. $अ^२ - ब^२$ यांचे घटक किंवा प्रोटॉन, न्यूट्रॉन, इलेक्ट्रॉन यांची माहिती सुसंकृत जीवनासाठी खरोखरीच अनिवार्य असते का ? मला वाटते विकसनशील देशात शिक्षणाचे स्थान काय याबातीत नीट विचार झाला नाही. अशा देशात शिक्षणाचे पहिले उद्दिष्ट हे असते की, सर्व समाजाला शिक्षणाच्या एका किमान पातळीवर आणावयाचे. त्यासाठी शिक्षणाचे सुलभीकरण किंवा माध्यमिक परीक्षेतील यश सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या आटोक्यात आणणे आवश्यक असते. कारण शिक्षणातील यश त्या विद्यार्थ्याला आत्मविश्वास देते. आणि हे करीत असतानाच अधिक सुसंकृत आणि प्रगल्भ जीवनाची संकल्पना त्यांच्या मनात रुजवावयाची असते. अर्थात त्यासाठी शिक्षणाबरोबरच निरोगी सामाजिक जीवनाचीही तितकीच आवश्यकता असते. अशा तऱ्हेने संबंध समाज एका किमान पातळीवर आला की, मग पुढची पायरी म्हणजे शिक्षणाचा दर्जा उंचावणे. अशा

दशात या कार्यक्रमाला साधारण पंचवीस वर्षे लागतील. आपल्याला शंभर वर्षे लागतील. पण तोपर्यंत शिक्षणाची पद्धत सर्वसाधारणपणे तीच ठेवायला लागेल. त्यांच्याचबरोबरीने जे बुद्धिमान विद्यार्थी असतील त्यांच्यासाठी एस्. एस्. सी. नंतर अधिक प्रगत अभ्यास-क्रमाची जरुरी आहे काय ? आदिवासी किंवा ग्रामीण भागात शेतकी किंवा असेच दुसरे उपयुक्त विषय गणित, शास्त्र याऐवजी ठेवले तर नुकसान होईल काय ?

मध्यंतरी नवीन अभ्यासक्रमाबद्दल विशेष आस्था असणाऱ्या एका प्राध्यापकांना मी विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम झेपतो का असे विचारले असताना विलक्षण उत्साहाने त्यांनी ' हो हो, झेपतो की. आम्ही आदिवासी भागात याबाबतीत प्रयोग करून त्यांनाही हा विषय समजू शकतो याचा पडताळा घेतला आहे.' असे उत्तर दिले. त्यांच्या उत्तरातच हा अभ्यासक्रम झेपतो हे सिद्ध करण्यास खास प्रयोग करावे लागतात यातच अपयशाची कबुली आहे. दुसरे म्हणजे प्रयोग यशस्वी का झाला याचीही कारणे शोधणे आवश्यक आहे. विषयाचे सखोल ज्ञान असलेला निष्णात शिक्षक, कोणताही कठीण विषय प्रयोगाचे वेळी सोपा करून दाखविनच या ईर्षेने पेटून विषय समजावून देणारा शिक्षक, प्रयोगाच्या औत्सुक्यापोटी जे कुतुहल जागृत होते त्यामुळे चित्तवृत्ती केंद्रित झालेला ( जादूचे प्रयोग पाहताना जादूगार लहान मुलांना आपल्या बोलण्याच्या कसबाने रस्त्यावर कसा तल्लीन करून सोडतो हे सर्वांना माहीत आहेच, ) आणि प्रयोगकर्त्याच्या नावाने भारून जाऊन त्याच्याबद्दल आदरभाव बाळगणारा विद्यार्थीवर्ग, असे सर्व अनुकुल घटक असले तरच 'प्रयोग' यशस्वी होतो. त्यावरून अभ्यासक्रम झेपणारा आहे असा निष्कर्ष काढणारे विद्वान पाहिले म्हणजे आपला शैक्षणिक भविष्यकाल किती उज्ज्वल आहे या कल्पनेने एक पालक म्हणून माझे मन भरून येते.

मी शिक्षणतज्ज्ञ नाही. एक पालक या नात्याने मी माझी भीती व्यक्त केली आहे. शिक्षणतज्ज्ञांनी यावर काही लिहिले तर उपकृत होईन. पण ते लिहिताना आकडेवारी किंवा प्रयोगाची माहिती न देता विद्यार्थ्याला जें शिकविले जाते ते त्याच्या अनुभवाचा कितपत भाग होतो याचे दिग्दर्शन करावे. आज जी विज्ञानपराङ्मुखता किंवा बुद्धिनिष्ठेचा अभाव जाणवतो याचे कारण विद्यार्थी मिळवतो ती निव्वळ माहिती असते, ती त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग बनत नाही, ही खरी शोकांतिका आहे. महाराष्ट्रासारख्या त्यामानाने पुढारलेल्या राज्यात ही परिस्थिती आहे. इतरत्र काय असेल याची कल्पना करणे अवघड नाही. राजकीय व आर्थिक असुरक्षिततेच्या भावनेला बौधिक अपंगत्वाची जोड मिळू पहात आहे.

असे विद्यार्थी महाविद्यालयात येतात तेव्हा कोणताही विषय त्यातील वैचारिक मर्या-दांची जाणीव ठेवून, समजून घेण्याची, आणि विचार मांडण्याची, त्यांच्यात कोणत्याही तऱ्हेची क्षमता निर्माण झालेली नसते. आणि असा विद्यार्थी महाविद्यालयात विषय शिकण्यासाठी येतही नसतो. त्याला हवी असते फक्त पदवी. लॉर्ड कर्झनने १९०१ साली भरवलेल्या शैक्षणिक परिषदेत विद्यापीठांवर टीका केली होती. तो म्हणाला की 'विद्यापीठे

फक्त परीक्षामंडळे झाली आहेत. शाळा आणि महाविद्यालये केवळ घोकंपट्टीच्या संस्था झाल्या आहेत. विद्यार्थी निव्वळ पदवीच्या मागे आहेत. आणि विद्यापीठांच्या सीनेटवर फारच थोडे विद्वान आहेत.' त्यानंतर रॅले कमिशन नेमण्यात आले व तेथपासून युनिव्हर्सिटी ग्रँटसपर्यंत अनेक कमिशने नेमण्यात आली. ऐंशी वर्षापूर्वी कर्झनने वर्णन केलेल्या परिस्थितीत काय बदल झाला ते कोणी विशद करील काय ?

शिक्षक विद्यार्थ्यांना तयार करतो हे जितके खरे, तसे विद्यार्थी शिक्षकाला तयार करतो हेही तितकेच खरे. माझा एक प्राध्यापक मित्र म्हणतो की, नोकरीच्या पहिल्या वर्षी त्याने विद्यार्थ्यांना भरभरून ज्ञान देण्यास सुरुवात केली. आणि त्याला शिकवता येत नाही म्हणून तक्रारी झाल्या. त्यानंतर दरवर्षी त्याने विद्यार्थ्यांना कमी कमी ज्ञान देण्यास सुरुवात केली. आणि आता तर तो वर्गात गप्पा मारण्यापलीकडे दुसरे काहीच करत नाही. एक अत्यंत विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून आता त्याची ख्याती आहे. यातला विनोदाचा भाग सोडून दिला तरी एवढें खरे की, विचक्षक विद्यार्थीच शिक्षकाला विषयाची तयारी करण्यास भाग पाडतो. पण आजकाल ‘ ज्ञान ’ हे प्राध्यापकांचे भांडवल नसून विद्यार्थ्यांचे ‘ अज्ञान ’ हे आहे.

दुसरे म्हणजे इंग्रजी माध्यमामुळे विद्यार्थ्याला विषयापेक्षा इंग्रजी भाषाच शिकवावी लागते. तेव्हा शिक्षणातले आव्हानच संपते. परभाषेतून शिक्षण हा शैक्षणिक अत्याचार आहे, पण आपण तो आनंदाने सहन करत आहोत. कॉन्व्हेंटमध्ये मुलांना प्रवेश मिळावा म्हणून पालक जीव टाकतात. काही थोडे अपवाद सोडले तर ही कॉन्व्हेंटस काय दर्जाची असतात ? मी या शाळांत शिकवणाऱ्या दोन-चार शिक्षकांना के. जी. पद्धतीची मूलतत्त्वे काय म्हणून प्रश्न विचारला तर त्यांना माहीत नव्हती. मेकॉलेलादेखील भारतात असे काही होईल याची कल्पना नव्हती. कारण त्याच्या प्रसिद्ध ‘ मिनिट ’मध्ये तो म्हणतो की, कालांतराने इंग्रजी भाषेतून शास्त्रीय परिभाषेची उसनवार करून देशी भाषा समृद्ध होतील व त्यांतून शिक्षण देता येईल. विद्यापीठाचे शैक्षणिक धोरणही विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना धरूनच आहे. कारण विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात पास केले नाही तर वरच्या वर्गात विद्यार्थी कमी राहतात व त्या प्रमाणात शिक्षक कमी करावे लागतात. त्यामुळे परीक्षकही मार्कांच्या बाबतीत उदार असतात.

याच्याच बरोबरीने परीक्षेत कॉपी होणे, त्याला पर्यवेक्षकांचे मिळणारे उत्तेजन, काही वेळा सामुदायिक कॉपी होण्याचा प्रकार, परीक्षकांचे अपप्रकार, निकालातील गोंधळ, महाविद्यालयातील गर्दीमुळे खालावत जाणारा शिक्षणाचा दर्जा या सर्वच गोष्टी चिंतित करणाऱ्या आहेत. पण त्याहीपेक्षा या सर्व गोष्टींबद्दल अधिकारपदस्थ असमाधानी नाहीत ही बाब अधिक गंभीर आहे.

परीक्षार्थी व विद्येबद्दल उदासीन विद्यार्थी, उदार परीक्षक, राजकारणग्रस्त विद्यापीठे असा आजच्या महाविद्यालयीन स्तरावरचा आकृतिबंध आहे. आणि अजून कित्येक कमिशने नेमली तरी शिक्षणात सुधारणा अशक्यच आहे. खरोखरीच सुधारणा हवी असेल तर शासकीय नोकऱ्यांसाठी पदवीपरीक्षेची आवश्यकता रद्द करावी ही राधाकृष्णन् कमिशनची

शिफारस अंमलबजावणीत आणणे एवढा एकच मार्ग आहे. तोपर्यंत कुत्र्याच्या छत्र्याप्रमाणे महाविद्यालये उगवत राहणारच य शिक्षणाचा दर्जा घसरत जाणारच. मग पाध्ये यांच्या म्हणण्याप्रमाणे सहाच विद्यापीठे केली तरी. कारण आता ग्रॅज्युएट होण्याची महत्त्वाकांक्षा प्रत्येक विद्यार्थ्याला असते. आजपर्यंत सुचविले गेलेले सर्वच उपाय लक्षणावर आहेत, रोगावर नाहीत.

शैक्षणिक मूल्यांच्या ऱ्हासाचे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे आता विद्यार्थ्यांचा कल अतिरिक्त प्रमाणात अर्थशास्त्राच्या अभ्यासाकडे असतो. अर्थात हे बदलत्या सामाजिक मूल्यांचे प्रतिबिंब आहे. १८२५ मध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीमध्ये ज्यावेळी अर्थशास्त्राचे अध्यापन झाले, त्यावेळी उद्घाटनप्रसंगी भाषण करताना पहिले प्रोफेसर नॅसॉ सिनियर यांनी उद्गार काढले होते की, स्वारस्य व उपयुक्तता या दृष्टीने नवे शास्त्र लोकांच्या लेखी सर्व नीतिशास्त्रात पहिले स्थान पटकावील कारण संपत्तीसाधन हे मानवाच्या दृष्टीने नीतिमत्ता उंचावण्याचेच एक मूलसूत्र आहे. नॅसॉ यांची भविष्यवाणी इतकी खरी झाली आहे की, प्रत्येक आधुनिक समाजात अर्थशास्त्रास अनन्यसाधारण महत्त्व प्रस्थापित झाले आहे. ही सवय आता इतकी बळावली आहे. की, इतर सामाजिक मूल्यांचेही अर्थशास्त्रीय मूल्यांकन सुरू झाले आहे.

स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्याच्या उर्मीमुळे अर्थशास्त्राच्या अध्ययनाचे परिणाम आटोक्यात राहिले होते, पण स्वातंत्र्योत्तर कालात आर्थिक प्रगतीची सुरुवात झाल्यानंतर आपल्या प्रत्येक कृतीचे अर्थशास्त्रीय मूल्यमापन करण्याचा चाळा आता प्रत्येकालाच लागला आहे. शिक्षणक्षेत्रात भाषा, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र हे विषय मागे पडले असून अर्थशास्त्र किंवा ज्या विषयांच्या अभ्यासामुळे आर्थिक अभ्युदय घडवून आणता येईल अशा विषयांनाच आता विद्यार्थी प्राधान्य देतात. आर्थिक लाभाची कल्पना आता समाजातील प्रत्येक माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव झाला आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. (याला काही अपवाद आहेत उदा. आदिवासी वगैरे) त्यामुळे समाजधारणेसाठी आणि अधिक सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या विधायक प्रेरणा दबल्या जात असून व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास होण्याऐवजी एकारलेली व्यक्तिमत्त्वे तयार होत आहेत.

याचा परिणाम समाजजीवनावर होणे अटळ आहे. हे जर टाळावयाचे असेल तर नीतिशास्त्राचे अधिष्ठान असलेल्या अर्थशास्त्राचा अंतर्भाव अभ्यासक्रमात होणे आवश्यक आहे. अर्थशास्त्रज्ञांना माझी ही सूचना हास्यास्पद वाटेल पण सामाजिक विनाशाकडे आपली होणारी वाटचाल रोखण्याच्या दृष्टीने हे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक लाभाच्या कल्पनेच्या पोटी विक्रेत्यांचे कसब अंगी बाणण्याची प्रवृत्ती आणि तिच्यातून जाहिरातबाजी उदयाला येते. स्वार्थ, आत्मपरीक्षणाऐवजी आत्मस्तुती व परनिंदा, आणि दिखाऊपणा ही आजच्या समाजाची व्यवच्छेदक लक्षणे आहेत. त्यांचा उगम अर्थलाभाच्या कल्पनेचा पगडा व्यक्तिमत्त्वावर बसलेला आहे त्यातच शोधावा लागेल. याची अनेक उदाहरणे

आपल्या दैनंदिन जीवनात अनुभवाला येत असतातच.

श्री. पाध्ये यांनी प्राध्यापकावरही लिहिले आहे. राज्यपुरस्काराबद्दल जो वाद माजला होता त्यासंबंधात राज्यशास्त्राच्या कोणातरी प्राध्यापकांनी 'स्टेट आणि गवर्नमेंट' असा भेद करून त्यासंबंधात लिहावयास पाहिजे होते अशी अपेक्षा व्यक्त केली होती. या दोहों-तील फरकापेक्षा प्राध्यापकांच्या दृष्टीने 'मॅनेजमेंट' अधिक महत्त्वाची आहे व तिच्या तैना-तीत राहणे अधिक अगत्याचे आहे. कारण खाजगी महाविद्यालयात 'कार्यवाहं प्रथमं वन्दे प्राचार्य तदनन्तरम' अशी परिस्थिती आहे. आणि कार्यवाह, अध्यक्ष आणि मॅनेजमेंटचे सभासद हे वेगवेगळ्या गटाचे असले म्हणजे तर प्राध्यापकाला अत्यंत निरुपद्रवी विषया-पलीकडे जाण्याची सोयच नसते. सरकारी महाविद्यालयातील प्राध्यापकांवरही बंधने आहेत. त्याशिवाय स्वतंत्रपणे विचार करण्याची कुवत फारच थोड्या प्राध्यापकांत असते

अभ्यासू प्राध्यापकांऐवजी वशिल्याच्या माणसांची नेमणूक करणे हाही प्रकार सर्वच ठिकाणी आढळतो. विद्यापीठ स्तरावरही हा प्रकार चालतो. 'सौंदर्यशास्त्रावर संशोधन केलेल्याला प्राधान्य दिले जाईल' (पाध्ये सौंदर्यसमीक्षक असल्यामुळे याचा त्यांना आनं-दच झाला असेल.) किंवा लिंग्विस्टिकमधील डिप्लोमा चालेल' अशा तऱ्हेच्या जाहि-राती विशिष्ट व्यक्तींना डोळ्यांसमोर ठेवून दिल्या जातात. या सर्व गोष्टींमुळे शैक्षणिक क्षेत्र विलक्षण कळाहीन बनले आहे. उत्साह वाटावा, चर्चा करावी असे वातावरण कुठेच आढळत नाही. प्राध्यापकांच्या रिकाम्या वेळातल्या गप्पा ऐकल्या म्हणजे त्यांना खरा रस कशात आहे हे समजून येईल.

अर्थात वर उल्लेखिलेली कारणे ही केवळ भर घालणारी (कॉंट्रिब्यूटरी) आहेत. शैक्ष-णिक क्षेत्रातील बौद्धिक दारिद्र्याचे मुख्य कारण ऐतिहासिक दृष्टीचा अभाव हे आहे. कोणत्याही विषयाचे यथार्थ दर्शन होण्यासाठी त्या विषयाच्या इतिहासाची माहिती अस-ण्याची नितांत आवश्यकता असते. आणि याची जाणीव शिक्षण क्षेत्रात कुठेच जाणवत नाही. राज्यशास्त्राच्या प्राध्यापकांना पुष्कळ वेळा इतिहासाची ओळख नसते किंवा घटना पंडितांना घटनात्मक इतिहासाची ओळख नसते. ऐतिहासिक दृष्टी असलेले विद्वान महा-राष्ट्रात होते तोपर्यंत मौलिक लिखाण होत होते. आता त्याची अपेक्षा करण्यात अर्थ नाही. अशी दृष्टी नसल्यामुळेच चैतन्यपूर्ण बौद्धिक धामधुमीचा अभाव हे तमोयुगाचे एक लक्षण शिक्षणक्षेत्रानेही आत्मसात केले आहे.

आता नवी शिक्षण नीती येऊ घातली आहे. शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणून भारताला २१ व्या शतकात घेऊन जाण्याची महत्त्वाकांक्षा राजीव गांधी बाळगून आहेत. वस्तुत: शिक्षणक्षेत्र हे सामाजिक जीवनाचाच एक अविभाज्य भाग असतो आणि सामाजिक ऱ्हासाचे प्रतिबिंब शिक्षणक्षेत्रात अटळपणे पडते. पण निरोगी पायंडे पाडून सार्वजनिक जीवन सुधारून त्यायोगे शिक्षणक्षेत्रही उन्नत व्हावे यासाठी कार्यरत होण्या-ऐवजी शिक्षणक्षेत्रातील सुधारणांच्या आधारे राष्ट्र प्रगतीपथावर नेण्याचा उफराटा कार-भार राजीव गांधी यांनी सुरू केला आहे. त्याचा थाट असा आहे की, संबंध शिक्षणपद्धती

जणू काय एका क्वारंटाईनमध्ये असून तेथे विद्यार्थ्यांना शिक्षणाची लस टोचली की, समाजात जे अनिष्ट आहे याची बाधा त्यांना होणार नाही. असे विद्यार्थी शिक्षण संपवून बाहेर पडले की ते सबंध समाज सुधारतील असा भाबडा (लुच्चा ! ) आशावाद त्यात आढळतो. वस्तुतः समाजातील वातावरण दूषित असले म्हणजे काय होऊ शकते हे शिक्षण-क्षेत्रात गेली दोनतीन वर्षे विनाअनुदान संस्थांनी जो अभूतपूर्व हाहाःकार माजवला आहे त्यावरून, तसेच मुंबई विद्यापीठातील मार्क वाढविण्याची उघडकीस आलेली प्रकरणे आणि पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीतील एका सदस्यावरील विद्यापीठाची साधनसामुग्री चोर-ल्याचा आरोप, यावरून स्पष्ट होईल. नव्या शिक्षण नीतीचा आणखी एक खुपणारा दोष म्हणजे शिक्षणाची उद्दिष्टे आणि कार्यवाही यात मूलभूत विसंगती आहे. राष्ट्रीय एकात्मता हे नव्या शिक्षणनीतीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पण त्याच्याशी अगदी विसंगत असे अल्प-संख्यांकांचे लाड चालू ठेवण्याचे धोरण हेही नव्या शिक्षणनीतीच्या कृतीकार्यक्रमाचे तित-केच महत्त्वाचे अंग आहे, राष्ट्रीय एकात्मता खरोखरीच साध्य करावयाची असेल तर अल्पसंख्य–बहुसंख्य ही भाषा प्रथम बंद करून सर्वजण भारतीय आहेत हे सर्वांवर बिब-विण्याची नितांत आवश्यकता आहे. पण निवडणुकीच्या सोयीसाठी ते होत नाही. नवी शिक्षणपद्धतीही अखेर राजकीय महत्त्वाकांक्षेचीच बळी ठरली आहे.

शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो हे खरे. पण ते जर यांत्रिक पद्धतीने दिले जात असले तर त्याचा परिणाम विद्यार्थ्याला साक्षर किंवा तंत्रज्ञ बनविण्यापुरताच होतो. 'वॉटर्लूची लढाई हॅरो आणि ईटन येथे लढली गेली हा इंग्रजीतील निव्वळ वाक्प्रचार नव्हे तर शैक्षणिक संस्काराची महती आहे. शिक्षणाची विद्यार्थ्यावर संस्कार घडवून आणण्याची क्षमता ज्या प्रमाणात दुबळी असते त्याप्रमाणात वर्तमानपत्रांची वाढते.

दैनिक अल्पजीवी असते त्यामुळे व्यक्तिमत्त्वावर त्याचा दीर्घकाल टिकणारा परिणाम होत नाही असा एक समज असण्याची शक्यता आहे, पण तो अत्यंत चुकीचा आहे. सकाळी उठल्याबरोबर चहाच्याही आधी आपल्याला वर्तमानपत्राची गरज भासते, आपल्याकडील शिक्षण अत्यंत निकस असल्यामुळे व वर्तमानपत्राचा सहवास निरंतरचा असल्यामुळे वाच-कांचा दृष्टिकोन (अ‍ॅटिट्यूडस्) बनविण्याचे ते अत्यंत प्रभावी साधन बनले आहे. या भूमिकेतून वर्तमानपत्रांचे धोरण काय आहे हे पाहणे उद्बोधक होईल. उठल्याबरोबर पहिले काम दैनिकातील ठळक मथळे वाचणे व ज्या दिवशी भ्रष्टाचार, मंत्र्याची हकाल-पट्टी, राजीनामा, खून, दंगल जाळपोळ, अपघात अशा तऱ्हेच्या बातम्या नसतात त्या दिवशी आज वाचण्यासारखे नाही म्हणून वर्तमानपत्र बाजूला ठेवतो. पण त्याच वर्तमान-पत्रात इतरत्र कोठेतरी कोपऱ्यात आलेली एखाद्या असहाय माणसावर, दलितावर किंवा स्त्रीवर झालेल्या अन्यायाची बातमी मला विचारप्रवण करीत नाही. कारण माझ्या जाणीवा आता बोथट झाल्या आहेत. 'असं चालायचंच' किंवा 'काय अडाणी लोक असतात' असे म्हणून ती घटना मी विसरून जातो.

ज्यांच्याशी माझा संबंध दूरान्वयानेही पोचत नाही अशाच सनसनाटी बातम्या मला

हव्या असतात. त्यावर मी तावातावाने ऑफिसात किंवा पत्ते कुटताना बोलतो. स्वतःला सुखवील असा शेरा मारतो व आपल्या निरोगी दृष्टिकोनाबद्दल समाधान पावून सुखाने झोपी जातो. त्या असह्याय व्यक्तींचा पत्ता काढून त्याला पाच रुपये पाठविण्याची कधी इच्छा होत नाही. कारण माझा दृष्टिकोन आता बनलेला आहे व आत्मसंतुष्टपणामुळे मला त्यात बदल करणे आवश्यक वाटत नाही. प्रत्येक गोष्टीला सरकार जबाबदार असते व प्रत्येक प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सरकारचीच हा भारतीय माणसाचा दृष्टिकोन बनण्यात वर्तमानपत्रवाल्यांचा फार मोठा हातभार लागलेला आहे. सार्वजनिक जीवनात किती प्रसंगी आपण पोलीस असले तरच शिस्त पाळतो हे तपासून पाहण्यासारखे आहे. मुंबईमध्ये बस थांबल्यावर रांगेत नीट उभे राहण्यासाठी आम्हाला आणीबाणीचे वातावरण लागले.

वर्तमानपत्रे हा आता धंदा झाला आहे व त्यामुळे बहुतेक सर्वच वर्तमानपत्रे बिनचेहऱ्याची झाली आहेत. नवशक्ती म्हणजे पाध्ये इ. समीकरणे नष्ट झाली आहेत. काही वर्तमानपत्रांना चेहरे आहेत असा भास होतो. पण प्रत्यक्षात ते इंदिरा गांधी किंवा गोअेंका यांचे मुखवटे असतात. ज्या ज्या पर्यायाने वर्तमानपत्राचा खप वाढेल अथवा ज्यामुळे इतर क्षेत्रात मालकाचा फायदा होईल अशा धोरणांना ही वर्तमानपत्रे बांधलेली असतात. त्यामुळे खून किंवा बलात्कारासारख्या ज्या प्रकरणात लोकांचे औत्सुक्य अतिरिक्त प्रमाणात चाळवले गेले असते अशा खटल्यांच्या सुनावण्यांनी केवढी तरी जागा व्यापलेली असते. तसेच सिमेंट वाटपातील भ्रष्टाचार किती दिवस तरी चालू आहे. पण काही विवक्षित वेळेलाच एखादा वृत्तपत्रकार तो का उघडकीला आणतो ?

जे सिमेंटचे झाले तेच काही दिवसापूर्वी साखरेचे झाले होते. तेच गोडया तेलाचेही होते आणि इतर अनेक वस्तूंचे होते. ज्या ज्या गोष्टींचा तुटवडा भासतो त्याचे नेमके कारण शोधून सरकारला परिणामकारक उपाय योजायला लावण्यासाठी वृत्तपत्रे आणि नियतकालिके मोहीम का काढत नाहीत ? यासंबंधात अमेरिकेचा इतिहास बरेच काही सांगून जातो. तेथे ज्यावेळी बडे भांडवलशहा आणि राज्यकर्ते यांचे साटेलोटे होते व सामान्य माणूस रगडला जात होता त्यावेळी हा सर्व प्रकार उघडा करणारी अनेक पुस्तके लिहिली गेली. अनेक नियतकालिके या मोहिमेत सहभागी झाली होती. त्याची सुरुवात हेन्री लॉईडच्या ' वेल्थ अगेन्स्ट कॉमनवेल्थ ' या पुस्तकाने केली. नंतर आयडा टारबेल हिने ' हिस्ट्री ऑफ स्टँडर्ड ऑईल कं. ' हे पुस्तक लिहिले. स्टेफेन्स लिंकनच्या ' ट्वीड डेज इन सेन्ट लुई ' या पुस्तकात त्या शहरातील भ्रष्टाचारावर प्रकाशझोत टाकला गेला. ' शेम ऑफ सिटीज ' मध्ये राज्यकर्ते आणि भांडवलशाही यांची युती चव्हाटयावर आली. त्यानंतर थॉमस् लॉसनचे ' फ्रेंझीड फायनान्स ' गुस्टावस मायरचे ' हिस्ट्री ऑफ ग्रेट अमेरिकन फॉर्च्युन्स " रसेलचे ' ग्रेटेस्ट ट्रस्ट इन द वर्ल्ड ', हेन्ड्रिकचे ' स्टोरी ऑफ लाइफ इन्शुअरन्स,' फ्रँक नॉरिसचे ' ऑक्टोपस ' अशी अनेक पुस्तके लिहिली गेली. त्याच्याच बरोबर अरीना, कॉस्मॉपॉलिटन, फोरम, अमेरिकन, लेडिज होम जर्नल, एव्हरीबॉडी अशी

अनेक नियतकालिकेही याच विषयाला वाहिलेली होती. आपल्याकडे अशा तऱ्हेचे लेखन होत नाही. कारण मोठी वृत्तपत्रे व नियतकालिके भांडवलदारांच्याच मालकीची आहेत. जी नियतकालिके स्वतंत्र बाण्याची आहेत त्यांचा जीव लहान आहे. अलीकडे बऱ्याच नियतकालिकांनी 'शोधक पत्रकारिता' या नावाखाली 'कव्हर स्टोरी' देण्याची टूम सुरू केली आहे. पण या सर्व 'कव्हर स्टोरीज' फक्त साप्ताहिक करमणूक करणाऱ्याच असतात. त्यामधून कोणतेही जनहित साधले जात नाही अर्थात कोणत्याही वृत्तसंस्थेचा तो हेतू नसतोही.

आपण वर्तमानपत्रे काही उद्देशाने चालवतो हा दावा आणीबाणीने पार उद्ध्वस्त करून टाकला. महाराष्ट्र टाईम्सचे तळवलकर यांनीही वर्तमानपत्रवाल्यांनी आता वृतपत्रस्वातंत्र्याच्या जुन्या कल्पना सोडल्या पाहिजेत असा सूर काढला होता व आजही त्यांच्या चेहऱ्यावर त्यांच्या मालकांनी राजीव गांधींचा मुखवटा चढवला तर त्यांना तो चढवून घ्यावा लागेल किंवा पाध्ये जसे नवशक्तीतून बाहेर पडले तसे करावे लागेल. दहनासाठी पंचवीस रुपये पेटीत ठेवून सुधारकाचा संसार चालविणाऱ्या आगरकरांची परंपरा निव्वळ उत्तम अग्रलेख लिहून पाळता येत नाही. त्याचा अर्थ एवढाच की, तळवलकर हे उत्तम कलावंत आहेत व हे वाचकांनाही माहीत आहे त्यामुळेच नाटकातील संभाजीच्या वाक्यांनी आणि वीरश्रीने ज्याप्रमाणे प्रेक्षकांच्या चित्तवृत्ती नाटक पाहत असताना पालवतात व मध्यंतरात ते बटाटेवडे किंवा सामोसे खातात त्याप्रमाणे या ताकदीच्या अग्रलेखामागे भाषा आणि व्यासंग यापलीकडे कोणतेही बळ नाही, तत्त्वनिष्ठा नाही, हे समजून वाचक क्षणभरच प्रभावित होतो व नंतर दाढी, स्नान इ. दैनंदिन कार्यक्रमाला लागतो.

□ □

# चार

वाचक, संपादक, व विरोधी पक्षाचे पुढारी यांचे संबंध कसे आहेत हे उदाहरण घेऊनच समजणे सोपे जाईल. 'कलावंत' तळवलकर यांनी मध्यंतरी 'भ्रष्टसंहार जाहला' या मथळ्याचा एक अप्रतिम अग्रलेख लिहिला होता. भीमसेन जोशी यांनी गाताना घेतलेल्या एखाद्या जागेला रसिकांनी दाद द्यावी त्याप्रमाणे या अग्रलेखाला अनेकांनी पत्रे पाठवून दाद दिली, या दाद देणाऱ्यात इन्कमटॅक्स, सेल्सटॅक्स, अबकारी खाते, म्युनिसिपालिटीतील नोकरवर्गही असणारच. पण भ्रष्टाचार थांबवणे ही सरकारची जबाबदारी आहे, आमची नव्हे असा आमचा दृढविश्वास असल्यामुळे त्या दिवशीच मी कोणाचे तरी काम करून पैसे घेतले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. संपादक कितपत तत्त्वनिष्ठ आहेत ? मुख्यमंत्र्यांनी उघड उघडच पैसे घेतल्याचे कबूल केले होते. त्यामुळे न्यायालयाने दिलेल्या निकालात अनपेक्षित असे काहीच नव्हते. इंदिरा गांधींनी अंतुले यांना पदावरून उतरण्यास सांगितले हा 'भ्रष्टसंहारा' पेक्षाही राजकारणाचाच भाग अधिक असण्याची शक्यता आहे. कारण त्यांनी 'मारुति' प्रकरणातील भ्रष्टाचार लोकांना पचवून घेणे भाग पाडले. म्हणजे 'भ्रष्टसंहारा' पेक्षा 'अंतुले गेले' हेच अधिक तर्कशुद्ध ठरले. आता अंतुले गेल्यामुळे भ्रष्टसंहार झाला असे समीकरण मांडण्यात भ्रष्टाराचापेक्षा अंतुले यांना व्यक्तिगत विरोध असेच या अग्रलेखाला स्वरूप येते.

दुसरा प्रश्न यापूर्वीचे काही मुख्यमंत्री भ्रष्टाचारी होते असे बोलले जाते. त्यांच्या वाढविवशी दोन चार पानाची खास पुरवणी महाराष्ट्र टाईम्समध्ये येत होती त्याचे काय? तिसरा प्रश्न असा प्रश्न असा की, श्री. शरद पवार मंत्रिपदावरून खाली उतरल्यानंतर हेलिकॉप्टरने प्रचार करत होते. ते त्यांना कसे परडवत होते ही शंका मला येते. तसेच कॉंग्रेस (स.) च्या कार्यालयाचा खर्च शरद पवार कसा भागवत असतील असेही माझ्या मनात येते. या शंका संपादकांना येत होत्या का नाही ? का पवार मित्र असल्यामुळे येत नव्हत्या ? आणि येत असल्या तर त्याचा शोध घेऊन त्यात संशयास्पद काही नाही असे वाचकांना पटवून देण्याचा प्रयत्न केला का, नाही ? आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. संपादक ज्या भांडवलदारांचे नोकर आहेत त्यांच्या व्यवहारात भ्रष्टाचार असतो का नाही? आणि असला तर तो बाहेर काढण्याची त्यांची हिंमत आहे काय ? का अंतुले गेले म्हणजे तेथलाही 'भ्रष्टसंहार जाहला ?'

हा अग्रलेख वाचून प्रा. ग. प्र. प्रधान हर्षभरे टाळ्या पिटते झाले. वास्तविक अंतुले गेल्यामुळे भ्रष्टाचाराच्या भस्मासुराची फक्त टोपीच पडली आहे. त्यात आनंद मानण्या-

पेक्षा प्रधानांनी अंतर्मुख व्हावयास पाहिजे होते. या भस्मासुराच्या पायाचे दगड गांधी-जींनी बसवले आहेत. त्यांनी निरनिराळे फंड जमा केले त्यांचा हिशेब आहे काय ? नेहरू निवडणुकीसाठी पैसा जमा करत होते, त्यांचे हिशेब आहेत का ? हा पुतळा घडवला दोन गांधी आणि एक नेहरू यांनी. मग गांधी–नेहरूंना बाजूला काढायचे आणि अंतुले यांना ठोकायचे हा प्रकार नैतिक अपरिपक्वता दाखवतो. प्रधानांनी आणखी दोन प्रश्नांची उत्तरे द्यावीत. पहिला म्हणजे पुलोदचा कारभार भ्रष्टाचारापासून मुक्त होता का ? आणि तसा तो नसेल तर भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले होते ? वस्तुस्थिती अशी आहे की, दैनिके, वाचक आणि सत्ताधारी आणि विरोधी पक्ष या सर्वांचाच प्रत्येक घडामोडीकडे बघण्याचा दृष्टिकोन अत्यंत उथळ आहे आणि यथार्थदर्शनाचाच अभाव हे त्याचे कारण आहे. त्यामुळे वर्तमानपत्राचे स्थान चहाबरोबरचे तोंडी लावणे येवढेच राहिले आहे. अर्थात याचा अर्थ असा नव्हे की, त्यांची शक्ती कमी झाली आहे. ती योग्य प्रकारे वापरली जात नाही. असो.

आजकालचा प्रत्येक संपादक पोटार्थी आहे. त्यामुळे त्याच्या गळ्यात दावे आहे. त्यामुळे तो संपादक कुठपर्यंत जाऊ शकतो हे त्या दाव्याच्या लांबीवर अवलंबून आहे. अर्थात या बाबतीत कोणत्याही संपादकाला दोष देता येणार नाही. कारण साखळी वर्तमानपत्रांच्या काळात स्वतःचे दैनिक काढणे म्हणजे पोरखेळ नव्हे. पण संपादकांना जे स्वातंत्र्य असते त्या मर्यादेत जनतेच्या गाऱ्हाण्यांना सनसनाटी बातम्यांप्रमाणेच महत्त्व देणे अशक्य नाही. तसे दिले तर जनतेचा अन्यायविरोधी दृष्टिकोन बनण्यास मदत होईल त्याचप्रमाणे विज्ञानात काय प्रगती होत आहे याबद्दलही वरचेवर वर्तमानपत्रात लोकांना समजेल अशा भाषेत माहिती दिली तर मानवतावाद व बुद्धिवाद जोपासला जाईल. नेमके हे केले जात नाही हा त्यांचा दोष आहे. त्यामुळे वर्तमानपत्रे आज 'ब्रॅन्ड' झाली आहेत. कोणी हमाम वापरतो कोणी लक्स त्याप्रमाणे कोणी महाराष्ट्र टाईम्स, कोणी लोकसत्ता अथवा इंग्रजी दैनिके घेतात.

मध्यंतरी श्री. अंतुले यांनी सरकारी वर्तमानपत्र काढण्याचा विचार बोलून दाखविला. ताबडतोब साखळी वर्तमानपत्रांची कोल्हेकुई सुरू झाली. का ते अजूनही मला समजत नाही. सरकारचाही काही दृष्टिकोन असू शकतो व वृत्तपत्रस्वातंत्र्याची जर आपण मागणी करत असलो तर सरकारला ते स्वातंत्र्य नाही असा विचार त्याच्याशी कसा सुसंगत असेल ? का वृत्तपत्रेही भांडवलदारांचीच मक्तेदारी असली तरच ते वृत्तपत्रस्वातंत्र्य असा अर्थ आहे ? का साखळी वर्तमानपत्रांच्या मालकांची कुलंगडी बाहेर आणली जातील अशी भीती निर्माण झाली ? पण ती अनाठायी आहे. कारण मंत्री आणि सरकारी नोकर यांना विकत घेण्याची त्यांची ताकद जबरदस्त आहे. सरकारी वर्तमानपत्रांवर असाही आक्षेप घेण्यात येतो की, दूरदर्शन व आकाशवाणी यांच्या बरोबरीनेच वर्तमानपत्रही सरकारी निघाले तर जनतेच्या पैशाने मंत्र्याची प्रसिद्धी केली जाईल. पण साखळी वर्तमानपत्र सध्या काय करीत आहेत ? जो मंत्री त्यांची अंतरे राखतो त्याला प्रसिद्धी व जो

त्यांना उपयोगी पडत नाही त्याला ठोकणे यापलीकडे काय चालले आहे.

शिवाय साखळी वर्तमापत्रांचे वार्ताहर विकले जात नसतील किंवा ब्लॅकमेलिंग करीत नसतीलच असे गृहीत धरता येणार नाही. मध्यंतरीच एका नियतकालिकात काही पत्रकारांना शेख अब्दुल्ला व्ही. आय. पी. म्हणून वागवतात असे वाचले होते. निरोगी सार्वजनिक जीवनाच्या आणि बुद्धिवादाच्या हितासाठी सर्वच दृष्टिकोन जनतेसमोर येणे आवश्यक आहे. पण आजकाल वाचकांना विचार करायला लावण्याऐवजी एखाद्या घटनेचे निमित्त करून त्यांना पछाडून टाकणे हाच वर्तमानपत्रांचा उद्योग आहे पछाडलेल्या लोकांना सारासार बुद्धीचा विसर पडतो व त्यांना हवा असतो भावनिक उतारा. ही गरज भागवली जाते. अंतुले गेल्याने, इंदिरा गांधी निवडणुकीत पडल्याने, मोर्चा काढल्याने किंवा जगजागरण केल्याने. हे झाले म्हणजे आपले सर्व प्रश्न सुटल्याच्या निश्चितीत ते असतात. कारण खरे प्रश्न, त्यांची सोडवणूक यांची त्यांना कल्पनाच नसते. आणि ते सोयीचेही असते. कारण प्रश्नाचे स्वरूप नीट समजले तर आपले उत्तरदायित्व किती याचाही शोध घ्यावा लागतो. त्यापेक्षा एखाद्या व्यक्तींवर किंवा सरकारवर दोष लादून नामानिराळे होता येणे यासारखी सुखप्रद गोष्ट कोणतीही नाही. आपल्या परिस्थितीला दुसऱ्याला जबाबदार धरणे हा मानसिक खेळ विलक्षण गुंतवणूक करणारा आणि समाधान देणाराच असतो व वर्तमानपत्रे ही एक फार मोठी गरज भागवतात.

कोणत्याही समस्येवर भावनिक समाधानाचा तोडगा शोधण्याच्या आपल्या प्रवृत्तीचे आणि ती गरज वृत्तपत्रे कशी भागवतात याचे दर्शन घडविणारा एक ठळक प्रसंग अलीकडेच घडला. तो म्हणजे माजी मुख्यमंत्री शिवाजीराव निलंगेकर यांच्या कन्या चंद्रकला डावले यांचे एम्.डी. परीक्षेत मार्क वाढवण्याबाबतचा. हे प्रकरण विकोपाला जाऊन त्यात शेवटी राज्यपाल कोना प्रभाकर राव व शिवाजीराव निलंगेकर यांची आहुती पडली. तर कुलगुरू माधवराव गोरे यांनी निष्कारण आत्माहुती दिली. हे बळी पडल्यानंतर सगळीकडेच समाधानाचे आणि सुटकेचे वातावरण पसरले आणि वृत्तपत्रांचेही या विषयातील स्वारस्य संपले. पण राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या राजीनाम्याने कोणती समस्या सुटली होती ? एकूण शिक्षणपद्धती तीच राहणार होती भ्रष्टाचाराला वावही तितकाच राहणार होता. वस्तुतः परीक्षेतील भ्रष्टाचार पूर्वापार चालत आलेला आहे. आणि पुढेही तो चालू राहणार यात शंका नाही. याचे एकच उदाहरण देतो. पूर्वी इंटर सायन्सच्या परीक्षेमध्ये मार्क देणाऱ्यांचे एक रॅकेट होते. सर्वांना माहीत होते. वृत्तपत्रांच्या संपादकांना माहीत असणार. पण ते नेस्तनाबूत करण्यासाठी अथवा इतर काही मार्गांनी परीक्षेत अपप्रकार करण्याची त्यांची क्षमता विफल करण्यासाठी कुणालाही प्रयत्न करावेसे वाटले नाहीत. बळी पडण्याची शक्यता दिसल्याखेरीज वृत्तपत्रे शरसंधान करीत नाहीत. परीक्षकांना मार्कांमध्ये ढवळाढवळ करण्यात अनीती वाटत नाही आणि ते थांबविण्यासाठी कोणीही प्रयत्नशील नाही तोपर्यंत असेच चालावयाचे. पण आपल्याला त्याचा संताप येत नाही. एखादे प्रकरण बाहेर पडून चार दोन मुंडकी घरंगळली म्हणजे मात्र आपल्या सर्व

समस्या सुटल्याचे आपल्याला समाधान वाटते. प्रत्यक्ष आपल्याला भ्रष्टाचाराचे परिणाम भोगावे लागत नाहीत तोपर्यंत आपल्याला ते खूपत नाही, पण आपला संबंध नसला तरी उच्चपदस्थांची स्थानच्युती आपल्याला विलक्षण आनंद देऊन जाते. बळी पाहून सुखावण्याची यज्ञसंस्कृतीतील माणसांची संस्कृती आपण टिकवून धरली आहे आणि ती गरज वृत्तपत्रे भागवतात. सध्या अमिताभ बच्चनचा बळी पाहण्याची सामान्य माणसाची उत्सुकता वृत्तपत्रांनी चाळवली आहे. आणि तो बळी पडल्यानंतर स्विस बँकेत पैसे ठेवण्याची सर्व प्रकरणे संपल्याचे समाधान वाचकांना लाभणार आहे.

मराठीतील प्रमुख दैनिके ही साखळी वृत्तपत्राचा एक घटक असून ती मराठेतर लोकांच्या मालकीची आहेत. मराठी लोकांच्या मालकीची जी वर्तमानपत्रे आहेत ती कशीवशी जीव धरून आहेत व साखळी वृत्तपत्रांशी स्पर्धा करून टिकून राहणे त्यांना उत्तरोत्तर कठीण होत जाणार आहे. मराठीतील कर्तबगार पत्रकारांच्या समोर औंध–भोर येथील राज्य की बडोदा–हैद्राबाद येथील दिवाणपद अशा तऱ्हेचा पेच नेहमीच उभा राहिलेला आहे व मराठी मनोवृत्तीला अनुसरून ते नेहमीच दिवाणपदाच्या मागे राहतात. काही वर्षांपूर्वी इंग्रजी टाईम्सचे मराठी भावंड निघणार अशी जाहिरात आली होती. तेव्हा कितीतरी पत्रकारांनी नव्या वर्तमानपत्रात काम करण्यासाठी अर्ज केले होते. मध्यंतरी एका साखळी वर्तमानपत्राची पुणे आवृत्ती निघणार असे जाहीर झाले होते तेव्हा अनेकांच्या पोटात गोळा उभा राहिला होता.

अपुरे भांडवल, अपुरे साधनबळ, कर्तबगार पत्रकारांची साखळी वर्तमानपत्राकडे ओढ यांमुळे मराठी लोकांची वृत्तपत्रे, एक शक्ती बनण्याऐवजी, मराठी माणसाच्या प्रत्येक बाबतीतील दैन्य आणि दारिद्र्य यांचेच प्रदर्शन करतात. यामुळे मराठी माणसांच्या हिताचा योग्यप्रकारे पाठपुरावा होणे अशक्य बनले आहे. अंतुले प्रकरण, अभ्यंकर खून खटला, नानावटी प्रकरण अशांना ज्या प्रमाणात प्रसिद्धी मिळते त्या प्रमाणात कोकण रेल्वे, ॲल्युमिनियम प्रकल्प, जंगलतोड, मुंबईतील प्रदूषण, नवीन निघणाऱ्या कारखान्यांमुळे मुंबईतील लोकसंख्येची बेसुमार वाढ, मराठी माणसांची सर्वच क्षेत्रात होणारी पिछेहाट अशांसारख्या महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रश्नांवर वर्तमानपत्रांतून प्रचाराची राळ उडत नाही. संयुक्त महाराष्ट्रावर रण पेटविण्यासाठी शेवटी 'मराठा'ची गरज भासली, पण ते व्यक्तिपत्र होते; खरी जरूर आहे स्वतंत्र मराठी वृत्तसंस्थेची. या बाबतीत श्रीमंत बागाईतदार, साखरकारखानदार, मराठी उद्योजक यांना पुष्कळच करता येण्यासारखे आहे पण त्यांना ती दृष्टी नाही. त्यामुळे मराठी मनावर अमराठी दृष्टिकोणच अधिराज्य गाजविणार.

वर्तमानपत्रे दृष्टिकोन बनवतात व त्याला अनुसरून साप्ताहिके, मासिके निघतात. अर्थात नियतकालिकांच्या बाबतीत दैनिकांच्या इतकी निराशाजनक परिस्थिती नाही. कारण सोबत, माणूस, साधना, किर्लोस्कर, स्त्री, नवभारत, समाज प्रबोधन पत्रिका

यांसारखी स्वतंत्र दृष्टिकोन असणारी नियतकालिके आहेत. पण वाचकांचा दृष्टिकोन आता सनसनाटी बातम्यांनी तयार झालेला असल्यामुळे आता अशाच नियतकालिकांना मागणी आहे व तोही धंदा बनला आहे. याचा अर्थ असा नव्हे की, नियतकालिकांनी व्यवहार पाहू नये. पण 'अभ्यंकर कुटुंबाचा खून' किंवा 'नामांतर चळवळ' या घटना जणू काय एखाद्या नियतकालिकाचा फायदा करून देण्यासाठीच झाल्या असाव्या असे तरी स्वरूप त्याला येऊ नये.

दुसरे म्हणजे स्त्रीवाचकांची संख्या आता खूप प्रमाणात वाढली आहे. स्त्री आता निव्वळ गृहिणी राहिली नसून अर्थार्जनही करीत आहे. ती सुशिक्षित आहे. त्यामुळे तिच्या बौद्धिक आवडीनिवडी यांचाही परिणाम बौद्धिक जीवनावर होतो, कारण शेवटी लेखक जे लिहितो ते वाचकांकरिताच. निव्वळ स्वान्तःसुखाय नव्हे. स्त्री सुशिक्षित झाली याचा अर्थ तिचा दृष्टिकोन व्यापक झाला असा नव्हे तर तिने ऑफिसमध्ये काम करण्यास लागणारी पात्रता संपादन केली एवढाच. ती विलक्षण आत्मसंतुष्ट आहे. तिच्या आवडीनिवडी अत्यंत उथळ आहेत. राजकारण, समाजकारण यात तिला यत्किंचितही रस नाही. काही नोकऱ्या न करणाऱ्या सुस्थितीतील स्त्रिया समाजकार्य करतात. पण ते एक फॅशन म्हणून. सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोन असलेल्या काही स्त्रिया निरनिराळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. पण त्यांची संख्या लहान आहे व त्यांना अपवादच समजावे लागेल. साहजिकच सर्वसाधारण स्त्रीच्या बौद्धिक मगदुराप्रमाणे घटकाभर करमणूक करणाऱ्या नियतकालिकांनाच आता जास्त मागणी आहे. शिवाय शहरातल्या धावपळीच्या जीवनात गंभीर विषयावरील लेखन वाचून त्यावर चिंतन करणे जवळजवळ अशक्य असते. आणि ज्यांना असा वेळ मिळतो त्यांना या विचारवंतांची व विद्वानांची समाजातील प्रतिमाही माहीत असते. त्यामुळे त्यांच्या लेखनांची सहसा कोणी दखल घेत नाही.

मागे नवशक्तीमध्येच अ. का. प्रियोळकर व म. भा. भू. आजगावकर यांच्यातील वाद प्रसिद्ध होत होता व वाचक तो हौसेने वाचत असत. पण आज विद्वान–विचारवंत या वर्गाची प्रतिमा फारशी उजळ नाही. ते जे बोलतात किंवा लिहितात ते केवळ बापुडवाणे शब्द असतात; त्याला कृतीची जोड नसते. त्यामुळे सामान्य माणसावर त्याचा काहीच परिणाम होत नाही. आता विचारवंतांची उक्ती व कृती यातील भेद त्याच्या अंगवळणी पडला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालात देशभक्ती हा सर्वश्रेष्ठ गुण मानला गेल्यामुळे अशा एखाद्या दोषाकडे जनता दुर्लक्ष करीत असे. कारण देशभक्ती ही त्यावेळी सुळावरची पोळी असे. गांधीजींनी आश्रमवासियांच्यावर निसर्गोपचाराची सक्ती केली पण स्वतःचे ऑपरेशन करून घेतले. मोटारीचा उपयोग करून यंत्रसंस्कृतीवर टीकेचे प्रहार केले अथवा शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालण्याचा संदेश भारतीयांना देऊन नेहरूंनी आपल्या भाच्यांना अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी पाठविण्यास विरोध केला नाही, तरी त्याबद्दल विशेष प्रतिक्रिया सामान्य जनतेत आढळली नाही. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्वच सक्तीने देशभक्त झाले. १९४२ च्या चळवळीत गैरहजर राहिल्याबद्दल मुलांच्याकडून माफीपत्रे

लिहून घेणारे शिक्षकही १४–१५ ऑगस्टच्या मध्यरात्री एका क्षणात प्रखर देशभक्त होऊन मुलांना उपदेशाचे व स्वातंत्र्यलढ्याच्या पुढाऱ्यांच्या कौतुकाचे बोल ऐकविते झाले. रात्रीचे बाराचे ठोके पडले आणि एखाद्या यक्षिणीने कांडी फिरवून चमत्कार घडवून आणावा त्याप्रमाणे त्या क्षणापर्यंत इंग्रजांचे एकनिष्ठ सेवक असलेले सर्वजण धरून यच्च-यावत भारतीय जनता देशभक्त बनली. अष्टी–चिमूर येथे गोळीबार करणारे, भूमिगतांचा ठावठिकाणा सांगणारे पोलिसांचे खबरे, तुरुंगात स्वातंत्र्यसैनिकांचा छळ करणारे, सर्वच देशभक्त बनले, पण त्यामुळे देशभक्तीभोवतालचे वलय नष्ट होऊन आता जनता कृतीची अपेक्षा करू लागली आणि त्याबाबत अधिक चिकित्सक बनली.

स्वार्थत्यागाचा, साधेपणाचा, काटकसरीचा, देशहितासाठी वैयक्तिक हित बाजूला ठेवण्याचा, जातिभेद विसरण्याचा, दलितांची सेवा करण्याचा उपदेश करणारे फक्त उपदेशच करीत होते हे जनतेच्या लवकरच लक्षात आले व तीही हळूहळू या ढोंगात सामील झाली. सार्वजनिक जीवनाने एका प्रचंड दंभाचे स्वरूप धारण केले. हा रोग आता इतका बळावला आहे की, त्याची आता आपल्याला सवय झाली आहे. एकच उदाहरण देतो. शिक्षणमंत्री, उपकुलगुरू वगैरे अधिकारी मंडळी सामान्य जनतेला नेहमी सांगत असतात की, शिक्षणात आमूलाग्र बदल घडवून आणला पाहिजे. मग त्याचा हात कोणी धरला आहे हे विचारण्याचादेखील त्रास कोणी घेत नाही.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे कितीही व्यासंगी आणि ज्याची सामाजिक प्रतिमा अत्यंत उजळ आहे अशा सूज्ञाचेदेखील बोल सरकारच्या बधीर कानावरच पडतात. त्यातून निष्पन्न काहीही होणार नाही हे प्रत्येकाला माहीत असते. वैय्यर्थाच्या एका प्रचंड जाणीवेने समाज हतबद्ध झालेला आहे. स्वतंत्र्यपूर्व कालात व नंतरही थोडा काल अशा लेखनात वाचकाला गुंतवणूक वाटत होती. काहीतरी नवनिर्मिती होत आहे व त्यास आपला हातभार लागणार आहे, आणि आपल्याला जे वाटत आहे ते किंवा आपले विचारच विचारवंत बोलून दाखवत आहेत, आपल्या व्यथांना वाचा फोडीत आहेत, त्यातून काहीतरी निष्पन्न होणार आहे असा त्याला विश्वास होता. त्यामुळे न समजणाऱ्या वादाबद्दलही त्याला कुतूहल होते. आज त्यातले काय उरले आहे ? पाध्ये यांच्यासारखे काहीजण वाळलेल्या फुलातला गंध शोधीत राहिले आहेत. फुले केव्हाच वाळून गेली आहेत आणि नवीन फुले फुलवू शकणाऱ्यांच्यापैकी बऱ्याच जणांच्या हातात सत्ताधीशांच्या आरतीचे तबक आहे.

विद्वान आणि विचारवंत यांमध्ये मी असा फरक करतो की, असलेले ज्ञान आत्मसात करतो तो विद्वान व नवीन विचार समाजाला देतो तो विचारवंत. पाध्ये यांनी जी यादी दिली आहे त्यातील विद्वान किती व विचारवंत किती याबद्दल मला माहिती नाही. आणि त्यांचे कार्य तोलामोलाचेही असेल. पण विद्वान व तथाकथित विचारवंत यांची जनमानसात जी प्रतिमा आहे तिची झळ त्यांनाही पोहोचणे अपरिहार्य आहे. या ठिकाणी विचारवंत कोणत्या समाजात निर्माण होतात याचा विचार आवश्यक आहे. समाजातील

परिस्थितीबद्दल खंत वाटून अस्वस्थ झाल्यामुळे त्यावर उपाय शोधण्याच्या प्रयत्नातून वैचारिक प्रतिक्रिया सुरू होते. असा विचार देण्याची बौद्धिक क्षमता विद्वानात असेल तर विचारांचे नवे वारे समाजात सुरू होते. पण अशा तत्त्वचिंतनाची पडेल ती किंमत देऊन आपला विचार समाजासमोर मांडावयाची व त्याप्रमाणे कृती करण्याची तयारी असावयास पाहिजे. तशी नसेल तर त्याला असे धाडस दाखविण्यासाठी लोकाश्रय, अथवा धनिकांचा आश्रय याची तरी आवश्यकता असते. नवा विचार ग्रहण करण्याची क्षमता समाजास असेल तर त्यातून चळवळ उभी राहते. याची अनेक उदाहरणे देता येतील.

मध्ययुगातून अर्वाचीन युगात संक्रमण होत असताना नवा विचार देणारे बहुतेकजण संसाराचा पाश नसलेले धर्मगुरू होते. उदा. रॉजर बेकन, पेट्रार्क, बायक्लिफ, जॉन हुस, मार्टिन लूथर, इरॅस्मस इ. मार्टिन लूथरला सॅक्सनीच्या राजाचा आश्रय होता. फ्रॅन्सिस बेकन पहिल्या जेम्सच्या दरबारात होता. मार्क्सला इंग्लंडमध्ये आसरा व एंगल्सची आर्थिक मदत होत होती. तर फ्रेंच तत्त्वज्ञांना धनिकांचा आश्रय होता. महाराष्ट्रात काय दृश्य दिसते ? आत्मसंतुष्टता, वैचारिक गोंधळ आणि स्वमताचा पाठपुरावा न करता राजकीय पुढाऱ्यांचा अनुनय करणारे विचारवंत आणि विद्वान, अशी परिस्थिती आहे. पण याबद्दल विचारवंतांना, कोणतीही किंमत द्यावी न लागता आपले विचार मुक्तपणे मांडता येतील अशी परिस्थिती राज्यकर्त्यांनी निर्माण केली नाही हेही दृष्टीआड करता येणार नाही. दिशाहीन राज्यकर्त्यांनी विद्वान व विचारवंत यांना 'पाळण्याचा' नवा षोक सुरू केला व तेही त्याला बळी पडले.

या ठिकाणी आणखी दुसऱ्या घटकाची दखल घेणे आवश्यक आहे. भौगोलिक शोध लागल्यानंतर युरोपमध्ये श्रीमंत व्यापाऱ्यांचा वर्ग उदयाला आला व अर्थव्यवस्था वस्तुविनिमयाकडून (बार्टर) द्रव्यविनिमयात (मनी इकॉनॉमी) रूपांतरित होऊ लागली. सरंजामशाहीतील मानाची (ऑनर) कल्पना हळूहळू लुप्त होऊन तिची जागा किंमत (प्राइस) या संकल्पनेने घेतली. याचा सार्वजनिक जीवनावरही परिणाम झाला. सरंजामशाहीमध्ये दिलेले वचन पाळणे, दुर्बलांचे रक्षण, स्त्रीदाक्षिण्य आणि धर्मसंरक्षण हे जे गुण मानले जात होते त्याचे मूल्यमापन करणे अशक्य होते. त्याचप्रमाणे शौर्य, प्रामाणिकपणा, इ. गुणांचे मूल्यमापन अमुक एक एकर जमीन अशा परिमाणात करणेही शक्य नव्हते. पण नव्या जगातून मौल्यवान धातूंची आयात व व्यापारी मनोवृत्ती यामुळे यापुढे प्रत्येक सद्‌गुणांची किंमत करता येऊ लागली. 'प्रत्येक माणसाला किंमत असते' हे मॅकीआवलीचे वचन या काळातलचे. कारण मौल्यवान धातूमुळे भ्रष्टाचार सोपा झाला.

स्वातंत्र्यानंतर भारतात हीच परिस्थिती निर्माण झाली. १८३५ च्या कायद्यान्वये संबंध भारतात रुपया हे कायदेशीर चलन प्रस्थापित झाले व भारतीय अर्थव्यवस्था द्रव्यविनिमयाकडे वळू लागली. पण १९४७ पर्यंत भारतीयांचे लक्ष स्वातंत्र्य संपादनाकडेच असल्यामुळे नवीन अर्थव्यवहाराचे दुष्परिणाम विशेष जाणवले नाहीत. कारण स्वातंत्र्याकरिता कितीही त्याग केला तरी तो कमीच होता व त्याचे रुपये, आणे, पैत मोल करणे अशक्य

आहे असा दृढ विश्वास होता. पण स्वातंत्र्यानंतर हे सर्वच पालटले. कारण आर्थिक अभ्युदय हे प्रत्येकाचेच ध्येय बनले. त्यामुळे प्रत्येक कृतीचे मूल्यमापन पैशात करण्याची सवय लागली.

स्वातंत्र्यपूर्व कालात पुष्कळांनी वकिली सोडली त्यावेळी मासिक प्राप्ती किती बुडाली याचा विचार केला जात नव्हता. पण आज ज्यावेळी एखादा नामांकित वकील न्यायाधीश म्हणून नेमणूक स्वीकारतो त्यावेळी त्याचे नुकसान किती होते याचा सहजच हिशोब होतो. म्युनिसिपालिटी, इन्कमटॅक्स, सेलसटॅक्स येथील कर्मचारी जेव्हा सचोटीने काम करतो तेव्हा त्याची किंमत किती हे काढणे सोपे असते. अशा प्रकारे निस्पृहता, सचोटी, प्रामाणिकपणा, वैचारिक स्वातंत्र्य या सार्वजनिक नीतिमत्तेच्या प्रत्येक अविभाज्य घटकाची पैशात मोजदाद होऊ लागली. या प्रवृत्तीने सबंध समाजाला ग्रासले व त्यातून भ्रष्टाचाराचा संगम निर्माण झाला. त्यातून विचारवंतही सुटले नाहीत. रामशास्त्रींच्या निस्पृहतेचीदेखील किंमत होऊ शकेल अशा वातावरणात आता आपण राहात आहोत.

अशा वेळी ज्या विचारवंत विद्वानांनी समाजाचे नेतृत्व करायचे, सार्वजनिक नीतिमत्तेचे संवर्धन करायचे, अन्यायविरोधी प्रवृत्ती जोपासायच्या, सामाजिक दंभाबद्दल चीड निर्माण करावयाची, 'शापादपि शरादपि' वृत्तीने शासनाला खडे बोल सुनवायचे आणि 'सत्यासत्याशी मन केले ग्वाही' या निष्ठेने तेजस्वी कृती करायची तेच हातपाय गळून बसले व लाचारीचे प्रदर्शन करू लागले. विद्वान, विचारवंत आणि नैतिक मूल्ये मानणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांच्या प्रतिमेला तडा गेला तो १९५२ च्या निवडणुकीत वाताहात झालेल्या समाजवाद्यांच्या आणि एम. एन. रॉय यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पिलावळीत झालेल्या पळापळीने. ('तानाजी' किंवा 'भाऊसाहेब' पडल्यानंतर पळण्याची मराठ्यांची परंपराच आहे.) याची मुख्य कारणे म्हणजे ध्येयापेक्षा नेत्यावरील निष्ठा, धीम्या वृत्तीने काम करण्याच्या ईर्ष्येचा अभाव, इच्छित परिणामासाठी दीर्घकाल वाट पाहण्याची तयारी नसणे आणि वैचारिक गोंधळ. स्वातंत्र्यापूर्वी तुरुंगात जाणे, सुतकताई करणे, खादी वापरणे, इंग्रजांवर टिका करणे. इ. कृतींनी राजकीय कार्येकर्ते, किंवा राजकारणात नसल्यामुळे या सर्व गोष्टीकडे अपेक्षेने पाहणारे विद्वान, विचारवंत आपण आपआपली भूमिका चोख बजावत आहोत अशा समाधानात असत हे सर्व सुलभ होते कारण त्या समाधानात विधायक कार्याची आडकाठी नव्हती. पण त्यामुळेच स्वतंत्र भारतात आपली भूमिका काय याचा उलगडा त्यांना कधीच झाला नाही.

वेब दांपत्य, शॉ, वेल्स इ. विचारवंतानी कित्येक वर्षे समाजवादाचा प्रचार केला तेव्हा १९४६ साली इग्लंडमध्ये मजूरपक्षाला निवडणुकीत बहुमत मिळाले. 'एका वर्षात स्वातंत्र्य' या परंपरेत वाढलेल्या समाजवाद्यांना 'एका निवडणुकीत समाजवाद' आणण्याची घाई झाली होती आणि सत्ता हाती नसली तरी विधायक कार्य करता येते याची जाणीव नव्हती. त्यामुळे त्यांच्यातले बरेचजण काँग्रेसमध्ये गेले. तर काहीजण विरोधाकरता विरोध या भूमिकेवर आले. कारण स्वातंत्र्यलढ्यात ते एवढेच शिकले होते. साह-

जिकच विरोधी पक्ष तात्त्विक पायावर उभे करण्याऐवजी सरकारचे आणि ज्या घटकांचे हितसंबंध विरोधी आहेत. उदा. कामगार. त्यांच्यात शिरून त्यांचे भाडोत्री पुढारीपण करणे एवढाच उद्योग त्यांना राहिला. मध्ययुगात भाडोत्री सैनिकांची परंपरा होती ती येथल्या राजकारणात आली. तिचेच पर्यवसान आज कामगार जगातील 'सामंतशाहीत' झाले आहे. या भाडोत्री वृत्तीमुळे सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षांचेही नैतिक अवमूल्यन सुरू झाले. आणि ते अशा अवस्थेला पोचले आहे की, एस. एम. जोशी यांच्यासारखे आदरणीय पुढारीदेखील केवळ मतासाठी मुसलमानांच्या अवास्तव मागण्यांना गोंजारतात.

वैचारिक गोंधळात रॉयवादी पण सापडले. स्वातंत्र्यानंतर यांची भूमिका काय? रॉय यांना स्वतःलाच हा प्रश्न पडला होता. पण रॉय 'कर्त्याची' भूमिका बजावत होते तोपर्यंत रॉयवाद्यांचे कुटुंब अविभक्त राहिले. पण या ज्ञानसूर्याचा अस्त झाल्यानंतर त्याची किरणेही लुप्त झाली. रॉय यांच्या हयातीत काँग्रेसच्या धोरणावर आसूड ओढणारे, काँग्रेसचे धोरण असेच चालू राहिले तर भारत द्विखंडच काय शतखंड होईल असे बजावणारे व शंकरराव मोरे यांना भर सभेत त्यांच्या तोंडावर ते नेहरूंच्या मागे चुकीच्या मार्गाने गेले म्हणून कानपिचक्या देणारे त. लक्ष्मणशास्त्री जोशी हे एक दिवस काँग्रेसच्या तंबूत सोवळेभांडे टाकते झाले. आमच्या श्रद्धेला एक तडा गेला. लक्ष्मणशास्त्रींचा द्रविड यांच्याबरोबरचा वादविवाद ऐकून भारताचार्य चिं. वि. वैद्य यांनी ज्यांना 'लक्ष्मणशास्त्री महाराष्ट्र' म्हणून गौरविले, काशीच्या पंडितांशी वाद करण्यास ज्यांना गांधीजींनी बोलाविले तो प्रकांड पंडित, गांधी, राजगोपालाचारी, रॉय यांच्या प्रभावळीत दिमाखाने फिरणारा विचारवंत, ज्याने आपले पूर्वायुष्य स्वातंत्र्यासाठी झगडण्यात घालवले, लोकविरोध सहन करून महायुद्धात इंग्रजाशी सहकार्य करण्याची भूमिका घेतली, नवीन विचार फुलविण्याचे सामर्थ्य ज्यांच्या हातात होते, त्यांनी यशवंतरावांसारख्या त्यांच्या तुलनेत सर्वच दृष्टीने खुज्या असलेल्या माणसांच्या छायेत वावरण्यात धन्यता मानली.

१९५०–५२ च्या सुमारास वाईला मुक्काम असता त्याबद्दल एक सुरस कथा ऐकली. त्यांच्या मुलालाही त्यांच्या काँग्रेस प्रवेशाने धक्का बसला होता, तेव्हा त्याने 'तुम्ही काय करीत आहात' असे विचारले. त्यावर 'हे सर्व तुमच्यासाठीच' असा त्यांनी जबाब दिला. गोष्ट खरी खोटी माहीत नाही. पण बहुधा खरी असावी. कारण १९८१ च्या ललितच्या दिवाळी अंकात लिहिलेल्या लेखात १९६० पर्यंत 'उद्या काय' असा प्रश्न सतत त्यांच्यासमोर असल्याचे लिहिले आहे. तेथपासून त्यांचा ऐहिक अभ्युदय सुरू झाला, त्याला थोडीशी खीळ बसली ती अंतुले सरकारच्या कारकीर्दीत.

अर्थात ही शोकांतिका शास्त्रीबुवांची नव्हे. तर त्यांनी आपले विचारधन मुक्तपणे उधळावे यासाठी अनुकूल परिस्थिती महाराष्ट्रात नव्हती त्या महाराष्ट्राची शोकांतिका आहे. शास्त्रीबुवा संसारी माणसासारखे वागले. आणि संसाराची बेडी असली आणि चरितार्थाचे अन्य साधन नसले की, त्याबाबतीत कोणताही विचारवंत हळवा बनला तर

त्याला कितपत दोष द्यावा हाही प्रश्नच आहे. प्रबोधनकालातील युरोपमध्ये बहुतेक विचारवंत धर्मगुरू होते आणि संसाराची बेडी त्यांच्या पायात नव्हती हा निव्वळ योगायोग नव्हे.

मध्यंतरी 'सोबत'च्या एका लेखात, कराडच्या संमेलनात शास्त्रीबुवांनी तेजस्वी भाषण केले पण त्याला विशेष प्रसिद्धी मिळाली नाही म्हणून खंत व्यक्त केली होती. यात मुख्य प्रश्न कुणाचे भाषण जास्त तेजस्वी हा नाही तर परिणामांची क्षिती न बाळगता आपली बरोबर किंवा चुकीची मते मांडण्याचे मनोधैर्य कुणाजवळ आहे हा आहे. दुर्गाबाई भागवतांनी ते दाखविले आणि मध्यंतरी सोबतच्या अंकात आलेल्या आमदारांवरील टीकेच्या बाबतीत बेहेरे यांनी दाखविले. पण अशी किती विद्वान आणि विचारवंत मंडळी आहेत ? दुसरे आमचे श्रद्धास्थान म्हणजे प्रा. गोवर्धन पारीख. पण त्यांची मुंबई विद्यापीठाच्या रेक्टरपदी कशी नेमणूक झाली हे उघड गुपीत आहे. त्याची भरपाई म्हणून विद्यापीठातील प्रोफेसरची जागा भरताना ज्या व्यक्तीला डावलून ते रेक्टर बनले त्यांची सोय करण्यासाठी परदेशातील विद्यापीठाची पदवी एवढीच पात्रता ठेवण्यात आली. पारीख-लवंदे प्रकरणात विद्यापीठाचे रजिस्ट्रार चिदंबरन् यांच्यावर लवंदे यांनी काही आरोप केले होते. त्यावेळी रजिस्ट्रारना लवंदे यांच्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद लावण्याचा सल्ला देण्याऐवजी प्रा. लवंदे यांची कशी ससेहोलपट त्यांनी केली याचा इतिहास त्यांनी स्वतःच विद्यापीठातर्फे प्रकाशित केलेल्या चोपड्यात दिला आहे. प्र. बा. गजेंद्रगडकर यांच्यावर श्री. गुर्जर यांनी महाराष्ट्र टाईम्समध्ये एक लेख लिहून 'ग्रेस मार्क' देण्याच्या बाबतीत निश्चित स्वरूपाचे आरोप केले होते. पण त्याची दखल घेतली गेली नाही.

न. र. फाटक हे आणखी एक विद्वान-कुणाचाही मुलाहिजा न ठेवणारे. १८५७ च्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या वेळीच 'शिपाई गर्दी' लिहून लोकांची नाराजी ओढवून घेण्याची हिंमत असणारे पण आठवी, नववी आणि दहावीच्या पुष्कळ विपर्यस्त विधाने असलेल्या इतिहासाच्या क्रमिक पुस्तकांच्या लेखक मंडळावर त्यांचे नाव होते. याची गल्लत धोंगडे यांच्या 'भूगोल प्रकरणाशी' करू नये. कारण धोंगडे पुस्तकाचे लेखक नव्हते. नंतर म. म. पोतदार 'पुण्याचे तेजस्वी ब्राह्मण' शिवचरित्रासाठी शासनाकडून दहा हजार रुपये घेऊन न लिहिणारे. स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीशो, जनतेशी व सरकारशी प्रतारणा करणारे. यांच्या मृत्यूनंतर एका सुप्रसिद्ध लेखकाने डोके ठेवण्यासाठी पाय उरले नाहीत म्हणून टाहो फोडला. सेनापती बापटांच्या मृत्यूनंतर त्यांनी हीच भाषा वापरली होती. त्यावेळी वाटले आमच्या भावना किती सुदरपणे व्यक्त केल्या. आता वाटते की, सकाळच्या वेळी 'शुभप्रभात' म्हणतात त्याप्रमाणे वयाने वडील व्यक्ती मृत्यू पावली म्हणजे वापरायचा हा वाक्यप्रचार आहे. पु. लं. च्या शब्दांत विचारता येईल की, 'यातले खरे कोणते आणि नाटक कोणते ?' पु. लं. नी मध्यंतरी ज्योतिबा फुले यांच्यावर लेख लिहून 'फक्त नामस्मरण करू नका, आचरण करा' असा संदेश दिला. माझी खात्री आहे की, त्यांनी एखादा तरी दलित मुलगा सांभाळला असेल. फक्त 'दिनेश'चे जसे व्यक्तिचित्र

रंगवले आहे तसे त्या मुलाचे केव्हा येणार याची मी उत्सुकतेने वाट पाहात आहे.

विश्वकोश म्हणजे महाराष्ट्रातील विद्वता एकत्र आणण्याचे प्रचंड कार्य. पण त. जोशी व दि. के. बेडेकर यांचा वाद वर्तमानपत्रातून गाजला. विश्वकोश हे दोघांच्याही घरचे कार्य नव्हते. मग इतर विद्वानांनी या वादामध्ये मध्यस्थी करून कोण बरोबर, कोण चूक हे ठरवून त्याप्रमाणे सरकारवर दडपण आणून वाद मिटवायला नको होता का ? पण हे झाले नाही. कारणे दोन. पहिले म्हणजे अशा कुस्त्या रिंगणाबाहेरूनच पाहण्याची आपल्याला सवय लागली आहे आणि महाराष्ट्राचे हे कार्य आहे याची जाणीव नव्हती किंवा तत्त्वनिष्ठा श्रेष्ठ मानून कुणाचीही कुणालाच दुखवायची तयारी नव्हती. दुसरे म्हणजे विद्वानांना भाड्याने घेणे हे राज्यसरकारचे तत्त्व ' राज्य साहित्य संस्कृती ' मंडळाने पुढे चालवले व आपले नाव सार्थ केले. म्हणजे राज्याची साहित्यिकांबद्दलची जी संस्कृती आहे ती पुढे चालविली व प्रमुखांच्या आश्रयाने जे राहतील त्यांनाच विद्वान म्हणून आमंत्रित करण्याचे धोरण ठेवले. त्यात पुष्कळ विद्वान प्रामाणिक होते. पण असेही काही होते की, कित्येक वर्षे नियमाने तेथे जाऊन काहीही काम केले नाही. या सर्व गोष्टी जनतेला माहीत होतात व त्यांचा परिणाम एकंदर विद्वत्तेच्याच अवमूल्यनात होतो.

महाराष्ट्र टाइम्सने पं. महादेवशास्त्री जोशी, प्राचार्य पुरोहित प्रभृतींवर कडक टीका केली होती. पण वस्तुस्थिती अशी आहे की, लक्ष्मणशास्त्री जोशी, पारीख, पोतदार, फाटक आदि मंडळींनी जी पायवाट मळली तिचा आता राजमार्ग झाला आहे. व त्यावर टोपे, गजेंद्रगडकर यांसारखी मंडळीही दिसली. जिथे दिग्गज रांगले तिथे महादेवशास्त्री जोशी यांच्यासारख्या कुणाच्या अध्यात मध्यात नसलेल्या व्यासंगी माणसाला जर कोणी बोट धरून नेले किंवा पुरोहितांसारखा अखेर सरकारी नोकर असलेला साहित्यिक आढळला तर त्यांना झोडपण्यात काय अर्थ आहे. पण त्यांना झोडपणे सोपे आहे. कारण ते आपल्या गटात नाहीत व त्यांच्या हाती वर्तमानपत्र नाही. मध्यंतरी तळवलकरांनी ' तर्कतीर्थांच्या मांडीला मांडी लावून बसण्याची ज्यांची लायकी नाही ' असा शब्दप्रयोग केला होता. मला या संबंधात एवढेच म्हणायचे आहे की, शास्त्रीबुवा भलत्या ' कंपनीत ' का गेले हे त्यांनाच विचारायला हवे होते. म्हणजे या लोकांनी त्यांच्या मांडीला मांडी लावलीच नसती. यावर खूप लिहिण्यासारखे आहे पण विस्तारभयास्तव टाळतो. आजच्या विद्वान विचारवंतांचे वर्णन वामन पंडिताने भाषांतर केलेल्या भर्तृहरीच्या श्लोकातच देणे सोपे पडेल.

योजी हिताप्रति निवारुनी पापकर्मे ।
वर्णी बरेच गुण, झाकुनिया कुकर्मे ॥
जे आपणास असता व्यसनी त्यजीना ॥
सन्मित्र लक्षण असे वदतात जाणा ॥

आज अशी सन्मित्र होण्याची साथ पसरली आहे, आणि त्याची लागण समस्त विद्वान, विचारवंत, संपादक यांच्यापर्यंत पसरली आहे. कोणी मंत्र्याचा तर कोणी साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षांचा सन्मित्र असतो. कुणातरी समर्थाच्या आश्रयाने राहून त्याची स्तुती

करणे हे तमोयुगाचे आणखी एक लक्षण दृग्गोचर होते. वैचारिक दास्यांतून मुक्तता हे प्रबोधनकालाचे लक्षण त्याच्याच बरोबरीने लुप्त होत असल्याचेही आढळते.

पाश्चात्य विचारवंतांचे दास्य ही आज महाराष्ट्राची किंवा भारताचीच शोकांतिका आहे. स्वातंत्र्य मिळाले त्या रात्री भाषण करताना नेहरूंनी हा 'नियतीचा संकेत आहे' असे काव्यमय उद्‌गार काढले होते. नियती त्यावेळी हसली असेल. कारण त्या वेळी वाटले नव्हते की, हा संकेत राजकीय व्यभिचार आणि बौद्धिक दास्याशी ठरणार होता. आज स्वातंत्र्य मिळवून चाळीस वर्षांहून अधिक काल लोटला असला तरी आपण अजूनही स्वतंत्र झालो आहोत असे वाटत नाही. कारण स्वातंत्र्य म्हणजे नुसते स्वराज्यच नव्हे तर बौद्धिक, मानसिक, सांस्कृतिक स्वातंत्र्यही. भारतीय संस्कृतीचा नैसर्गिक विकास व भारतीयांचे बौद्धिक दास्य संपणे म्हणजेच खरे स्वातंत्र्य, पण आजच्या जीवनाचे सारे वर्णन दोन शब्दात करता येईल 'इंपोर्टेड' आणि 'एक्स्पोर्ट क्वालिटी.' जीवनाच्या विविध अंगावर यांचा प्रभाव कसा पडला आहे हे पाहणे मनोरंजक आहे. पण येथे ते असंबद्ध होईल. कारण वैचारिक जीवन कसे 'इंपोर्टेड' आहे याचाच फक्त थोडक्यात परीमर्श घेणार आहे

जीवनाच्या सर्वच अंगाना आज राजकारण व अर्थनीती स्पर्श करतात तेव्हा त्यापासूनच सुरुवात करणे इष्ट होईल. राज्यशास्त्रात प्लेटोपासून ते तहत मार्क्स, लास्की यांचे विचार शिकवले जातात. त्यांच्या विचारातील उणीवांवर चर्चा केली जाते. थोडेसे 'प्राचीन भारतीय राजकीय विचारही' शिकवले जाते. दोन्हीवर लेख लिहिले जातात. संसदीय आणि अध्यक्षीय लोकशाही यावर वाद खेळले जातात. यात वावगेही काही नाही. पण या विचारवंतांचा मागोवा घेत भारतीय राजकारणावर लिहिले जाते त्यावर इंग्रजी प्रथांच्या गुलामगिरीचे दाट सावट पडलेले आढळते. उदा. ज्यावेळी कोणत्याही पक्षाला विधिमंडळात निर्विवाद बहुमत नसते त्यावेळी सर्वांत मोठ्या पक्षाला पाच वर्षे राज्य करण्याचा अधिकार असावा व नवीन अर्थसंकल्प मान्य होईपर्यंत जुनी करपद्धतीच चालू राहावी हा जपानने वापरलेला पर्याय अध्यक्षीय की संसदीय या चर्चेत, कोणालाच विचारात घ्यावासा वाटत नाही.

प्रत्येक देशातील राजकीय संस्था विशिष्ट गरजेपोटी निर्माण झालेल्या असतात, व त्या जसजशा जुन्या होत जातात तसतसे त्यांच्यात क्रांतीच्या अथवा उत्क्रांतीच्या मार्गाने बदल होत जातात. त्यांच्या अनुषंगाने जी तत्त्वप्रणाली मांडली जाते तिचा विचार राज्यशास्त्रात होतो. एका दृष्टीने राज्यशास्त्र हे इतिहासाप्रमाणेच वेगवेगळ्या देशात वेगवेगळे असावयास पाहिजे. एका देशातील प्रथा दुसऱ्या देशात तशाच्या तशाच वापरणे अत्यंत धोक्याचे असते. इंग्रजी राज्यघटनेचे माँटेस्क्यूने जे विश्लेषण केले होते त्याबरहुकूम बेतलेल्या, फ्रेंच राज्यक्रांतीच्या कालातील १७९१ च्या फ्रान्सच्या राज्यघटनेने फ्रान्सचे अहितच जास्त केले. इंग्लडमध्ये संसदीय राज्यपद्धती अस्तित्वात आली तिच्यामागे काही इतिहास आहे व त्या इतिहासाच्या अनुषंगाने हॉब्स, लॉक, बेन्थॅम, मिल, लास्की, बार्कर हे विचारसरणी मांडतात. हे करीत असताना ग्रीक व रोमन संस्कृतीचा प्रभाव, ट्यूटॉनिक टोळ्यांच्या चालीरीती आणि ज्या स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या चिवटपणामुळे इंग्लंडमध्ये लोकशाही दृढमूल

झाली त्यांचा अभ्यास करणेही अनिवार्य होते.

या सर्व विकासाचा शोध घेऊन, त्याचप्रमाणे इतर देशातील राजकीय संस्थांचा इतिहास तपासून त्यांची सांगड भारतातील परिस्थितीशी घालून भारतीय राज्यशास्त्र का काही निर्माण होत नाही ? किंवा असेही म्हणता येईल की, भारतीय आणि पाश्चात्य राजकीय विचार हे समांतर पद्धतीने शिकविण्याऐवजी दोन्ही एकात्म (इंटिग्रेटेड) पद्धतीने शिकवता येतील का, याचा विचार कां होत नाही ? लोकशाहीची यत्किंचितही जाण नसलेल्या लोकांवर इंग्रजांनी हळूहळू त्यांच्या संस्थांचे आरोपण केले व राष्ट्रीय पुढाऱ्यांची तीच मागणी होती. यातून एक विसंवाद निर्माण झाला व त्याची फळे आपण आजही भोगत आहोत. जे राज्यशास्त्र शिकविले जाते, किंवा त्याच्यावर जे लेख लिहिले जातात किंवा मार्क्सवाद श्रेष्ठ की लोकशाही श्रेष्ठ तयार जे वाद खेळले जातात त्यात यांची कुठे जाणीव दिसते का ? मार्क्स कुठे चुकला यावर पां. वा. गाडगीळ, किंवा कम्युनिस्ट राष्ट्रातही कशी पिळवणूक होते यावर प्रा. रामजोशी विद्वत्ताप्रचुर लेख लिहितात पण भारतात लोकशाही का घसरली याचे मूलगामी विवेचन करून भारतीय राज्यशास्त्राची संकल्पना मांडणे शक्य आहे का असा विचार त्यांना सुचत नाही. उलट ही कल्पना राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना हास्यास्पदच वाटेल.

राज्यशास्त्रावर जे साधारण लिखाण आढळते ते सत्तेचे विकेंद्रीकरण, शासन आणि विधिमंडळ, शासन आणि लोकनियुक्त संस्था यांचे परस्परसंबंध, त्रिस्तरीय पद्धती आणि शेवटी ठिगळासारखे जोडलेले भारतीय लोकशाहीमधील उणीवांचे विवेचन या भोवतीच फिरक्या घेत असते. कारण इंग्लंडचा सबंध इतिहास हा संसद, शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील सत्तावाटपसंबंधीच आहे. वास्तविक लोकशाही आपण स्वीकारली तीं तळागाळातल्या माणसाची गाऱ्हाणी दूर व्हावी म्हणून. हे ध्येय साध्य होण्यासाठी भारतात ज्या लोकशाही संस्था आहेत त्यांत कोणते बदल घडवून आणावे लागतील यांचा विचार कुठे आढळत नाही.

याचे कारण म्हणजे सत्तेचें विकेंद्रीकरण आणि प्रौढ मतदान म्हणजेच लोकशाही असे आपण गृहीतच धरले आहे व त्याच्या तुरुंगातून आमचे विचारवंत बाहेर पडू शकत नाहीत. निवडून येण्यासाठी अथवा मतदानासाठी शिक्षणाची अट ही कल्पनाच त्यांना सहन होणार नाही. सत्तेचे वाटप ज्याप्रमाणे कायद्यात होते त्याचप्रमाणे जबाबदारीचे वाटपही कायद्यानेच व्हावयास पाहिजे व जबाबदारी न पाळणे अथवा कर्तव्यच्युती हा गुन्हा व्हावयास पाहिजे. भारतीय विचार फक्त कर्तव्य मानतो. पाश्चात्य विचार फक्त हक्काचाच विचार करतो. या दोहोंमधला मार्ग शोधून भारतीय विचारवत जोपर्यंत लोकशाहीच्या प्रश्नाकडे नव्या दृष्टीने बघणार नाहीत तोपर्यंत भारतीय लोकशाही अडाणीच राहणार, व स्वार्थी लोक तिचा उपयोग भ्रष्टाचारासाठीच करणार.

अर्थशास्त्राच्या बाबतीत परिस्थिती थोडी वेगळी आहे. राज्यशास्त्रामध्ये ज्याप्रमाणे भारताचे राजकीय प्रश्न काय आहेत याबाबतीत जवळ जवळ अंधार आहे, तसे येथे होत

नाही. त्याचे श्रय दादाभाई नवरोजी, रानडे, रमेशचंद्र दत्त इत्यादींच्याकडें जाते. दादाभाईनी 'भारतीय अर्थशास्त्र' अशी अत्यंत अन्वर्थक संज्ञा वापरली होती. पुढे मर्चंट आणि वाडिया यांनी ती मुंबई विद्यापीठात बदलून घेऊन भारताचे आर्थिक प्रश्न अशी केली. त्यांचा दावा असा की, अर्थशास्त्र भारतासाठी वेगळे असू शकत नाही. अर्थशास्त्राचे नियम सगळीकडे तेच असतात. यांचे 'इंगित' उघड आहे. पूर्वी इंग्रजी अर्थनीतीचे विश्लेषण भारतीय दृष्टिकोनातून होत असे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वदेशी अर्थनीतीचे विश्लेषण पाश्चात्य दृष्टिकोनातून होऊ लागले.

राज्यशास्त्रापेक्षा अर्थशास्त्रात थोडा वेगळा प्रकार आढळतो. म्हणजे भारताचे आर्थिक प्रश्न काय आहेत याची जाणीव भारतीय अर्थशास्त्रज्ञांना आहे. पण प्रत्यक्ष परिस्थिती-बद्दल मात्र अज्ञान आहे. उदा. महाराष्ट्रातील शेतकरी हा शेतीतील गुंतवणूक व त्यापासून मिळणारे उत्पन्न यांचा संबंध कधीच जोडत नाही. तो फक्त अधिकाधिक जमीन मिळ-विण्याच्या मागे आहे. ही गोष्ट लक्षात घेतली जात नाही. भांडवलदारांचे अर्थशास्त्र कमीत कमी किंमतीत जास्तीत जास्त माल खपवण्यापेक्षा कृत्रिम तुटवडा निर्माण करून नफा जास्त मिळविणे हे आहे. जसजशी उत्पादनशक्ती वाढत जाईल तसतसे कामाचे तास कमी करणे हा उपाय त्यांना सुचत नाही. उदा. गिरण्यातील पाळ्या तीनऐवजी चार करणे.

मध्यंतरी प्रा. स. ह.. देशपांडे यांनी आदिवासी लोकांना आकडे मोजण्याची पद्धत माहीत नसल्यामुळे त्यांना आपला जास्तीत जास्त फायदा कसा करून घ्यावा हे समजत नाही असा विचार मांडला होता. यावर जो वाद झाला त्यात प्रा. देशपांडे यांच्या टीका-कारांनी पाश्चात्य अर्थतज्ज्ञांना वेठीला धरून त्यांचा दृष्टिकोन कसा चुकीचा आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. या वादात वस्तुस्थिती काय आहे हा प्रश्न होता. पण पडताळून न पाहता एक निष्कारण वाद कागदावर झाला. प्रत्यक्ष परिस्थितीची जाणीव विद्यार्थ्याला करून देण्यापेक्षा पाश्चात्य अर्थतज्ज्ञांनी तेथील परिस्थितीच्या अनुभवातून जे निष्कर्ष काढले आहेत त्यांचा वापर करून भारतीय अर्थव्यवस्थेचे सैद्धांतिक विश्लेषण केले जाते. मध्ययुगात ॲरिस्टॉटलला प्रमाण मानले जात होते. आज भारतात पाश्चात्य विद्वानांचे पाश्चात्य ज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग भारतातील परिस्थितीला अनु-कूल अशा तऱ्हेने करण्यास आपले विद्वान केव्हा शिकणार ? रॉजर बेकन म्हणत असे की त्याच्या हातात असते तर ॲरिस्टॉटलची सर्व लॅटीन भाषांतरे त्याने जाळून टाकली असती. एवढ्या टोकाला जाण्याची जरुरी नाही. पण बेकनने ज्याप्रमाणे ॲरिस्टॉटलच्या वैचारिक गुलमगिरीचे जू मानेवरून फेकून दिले त्याप्रमाणे पाश्चात्य विचारवंताचे दास्य आपण कधी झुगारणार ?

स्वतंत्र भारतातील न्यायपद्धती ही संपूर्णपणे इंग्रजीच आहे. सतराव्या शतकात ज्या काही राजकीय घडामोडींमुळे दीर्घसूत्री न्यायपद्धती अमलात आली तिचे ओझे भारतीय न्यायपंडित आपल्या खांद्यावर मोठ्या अभिमानाने बाळगीत आहेत. आपल्या न्यायालयाचे काम सत्यसंशोधन नसून न्याय देणे हे आहे. म्हणजे समोर आलेल्या पुराव्यावरून कोणत्या

बाजूला तराजू झुकतो आहे एवढेच पाहणे. व्यावसायिक नीती हीही पाश्चात्यच आहे. ज्या ताईमहाराज खटल्याने टिळकांचे आयुष्य कित्येक वर्षांनी कमी झाले त्या खटल्यात यांच्या विरुद्धचे वकीलपत्र बॅ. जयकरांनी घेतले होते व निकाल टिळकांच्या विरुद्ध लागला हे त्यांनी अभिमानाने आपल्या आत्मचरित्रात नमूद केले आहे. याउलट गांधी खून खटल्यात सावरकरांचे वकीलपत्र घेण्यास त्यांनी नकार दिल्याचे स्मरते. या दोन्ही प्रकरणात जयकरांना दोष देता येणार नाही कारण त्यांचे वर्तन व्यावसायिक नीतीच्या दृष्टीने योग्यच होते पण ते अशा समाजात राहात होते की, नैतिकमूल्ये व व्यावसायिक नीती यात संघर्ष आला तर व्यावसायिक नीती पाळणे आवश्यक असते. ही नीती आपण इंग्रजांकडून घेतली.

गांधीजींनी वकिली व्यवसायात नैतिक मूल्यांना प्राधान्य दिले, याचाच अर्थ त्यांना न्यायपद्धतीचे मानवीकरण करणे अगत्याचे वाटत होते. पण आपण अजूनही या क्षेत्रात इंग्रजांचेच वैचारिक दास्य मनोभावे करीत आहोत. नानी पालखीवाला हे इंदिरा गांधींच्या राज्य करण्याच्या पद्धतीचे कट्टर विरोधक पण त्यांची निवड हायकोर्टाने अवैध ठरवली तेव्हा पालखीवाला यांनीच त्यांचे वकीलपत्र घेतले होते. अशी अनेक उदाहरणे देता येतील. यात मौजेचा प्रकार असा आहे की, ज्या इंग्रजी पद्धतीचे दास्य आपण स्वीकारले आहे तिचा इतिहास मात्र आपण ज्या प्रथा पाळतो तिच्याविरुद्ध आहे इंग्लंडमध्ये साधारण तेराव्या शतकाच्या अखेरीस ' कॉमन लॉ ' ताठर (रिजिड) बनला. त्यामुळे पुष्कळ वेळा कायद्यानेच अन्याय होऊ लागला. तेव्हा अशा प्रकरणात सदसद्विवेकबुद्धीला स्मरून न्याय देण्याची पद्धत सुरू झाली. व ' कॉमन लॉ ' मुळे होणारा अन्याय टाळणे शक्य झाले. यालाच ' इक्विटी ' म्हणतात.

ही पद्धती जवळजवळ एकोणीसाव्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. पण एल्डन या कर्मठ न्यायाधीशाने ' इक्विटी ' ला आपल्या एका निकालपत्राने पुन्हा ताठरपणा आणला. इंग्रजी कायद्याचा विकास होत असताना सदसद्विवेक बुद्धीला प्राधान्य देण्यात येऊन अन्याय टाळण्यात येत असे. स्वतंत्र भारतात हे का होऊ नये, कारण सदसद्विवेकबुद्धी अखेर नैतिक मूल्यांचाच आविष्कार आहे.

सदसद्विवेकबुद्धीला स्मरून न्याय देण्याच्या पद्धतीबद्दल सेल्डन उपरोधाने म्हणत असे की " सदसद्विवेकबुद्धी ही प्रत्येक चॅन्सेलरच्या पायाच्या मापाप्रमाणे बदलत असते " त्याच्या म्हणण्याचा भावार्थ असा की, प्रत्येक न्यायाधीश आपल्या बुद्धीप्रमाणे न्याय करू लागला तर तो मनःपूत न्याय देईल आणि त्यातून अन्याय होण्याचीच शक्यता जास्त. पण कालांतराने त्या न्यायशाखेत पद्धत आली. आणि ती एक गरज बनली. त्यामुळेच पहिल्या चार्ल्सच्या कारकीर्दीत राजाच्या अनेक न्यायाधिकारांना पायबंद घालण्यात आला. तथापि इक्विटीला हात लावण्यात आला नाही. साधारण पंधराव्या शतकापर्यंत मालमत्ता मुख्यत्वेकरून जमिनीच्या स्वरूपात असे. पण त्यानंतर झालेल्या आर्थिक प्रगतीमूळे जमिनीखेरीज इतर स्वरूपातही मालमत्ता अस्तित्वात आली. आणि समाजरचना अधिक जटिल

होऊ लागली. संक्रमणावस्थेत असलेल्या समाजाला लवचिक कायद्याची जरूर असते. अशा परिस्थितीत विकसनशील इंग्लंडची गरज इक्विटीने भागविली. सामान्य माणसाच्या दृष्टीने तीन कायदे महत्त्वाचे असतात. कराराविषयक (कॉन्ट्रॅक्ट), मालमत्ता हस्तांतर (ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी) आणि व्यापारविषयक ( मर्चन्ट लॉ) या तीनही कायद्याच्या शाखांमध्ये समाजहिताच्या दृष्टीने योग्य ते फेरफार करून इक्विटीने काळाची एक फार मोठी गरज भागवली. आज आपलाही समाज संक्रमणावस्थेत आहे. अशावेळी उच्च न्यायालयांना असा अधिकार असावा काय याबद्दल साधी चर्चादेखील होत नाही. कारण ? इंग्लंडमधे गेल्या शतकातच एल्डनने यावर निर्णय घेतला नाही काय ?

फौजदारी कायद्याच्या बाबतीतही हीच दुरवस्था आढळते. इंग्रजी कायद्यातील "कोणवरही त्यांच्या इच्छेशिवाय स्वतःविरुद्ध साक्ष देण्याची सक्ती करता येणार नाही" हे तत्त्व आता आपल्या घटनेत समाविष्ट करण्यात आले आहे. दिवाणी न्यायालयात या तत्त्वाचा जाच होत नाही. कारण एखाद्याने साक्ष देण्याचे नाकारले तर न्यायाधीश त्याच्याविरुद्ध प्रतिकूल अनुमान काढू शकतो. फौजदारी कायद्यात मात्र हा अधिकार न्यायाधिशाला नाही. या तत्त्वाचा उगम काय आहे हे पाहाणे बोधप्रद ठरेल. इंग्लंडमधे सोळावे शतक हे धार्मिक असहिष्णुतेचे. त्यावेळी प्रस्थापित धर्माविरुद्ध ज्यांचा कल आहे, त्यांची छळणूक करण्याकरिता 'ओथ–एक्स–ऑफिशिओ' हा प्रकार सुरू करण्यात आला. आरोपीला धर्मविषयक आडवेतिडवे प्रश्न विचारून पाखंडी ठरविण्यात येत असे व शिक्षा दिली जाई. याचा इतका अतिरेक झाला की, त्याविरुद्ध प्रचंड असंतोष निर्माण होऊन शेवटी वर उद्धृत केलेले तत्त्व इंग्लंडच्या कायद्यात स्वीकारण्यात आले. आता धर्मरहस्य प्रत्येकालाच माहीत असेल असे नाही. तेव्हा त्याबाबतीत प्रश्न विचारून गुन्हा सिद्ध करणे आणि शिक्षा देणे केव्हाही गैर. पण गुन्हेगाराच्या बाबतीत हा युक्तिवाद करता येणार नाही त्याला आपण केलेल्या गुन्ह्याची संपूर्ण माहिती असते. तेव्हा त्याला शपथ देऊन साक्षीदार म्हणून बोलविण्यात काय गैर आहे ?

याच्याच बरोबरीने दुसरीही एक घटना घडत होती. सतराव्या शतकात इंग्रजी राज्यघटनेचा तोल सार्वजनिक हितसंबंधाच्या विरोधात खाजगी हितसंबंध रक्षण करण्याच्या दिशेने ढळला. सार्वजनिक हितसंबंध आणि वैयक्तिक हितसंबंध यात संघर्ष आला तर वैयक्तिक हितसंबंधाला प्राधान्य देण्यात येऊ लागले. व यानंतर इंग्रजी कायद्याची वाढ व्यक्तीला संरक्षण देण्याच्या दिशेनेच झाली. याचा परिणाम गुन्हेगारांनाही जास्तीत जास्त संरक्षण मिळण्यात झाला. त्यातून 'प्रत्येक आरोपी आरोप सिद्ध होईपर्यन्त निर्दोषी आहे' आणि 'हजार गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एकाद्या निरपराध व्यक्तीला शासन होता कामा नये' अशी आक्षेप घेता येणार नाहीत, अशी दोन तत्त्वे विकसित झाली. इंग्रजी कायद्याचे आणखी एक तत्त्व म्हणजे न्यायाची संकल्पना. न्यायाधीशांचे कर्तव्य सत्यशोधन नसून आरोपीविरुद्ध सबळ पुरावा आहे की, नाही एवढेच पाहण्याचे. त्यामुळे न्याय आणि सत्य यात अंतराय निर्माण झाला. न्यायदेवता आंधळी आहे, त्यामुळे तिला सत्य

दिसत नाही. हातातील न्यायाच्या तराजूचे कोणते पारडे जड आहे एवढेच फक्त तिला समजते, अशी इंग्लंडमधील कायद्याची स्थिती आहे. ही हास्यास्पद संकल्पना आपण जशीच्या तशी उचलली आहे. कोणताही सारासार विचार न करता. आपली परंपरा खरी वेगळी आहे. कौटिल्याने अर्थशास्त्रात कंटकशोधन न्यायालयांचा उल्लेख केला आहे. गुन्हेगारांना शोधून काढून त्यांचा नि:पात करणे हे त्यांचे कर्तव्य होते. म्हणजे न्यायपद्धती सत्यशोधनावर आधारलेली होती. या संबंधात मी काही प्रश्न उपस्थित करणार आहे, त्याची न्यायपंडितांनी दखल घ्यावी अशी इच्छा आहे. पहिला म्हणजे इंग्लंडमध्ये ज्या ऐतिहासिक कारणामुळे स्वत:विरुद्ध साक्ष देण्यासंबंधी तत्त्व अमलात आले ते सनातन मानवी मूल्य आहे का ? आरोपीने पोलीस कस्टडीत जो जावजबाव दिला असेल तो एक-वेळ विचारात घेऊ नये. पण आरोपीला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे करून प्रश्न विचारले तर त्याच्यावर काय अन्याय होणार आहे ? आरोप सिद्ध होईपर्यंत आरोपीला निर्दोष समजावे, पण सत्यशोधनासाठी सरकारशी सहकार्य करण्याची त्याच्यावर कायदेशीर जबाबदारी टाकली तर काय नुकसान होईल ? न्यायालयांचे कर्तव्य निव्वळ न्याय देणे नसून सत्यशोधन आहे व त्यासाठी त्यांना सर्व अधिकार असतील असे तत्त्व न्यायपद्धतीत आणले तर त्याचा परिणाम विपरीत होईल का ? कोणाही निरपराध माणसाला शिक्षा होता कामा नये हे तत्त्व अत्युत्तम. पण म्हणून खऱ्या गुन्हेगारालाही तो निरपराध ठरावा म्हणून सर्व सवलती आणि पोलिसांच्या मार्गात शक्य तितके सर्व अडथळे उभे करावयाचे हे न्यायदान की, त्याचा विपर्यास ? आज फौजदारी न्यायालयांचे काम पाहिले तर सर-कारी वकील आणि बचावाचे वकील यांच्यातील 'खेळाचे' स्वरूप त्याला आलेले दिसते, हे स्पृहणीय आहे का ? शेवटी सत्यशोधन ही सरकारी वकील, बचावाचा वकील व न्यायाधीश यांची कायद्याने संयुक्त जबाबदारी ठरविण्यात आली तर न्यायपद्धतीला हानी पोहोचेल काय ? जामीनाबाबत तीच परवड आहे. जामीन हा आता हक्क समजला जातो. सर्वसामान्य माणसाच्या बाबतीत जामीन उपकारक आहे. पण त्यांना तो मिळणे कठीण जाते. याच्या उलट खुनी, कुप्रसिद्ध स्मगलर, गुंड यांना तो सहजपणे मिळतो. ज्याची कुप्रसिद्धी आहे अशा गुंडाला जामीन मिळणे कायद्याने अशक्य करावयास नको काय ? ते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक नाही काय ? पण सतराव्या शतकात इंग्लंडने हित-संबंधावर तिलांजली दिली. तीच परंपरा आपण आजही चालवायची का? याचा परिणाम म्हणून आता न्यायालयातही खून पडू लागले आहेत. पण जामीनाच्या कायद्यासंबंधी सुधारणा करण्याचा विचारही कोणाच्या मनात येत नाही. आणि खटल्याचे निकाल लागायला किती वर्षे लागावीत ? श्रीमती इंदिरा गांधींच्या हत्येला तीन वर्षे झाली तरी निकालाचा पत्ता नाही. वास्तविक स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे झाली. पण इंग्रजी काय-द्याची तत्त्वे आक्षेपापलीकडची आहेत का असा प्रश्नही कोणाला विचारावेसे वाटू नये हे आपल्या वैचारिक गुलामगिरीचेच लक्षण आहे.

पण न्यायपद्धतीत आपली आंधळी अनुकरणप्रियता जर कोठे हास्यास्पद पातळीवर

उतरली असेल तर ती अधिकारक्षेत्राच्या बाबतीत. दिवाणी किंवा फौजदारी, आणि प्रादेशिक अधिकारक्षेत्र, येवढेच वास्तविक ओळखले जावे. पण कोणत्या कोर्टाला खटला चालविण्याचा अधिकार आहे या प्राथमिक बाबीतच कित्येक महिने किंवा अधिक काल जातो. मागे अंतुले यांच्यावरील खटला विशेष कोर्टापुढे आला त्यावेळी त्या कोर्टाला खटला चालवण्याचा अधिकार आहे का नाही याचा वाद थेट सुप्रीम कोर्टापर्यंत गेला. न्यायासाठी याची आवश्यकता आहे काय ? कोणत्याही न्यायालयापुढे खटला चालला तरी तो योग्य पद्धतीने (फेअर) चालत असेल तर अधिकारक्षेत्राचा वाद निर्माण का व्हावा याचा मला अर्थच समजू शकत नाही. आणि आरोपी यापेक्षा जास्त कोणत्या गोष्टीची अपेक्षा धरू शकतो ? न्यायाधिशांनी योग्य तऱ्हेने अंतुले यांच्यावरील खटला चालविला असता म्हणजे झाले.

तथापि ज्या अधिकारक्षेत्राची आपण पतिव्रतेच्या शीलासारखी जपणूक करतो त्या पद्धतीचा उगम काय ? तोही अत्यंत मनोरंजक आहे. व तो समजला म्हणजे आपली अनुकरणप्रियता हास्यास्पद होते. एका दृष्टांताच्या सहाय्याने तो अधिक स्पष्ट होईल. एका देवळात एक स्थानिक माणूस पाठ खाजत होती म्हणून देवळातल्या एका खांबावर ती घासत होता. एका परस्थ यात्रेकरूने ते पाहिले आणि त्याला वाटले की, त्या देवळात तशी प्रथा होती. म्हणून त्याने खांबाला आपली पाठ घासली, नंतर इतर बऱ्याच यात्रेकरूंनीही तसेच केले. आता त्या देवळात गेले म्हणजे खांबाला पाठ घासणे हा एक आवश्यक विधी झाला आहे. आणि ते केल्यानंतर पाठीची दुखणी बरी होतात अशी समजूत सगळीकडे पसरली आहे. तसाच प्रकार अधिकारक्षेत्राच्या बाबतीत झाला आहे. इंग्लंडमध्ये पुष्कळ शतके न्यायाधिशांना पगार नसे. त्यांच्यासमोर जे खटले येतील त्यातून कोर्ट फीचे जे उत्पन्न होईल त्याचा हिस्सा त्यांना मिळत असे. साहजिकच जितके जास्त कज्जे तितके जास्त उत्पन्न. त्यामुळे साहजिकच प्रत्येक न्यायशाखा अधिकारक्षेत्राबद्दल अत्यंत जागरूक राहू लागली. प्रसिद्ध घटनातज्ज्ञ मेटलंड म्हणतो की, इंग्लंडमधील न्यायपद्धतीचा जो विकास झाला त्याचा पुष्कळसा संबंध न्यायाधिशांना पगार नव्हता या एका गोष्टीशी पोहोचतो. आता इंग्लंडमध्ये काही विशिष्ट परिस्थितीत अधिकारक्षेत्राबाबत काही विवक्षित प्रथा निर्माण झाल्या म्हणून आपणही तोच मार्ग अंगिकारायचा का ?

राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व न्यायपद्धती यांत जी दुरवस्था आढळते त्याचे कारण म्हणजे भारतीयांच्यातील ऐतिहासिक दृष्टीचा अभाव. भारतीय इतिहास शिकू लागले ते इंग्रजी राज्यस्थापनेनंतर. तत्पूर्वी पुराणे, बखरी, स्थानिक वृत्तांत, चरित्रे एवढ्यापुरतेच इतिहास-लेखन मर्यादित होते. कल्हणांचे 'राजतरंगिणी' सोडले तर इतरत्र ऐतिहासिक दृष्टि-कोनाचा अभाव जाणवतो. किंबहुना असेही म्हणता येईल की, इतिहासलेखन हे एखाद्या राजाचे गुणगान किंवा साहित्यिक शैलीचा आविष्कार या दृष्टिकोनातूनच केले गेले. एखादा कालखंड घेऊन त्याचा इतिहास लिहिणे ही पद्धतच आपणास माहिती नव्हती.

इंग्रजी राज्यस्थापनेनंतर भारतीय इतिहासकारही इतिहास लिहू लागले, व साहजिकच

त्यात इतिहासाच्या उदात्तीकरणाची प्रवृत्ती दिसू लागली. एका दृष्टीने पाहिले तर ती त्या परिस्थितीची गरजच होती. कारण परतंत्र देशातील लोकांना झगडण्यासाठी जी स्फूर्ती लागते ती अशा तऱ्हेने उदात्तीकरण केलेला इतिहासच देऊ शकतो. पण ही गरज स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संपली व एक नवी गरज निर्माण झाली. ती म्हणजे आपण काय होतो आणि का होतो याचे अत्यंत परखड विश्लेषण आणि आपण काय होऊ पाहात आहोत याचा वेध घेणे. असा वेध घेणे म्हणजे निव्वळ स्वप्नरंजन करणे नव्हे तर पाय जमिनीवर स्थिर ठेवून प्रगतीसाठी योजनाबद्ध प्रयत्न करणे. पण आपल्या राष्ट्रीय चारित्र्यातील उणीवा, त्यांचा परकीयांनी घेतलेला फायदा यांचे ऐतिहासिक पद्धतीने विश्लेषण करण्याऐवजी प्रत्येक गोष्टीबद्दल इंग्रजांना जबाबदार धरण्याची प्रवृत्ती बळावू लागली.

भारतीय इतिहासाचे आजवरचे लेखन तीन प्रकारे झाले आहे. पहिला प्रकार म्हणजे देशभक्तिपर इतिहास. अशा इतिहासलेखनाला विशेष प्रेरणा मिळाली ती स्वा. सावरकरांच्या '१८५७' या ग्रंथाने. अशा इतिहासलेखनापासून अनेकांनी स्फूर्ती घेऊन असीम त्याग केला. पण त्यात देशभक्ती जास्त आणि इतिहास थोडा अशी परिस्थिती होती. देशभक्तिपर लेखन शेवटी अशा अवस्थेला पोचले होते की, तंटया भिल्ल आणि शिवा रामोशी यांचेही उदात्तीकरण करण्यात येऊ लागले. तंटया भिल्ल आणि शिवा रामोशी हे मध्ययुगीन रॉबीनहूडचे आधुनिक भारतीय अवतार. रॉबीनहूड हा इंग्लंडमधील मध्ययुगीन समाजाच्या हताशपणातून निर्माण झालेल्या दुबळचा अशा आकांक्षांचे प्रतीक. अशा मध्ययुगीन व्यक्तिरेखेचे आधुनिक भारतात पुनरुज्जीवन होणे आणि त्याने सामान्य माणसाने हरखून जाणे हे समाजात जोम नसल्याचे लक्षण होते. अर्थात अशा व्यक्तीच्या शौर्यगाथेत रममाण होऊन स्वतःचा नाकर्तेपणा विसरून जाण्याच्या दृष्टीने हे सोयीस्कर होते.

इतिहासलेखनाचा दुसरा प्रकार म्हणजे ऐतिहासिक साधनांच्या सहाय्याने ऐतिहासिक पद्धतीने इतिहास लिहीणे. जयस्वाल, भांडारकर, मजुमदार, मुकर्जी, रायचौधरी अशी अनेक नावे या संदर्भात डोळचासमोर येतात. त्यांचे कार्य अतिशय मोलाचे आहे. या लेखनात अनेक छटा आढळतात. पण सर्वसाधारण असे विधान करता येईल की, मजुमदार यांच्या काही लेखनाचा अपवाद करता या लेखकांचा दृष्टिकोन विश्लेषणात्मक असण्याऐवजी वर्णनात्मक आणि थोडासा इतिहासाच्या उदात्तीकरणाकडे वळणारा आहे.

इतिहासलेखनाच्या तिसऱ्या प्रकाराचे प्रणेते डी. डी. कोसंबी. इतिहासाचा मार्क्सप्रणीत अन्वयार्थ लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या पद्धतीने भारतीय इतिहासाचा शोध घेण्याच्या बाबतीत एक अडचण येते. उत्पादन आणि अर्थार्जनाच्या पद्धतीत जे बदल होतात त्याच्या अनुषंगाने समाजाच्या रचनेतही बदल होतात. हा मार्क्सचा सिद्धांत भारताला कशा तऱ्हेने लागू होतो याचे आकलन होणे कठीण आहे. कारण दोन हजार वर्षे तरी भारतात उत्पादनपद्धती तीच राहिली होती. दुसरे म्हणजे मार्क्सनेच धर्मास अफूची गोळी म्हटले होते. अन्नापेक्षा अफूची गोळीच जास्त परिणामकारक असते. तेव्हा निर्वाहाच्या साधनापेक्षा, अफूच्या गोळीच्या संदर्भातच, विशेषतः उत्पादनाच्या साधनात

फारसा बदल झालेला नसताना, एखाद्या देशाचा इतिहास योग्य तऱ्हेने समजू शकणार नाही का ? कोसंबी यांनी प्राचीन भारताच्या इतिहासाचा अन्वयार्थ अतिरिक्त उत्पादनाच्या सिद्धांतावर विसंबून लिहीला आहे. परंतु अतिरिक्त उत्पादनामुळे इजिप्तमध्ये पिरॅमिड्स का उभे राहिले तर अतिरिक्त उत्पादनामुळे भारतात औपनिषदिक तत्त्वज्ञान का निर्माण झाले या प्रश्नांची उत्तरे त्यांच्या विश्लेषणात मिळत नाहीत. वास्तविक पिरॅमिड्स आणि औपनिषदिक तत्त्वज्ञान या दोघांच्याही मागची प्रेरणा मृत्यूबद्दलचे कुतुहल हीच होती. मग त्याचा आविष्कार वेगवेगळ्या संस्कृतीत वेगवेगळा का होतो याचे उत्तर मार्क्सप्रणीत पद्धत देऊ शकत नाही.

या वेगवेगळ्या इतिहासलेखनाच्या प्रकारातून अनेक प्रश्न अनुत्तरीत राहतात किंवा आजच्या राजकारणाच्या दबावाने अनुत्तरित ठेवले जातात. उदा. स्वतःच्या देशात पराभूत झालेल्या बाबरचा राजवंश भारतावर तीनशे वर्षे राज्य करतो. त्याचा नातू अकबर अखिल भारतीय साम्राज्याची महत्त्वाकाक्षा बाळगतो. पण शतकानुशतके ज्याचे पूर्वज याच देशात रहात होते त्या महापराक्रमी राणा प्रतापाची ‘माझी जमीन’ एवढीच महत्त्वाकांक्षा का ? हिंदुस्थानचा सम्राट बनेन असे स्वप्नदेखील एकाही हिंदू राजाने हर्षवर्धननंतर का पाहिले नाही ? हिंदुस्थानातील सैनिक इराणच्या सम्राटाच्या सैन्यात दाखल होऊन ग्रीकांशी लढण्यास का जातात ? भारतभर ज्यांचा दरारा त्या पेशव्यांनी ‘वकील इ मुतालीक’ हा किताब धारण करण्यातच का बहुमान मानला ? एकाच कालखंडातील शिवाजी आणि औरंगजेब अनुक्रमे धार्मिक सहिष्णुतेचे आणि धार्मिक छळाचे धोरण का स्वीकारतात ? बिहारमध्ये जातीय दंगली झाल्यानंतर बॉम्बफेकीची धमकी देणारे नेहरू बंगालमधील हिंदूंच्या कत्तलीसंबंधात तशीच भाषा का करीत नाहीत ? असे अनेक प्रश्न. त्यांची समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. कारण त्यांची सांगड हिंदू संस्कृतीशी घातली जात नाही. अशी सांगड घालणे आज प्रतिगामित्वाचे लक्षण समजले जाते. हेही हिंदु संस्कृतीशी सुसंगतच आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीय इतिहासाच्या प्रदीर्घ कालखंडात अत्युच्च महत्वाचा घटक म्हणजे हिंदू संस्कृती. या संस्कृतीचे निरनिराळ्या परिस्थितीत जे प्रतिसाद होते त्यांच्याच सहाय्याने भारताचा सांस्कृतिक इतिहास लिहिणे आवश्यक आहे. अर्थात सांस्कृतिक इतिहास म्हणजे विविधतेतील एकात्मता, सर्वधर्मसमभाव असे चावूनचावून चोथा झालेले शब्द वापरणे नव्हे किंवा एखाद्या कालखंडातील आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थिती, धर्म आणि तत्वज्ञान, वाङ्मय आणि कला याचे वर्णनही नव्हे. तर या सर्वांचा हिंदू व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम आणि त्यातून इतिहासाच्या ओघाने कोणती आणि कशी वळणे घेतली याचे विश्लेषण.

काही वेळा असा एक विचार मांडण्यात येतो की, शाळा, महाविद्यालयांतून इंग्रजांनी लिहिलेला इतिहासच शिकविला जातो. त्यामुळे भारतीयांना त्यांच्या इतिहासाचे यथार्थ

दर्शन होत नाही. प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे ? आपला भूतकाल उज्ज्वल होता हा शोध इंग्रजांनीच लावला. क्लाइव्ह आणि हेस्टिंग्ज यांच्या कारवाया आणि कारस्थाने त्यांनीच उजेडात आणून टीका केली. याउलट आमच्या इतिहासाच्या पुस्तकात मात्र गांधी, नेहरू, यांचे धोरण चुकल्याचा कुठेही उल्लेख नाही. पोपप्रमाणेच ते दोघेही अस्खलनशील असल्याचे गृहीतक धरूनच इतिहासाची पुस्तके लिहिली जात आहेत. बाणभट्टाची जी भूमिका हर्षचरित लिहिताना होती तीच भूमिका आजही आमची आहे. या उलट आजही भारतीय इतिहासलेखनास इंग्रज लेखक किंवा त्यांच्या प्रकाशनसंस्था भरीव आणि साक्षेपी योगदान करीत आहेत. आपण मात्र प्रत्येक बाबतीत इंग्रजांनाच जबाबदार धरत होतो. याचा परिणाम असा झाला की, हिंदू व्यक्तिमत्वाचा शोधच घेण्यात आला नाही. त्यामुळे आपल्या दोषांवर पांघरूण घातले गेले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही प्रवृत्ती अधिकच बळावली कारण आपल्या दुरवस्थेचे खापर दुसऱ्यावर फोडणे हे प्रत्येकालाच सुखकर वाटते. पण यामुळे आपल्या परिस्थितीचे नेमके निदान होऊ शकत नाही व परिणामी ती सुधारण्यासाठी उपायही सापडत नाही. स्वातंत्र्यपूर्वकालात आपण पुष्कळ असत्ये राजकारणाच्या सोयीसाठी उराशी कवटाळून बसलो होतो व त्यांचे भूत अजूनही आपल्या मानेवरून उतरत नाही. हिंदु–मुस्लिम संबंधात इंग्रजांनी बिब्बा घातला हे त्यापैकी एक. वस्तुस्थिती अशी आहे की, जवळ जवळ हजार वर्षे शेजारी शेजारी राहूनही या जमातीत कोणतेही प्रेम नाही. हिंदु–मुस्लिम ऐक्य हे ध्येय आहे; पण ते हस्तगत झाले आहेच अशा भ्रमात आपण आपल्याला जवळ जवळ साठ वर्षे ठेवले आहे. त्यामुळे या प्रश्नांचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून केव्हाच विचार झाला नाही. भारतीय संस्कृती ही अशीच एक कल्पना. मला भारतीय संस्कृती कोठेच दिसत नाहीत. आहेत त्या हिंदू आणि मुस्लिम संस्कृती. दोहोंचेही मिश्रण असलेली भारतीय संस्कृती हे पुन्हा ध्येय आहे. वस्तुस्थिती नव्हे. इतकी वर्षे शेजारी राहून आपण साधी नावाचीदेखील देवाणघेवाण केली नाही, ईश्वर, अल्ला एका भजनात गुंफणाऱ्या गांधीजींनी आपल्या एखाद्या मुलाचे नाव अल्लाबक्ष ठेवले नाही किंवा नेहरूंनी आपल्या मुलीचे नाव खदिजा किंवा आयेषा न ठेवता इंदिरा ठेवले. फक्त संगीतातच काय ते भारतीयत्व आढळते. इतरत्र दोन्ही संस्कृतीच्या कडेकडेनेच काय ती देवाण घेवाण आढळते.

आज भारतात खरी आढळते ती ' खेचर ' संस्कृती. इंग्रजी सस्कृती आणि हिंदु संस्कृती यांचे अपत्य. तिची वैशिष्टचे लक्षात घेण्यासारखी आहेत. विधिमंडळे, लोकसभा वगैरे इंग्रजी संस्कृतीची देणगी, तर आयाराम गयाराम ही भारतीय संस्कृतीची देणगी; मधु लिमये यांचे संसदपटुत्व हे पाश्चात्य पद्धतीचे तर आपल्याच पक्षाला निरर्थक शाब्दिकवादासाठी सत्तेवरून खाली खेचणे हा भारतीय परीसस्पर्श; प्रशासकीय व्यवस्था इंग्रजी त्यामुळे दफ्तरदिरंगाई वगैरे वैशिष्टचे, तर सरकारी नोकरांची बेफिकिरी अस्सल भारतीय; कारखानदारी पद्धती इंग्रजी पण उपभोग्यवस्तूंचा कृत्रीम तुटवडा करून नफेखोरी हा प्रकार भारतीय. वैद्यकीय व्यवसाय पाश्चात्य पद्धतीचा पण रुग्णांबद्दलची बेफिकिरी आणि पैशाची

लालसा संपूर्ण भारतीय. अभियांत्रिकी पद्धत पाश्चात्य पण भरपूर पैसे घेऊन मानवी जीविताला हानी पोहोचेल अशी बांधकामे होणे आणि त्याबद्दल शासनासकट कोणालाही खंत नसणे हा प्रकार भारतीय; कामगार चळवळ इंग्रजी पण आयुर्विमा कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळात भजने म्हणणे किंवा महापालिका कर्मचाऱ्यांनी नगरपालिकेबाहेर मेलेली कुत्री आणि सडके मांस टाकणे ही किमया भारतीय; सहकारी चळवळ इंग्रजी पण तिला भ्रष्टाचाराची गंगोत्री बनवणे हे भारतीय योगदान; शोधक पत्रकारिता पाश्चात्य पण वाचकांना मिटक्या मारत वाचता येतील अशीच प्रकरणे बाहेर काढणे हा प्रकार भारतीय; सबंध शिक्षण पद्धत इंग्रजी पण शिक्षकांची आणि विद्यार्थ्यांची ज्ञानाबद्दलची अनास्था आणि पदवीचे वेड भारतीय; खेळांचे वेड पाश्चात्य पण शरीरसंवर्धनाची नावड भारतीय. अशी अनेक उदाहरणे देता येतील. खेचरांच्या अंगी पुनरुत्पादनाची शक्ती नसते असे म्हणतात. त्याप्रमाणे खेचर संस्कृतीची सर्जनशीलता संपूर्ण आटलेली आहे. त्यामुळे वैचारिक, साहित्यिक, शास्त्रीय, प्रशासकीय, कलात्मक अशा सर्वच क्षेत्रांत स्वतंत्र विचारांची निपज फारशी होतच नाही. अशिक्षित, दैववादी, विज्ञानविन्मुख, जातीयवादी, भ्रष्टाचाराचे वावडे नसलेल्या, लोकशाही प्रक्रियेबद्दल अनभिज्ञ किंवा उदासीन असलेल्या, अन्यायाची चीड नसलेल्या आणि त्रात्यासाठी आसुसलेल्या अशा बहुसंख्य जनतेची आणि खेचर संस्कृतीची भारतात सांगड पडलेली आहे. पण या सत्याला सामोरे न जाता भारतीय संस्कृतीचे नगारे सर्वत्र वाजवले जात आहेत.

आणखी एक असत्य म्हणजे गांधीच्या नेतृत्वामुळे स्वातंत्र्य मिळाले. गांधीजींच्या सत्याग्रहाचे श्रेय इंग्रजांच्या सुसंस्कृतपणाला देणे आवश्यक आहे. पोर्तुगीज राजवटीत हा महात्मा कायमचा बंदिवासात राहिला असता किंवा त्यांचा 'हिरवे गुरुजी' झाला असता. दुसऱ्या महायुद्धानंतर जे अनेक देश स्वतंत्र झाले त्या देशात कोणीही गांधी निपजले नव्हते तरी त्यांना स्वातंत्र्य मिळविण्यात अडचण आली नाही. एम. एन. रॉय यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीलाच भविष्यवाणी उच्चारली होती की, इंग्रज युद्ध जिंकोत अथवा हरोत भारताला स्वातंत्र्य मिळणारच.

गांधीजींनी लोकशाही जोपासली हे आणखी एक असत्य. हिंदू अविभक्त कुटुंबातील कर्त्याची भूमिका त्यांनी राजकारणात बजावली. लग्नासंबंधी बोलणी–चालणी ज्याप्रमाणे कर्ता एकटाच करतो, त्याप्रमाणे गोलमेज परिषदेसाठी ते एकटेच गेले. श्रीमती इंदिरा गांधींना हुकूमशहा म्हणजे चुकीचे आहे तसेच म. गांधींना लोकशाहीवादी म्हणजेही चुकीचे आहे. भारतात हुकूमशाही येणे अशक्य आहे. कारण लोकांची मनोभूमिका त्याला अनुकूल नाही. अनुकूल आहे फक्त सत्तेच्या गैरवापराला आणि तो चालूच आहे. गांधी, नेहरू आणि श्रीमती गांधी हे सर्वच कर्त्याची भूमिका बजावतात. पण गांधी, नेहरूंना वेगळे काढणे आणि श्रीमती गांधींच्यावर कडक टीका करणे हे भारतीय जीवनाच्या दुसऱ्या अधू बिंदूचे एक लक्षण आहे. दुसरे म्हणजे 'एक्स्पोर्ट क्वालिटी.'

गांधी, नेहरू, विवेकानंद, राधाकृष्णन, हे सर्व 'एक्स्पोर्ट क्वालिटी'चे. या उलट रानडे,

टिळक, स्वामी रामतीर्थ, गुरुदेव रानडे, इंदिरा गांधी हा सगळा स्वदेशी माल. त्यामुळे वाजपेयीदेखील अखेर भुरळले आणि त्यांनी गांधीवादी समाजवादाची घोषणा केली. त्याआधी ते परराष्ट्रमंत्री होते हा निव्वळ योगायोग नव्हे. तर प्रश्न असा आहे की, इतिहासाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन आपले विचारवंत करणार आहेत की, विनोबा, स. ज. भागवत, दादा धर्माधिकारी यांच्यासारख्यांनी रचलेल्या आख्यानावर विसंबून गांधींवर कीर्तने करीत बसणार आहेत ? प्रत्येक पूर्वग्रह ज्यावेळी वस्तुनिष्ठतेवर घासून तपासला जातो त्याचवेळी वैचारिक प्रगल्भत्ता येते. आणि आता तर निधर्मीवादाच्या नावाखाली इतिहास बदलून लिहिण्याची भाषा निघत आहे. आणि हे काम करायला महाराष्ट्रात विद्वानांची वाण पडणार नाही हे निश्चित. कारण जिथे न. र. फाटकांच्यासारखे विद्वान हे विपर्यस्त इतिहास लिहिण्याचे वैचारिक दास्य कर्म करायला तयार झाले तिथे इतरांची काय कथा !

पाश्चात्य विचारवंतांचे आणि स्वकीय राज्यकर्त्यांचे बौद्धिक दास्य मनोभावे करण्याची आपल्या विद्वान विचारवंतांची तयारी असताना मुंबई येथील साहित्य संमेलनात श्रीमती मालतीबाई बेडेकर यांनी आमच्या विचारजीवनाची सूत्रे सरकारला हवी आहेत असा दावा करावा याचे आश्चर्य वाटते. प्रश्न असा आहे की, विचारजीवनाची सूत्रे आमच्या हातात आहेत की, आम्ही ती केव्हाच दुसऱ्याच्या हवाली केली आहेत ? विशेषत: चारदोन पारितोषिके देण्याची शिफारस नाकारली किंवा एखाद्या मुख्यमंत्र्याने जरा धमकावणीची भाषणे केली म्हणजे ज्यांना आपली विचारसूत्रे सरकारच्या हाती जातील याची भीती वाटते ते कीव वाटून घेण्यास तरी पात्र आहेत का याची शंका वाटते.

एखादा निर्धन माणूस ज्याप्रमाणे चार–दोन आण्याची इस्टेट कोणीतरी चोरून नेईल या धास्तीने पोखरलेला असतो त्याप्रमाणे या विचारवंतांची अवस्था आहे. जे मुळातच आपल्या हातात नाही आहे ते सरकार हिसकावून घेईल या आशंकेने ते भयाकुल झाले आहेत. वैचारिक सूत्रे आपल्या हाती ठेवायची असतील तर त्यासाठी प्रथम बौद्धिक दास्य झुगारून देण्याची आवश्यकता असते व त्याला जोड हवी असते ती आत्मविश्वासाची, कठोर आत्मपरीक्षणाची, उदंड मानवतावादाची. स्वार्थ बाजूला सारण्याची आणि आव्हान स्वीकारण्याची.

गोल्डस्मिथच्या 'विकार ऑफ बेकफील्ड' मध्ये विकार, त्यातील एका पात्राचे वर्णन करताना म्हणतो 'त्याने माझ्याकडून पैसे उसने घेतले होते. पण आपल्या मताचे मंडन तो अशा अभिनिवेशाने करत असे की, जणू तोच माझा आश्रयदाता होता.'' आपल्या विचारवंतांना हे जमेल काय ?

वैचारिक स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते हे स्वत:च आपण तयार केलेल्या वैचारिक कोशात तुरुंगवासी कसे होऊन बसतात याचे एक मनोरंजक उदाहरण पाध्ये यांनीच पुरवले आहे. त्यांची तक्रार अशी की, महाराष्ट्रातील वैचारिक जीवनाचा दर्जा पार घसरला आहे. हा त्यांचा साक्षात्कार सरकारने पुस्तकांना पुरस्कार देण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशी सरकारनेच डावलल्यामुळे महाराष्ट्र टाईम्समध्ये जो पत्रव्यवहार झाला त्याचा हवाला

देऊन त्यांनी व्यक्त कला आहे. त्यांचे म्हणणे असे की, त्यांनी स्टेट आणि गव्हर्नमेंट असा भेद सुचवला होता व त्याच अनुषंगाने चर्चा व्हावयास हवी होती. तशी ती न झाल्यामुळे ते व्यथित झाले व त्या चर्चेचा दर्जा काय होता असा उपरोधिक प्रश्न विचारला होता. नुसता प्रश्न विचारून काहीच सिद्ध होत नाही. प्रथम दर्जाचा निकष ठरवला पाहिजे. मगच दर्जा घसरला किंवा काय हे निश्चित करता येईल. वैचारिक प्रक्रिया कशी सुरू होते हे वर दिले आहेच. परिस्थितीचे सम्यक ज्ञान, त्यात अंतर्भूत असलेल्या प्रश्नांचे नेमके स्वरूप, त्यातील जाणवत असलेल्या उणीवा व त्यावर सुचलेला तोडगा हे घटक उपस्थित असले तर चर्चेला वस्तुनिष्ठता येते.

इंग्लंडच्या इतिहासाचे सार फक्त चार शब्दांत सांगता येईल. ' निश्चित गाऱ्हाणी आणि नेमके उपाय ' या गाऱ्हाण्यांवर उपाय शोधताना राजा व प्रजाजन यांच्या अधिकारांचा ऊहापोह होत होता व त्याच्याच अनुषंगाने विचारवंत आपली मते मांडत होते. म्हणजेच राजाचे अथवा प्रजाजनाचे अधिकार शाबित करण्याच्या दृष्टीनेच नव्या तत्त्वप्रणाली मांडल्या जात होत्या पण हे करीत असताना वस्तुस्थितीचे भान सुटत नव्हते. हॉब्स, लॉक आणि फ्रान्समध्ये मॉंतेस्क्यू, रुसो यांनी या पद्धतीने आपले विचार मांडले. पुढे हीच पद्धती अवलंबिली गेली.?

आज भारतात नागरिकांचे हक्क ही स्वयंसिद्ध गोष्ट आहे. तो शाबित करण्याची जरुरी नसल्यामुळे सैद्धान्तिक चर्चेची आवश्यकताच नव्हती. पण आपला वैचारिक पिंड पाश्चात्यांच्या अनुकरणावर पोसला गेला असल्यामुळे वस्तुस्थितीचे भान न ठेवता सैद्धान्तिक चर्चा करणे म्हणजेच वादविवादांचा दर्जा वाढविणे असे समीकरण तयार केले. तशी चर्चा नसली की, वादविवादांचा दर्जा पार घसरला अशी आपणास खंत वाटते, नव्या तत्त्वप्रणालीसाठी सैद्धान्तिक चर्चेची गरज असते. एरवी नाही, हे पाश्चात्यांचे दास्य स्वीकारल्यामुळे आपल्या लक्षात येत नाही.

□ □

# पाच

राज्यपुरस्काराबाबत जी चर्चा झाली तिचा दर्जा उत्तम होता व सरकार देत असलेला पैसा अखेर लोकांचाच आहे हा अत्यंत बिनतोड युक्तिवाद आहे. पाध्ये यांच्या दुर्दैवाने सर्वसामान्य वाचकाला समजेल अशा तऱ्हेने ही चर्चा चालली होती व त्यामुळेच त्यांच्यातील विचारवंताला व समीक्षकाला खेद वाटला असावा. त्या वादविवादात पाश्चात्य विचारवंतांची एकदोन अवतरणे व एखादे घटनात्मक तत्त्व यांचा शिडकावा असता म्हणजे त्यांना आनंद झाला असता. वास्तविक या सबंध प्रकरणात सरकारने आजवरची प्रथा मोडली होती व त्याचाच राग विद्वानांना व जनतेला आला होता व तो नेमक्या शब्दांत व्यक्तही झाला होता. सामान्य माणसाची अशा तऱ्हेने वैचारिक गुंतवणूक करणे म्हणजेच वैचारिक जीवन सुधारणे होय. ही चर्चा खालील प्रकारे झाली असती म्हणजे पाध्ये कदाचित खूष झाले असते–

'राज्य वा शासन या स्वतंत्र संकल्पना आहेत. शासन दर पाच वर्षांनी बदलते. तर राज्याला सातत्य असते. इंग्लंडच्या राज्यघटनेत राज्य ही कल्पना 'क्राऊन' या शब्दाने साकार केली आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. कारण राजा कधीही मरत नाही. 'राजा मेला आहे. राजा चिरायु होवो' असे तेथे म्हटले जाते. इंग्लंडमध्ये राजा व शासन यांचे संबंध ज्या तऱ्हेने नियमित होतात तशाच तऱ्हेने ते भारतातही स्टेट व गवर्नमेंट संदर्भात होण्याची आवश्यकता आहे. इंग्लंडची राज्यघटना ही अलिखित आहे तर भारताची घटना लिखित आहे हाही फरक लक्षात घेण्यासारखा आहे.

'घटना अखेर एक चौकट असते व त्या चौकटीत राहूनच सर्व संबंधित घटकांना आपले संबंध निश्चित करावे लागतात. पण हे संबंध कशा तऱ्हेने निश्चित होतील हे त्या घटकांच्या सामर्थ्यावर व इतर बाबींवर अवलंबून असते. त्यामुळे या संबंधांचे स्वरूप निरनिराळ्या काळात निरनिराळे असते. या गोष्टींकडे डायसी या घटनातज्ज्ञाने प्रथम लक्ष वेधले. तो म्हणतो की, राज्यशकट सुरळीत चालण्यासाठी प्रथांची (कन्व्हेशन्स) जरुरी असते. एका अर्थाने या प्रथांना राज्यशकटाचे वंगण म्हटले तर ते सार्थच होईल. डायसीने प्रथांची व्याख्या 'कस्टम्स, प्रॅक्टिसेस, मॅक्झिम्स ऑर प्रीसेप्टस विच आर नॉट एन्फोर्सड ऑर रेकग्नाइज्ड बाय कोर्टस् ऑफ लॉ' अशी केली आहे. पण त्या पाळाव्या लागतात हे निश्चित. बर्कने हीच कल्पना जरा वेगळ्या शब्दात मांडली आहे. तो म्हणतो, 'द कॉन्स्टीटच्यूअंट पार्टस ऑफ अे स्टेट आर ओब्लाइज्ड टु होल्ड देअर पब्लिक फेथ विथ ईच आदर अँड द होल स्टेट विथ सेपरेट कम्युनिटीज.' राज्यपुरस्काराबाबत नेमकी

हीच गोष्ट घडली आहे. समिती ही सरकारने नेमली होती व ती एका दृष्टीने सरकारचाच भाग म्हणावयास हरकत नाही. अशा परिस्थितीत बर्कने म्हटल्याप्रमाणे शासन व समित्या यांचे संबंध ज्या सार्वजनिक श्रद्धेचा ते भाग बनले आहेत त्याप्रमाणे ते राखले गेले नाहीत ही खरी व्यथा आहे. वगैरे, वगैरे.

मग याला तसेच दर्जेदार उत्तर : 'श्री. अमुक अमुक यांनी राजा व राज्य या संकल्पना एकच समजून आपला वैचारिक गोंधळच स्पष्ट केला आहे. इंग्लंडच्या राज्यघटनेत राजा व शासन एकच असते. राजा हा नामधारी शासक आहे तर मंत्रिमंडळ हे खरे शासन असते. कौटिल्यीय अर्थशास्त्रात राज्याचा सप्तांग सिद्धान्त सांगितला आहे त्यात राजा फक्त एक घटक मानला आहे. युरोपात राज्य ही संकल्पना उदयास आली ती...फ्रान्सचा चौदावा लुई म्हणत असे की, 'मी म्हणजेच राज्य'...शासन आणि समित्या यांच्या परस्पर संबंधाबाबत त्यांचे विचार असेच अज्ञानमूलक आहेत. समित्या या कधीच शासनाचा भाग होऊ शकत नाहीत. समित्यांचे अनेक प्रकार आहेत. एतदर्थ, पार्लमेंटरी त्यांचे काम फक्त शिफारशी करणे. या संबंधात जेनिंग्ज म्हणतो की इ. इ.'

लागला की, नाही वाद रंगायला आणि चर्चेचा दर्जा उंचावयाला ? कोणत्याही प्रश्नाच्या मुळाशी जाऊन आपल्या मगदुराप्रमाणे त्याची चिकित्सा करण्याची पद्धत आपण आता सोडून दिली आहेत. आपला भर असतो तो बव्हंशी चित्रणावर. आणि असे चित्रण तात्कालिक महत्त्वामुळे वाचकांनाही आकर्षित करते व मग सर्वचजण या साथीला बळी पडतात. 'ताकदीच्या अग्रलेखा' पैकी कितीमध्ये चिकित्सा आहे व किती निव्वळ आकर्षक शैलीने लिहिलेली चित्रणे आहेत याचाही विचार होणे आवश्यक आहे.

विचारवंतांची आणखी एक सवय म्हणजे आपल्याला ज्या विषयात गती नाही त्यासंबंधात निश्चित स्वरूपाची विधाने करण. मते मांडायला हरकत नाही पण ती मांडत असताना भूमिका विद्यार्थ्याची घ्यावयास पाहिजे. पाध्ये म्हणतात की, वैज्ञानिक क्षेत्रात भारतात चाललेले काम अभिमानस्पद आहे व त्याच्या बातम्यांनी ते थरारून जातात. अर्थात त्याचे कारणही त्यांनी दिले आहे. त्या साऱ्या त्यांच्या आकलन शक्तींच्या टप्प्यांत असतातच असे नाही. मग 'अभिमानस्पद' हे सर्टिफिकेट कशासाठी ? अज्ञान हे वरदान आहे असे म्हणतात त्याचा पुरावाच त्यांनी दिला आहे. त्यांनी ज्या शोधांची जंत्री दिली आहे ते सकृद्दर्शनी तरी अत्यंत सामान्य वाटतात. ज्या जमान्यात मानव चंद्रावर जाऊन पोचला त्या जमान्यात सुधारित बैलगाड्यांबद्दल वाचून पाध्ये यांचे मन भरून येते. त्यांचे मन मोठे ! वास्तविक पाहता इतर सर्वच क्षेत्राप्रमाणे वैज्ञानिक क्षेत्रातही काही हालचाल चालू आहे एवढाच त्याचा अर्थ. एखाद दुसरी चांगली कादंबरी, नाटक, कविता, शिल्प, चित्रकला यात काहीना काही कुणाचे-तरी मन भरून आणणारे आणि खरोखरीच चांगले असे काहीतरी चालू आहे. पण सर्वसाधारण प्रवृत्ती सामान्यत्वातून अतिसामान्यत्वाकडे आहे व हे असेच चालू राहिले तर त्याचा शेवट अवनतावस्थेत होणार हे स्पष्ट आहे.

वैज्ञानिक क्षेत्रात मन भरून येण्यासारख्या दोनच घटना. पहिली म्हणजे रामन यांना

नोबेल पारितोषिक मिळाले ती व दुसरी म्हणजे वीस एक वर्षापूर्वी फ्रेड हॉईल यांनी हॉईल-नारळीकर सिद्धांत जाहीर केला व या शोधात आपल्या इतकाच नारळीकर यांचाही तितकाच वाटा असल्याचे आवर्जून सांगितले ती घटना. पुढे त्यांनी आपल्या शोधात काही उणीवा असल्याचेही जाहीर केले होते. हा सर्वच प्रसंग वैज्ञानिकांची संशोधन वृत्ती आणि प्रामाणिक पणा यांचा एक आगळा अनुभव म्हणून जपून ठेवला आहे. पण भारतात आल्यानंतर नारळीकर कुठल्यातरी संशोधन शाळेत काम करतात एवढेच माहिती आहे. मराठी दैनिकातून सामान्य वाचकाला समजेल अशा तऱ्हेने, वैज्ञानिकांचे काय कार्य चालू आहे व त्याला आंतरराष्ट्रीय मान्यता किती याची माहिती कोणत्याही तऱ्हेने दिली जाऊ नये याचे आश्चर्य वाटते. मराठी वर्तमानपत्रे नारळीकरांना अनुल्लेखाने मारतात का अतिसामान्य स्वरूपाच्या ' रुटिन ' कार्यात ते गुंतले आहेत ? अलीकडे त्यांच्या वैज्ञानिक कथा मात्र बऱ्याच मासिकातून नियमितपणे येतात. त्यांनी लिहू नये असे नव्हे. पण नारळीकरांची आठवण सामान्य माणसाला गोष्टींमुळे व्हावी, त्यांच्या संशोधनामुळे नव्हे, हीही वैज्ञानिक क्षेत्रातील शोकांतिकाच आहे व तिचे मूळ संबंध समाजाच्याच अवनत अवस्थेत शोधावे लागेल. जे. बी. एच. हाल्डेन या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधकाने भारतीय नागरीकत्व स्वीकारले त्याची आपण काय दैना केली होती हे सर्वज्ञात आहेच.

विद्वान, विचारवंत व साहित्यिक यांच्यात, काही अपवाद वगळता जी, लाचारी आढळते तिचे मूळही समाजाच्या अवनत अवस्थेतच शोधावे लागले. आज खरे पाहिले तर त्यांचे स्थान हेवा करण्यासारखे आहे. सामान्य बुद्धीच्या बहुसंख्य वाचकांमुळे सामान्य दर्जाच्या लेखकांनाही चांगली मागणी आहे. स्त्री–वाचकांची संख्या वाढल्यामुळे दिवाळी अंक उदंड झाले आहेत दोनचार नामवंत लेखक व पंधरावीस सुमार लेखक अशी साधारण प्रत्येक मासिकाची वाटणी आहे. हे नामवंत लेखकही सर्वसाधारणपणे सामान्य दर्जाचेच लिखाण करतात. कारण त्यांनाही आता वार्षिक, मासिक अथवा साप्ताहिक रतीब घालावयाचा असतो. संपादकांची प्रेमपत्रे व तारा यांच्या भिडेला बळी पडून काहीतरी खरडून देण्याची साथ इतकी पसरली आहे की, पु. ल. देशपांडे यांच्यासारखा लेखकही त्यातून सुटला नाही. ' अंबा पिकतो, रस गळतो, ' असा ललितरम्य लेख लिहिणाऱ्याने अंतुलेंच्यावर दख्खनी उर्दूच्या शैलीने ' अंतुले, तुम्हारा चुक्याच ' असा अतिसुमार लेख लिहावा याचे इंगित काय ?

' भिडे भिडे पोट वाढे ' अशी आजची मराठी साहित्याची स्थिती आहे. संपादकांना आज गरज असल्यामुळे त्यांना आज बहुप्रसव असणाऱ्या लेखकांचीही मनधरणी करावी लागते. वि. आ. बुवा यांचा विनोदी लेख आणि भाषणे यांनीदेखील पोट धरधरून हसणारा आजचा वाचक वर्ग आहे. अर्थात हे होणे अटळ आहे. कारण सर्वच साहित्य उच्च दर्जाचेच असले पाहिजे ही कल्पना अवास्तव आहे. जे उच्च दर्जाचे असते ते टिकून राहते. बाकीचे कालौघात नष्ट होते. पु. ल. देशपांडे यांचे बरेच विनोदी लेखन त्यांच्या हयातीतच जुने पुराणे झाले आहे. पण प्रश्न तो नव्हे. तर सामान्य दर्जाचा लेखकदेखील

आज त्याला मागणी असल्यामुळे आत्मविश्वासाने, क्वचित प्रसंगी अरेरावीने समाजात हिंडावयास पाहिजे. पण तसे न होता बहुसंख्य लेखक आणि विचारवंत यांत लाचारी का आढळते, यावर मुंबईला जे साहित्य संमेलन झाले त्यात विचार व्हावयास पाहिजे होता. पण नायपॉलने म्हटले आहे त्याची वारंवार आठवण होते. इंडियन्स कॅनॉट विथड्रा अँड अॅनलाईज. आणि ते खरे आहे. साहित्यिकांच्या लाचारीचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. नुसते लाचार आणि स्वाभिमानी लेखक असे वर्गीकरण करून 'स्वयंभू' स्वाभिमानी लेखकांनी इतरांना झोडपून काढणे हा प्रकार चातुर्वर्ण्य मानणाऱ्यांनाच शोभणारा आहे.

माणसाला समजून घेणे व तो विशिष्ट पद्धतीने का वागला हे जाणून घेणे हे मानवतावादाचे लक्षण आहे. पण मध्ययुगाकडे वाटचाल करणाऱ्या समाजात हे मूल्य नष्ट होऊ लागले तर नवल नाही. हाही महाराष्ट्राच्या शोकांतिकेचाच एक भाग आहे. काही लेखक जे लाचार म्हणून गणले गेले ते लाचार किंवा भिक्षुकी वृत्तीचे नसून स्वभावाने भिडस्त आहेत. आतिथ्याच्या मूल्याला ते जास्त महत्त्व देतात. गो. नी. दांडेकर किंवा महादेवशास्त्री जोशी या वर्गात मोडतात. निव्वळ लेखनावर जगणारी ही माणसे. सरकारी कृपेवर नव्हे. यांना लाचारी करण्याचे कारण काय ? जुनी भारतीय परंपरा मानणारी ही मंडळी. एखाद्याला एकदा पाहुणा म्हणून बोलावल्यावर तो जरी अद्वातद्वा वागला तरी ते सहन करण्याची यांची स्वाभाविक प्रवृत्ती. यांच्याकडून इतरांच्या दृष्टीने तेजस्वी पण त्यांच्या स्वतःच्या दृष्टीने अनुचित वागणुकीची अपेक्षा करता येणार नाही. या ठिकाणी हे स्पष्ट केले पाहिजे की, गो. नी. दांडेकर किंवा महादेवशास्त्री जोशी यांचे मला समर्थन करावयाचे नाही. मला एवढेच निदर्शनास आणावयाचे आहे की, अशाही एका तऱ्हेने त्यांच्या वागणुकीचा अर्थ लावता येईल. तो बरोबरच आहे असा माझा आग्रह नाही. एक शक्यता फक्त दाखवून दिली. ते लाचार असतील किंवा नसतील. पण महाराष्ट्रात लाचार नसलेले किती विचारवंत आहेत ? त्यांच्या बाबतीत निदान एवढे तरी नक्की म्हणता येईल की, उद्या त्यांनी भुंकायचे ठरवले तर मालकाच्या तोंडाकडे तरी पाहण्याची जरूर नाही. पु. ल. ही थोडेसे याच वर्गातले. यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केल्याखेरीज त्यांना राहवत नसे. आणि त्यात गैर काय आहे ? स्थानालाही महत्त्व असतेच.

लेखक आणि विचारवंतांच्या लाचारीचा विचार करताना लाचारी कशाला म्हणायचे येथपासून सुरुवात करावी लागेल. एखादा अपटुडेट पोषाख केलेला विक्रेता जेव्हा बोटबोट दाढी वाढलेल्या आणि गलिच्छ कपडे घातलेल्या पानवाल्याला पॉश टेम्पोमधून उतरून अजीजीने 'साब, क्या होना' असे विचारतो त्याला लाचारी म्हणता येईल का ? मध्यमवर्गाची आजची संस्कृती ही अशा विक्रेत्याची आहे. विक्रेत्याची स्वाभाविक वर्तणूक आणि लाचारी यांना विभागणारी रेषा अतिशय अस्पष्ट आहे. त्यामुळे आज लाचारीत काही जगावेगळे आहे असे समजले जात नाही. असा समाज वीरोचित कृत्य करण्यास अक्षम असल्यामुळे तसे धाडस दाखविण्याची प्रशंसा करण्यास नेहमीच तयार असतो. जे लेखक विचारवंत आर्थिक दृष्ट्या परावलंबी आणि किंवा निव्वळ महत्त्वाकांक्षी असतात विशेषतः

त्यांच्यासमोर जनतेची प्रशंसा की, समर्थांची अंतरे राखणे असा पर्याय असतो. आज लाचारीशिवाय किंवा तशाच काहीशा वर्तनाशिवाय जगूच शकणार नाही अशी परिस्थिती आहे. नोकरदारांवर नोकरीमुळे आणि स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्यांवर सरकारी नियमाच्या जाचामुळे कुणाची तरी लाचारी पत्करल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे अशा समाजात राहणारे बहुतेक लेखक दुसराच पर्याय उघड उघड पसंत करतात.

इतरांच्यातले काहीजण धूर्त असतात. तर काहीजणांना जे चालले आहे आहे ते ठीक नाही असे वाटत असते, पण अंगात साहस नसते. ते अधूनमधून आपल्या हितसंबंधांना धोका पोहोचणार नाही अशा बेताने शौर्याचे प्रदर्शन करीत असतात. आणि अगदी थोडे-जण कशाचीच पर्वा न करता आपल्या नैतिक मूल्यांचे जतन करतात व अशांना समाज डोक्यावर घेण्यास तयार असतो. दुर्गाबाई भागवत हे असे एक उदाहरण. दुर्गाबाईंची निस्पृहता ही समाजाला 'सहज' कृत्य न वाटता 'वीरोचित' कृत्य वाटते. व समाज अशा वीरांच्या शोधात असतो. नैतिक मूल्ये जतन करणाऱ्या समाजाला दुर्गाबाईंचे वर्तन 'सहज' वाटले असते तर इतरांचे वर्तन पचवून घेण्यास जड पडले असते. समाजालाही दुर्गाबाई आणि इतर यातला फरक समजतो. त्यामुळे समाज त्यांना वेगळ्या वर्गात घालतो. आज स्वाभिमान हे समाजाचे वैशिष्टच न राहता वीरांचेच वैशिष्टच राहिले आहे. आणि अशा वीरांची गरज समाजाला भासते हीही आजची शोकांतिका आहे. 'गॅलिलिओ' या नाटकात ब्रेख्टने म्हटले आहे, 'अनहॅपी इज द लॅंड दॅट इज इन नीड ऑफ हीरोज' आपल्या समाजाची ही अवस्था आहे. लोकशाहीमधे वीरांची आवश्यकता नसते. इंग्लंडच्या आधुनिक इतिहासात वीरांचा अभावच आहे.

साहित्यिक आणि विचारवंत यांच्यातील लाचारीचे कारण म्हणजे निव्वळ लेखनावर पोट भरणे अशक्य आहे हे होय. ही व्यथा पु. भा. भावे यांनी फार वर्षापूर्वीच बोलून दाखविली होती, 'रेझर्स एज' ही कादंबरी लिहिण्यासाठी सॉमरसेट मॉमला भारतात येणे आर्थिकदृष्टचा परवडत होते. या उलट मराठी लेखकाला त्याच्या वाङ्मयीन सेवेचा दोर करून जमल्यास शासकीय सहाय्याने वैयक्तिक अभ्युदय घडवून आणायचा असतो. व त्यासाठी शासनाची 'अंतरे राखणे' आवश्यक असते. त्यामुळे भावे यांच्यासारखा एखा-दाच लेखक स्वतःच्या धुंदीत जगतो व मंत्र्यांच्या उपस्थितीने बावचळून जात नाही. लाचारी प्रकर्षाने आढळते ती सामान्य वकूबाची महत्त्वाकांक्षी लेखक मंडळी आहेत त्यांच्यात. सरकारी खर्चाने ठिकठिकाणी जाणे, ज्या ठिकाणी अर्थार्जन होऊ शकेल अशा सरकारी समित्या वगैरे ठिकाणी नेमणुका करून घेणे, यासाठी मंत्र्यांच्या पुढे पुढे करणे यांना आवश्यक असते. एकंदरच सामाजिक जीवन भ्रष्टाचाराने भरलेले असल्यामुळे यात कमीपणाही वाटत नाही. अशी माणसे भेकडही असतात, कारण याचे बल स्वाभिमानी लेखकांप्रमाणे आत्मिक नसते तर शासनाने त्यांना टेकू दिलेला असतो, त्यात असते. पण असे लेखक निदान प्रामाणिक तरी असतात- ते कसे आहेत, त्यांना काय हवे आहे याची समाजाला पूर्ण कल्पना असते. व त्यांच्या वागणुकीमुळे सामाजिक जीवनावर कोणताही

बरावाईट परिणाम होणार नसतो.

पण लाचारी पुष्कळ वेळा प्रच्छन्नही असते. व ती जेव्हा स्वाभिमानाचे रूप धारण करून येते त्यावेळी समाजाच्या अधःपाताचा पायाच घातला जात असतो व समाजाचे वैचारिक नेतृत्व करू पाहणाऱ्या या मंडळीमुळे समाजाच्या भवितव्याबद्दलच साशंकता निर्माण होते. एका इंग्रजी वाक्प्रचाराप्रमाणे पावाच्या कोणत्या बाजूला लोणी लावलेले आहे हे त्यांना बरोबर माहिती असते व लोकांच्या डोळ्यात भरणार नाही अशा तऱ्हेने शासनाशी त्यांनी योग्य संधाने बांधलेली असतात व जेव्हा उपकुलगुरुपदी किंवा सरकारी समित्यांवर त्यांची नेमणूक होते तेव्हा शासनाला ते गौरवास्पद आहे असा आभास निर्माण करण्यात ते यशस्वी होतात. पण प्रत्यक्षात ते जे निर्णय घेतात किंवा ज्या दडपणांना बळी पडतात त्यांची माहिती समाजाला होत नसल्यामुळे सार्वजनिक नीतिमत्तेचा लोकांच्या नकळत अधःपात चालू असतो. पण तो छुपा असल्यामुळे त्याचे निदान रोग आटोक्याबाहेर गेल्यावरच होते व समाज त्याचा अपरिहार्यपणे स्वीकार करतो. एवढेच नव्हे तर संधी आल्यास स्वतःचाही अधःपात करवून घेण्यास लोकांची मानसिक तयारी होते. समाजाचा अधःपात उघडउघड लाचार मंडळींनी घडवून आणणे सर्वथैव अशक्य आहे. तो हे छुपे रुस्तुमच घडवून आणू शकतात. या लोकांची सरकारबरोबर उघड हात करण्याची तयारी नसते पण सरकारविरोधी संमेलनाला हजेरी लावण्याची मात्र ते दक्षता घेत असतात.

लाचारीचा आणखी एक प्रकार म्हणजे काही वेळेला ती स्थान सापेक्ष असते. म्हणजे असे की, ज्या ठिकाणी एखाद्याचा हितसंबंध गुंतलेला असतो तेवढ्यापुरता तो लाचार असतो आणि त्याच्या टोचणीमुळे त्याची भरपाई करण्यासाठी तो इतरत्र शौर्याच्या गर्जना करीत असतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. पाध्ये तडफदारपणे नवशक्तीमधून बाहेर पडल्यानंतर प्र. ठाकरेंच्या शब्दात 'युसिसच्या कुशीत शिरले' त्या ठिकाणी संधान बांधल्यानंतर अमेरिकन सरकारवर टीका करण्याचा अधिकार सहजच सीमित होतो. अमेरिकन धोरणावर कुठल्या मर्यादेपर्यंत टीका करता येईल याचा निर्णय त्याच्या नव्या धन्याचा राहील. त्यांचा स्वतःचा नव्हे.

तसेच मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक विद्यापीठातील भ्रष्टाचारावर टीका करू शकेल काय ? त्याला रीडरच्या जागेकरता आवश्यक ती पात्रता नसेल तर ती जागा मिळविण्यासाठी त्याला विभागप्रमुखांच्या मेहेरबानीवरच अवलंबून राहावे लागते ना. त्याशिवाय जेव्हा प्रोफेसरची जागा रिकामी होईल त्यावेळी 'महाराष्ट्रातील राजकारणावर संशोधन केलेल्यास प्राधान्य देण्यात येईल' अशी जाहिरात येण्यासाठीही दक्ष रहावे लागतेच. सरकारी नोकरांवर अनेक बंधने आहेत. यांनाही तसेच दबून रहावे लागते. बहुतेकांचीच अशी परिस्थिती आहे व मीही त्यापासून मुक्त नाही. अशा संबंधामुळेही वैचारिक स्वातंत्र्यावर गदा येत नाही काय व त्यासाठी काही उपाययोजना आहे काय याचा विचार कुठे होतो काय ? उलट असे दिसते की 'स्वयंभू' स्वाभिमानी मंडळी आत्मपरीक्षणाऐवजी किंवा

त्यांच्यासमोर जनतेची प्रशंसा की, समर्थाची अंतरे राखणे असा पर्याय असतो. आज लाचारीशिवाय किंवा तशाच काहीशा वर्तनाशिवाय जगूच शकणार नाही अशी परिस्थिती आहे. नोकरदारांवर नोकरीमुळे आणि स्वतंत्र व्यवसाय करणाऱ्यांवर सरकारी नियमाच्या जाचामुळे कुणाची तरी लाचारी पत्करल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे अशा समाजात राहणारे बहुतेक लेखक दुसराच पर्याय उघड उघड पसंत करतात.

इतरांच्यातले काहीजण धूर्त असतात. तर काहीजणांना जे चालले आहे आहे ते ठीक नाही असे वाटत असते, पण अंगात साहस नसते. ते अधूनमधून आपल्या हितसंबंधांना धोका पोहोचणार नाही अशा बेताने शौर्याचे प्रदर्शन करीत असतात. आणि अगदी थोडे-जण कशाचीच पर्वा न करता आपल्या नैतिक मूल्यांचे जतन करतात व अशांना समाज डोक्यावर घेण्यास तयार असतो. दुर्गाबाई भागवत हे असे एक उदाहरण. दुर्गाबाईंची निस्पृहता ही समाजाला 'सहज' कृत्य न वाटता 'वीरोचित' कृत्य वाटते. व समाज अशा वीरांच्या शोधात असतो. नैतिक मूल्ये जतन करणाऱ्या समाजाला दुर्गाबाईंचे वर्तन 'सहज' वाटले असते तर इतरांचे वर्तन पचवून घेण्यास जड पडले असते. समाजालाही दुर्गाबाई आणि इतर यातला फरक समजतो. त्यामुळे समाज त्यांना वेगळ्या वर्गात घालतो. आज स्वाभिमान हे समाजाचे वैशिष्टच न राहता वीरांचेच वैशिष्टच राहिले आहे. आणि अशा वीरांची गरज समाजाला भासते हीही आजची शोकांतिका आहे. 'गॅलिलिओ' या नाटकात ब्रेख्टने म्हटले आहे, 'अनहॅपी इज द लँड दॅट इज इन नीड ऑफ हीरोज' आपल्या समाजाची ही अवस्था आहे. लोकशाहीमधे वीरांची आवश्यकता नसते. इंग्लंडच्या आधुनिक इतिहासात वीरांचा अभावच आहे.

साहित्यिक आणि विचारवंत यांच्यातील लाचारीचे कारण म्हणजे निव्वळ लेखनावर पोट भरणे अशक्य आहे हे होय. ही व्यथा पु. भा. भावे यांनी फार वर्षापूर्वीच बोलून दाखविली होती, 'रेझर्स एज' ही कादंबरी लिहिण्यासाठी सॉमरसेट मॉमला भारतात येणे आर्थिकदृष्टचा परवडत होते. या उलट मराठी लेखकाला त्याच्या वाङ्मयीन सेवेचा दोर करून जमल्यास शासकीय सहाय्याने वैयक्तिक अभ्युदय घडवून आणायचा असतो. व त्यासाठी शासनाची 'अंतरे राखणे' आवश्यक असते. त्यामुळे भावे यांच्यासारखा एखा-दाच लेखक स्वतःच्या धुंदीत जगतो व मंत्र्यांच्या उपस्थितीने बावचळून जात नाही. लाचारी प्रकर्षाने आढळते ती सामान्य वकूबाची महत्त्वाकांक्षी लेखक मंडळी आहेत त्यांच्यात. सरकारी खर्चाने ठिकठिकाणी जाणे, ज्या ठिकाणी अर्थार्जन होऊ शकेल अशा सरकारी समित्या वगैरे ठिकाणी नेमणुका करून घेणे, यासाठी मंत्र्यांच्या पुढे पुढे करणे यांना आवश्यक असते. एकंदरच सामाजिक जीवन भ्रष्टाचाराने भरलेले असल्यामुळे यात कमीपणाही वाटत नाही. अशी माणसे भेकडही असतात, कारण याचे बल स्वाभिमानी लेखकांप्रमाणे आत्मिक नसते तर शासनाने त्यांना टेकू दिलेला असतो, त्यात असते. पण असे लेखक निदान प्रामाणिक तरी असतात- ते कसे आहेत, त्यांना काय हवे आहे याची समाजाला पूर्ण कल्पना असते. व त्यांच्या वागणुकीमुळे सामाजिक जीवनावर कोणताही

बरावाईट परिणाम होणार नसतो.

पण लाचारी पुष्कळ वेळा प्रच्छन्नही असते. व ती जेव्हा स्वाभिमानाचे रूप धारण करून येते त्यावेळी समाजाच्या अध:पाताचा पायाच घातला जात असतो व समाजाचे वैचारिक नेतृत्व करू पाहणाऱ्या या मंडळीमुळे समाजाच्या भवितव्याबद्दलच साशंकता निर्माण होते. एका इंग्रजी वाक्प्रचाराप्रमाणे पावाच्या कोणत्या बाजूला लोणी लावलेले आहे हे त्यांना बरोबर माहिती असते व लोकांच्या डोळ्यात भरणार नाही अशा तऱ्हेने शासनाशी त्यांनी योग्य संधाने बांधलेली असतात व जेव्हा उपकुलगुरुपदी किंवा सरकारी समित्यांवर त्यांची नेमणूक होते तेव्हा शासनाला ते गौरवास्पद आहे असा आभास निर्माण करण्यात ते यशस्वी होतात. पण प्रत्यक्षात तें जे निर्णय घेतात किंवा ज्या दडपणांना बळी पडतात त्यांची माहिती समाजाला होत नसल्यामुळे सार्वजनिक नीतिमत्तेचा लोकांच्या नकळत अध:पात चालू असतो. पण तो छुपा असल्यामुळे त्याचे निदान रोग आटोक्या-बाहेर गेल्यावरच होते व समाज त्याचा अपरिहार्यपणे स्वीकार करतो. एवढेच नव्हे तर संधी आल्यास स्वत:चाही अध:पात करवून घेण्यास लोकांची मानसिक तयारी होते. समाजाचा अध:पात उघडउघड लाचार मंडळींनी घडवून आणणे सर्वथैव अशक्य आहे. तो हे छुपे रुस्तुमच घडवून आणू शकतात. या लोकांची सरकारबरोबर उघड हात करण्याची तयारी नसते पण सरकारविरोधी संमेलनाला हजेरी लावण्याची मात्र ते दक्षता घेत असतात.

लाचारीचा आणखी एक प्रकार म्हणजे काही वेळेला ती स्थान सापेक्ष असते. म्हणजे असे की, ज्या ठिकाणी एखाद्याचा हितसंबंध गुंतलेला असतो तेवढ्यापुरता तो लाचार असतो आणि त्याच्या टोचणीमुळे त्याची भरपाई करण्यासाठी तो इतरत्र शौर्याच्या गर्जना करीत असतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. पाध्ये तडफदारपणे नवशक्तीमधून बाहेर पडल्यानंतर प्र. ठाकरेंच्या शब्दात 'युसिसच्या कुशीत शिरले' त्या ठिकाणी संधान बांधल्यानंतर अमेरिकन सरकारवर टीका करण्याचा अधिकार सहजच सीमित होतो. अमेरिकन धोरणावर कुठल्या मर्यादेपर्यंत टीका करता येईल याचा निर्णय त्याच्या नव्या धन्याचा राहील. त्यांचा स्वत:चा नव्हे.

तसेच मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक विद्यापीठातील भ्रष्टाचारावर टीका करू शकेल काय ? त्याला रीडरच्या जागेकरता आवश्यक ती पात्रता नसेल तर ती जागा मिळविण्यासाठी त्याला विभागप्रमुखांच्या मेहेरबानीवरच अवलंबून राहावे लागते ना. त्याशिवाय जेव्हा प्रोफेसरची जागा रिकामी होईल त्यावेळी 'महाराष्ट्रातील राजकारणावर संशोधन केलेल्यास प्राधान्य देण्यात येईल' अशी जाहिरात येण्यासाठीही दक्ष रहावे लागतेच. सरकारी नोकरांवर अनेक बंधने आहेत. यांनाही तसेच दबून रहावे लागते. बहुतेकांचीच अशी परिस्थिती आहे व मीही त्यापासून मुक्त नाही. अशा संबंधामुळेही वैचारिक स्वातंत्र्यावर गदा येत नाही काय व त्यासाठी काही उपाययोजना आहे काय याचा विचार कुठे होतो काय ? उलट असे दिसते की 'स्वयंभू' स्वाभिमानी मंडळी आत्मपरीक्षणाऐवजी किंवा

दुसऱ्याला समजून घेण्याऐवजी आपला कमकुवतपणा झाकण्यासाठी ज्यांच्यामुळे त्यांचा हितसंबंधाना बाधा पोहचणार नाही अशांच्यावर त्वेषाने तुटून पडून आपल्या बाह्यात्कारी शौर्याचे प्रदर्शन करून स्वत:ला आणि समाजालाही फसवीत आहेत.

वैचारिक स्वातंत्र्याच्या बाबतीत आणखीही एक मुद्दा उपस्थित होवो. तो म्हणजे रेडिओ आणि टी. व्ही. वरील भाषणे सेन्सॉर होतात. त्याविरुद्ध या 'स्वाभिमानी' लोकांचे धोरण काय आहे ? जोपर्यंत अशा तऱ्हेचे निर्बंध आहेत तोपर्यंत आम्ही रेडिओ किंवा टी. व्ही. शी कोणताही संबंध ठेवणार नाही अशी मास्तर कृष्णरावांसारखी जिद्द ते का दाखवत नाहीत. कारण त्यामुळे मिळणाऱ्या वैयक्तिक प्रसिद्धीला मुकण्याची त्यांची तयारी नसते. आणि एक फडके गेले तर अनेक चिंध्या गोळा करणे रेडिओ किंवा टी.व्ही. वाल्यांना शक्य असते हे त्यांना माहीत असते. त्यामुळे त्या क्षेत्रात शासनाशी सहकार्य करणे त्यांना अवघड वाटत नाही. वस्तुतः आज शासनाशी आपला इतक्या तऱ्हेने संपर्क येतो की, शासनाशी असहकार ही कल्पनाच अशक्य कोटीतील आहे. त्यापेक्षा शासनाशी प्रतियोगी सहकारितेचे तत्त्व अंगिकारणेच वैचारिक प्रामाणिकपणाला धरून राहील व तीनच नव्हे तर शंभर मंत्र्यांना बोलावूनही त्यांना त्यांची रसिक म्हणून जागा दाखवणे हे जास्त अगत्याचे आहे. शासनाकडून अनुदान घेऊनही 'आम्ही काय कुणाचे खातो' ही वृत्ती बाळगणे हेच निरपेक्षतेचे लक्षण आहे. पण त्यासाठी आत्मविश्वासाची जरूर आहे. 'स्टेट आणि गव्हर्नमेंट'ची रेकॉर्ड पुन्हा पुन्हा लावून त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. तर मंत्र्याला लग्नाचे आमंत्रण दिले म्हणजे त्याला कोणी नवऱ्या मुलाच्या जागी बोहोल्यावर उभे करत नाही याची जाणीव मंत्र्यांना त्यांच्या उपस्थितीतच संमेलनात द्यावयास पाहिजे. तरच वैयक्तिक जीवनाची सूत्रे विचारवंतांच्या हातात राहातील. रुसून पर्यायी संमेलने भरवून हे होणार नाही. जेथे जेथे वैचारिक स्वातंत्र्याला आव्हान मिळत असेल तेथे तेथे आमंत्रण नसतानाही जाऊन त्याचा घोष करावयास पाहिजे. पण महाराष्ट्रात आता वैचारिक निर्भयता कितीशी शिल्लक राहिली आहे ?

प्रथमच हे स्पष्ट केले पाहिजे की, साहित्याबद्दल लिहिताना मी साहित्यबाह्य निष्कर्ष वापरणार आहे. समीक्षा अथवा परीक्षणे करणे हा माझा हेतू नाही आणि सामान्य वाचक या नात्याने माझा तो अधिकारही नाही. पण समाजजीवनाचा प्रभाव साहित्यावर पडणे अटळ असते आणि तो तपासण्याचा माझा प्रयत्न आहे. जोम नष्ट होत चाललेल्या समाजात परिश्रमाचा अभाव, निव्वळ जगण्यासाठी धडपड, आव्हानांना सामोरे जाण्याची अनिच्छा, वास्तवापासून पलायन, भूतकालाचे उदात्तीकरण इ. प्रवृत्ती आणि सर्जनशील कलांची अवनती आणि संशोधक वृत्तीचा अभाव ही वैशिष्टचे आढळतात. बाल्झॅकने एका ठिकाणी म्हटले आहे की, 'सतत परिश्रम हा जीवनाचा आणि कलेचाही धर्म आहे. श्रेष्ठ कलावंत आणि खरे कवी हे अविश्रांतपणे निर्मिती करत असतात आणि त्यातून शेवटी स्वत:ला वेठीला ( toil ) धरणे ही सवय होते.' मराठी साहित्याचा परामर्ष घेताना साहित्य निर्मितीचा दर्जा काय, त्याच्या मागे परिश्रम किती आणि त्याच्यावर समाज-

जीवनाचा प्रभाव किती एवढ्यापुरताच विचार करणार आहे. तो करीत असताना मराठी साहित्याची प्रगती होत आहे की, परागती याचा फक्त आलेख काढण्याचा प्रयत्न करणार आहे व त्यासाठी मराठीतील जे नावाजलेले लेखक आहेत त्यांच्या बोलबाला झालेल्या काही कृतींचा आधार घेणार आहे.

वैचारिक निर्भयतेचा आणि मानवतावादाचा अभाव, पाश्चात्यांचे मानसिक दास्य, समाजाने स्वीकारलेली विक्रेत्याची संस्कृती, त्यातून साहजिकच निर्माण होणारा जाहिरातबाजीचा प्रभाव आणि चिंतनशीलतेचा अभाव, टिकाऊपेक्षा विकाऊ माल निर्माण करण्याची प्रवृत्ती, मध्यमवर्गाने आत्मसात केलेले आत्मसंतुष्टता आणि वैफल्यग्रस्तता हे परस्पर विरोधी विशेष किंवा 'थ्रिल' मध्ये समाधान शोधणे, याचा परिणाम ललितकलांवरही झाला असल्यास नवल नाही. आणि कलावंत सर्वसाधारणपणे आशय सोडून तंत्राच्याच मागे लागला.

बुद्धिवंत व कलावंत हा स्वभावतःच अस्वस्थ असतो. उत्कटतेचा अभाव आणि आत्मसंतुष्टता ही त्याच्या सर्जनशीलतेची अखेर असते. त्यानंतर तो जे करतो ती निव्वळ 'वीण' असते, निर्मिती नसते. कलावंताच्या या अस्वस्थतेचे अत्यंत मनोज्ञ चित्रण आयर्विंग स्टोन या लेखकाने मायकेल अँजेलोच्या जीवनावर 'अॅगनी अॅड एक्स्टसी' ही कादंबरी लिहिली आहे त्यात केले आहे. अशा तऱ्हेच्या अस्वस्थ, बेचैन किंवा तरल मानसिक अवस्थेत बुद्धिवंत किंवा कलावंत यांच्या मनात त्यांच्या अनुभवाशी संबंधित अशा भावना किंवा विचार यांचा कल्लोळ होतो व त्यातून त्याच्या मनात चिंतनातून हळूहळू एक जिवंत वाटणारी आकृती साकार होते व त्याची अनुभूती ललित लेखन, शिल्प, चित्र अथवा तत्त्वज्ञान यांच्याद्वारे तो रसिकापर्यंत पोचती करतो. ही बेचैनी, अस्वस्थपणा तुकाराम, रामदास, केशवसुत, मर्ढेकर, हरीभाऊ आपटे, केतकर, शिवरामपंत परांजपे, आगरकर, वा. म. जोशी, अत्रे, पाध्ये आणि इतर अनेकांच्या लेखनात आढळते.

मी स्वत: वैचारिक लेखन आणि ललित लेखन यांच्यात फरक करीत नाही. कारण अनुभव ज्यावेळी बाहेर पडण्यासाठी अनावर होतो व त्याला चिंतनाची आणि मानवतावादाची जोड असते त्यावेळी तो सहजपणेच कलाकृतीचे रूप धारण करतो व त्याला वाङ्मयीन दर्जा येतो. मग ते ज्ञानेश्वर, रसेल यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान, रॉबिन्सनने लिहिलेले अर्थशास्त्रावरील पुस्तक, अॅन्सनने लिहिलेले कायद्यावरील लिखाण, रॉबर्टसनसारख्याचे व्यवस्थापनासारख्या रुक्ष विषयावरील विवेचन, सीझर, बाबर, लक्ष्मीबाई टिळक यांची आत्मचरित्रे, टॉयन्बी किंवा बिल ड्यूराँ यांचे ऐतिहासिक लेखन, क्लाइव्हसारख्याचे आपल्या कारस्थानाचे वर्णन, अ. भि. शहा यांचे वैचारिक लेखन किंवा तळवलकरांचे अग्रलेख असोत.

ही यादी कितीतरी लांबविता येईल. अर्थात त्यातील सौंदर्य सर्वांनाच किंवा एकाचवेळी प्रतीत होईल असे नव्हे. भवभूतीचीदेखील समानधर्मा भेटण्यासाठी अनंतकाल थांबण्याची तयारी होती. मर्ढेकर त्यांच्या मृत्यूनंतर पंचवीस वर्षांनी लोकप्रिय होत असल्याचे दृश्य

दिसत आहे. तीस एक वर्षांपूर्वी मी केतकरांची ब्राह्मणकन्या पुरी वाचू शकलो नव्हतो. पण ती अलीकडेच वाचली त्यावेळी त्यात एक वेगळेच सौंदर्य प्रतीत झाले. महाराष्ट्रात आज अशा तऱ्हेचे लेखन कितीसे होत आहे ? आज साधारणपणे उत्कटता आणि अस्वस्थता यांचा अभाव जाणवत असून, प्रामुख्याने लेखनात आढळतो तो आत्मसंतुष्टपणा किंवा विषाद.

ललित लेखकांपैकी जे आदर्शवादी होते त्यांचे भावविश्व स्वातंत्र्यानेच जमीनदोस्त केले. त्यांचे प्रतिनिधित्व खांडेकरांच्या ' अश्रू ' कादंबरीतील शंकर करतो. महायुद्ध होऊन गेले, त्याचे सर्वंकष परिणाम भारतातही जाणवले तरी शंकर स्वातंत्र्यपूर्व कालातच वावरतो. त्याला नवी आव्हाने समजलीच नाहीत तिथे पेलण्याचा भागच येत नाही. थोड्याफार फरकाने त्या पिढीतील सर्वच ललित लेखकांच्या बाबतीत हे विधान करता येईल. सर्वचजण गोंधळून गेले होते. कारण रोमँटीक कादंबरी किंवा कविता लिहिण्याकरता जो उच्छृंखल उत्कटपणा लागतो तो निर्माण करण्याची शक्ती स्वातंत्र्य चळवळीने निर्माण केलेल्या उर्मीत निश्चित होती. पण स्वातंत्र्याबरोबरच प्रणयकाल संपला आणि राष्ट्राच्या प्रत्यक्ष संसाराला सुरुवात झाली होती. जातीय दंगलीवर एखादी कादंबरी किंवा काही गोष्टी लिहिता येतील, त्याप्रमाणे बिवलकरांनी 'सुनीता' ही कादंबरी आणि पु. भा. भावे यांनी गोष्टी लिहिल्या, पण राज्यघटना, पंचवार्षिक योजना किंवा कुळकायदा या गोष्टी ललित लेखनासाठी कुचकामाच्या आहेत.

त्यात भर पडली ती स्वातंत्र्यानंतरच्या भ्रमनिरासाची. त्यामुळे खांडेकरांनी स्वतःला जुन्या कालात हरवून टाकले आणि ' ययाति ' लिहिली. त्यांना अनुसरून अनेकांनी पौराणिक किंवा ऐतिहासिक व्यक्तींचे उदात्तीकरण करण्यास सुरुवात केली. शिवाजी, पहिले माधवराव, दुसरा बाजीराव, त्र्यंबकजी डेंगळे, कर्ण यांच्या जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या. पण त्यात या व्यक्तीतील माणूस शोधण्याचा प्रयत्न आयर्विंग स्टोनप्रमाणे करण्यात आला का ? त्या कालातील जीवनाचा संपूर्ण आलेख वाचकांपुढे उभा करण्यात त्यांना यश मिळाले, का निव्वळ शब्दांचा फुलोरा आणि ऐतिहासिक किस्सेच उभे करण्यात आले ? या सर्व लेखनाची स्फूर्ती आजच्या समाजजीवनात ज्या गोष्टी खटकतात त्यांच्या विरोधी प्रतिक्रियेतून निर्माण झाली असून सद्यःपरिस्थितीचे सावट त्यावर पडले आहे काय ? अशा शंका माझ्यासारख्या सामान्य वाचकासमोर उभ्या राहतात. मानवतावाद–माणसातला माणूस ओळखणे आणि त्याचे सहृदयतेने विश्लेषण करणे हे प्रबोधनकालाचे वैशिष्टय समजले जाते आणि सर्जनशीलता नष्ट होणे हे तमोयुगाचे लक्षण मानले जाते. त्यादृष्टीने या लेखनाचे मूल्यमापन झाले आहे काय ? त्यातील ऐतिहासिक तपशीलाच्या चुकांना या दृष्टिकोनातून काहीच महत्त्व मी देत नाही. कलाकृती म्हणूनच त्यांचे मूल्यमापन व्हावयास पाहिजे.

स्वामी ही रणजित देसाई यांची अत्यंत गाजलेली कादंबरी. थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावरील या कादंबरीचा प्रभाव येवढा की, विस्मृतीत पडलेले थेऊर काद-

बरीच्या प्रकाशनानंतर पुन्हा तीर्थक्षेत्र बनले आणि थेऊरला जाणारी पाऊलवाट राजमार्ग बनली. पण पेशवाईतील समाजजीवनाचे प्रतिबिंब या कादंबरीत उमटले आहे की, निव्वळ माधवरावांचे उदात्तीकरण करणारे किस्सेच आहेत ? माधवराव कर्तबगार राजकारणी पुरुष होते. पोरवयात पडलेली जबाबदारी त्यांनी विलक्षण समर्थपणे पेलली. त्यांच्या अकाली निधनाने न हळहळणारा मराठी माणूस मिळणार नाही. सर रिचर्ड टेंपल, ग्रँट डफ, किंकेड या इंग्रज इतिहासकारांनीही त्यांची थोरवी मान्य केली. तथापि ज्या दूरदृष्टीने शिवाजीने मराठी राज्याची स्थापना केली त्या स्वराज्याची पेशवाई ही शोकांतिका होती. निरनिराळे प्रदेश शिवाजीप्रमाणे एका शासकीय यंत्रणेखाली आणण्याऐवजी मुलुख मारणे आणि लूट करणे एवढेच राजकारण पेशवाईत परंपरेने झाले. या शोकांतिकेच्या संदर्भात माधवरावांमधला माणूस शोधण्याचे प्रयत्न या कादंबरीत व्हावयास पाहिजे होते. पण 'रमा–माधवाच्या' आरतीपलीकडे या कादंबरीत काहीच सापडत नाही.

याच कादंबरीत रमाबाई सती जाण्याचा प्रसंग आहे. एका बाजूने सतीची चाल अमानुष म्हणावयाचे आणि दुसऱ्या बाजूला कादंबरी अशा तऱ्हेने रंगवावयाची की, रमाबाईचे सती जाणे हा तिचा उत्कर्षबिंदू ठरावा. ज्या संस्कृतीत एका काळी स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचे स्थान होते तिच्यात सतीची चाल सुरू व्हावी ही त्या संस्कृतीची अवनती होती. पण तशी ती न रंगवता सती जाण्याचे उदात्तीकरण केले जावे हे विपरीत वाटते. विकेशा होणे किंवा सती जाणे यापलीकडे विधवा ब्राह्मण स्त्रीला पर्याय नसणे ही महाराष्ट्रातील ब्राह्मण स्त्रीची शोकांतिका होती. पण तशी ती रंगवली गेली नाही. सती जाण्याचा महिमा एवढा मोठा की, भले भलेदेखील थकले. आणि त्या भल्या लोकात साक्षेपी विचारवंत नरहर कुरुंदकरही हजेरी लावून गेले. 'रमाबाईंचे सती जाणे ही वैयक्तिक मूल्यांनी उच्चतर सामाजिक मूल्यांना दिलेली मानवंदना आहे,' असे लाखमोलाचे सर्टिफिकीटही त्यांनी देऊन टाकले. आता सती जाण्यात कोणते वैयक्तिक मूल्य आहे, कोणचे उच्चतर सामाजिक मूल्य आहे आणि कशाची कशाला मानवंदना आहे ? प्रश्न असा पडतो की, रणजीत देसाई, नरहर कुरुंदकर आणि देवराला येथे रूपकुंवर सती गेल्यानंतर जमणारे लाखो लोक यांच्यात काही फरक आहे का ? अखेर बळी पाहून आपण सुखावतो आणि भारावतो हेच खरे !

स्वामी कादंबरी लिहिताना लेखकाने निदान समर्थ व्यक्तींची तरी निवड केली होती. पण 'मंत्रावेगळा' या कादंबरीत लेखकाने दुसऱ्या बाजीरावाचेही उदात्तीकरण करावे ही ऐतिहासिक कादंबरी लेखनाचीच शोकांतिका आहे.

रणांगण या कादंबरीने कादंबरी लेखनात एक नवे युग सुरू केले असे म्हणतात. पण हा प्रयत्न इतका क्षीण होता की, मराठी कादंबरीचा थिटेपणाच जास्त उघडा पडतो. स्वातंत्र्योत्तर कालातील मराठी कादंबरी लेखकांच्यात मध्यम वर्गाचे सर्वच गुणदोष आढळतात. अनुभवाचा तोकडेपणा, आत्मसंतुष्टतेतून निर्माण होणारी उपरी सहानुभूती किंवा विषादातून निर्माण होणारी उथळ खंत, लेखक स्वतःच एकाच बौद्धिक पातळीवर

बसून राहिलेला असल्यामुळे कितीही अनुभवातून गेली तरी न वाढणारी पात्रे अशी काही ठळक वैशिष्टचे मराठी कादंबरीची सांगता येतील.

नव्वा पिढीतील लेखकांची कुवत सर्वसाधारणपणे एकच चांगली कादंबरी लिहिण्याची असते आणि ती म्हणजे आत्मचरित्र. पण मागणी असल्यामुळे ते बऱ्याच कादंबऱ्या लिहितात. आणि त्यात एकाच अनुभवाची पातळी निरनिराळ्या प्रसंगातून (सिच्युएशन्स) फिरवलेली असते. निरनिराळ्या पातळ्यांवर अनुभव घेण्याची बौद्धिक आणि मानसिक कुवत नसल्यामुळे आणि चिंतनशीलतेच्या अभावामुळे एकाच लेखकाने लिहिलेल्या अनेक कादंबऱ्यातून स्वतंत्र अस्तित्व असलेली पात्रे दिसण्यापेक्षा लेखक स्वतःच दिसतो.

श्री. ना. पेंडसे लेखक म्हणून 'गारंबीच्या बापू'तच संपतात. इतर कादंबऱ्यातील पात्रे जरी 'गारंबी'त घुसवली तरी फिट्ट बसतील. फक्त उपकथानके वाढतील. एका नव्या विषयावरील कादंबरी म्हणून 'ऑक्टोपस' मोठ्या आशेने वाचावयास घेतली तर तंत्रापलीकडे हाती काहीच लागले नाही. 'सेक्स'वर इतके पोरकट लिखाण व्हावे याचे आश्चर्य वाटते. मनुष्य 'सेक्स' इतक्या पातळ्यांवर जगत असतो की, असा विषय सर्जनशील लेखकाला आव्हानात्मक वाटाव्या. 'होमोसेक्स्युअल्स' जर मध्यमवर्गीय असतील तर ते त्याचेदेखील तत्त्वज्ञान बनवू शकतात. ती कदाचित नुसतीच सवय नसते.

स्त्री–पुरुष संबंधदेखील अनेक मानसिक पातळीवर असू शकतात. त्यांचा संबंध उपजत प्रेरणा, संस्कारक्षम वयात एखादा मनावर कोरून गेलेला प्रसंग, जीवनातले इतर अनुभव यांच्याशीही असतो. हे सर्व एका सूत्रात बांधण्यासाठी आवश्यक ते ज्ञान, पात्राबद्दल सह–अनुभूती, चिंतन यांची जरुरी असते. ते या कादंबरीत आढळते का? यानंतर माडगूळकरांची 'बनगरवाडी' आणि जयवंत दळवी यांची 'चक्र' असे काही अपवाद सोडले तर मानवी जीवनाचे यथार्थदर्शन कितीशा कादंबऱ्या घडवतात. 'थॅंक यू मि. ग्लॅड' आणि 'अकरा कोटी गॅलन पाणी' या अलीकडील कादंबऱ्या 'श्री' साप्ताहिकाच्या वाचकांची आवड पुरवणाऱ्याच आहेत. त्यात भरीला गो. नी. दांडेकरांसारखे कीर्तनकारही आहेतच. कीर्तनकार ज्याप्रमाणे एखादी ओळ घेऊन पूर्वरंग सजवतो त्याप्रमाणे एखादा लहानसा अनुभव घेऊन तो कथेकरी बाजाने मांडणे हा प्रकार गो. नी. दांडेकर यांच्या कादंबऱ्यात आढळतो. 'पडघवली' या कादंबरी प्रस्तावनेत ते म्हणतात ' ही कादंबरी नव्हे; ते एका नष्ट होऊ घातलेल्या खेड्याचे शब्दचित्र आहे. कारखाने आणि उद्योगधंदे यांचे केन्द्रीकरण झाल्यामुळे नवसर्जनशील मनुष्यशक्तीचे शहरात जे विलीनीकरण होत आहे, ते भयानक आणि विचारी माणसाला चिंतीत करणारे आहे. 'पडघवली' या सर्व मरगळ आलेल्या खेड्यांची प्रतिनिधी आहे.' साहजिक खेडेगावातील जीवन व त्यावर शहरीकरणाचे परिणाम, त्यातून निर्माण होणारे तणाव, हे चित्रित करणारी कादंबरी वाचावयास मिळेल अशी अपेक्षा निर्माण होते. पण भाऊबंदकीपलीकडे या कादंबरीत काहीच नाही. त्यावर फारतर एक गोष्ट लिहिता येईल. मग तिची कादंबरी बनवण्यासाठी दांडेकरांनी कथेकऱ्याचे सर्व कसब पणाला लावले. सुरुवातच मुळी शिवकालापासून. नंतर देवीचा दृष्टांत,

डोहाळजेवण, गंडमाळा झालेला नाग, मुसलमानांचा हल्ला, रामशास्त्री प्रभुणे, सोळा सोमवार, मधे भाऊबंदकी आणि शेवटी मूळपुरुषाचा दृष्टांत. या सर्व गोष्टींचा आणि 'मरगळ आलेल्या खेड्याचा' काही संबंध आहे का? पण कीर्तनकाराला सर्वच क्षम्य असते. तरीपण दांडेकर थोडेसे थकलेच. कोकणातल्या खेड्यावरील कादंबरी म्हणजे वास्तविक त्यांनी परशुरामापासूनच सुरुवात करावयास हवी होती. म्हणजे आणखी शे-दोनशे पाने सहज वाढवता आली असती, आणि पृष्ठसंख्या वाढली की, पुस्तकाची किंमत वाढते आणि त्याबरोबर रॉयल्टीपण. मागे जयवंत दळवी यांनी एका मुलाखतीत नेमके याच मुद्द्यावर बोट ठेवले होते. त्यांची 'चक्र' कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर ना. सी. फडके यांनी त्यांना हा 'नाद' सोडण्याचा सल्ला दिला होता. चक्र कादंबरी १५०/१७५ पानांचीच आहे, येवढी लहान कादंबरी लिहून लेखकाला प्राप्ती होणार नाही असे फडक्यांनी सुचविले होते. तंत्र, शब्दाचा फुलोरा, काही भडक वा करुण प्रसंग, मनोविश्लेषणाचा थोडासा थाट, अनपेक्षित अथवा हृदयद्रावक शेवट असा एकंदर हल्लीच्या कादंबऱ्यांचा साचा आहे. कादंबरीचे वाचन हा एक अनुभव ठरावा असे किती कादंबऱ्यांच्या बाबतीत घडते? या दृष्टीने गुजराथी लेखक चंद्रकांत बक्षी यांच्या 'पॅरॅलिसिस' या कादंबरीचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. या कादंबरीला सांकेतिक अर्थाने शेवटच नाही आहे.

पु. ल. देशपांडे यांनी खास भलावण केली म्हणून 'बलुतं' कादंबरी वाचली. त्याचा लेखक दलित वर्गातून आला आहे या पलीकडे कोणते वैशिष्टचे त्यात आहे? दलितांना सोसाव्या लागणाऱ्या यातनांचा प्रत्यय वाचकापर्यंत पोचविण्यास लेखकास अपयश आले आहे. याचे कारण तो अनुभव समर्थपणे पेलण्याऐवजी तो त्यापासून पळून जात असल्याचे आढळते. त्यामुळे 'यातनेतून सुटके'चा आढावाच त्यात घेतला आहे. 'राजर्षीचा ब्रह्मर्षी कसा झाला' किंवा 'गोखल्यांचे रास्ते कसे झाले', या चालीवर 'दलितांचा पांढरपेशा कसा झाला' याची कथा वर्णन करणारे रंजक पुस्तक यापलीकडे त्याला स्थान नाही. दलित लेखनाचाही आता साचा ठरून गेला आहे. जखमांचे प्रदर्शन करणे व त्यातून वाचकाच्या मनात दया निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. अशा दयेचे प्रदर्शन करणारे अनेक सवर्ण ठेकेदार तयार आहेतच. पण ही दया दाखविणारा व दाखवून घेणारा या दोघांचाही नैतिक अधःपातच होतो. दया दाखवणारा अहंकारी होतो, तर दया दाखवून घेणारा आत्मविश्वास गमावतो. वाचकाला अंतर्मुख करून त्याच्यातील मानवतेला आवाहन करून त्याला अपराधी वाटावयास लावेल असे समर्थ लेखन कितीसे दलितांनी केले आहे? कडकलक्ष्मी आपल्याच अंगावर आसूड मारून घेताना पाहून येणारा-जाणारा क्षणभर हळहळतो व पुढे जातो तसे दलित लेखनाचे होऊ नये असे मनोमन वाटते.

प्रा. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' याबद्दलही हेच म्हणता येईल. 'मी व्हाईस प्रिन्सिपल झालो' हे या पुस्तकाचे पालुपद. पुस्तकात ते कितीवेळा आले आहे हे मोजण्याचा मी प्रयत्न केला, पण यशस्वी झालो नाही. अर्थात ज्या सामाजिक चौकटीत राहून

त्यांनी यश मिळविले त्याचे प्रत्येकालाच कौतुक वाटेल. पण त्यांनी उत्कर्ष कसा करून घेतला यावरच पुस्तकाचा भर असल्यामुळे वाचकाचे लक्ष सतत त्यांच्या यशाकडील वाट-चालीकडे केन्द्रित होते. व त्यामुळे वाचकाला अंतर्मुख करणे हा जो पुस्तकचा मुख्य उद्देश तो निसटून जातो. या पुस्तकाच्या वाचनाने सर्कशीतला एखादा प्रयोग पाहिल्याचेच समा-धान मिळते.

लक्ष्मण माने यांनीही आपल्या ' उपरा ' या आत्मचरित्रात आपल्या उत्कर्षाचाच आलेख काढला आहे. पण ते करीत असताना त्यांनी अजाणतेपणी सवर्ण व दलित यांच्यात अस-लेल्या उच्चनीचतेच्या कल्पनांच्या मुळाशी आज जे एक कारण असू शकते त्याच्यावर नेमके बोट ठेवले आहे. पांढरपेशे होऊन एका मराठा मुलीशी लग्न केल्यानंतर माने यांची आई व इतर लोक त्यांना भेटावयास येतात आणि त्याबद्दलची नाराजी अत्यंत तीव्र भाषेत व्यक्त करतात. मराठा मुलीने कैकाडयाशी लग्न केले याचे त्यांना आक्रीत वाटते व त्या संबंधात एकजण म्हणते ' अग लवडा बघून आली ना... तिला का बगताय ?' अशा तऱ्हेने इतरही बरेच ग्राम्य शेरे मारले जातात. माने यांना ते आवडत नाही. पण दुःखात सुख एवढेच की, त्यांच्या पत्नीला कैकाडी भाषा येत नसल्यामुळे तिला ते समजत नव्हते. आणि मग ९६॥ टक्केवाल्यांच्या भाषेची तरफदारी करणाऱ्या माने यांच्या लेख-णीतून ३॥ टक्केवाल्यांचीच भाषा उतरते. ' सगळयांना मी सोंग करतोय असं वाटलं. खरं तर अंगात ताप होता. खूप मानसिक त्रास झाला होता. डोकं दुखत होतं. आणि या कैकाडणी आणि सारे पाहुणेराउळे दारात, घरात...बाया बोलत होत्या ते लिहिण्यासारखं आणि सांगण्यासारखं नव्हतं—ओरडून सांगावं आणि साऱ्यांना हाकलून लावावं असं सारखं वाटत होतं.' दलितांनी आपली भाषा, राहणी या गोष्टी बदलल्या म्हणजे त्यांच्यात आणि उच्चवर्गीयात असलेला एक अडथळा दूर होईल. कारण कैकाडी जातीत जन्म घेऊनही जर माने यांना ती भाषा खटकते आणि आपल्याच जातीतल्या स्त्रियांचा ' कैकाडणी ' म्हणून रूढार्थाने अधिक्षेप करतात मग इतरांनी ती भाषा सोसावी असा त्यांचा आग्रह का ? त्यांच्याच नात्यातील एक स्त्री रोज स्नान करीत असे, केस विंचरीत असे म्हणून तिला सर्वजण नावे ठेवीत असत. दलितांची राहणी सुधारावी म्हणून माने काय करीत आहेत हे जाणून घेण्याची मला इच्छा आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे याची जाणीव-देखील त्यांच्या पुस्तकात कुठे आढळत नाही. सवर्णावर त्यांनी सडकून टीका करावी. तो त्यांचा हक्कच आहे. पण आत्मपरीक्षणाचे त्यांना वावडे का ?

याचे कारण एकच. ते म्हणजे माने हिंदू आहेत. ज्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्यांनाही हिंदुत्वाने सोडले नाही. मग भले ते आम्ही हिंदू नाही म्हणून म्हणोत. स्वतःचा उद्धार झाला म्हणजे झाले. मग बाकीचे मरेनात का हीच वृत्ती याच्या मुळाशी आहे. हल्ली दलितांच्या तोंडी विद्रोहाची भाषा आढळते. पण हा विद्रोहही हिंदु विद्रोहच आहे. म्हणजे वैयक्तिक उत्कर्ष करून घेण्यासाठी विद्रोहाची भाषा फक्त शहरात वापरली जाते. खेडेगावातल्या लोकांना विद्रोह शिकविण्याची खरी जरुरी आहे. तिथे हे लोक जायला तयार आहेत का ?

पण यापेक्षाही खेदाची गोष्ट म्हणजे जो न्याय बौद्ध सवर्णांकडून मागत आहेत तोच न्याय ते चर्मकार, मातंग या जातींना करावयास तयार नाहीत. व राखीव जागांवर बौद्धांचीच निवड झाल्याचे आढळते.

शंकरराव खरात किंवा अर्जुन डांगळेसारखा होतकरू लेखक असे काही अपवाद वगळले तर संयत लेखन आणि अस्वस्थता निर्माण करण्याची क्षमता दलित लेखकात आढळून येत नाही. खरात यांनी आयुष्यभर आलेले अनुभव समर्थपणे पचवले आहेत आणि एका तटस्थपणे 'तराळ आणि अंतराळ' या आत्मचरित्रात वर्णन केले आहेत. त्यात कोणताही अभिनिवेश नाही. केवळ उत्कर्षाचा आढावा नाही. आहे तो एक सनातन प्रश्न. 'माणसाला माणूस अमानुषपणे का वागवतो ?' Much it grieved my heart to see what has made of man या भूमिकेतून लिहिलेले हे आत्मचरित्र वाचकाला अंतर्मुख करते. एक इंग्रज टीकाकाराने म्हटले आहे की, सोसणारा माणूस आणि सर्जनशील मन यात जितका जास्त अंतराय असतो तितकी कलाकृती जास्त परिपूर्ण होते. त्याची प्रचीती या पुस्तकाने मिळते.

हरी नारायण आपटे यांनी 'पण लक्षात कोण घेतो.' या कादंबरीत निव्वळ सहानुभूतीने यमूच्या जीवनाचे प्रत्ययकारी वर्णन केले आहे. अनिल अवचट यांच्या 'माणसं' या पुस्तकाचे वाचन बेचैन करते. पण प्रत्यक्ष अनुभूती असूनही त्याचे प्रत्ययकारी वर्णन करण्यात 'बलुतं,' 'आठवणींचे पक्षी' आणि 'उपरा' यांचे अपयश याची कारणमीमांसा होणे आवश्यक आहे. माझ्या मते हे लेखक स्वतःतच इतके गुरफटले आहेत की, त्यांचा अनुभव सर्वस्पर्शी होत नाही. दलितांच्या सहानुभूतीच्या सवर्ण ठेकेदारांना हे अर्थातच मान्य होणार नाही याची मला खात्री आहे. आज दलित लिहीत आहेत. आपल्या भावनांना वाट देत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांनी 'ग म भ न' काढले तरी मला ती क्रांती वाटते. तेव्हा ते आत्मचरित्रे, कादंबऱ्या, कविता लिहीत आहेत ही घटना आजच्या सामाजिक जीवनाच्या चौकटीत अलौकिक आहे. पण समाजाला ढवळून काढण्याचे सामर्थ्य या लेखनात नाही. कारण त्यांच्या सहानुभूतीच्या मर्यादा फक्त स्वतःपुरत्याच मर्यादित आहेत.

दलित लेखकांच्या लेखनाकडे कलाकृती म्हणून पाहू नका असाही एक सूर आढळतो. साहजिकच मग ते कुणासाठी लिहीत आहेत असा प्रश्न उपस्थितीत होतो. त्यांचा वाचक वर्ग बव्हंशी मध्यमवर्ग आहे. त्यापैकी ब्राह्मण तत्समवर्गालाच दलितांबद्दल शाब्दिक होईना पण सहानुभूती आणि खंतही आहे. पण खेड्यापाड्यातून जो असंख्य असहाय्य व ज्यांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीवही नाही त्यांच्याशी या दलित लेखकांची कितपत बांधीलकी आहे ? त्यांच्यासाठी दलित लेखक काय करीत आहेत ? मध्यंतरी गावाकडे गेलो असता एका साक्षर दलित मित्राला दया पवार नाव ऐकले का म्हणून विचारले, तर तो म्हणाला, 'कुठली दया पवार ? काय काही लफडं वगैरे?' निव्वळ मध्यमवर्गामध्येच सहानुभूती निर्माण करून दलित लेखक दलितांची परिस्थिती कशी काय सुधारणार ?

शहरी जीवन आणि सवर्णांची दया यांचा हा लेखकवर्ग कैदी बनला असून तेच आपल्या आयुष्याचे 'मिशन' आहे अशा भूमिकेतून दलित साहित्य निर्माण होत आहे. कादंबरीतील पात्रांशी सह-अनुभूती बाळगण्यापेक्षा शहरी मध्यम वर्गांच्याच सहानुभूतीकडेच डोळे लावून केलेल्या लिखाणाचा दर्जा तरी काय असणार ?

विनोदी लेखनाच्या बाबतीत चिं. वि. जोशी यांच्यानंतर 'अनामिका सार्थवती बभूव' असेच म्हणण्याची पाळी येते. अत्रे यांचा विनोद फार ढोबळ आहे आणि दोन नाटके आणि काही सिनेमे सोडले तर त्यांची जास्त प्रसिद्धी विनोदी वक्ता म्हणून आहे. जयवंत दळवींचे विनोदी लेखन प्रासंगिक स्वरूपाचे आहे तर पु. ल. देशपांडे यांच्या लेखनात विनोदापेक्षा उपहासच जास्त आहे.

कोल्हटकरांचे 'सुदाम्याचे पोहे' अजूनही गोड लागतात. 'चिमणरावांचे चऱ्हाट' आणि 'आणखी चिमणराव' अगणित वेळा वाचले आहे. 'बटाटयाची चाळ' आणि 'नस्ती उठाठेव' ही पुस्तके प्रथम प्रसिद्ध झाली तेव्हा अट्टाहासाने मिळवून वाचली. पण आज त्यांच्या वाचनाने पुनःप्रत्ययाचा आनंद मिळत नाही कारण त्यातील बरेचसे लिखाण प्रासांगिक स्वरूपाचे आहे.

कोल्हटकरांनी सुदामा, पांडुतात्या आणि बंडुनाना, चिं. वि. जोशी यांनी चिमणराव, गुंड्याभाऊ व जोग कुटुंबीय अशा आपल्यातल्याच वाटणाऱ्या व्यक्तिरेखा निर्माण केल्या. काही काळ ताम्हनकरांच्या दाजीने जनमानसात स्थान मिळवले होते. आता त्या वकूबाचा लेखक मराठी साहित्यात आढळत नाही. 'जनू बांडे' किंवा 'बंडू आणि स्नेहलता' हे या दिशेनेच प्रयत्न होते. पण ते होता होतानाच विरले. पु. ल. ही अशी व्यक्तिरेखा निर्माण करू शकले नाहीत. आज मराठीतील विनोदी लेखन उथळ टिंगल टवाळी, किस्से, प्रासंगिक विनोद याभोवतीच गिरक्या घेताना दिसते. ते क्षणभर हसवते. रिझवते पण त्यांचे वाचन हा अनुभव होऊ शकत नाही. माझ्या मते त्याचे मुख्य कारण म्हणजे उत्कट विनोदी लेखनाला आवश्यक असलेल्या सहानुभूतीचा अभाव किंवा त्याला हानीकारक असलेल्या पूर्वकल्पित समजुतींचा (प्रीं कन्सीव्हड नोशन्स) लेखकाच्या मनावरील प्रभाव. पु. ल.ची सुशिक्षित स्त्री एखादा पदार्थ तयार करताना आर्धा इंच आल्याचा तुकडा मोजण्यासाठी मुलाकडे फूटपट्टी मागते. या संबंधात बटाटयाच्या चाळीतील 'चिंतन' हा लेख वाचावा. सुरुवातीच्या सर्व लेखात त्यांनी बटाटयाच्या चाळीतील सर्व रहिवाशांना सहानुभूतीशून्य उपहासाने ओरबडून काढले आहे. आणि या सुराशी सर्वस्वी विसंवादी असे सहानुभूतीचे सुस्कारे 'चिंतन' मध्ये सोडले आहेत. अर्थात जे समाजातच नाही ते लेखकात सापडणे दुरापास्तच. त्यामुळे ओरबाडणे, बोचकारणे, उपहास, एखाद्याला हास्यास्पद करणे किंवा चमत्कृतिपूर्ण कल्पनांनी हसवणे म्हणजेच विनोदी लेखन असे समीकरण झाले आहे.

कोल्हटकरांचा 'मुंबईचा दीपोत्सव,' चिं. वि. जोशी यांचा 'माझा सेकंड क्लासचा प्रवास' आणि पु. ल. देशपांडे यांचा 'भ्रमणमंडळ' हे तीन लेख वाचले म्हणजे मराठी

विनोदाची वाटचाल कशी चालू आहे याचा एक आलेख मिळतो. 'भ्रमणमंडळ' मध्ये पु. लं. च्या विनोदाचे प्रमुख वैशिष्टच प्रकर्षाने आढळते. प्रवासाला निघालेल्या मंडळीं-मध्ये अनेक स्वभावाचे लोक असतात. व त्यातून विनोद निर्मिती शक्य असते. पण 'भ्रमण मंडळ' मध्ये श्री के.क्षीरसागर यांचे व्यंगचित्र रंगविण्याची काही जरुरी होती का ? त्यांच्या नावाचा उल्लेख नसल्यामुळे हा भाग सर्व वाचकांच्या लक्षात येतो असे नाही. त्यामुळे तर हा भाग सर्वस्वी उपरा आणि अनाकलनीय होतो. आता 'प्रवास' आणि श्री. के. क्षी. यांचा अर्थाअर्थी काही संबंध आहे का ? पण आणले त्यांना ओढून ताणून आणि हाणल्या चार टपला. विनोदी लेखन म्हणजे टपला मारण असे पु. लं चं समीकरण दिसते. हे वैशिष्टच त्यांच्या बऱ्याच लेखनात आढळते. टपला मारण्याच्या या सवयीच्या बऱ्याचशा 'व्यक्ती आणि वल्ली' देखील बळी झाल्या आहेत. द. मा. मिरासदार हे आणखी एक लोकप्रिय लेखक. पण 'विरंगुळा' लिहिणारे मिरासदार त्यांच्या इतर लेखनात आढळत नाहीत ही खेदाची गोष्ट आहे.

आत्मचरित्रे या कालात पुष्कळ लिहिली गेली. पण त्यांचे स्वरूप बहुधा आठवणींची जंत्री, स्वसमर्थन किंवा आपण श्रेष्ठपदी कसे पोहोचलो याचा आढावा अशाच स्वरूपाचे आहे. आत्मपरीक्षण त्यांत अभावानेच आढळते. आशयाच्या बाबतीत लक्ष्मीबाई टिळक यांची स्मृतिचित्रे किंवा शैलीच्या बाबतीत ल. रा. पांगारकर यांच्या 'चरित्रचंद्र' यांच्या जवळपासही इतर आत्मचरित्रे येत नाहीत.

नाटकांच्या बाबतीत विचार करताना नाट्यप्रयोग आणि नाटकाचे वाङ्मयीन मूल्य असा फरक करणे आवश्यक आहे. नाटकाचे प्रयोग दृष्ट लागण्यासारखे होतात हे निर्वि-वाद. पण कितीशा नाटकांचे वाचन आनंददायी होते ? नाटककार स्वतःही त्याच्या नाट-काचे मूल्यमापन त्याचे किती प्रयोग झाले यावरूनच करतो. त्यामुळे आत्मसंतुष्टता हा बहुतेक नाट्यलेखकांचा स्थायीभाव आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. नाटक चालले नाही तरच ते बेचैन होतात. वसंत कानेटकर हे आजचे प्रथितयश नाटककार, आपण किती नाटके लिहिली यावरच ते संतुष्ट असावेत असे वाटते. 'रायगडाला जेव्हा जाग येते' हे त्यांचे एक प्रसिद्ध नाटक. त्यात त्यांनी ऐतिहासिक व्यक्तींमधील माणूस शोधण्याचा प्रयत्न केला आहे, तो स्तुत्य आहे. पण ही माणसे शोधताना त्यांच्या हाती मध्यमवर्गीय 'फॅमिली'च गवसली. या नाटकातील सर्वच पात्रांचे साद पडसाद संपूर्ण मध्यमवर्गीयच आहेत. ती राजकुलातील माणसे वाटत नाहीत. वानगीदाखल थोडी उदा-हरणे देतो. आजीने 'मायेच्या पोटी नको नको ते लाड केले,' राजारामाने 'थंडीवाऱ्याची रात्र बाहेर कुडकुडत काढली', 'राजारामाचा थाळा बंद', शंभूराजांच्या नादी लागला तर राजारामासाठी 'गडाचे दरबाजे बंद' शिवाजीला पेटाभर करवंदे काढून देण्याची तयारी दाखविणारा राजाराम, किंवा येसूबाईला 'खुशाल रायगडावर उष्टी खरकटी काढीत बसा' म्हणणारा संभाजी, ही भाषा किंवा प्रसंग काय राजकुलातील आहेत ? ही तर पुणे, नाशीक अशा शहरांतील एखाद्या ब्राह्मण आळीत ऐकू येणारी भाषा आहे. हे प्रसंग

आणि भाषा यातून दृगोच्चर होते ते मध्यमवर्गीय जीवन आणि त्या जीवनाचा राजकुलावर आरोप करून बेतलेले नाटक संपूर्णपणे अविश्वसनीय होते. त्यामुळे त्यातून मराठी राजाची शोकांतिकाही नीट उभी राहात नाही.

सावत्र आईमुळे संभाजीचा भावनिक कोंडमारा झाला होता हा कानेटकरांचा आवडता सिद्धांत, पण राजकुलात सावत्र मुलाचा भावनिक कोंडमारा केला जात नाही तर त्याला विष किंवा मारेकरी घातले जातात. राजकुलातील प्रत्येक राजपुत्राला भावी राजकीय जबाबदारीसाठी तयार करण्यात येत असल्यामुळे त्याला वाढविण्यात येत असताना त्यात भावनेला फारच कमी थारा असतो.

या नाटकाच्या दुसऱ्या अंकात शिवाजी व सोयराबाई अंतःपुरात बोलत आहेत आणि मोरोपंत आणि अण्णाजी ' मधेच दाराशी कान देऊन ऐकताहेत ' असा प्रसंग आहे. शिवाजीचे अंतःपुर म्हणजे काय तीन खोल्यांच्या सेल्फकंटेन्ड ब्लॉकमधील बेडरूम वाटली! आणि मोरोपंत आणि अण्णाजी म्हणजे शेजारच्या ब्लॉकमधील चढलेले आवाज ऐकून भिंतीला कान लावणारे मध्यमवर्गीय वाटले काय ! अंतःपुराबाहेरील द्वारपाल इराण्याच्या हॉटेलात चहा प्यायला गेले असल्यामुळे मोरोपंतांना दरवाजाला कान लावता आला हा खुलासा कानेटकरांनी केला असता म्हणजे बरे झाले असते. हा सबंध प्रसंग म्हणजे, कुठल्यातरी सहकारी सोसायटीचे चेअरमन माननीय शिवाजीराव सौ. शिवाजीरावांशी चढ्या आवाजात बेडरूममध्ये बोलत आहेत आणि बाहेरच्या हॉलमधे बसलेले सेक्रेटरी बेडरूमच्या दाराला कान लावून ऐकत आहेत या अवकळेला शिवाजीचे जीवन नेऊन पोहोचविणारा होय. पण नाटक पाहणारे मध्यमवर्गीयच असल्यामुळे त्यांना ते भावते.

' गगनभेदी ' हे कानेटकरांचे अलीकडील एक नाटक. त्यात त्यांनी शेक्सपीअरच्या चार शोकान्तिकांच्या नायकांची पुणेरी भेळ बनवली आहे. ज्या व्यक्तिरेखा राबविण्यासाठी शेक्सपीअरला चार नाटके लिहावी लागली त्या लिअर, हॅम्लेट, ऑथेल्लो आणि मॅकबेथ या एकमेकाशी विसंगत चार व्यक्तिरेखा एकाच व्यक्तीत कोंबून तिचा होल्डऑल बनविण्याचा अफलातून प्रयोग केला आहे. शेक्सपीअरला जे सुचलेदेखील नाही ते कानेटकर यांनी करून दाखविले. पण एवढ्यावरच ते थांबले नाहीत. तर त्याचा नायक विक्रम याच्यावर मध्यमवर्गीय नीतीकल्पनांचे आरोपण केले आहे. या ठिकाणी एक साधा प्रश्न विचारावासा वाटतो की, ज्याला औद्योगिक साम्राज्य स्थापायचे असते त्याला कुटुंबियांच्या नीतिमत्तेकडे लक्ष द्यायला फुरसत असते का ? नाटक वाचत असताना सतत ही भावना निर्माण होते की विक्रमची आयुष्यातील मुख्य भूमिका आपल्या कुटुंबियांच्या नीतिमत्तेचा सेन्सॉर होणे हे असून त्याच्या अनुषंगाने लिअर, ऑथेल्लो, हॅम्लेट, यांच्या भूमिका करत असतो आणि या सर्वांतून वेळ उरला तर, आणि तो उरतोच (!), त्यात औद्योगिक साम्राज्याची स्थापना करतो, आणि साम्राज्य नाटकीच असल्यामुळे त्यात त्याला अडचण येत नाही.

कानेटकरांच्या इतर नाटकातूनही अशीच मध्यमवर्गीय पात्रे निरनिराळे पोषाख करून

हिंडत असतात. पण ती ज्यावेळी मध्यमवर्गीय वातावरणातच असतात तेव्हा एक सुरेख कॉमेडी निर्माण होते– ' प्रेमा तुझा रंग कसा '.

नटसम्राट हे एका प्रतिभासंपन्न कवीने लिहिलेले नाटक. खाडिलकरांनी ' आयागो ' आणि ' हॅम्लेट ' यांना एकत्र आणून ' सवाई माधवरावांचा मृत्यू ' हे नाटक विलक्षण प्रतिभाविलासाने लिहिले आहे. शेक्सपिअर हा नाट्यजगताचा आधारवड. तेव्हा त्याच्या नाटकातील व्यक्तिरेखा उचलून कुणी नवे नाटक लिहिले तर ते कमीपणाचे नसून गौरवास्पदच आहे. पण त्यासाठी खाडिलकरांच्यासारखी प्रतिभा पाहिजे. ती नसेल तर काय होते हे ' नटसम्राट ' या नाटकाने दाखवले आहे. शिरवाडकर प्रथम बसले 'किंग लिअर'चे भाषांतर करायला. पण मग शेक्सपिअरच्या दुसऱ्या नाटकातील स्वगते त्यांच्या कविमनाला खुणावू लागली. शिवाय त्याच तोलाची काही संस्कृत स्वगते मनात गुंजन करू लागली. येथे एक पेच निर्माण झाला. एका नाटकातील स्वगते दुसऱ्या नाटकात कशी घालायची आणि स्वकृत स्वगतांचे काय करायचे ? त्यातून एक क्लुप्ती निघाली. नवीनच नाटक लिहून नटसम्राटाच्या तोंडी ही स्वगते घातली की भागले. यातून निर्मिती झाली ती म्हातारपणी स्वतःसाठी पैसा न ठेवणाऱ्या मध्यमवर्गीयाची, नटसम्राटाची नव्हे, शोककथा. प्रेक्षकांचीही नाटक पाहून बाहेर येताना हीच प्रतिक्रिया असते. आप्पासाहेब बेलवलकर नटसम्राट नसते आणि हेडक्लार्क असते तरीही त्यांची शोकांतिका झाली असती. फक्त ते नटसम्राट नसल्यामुळे त्यांनी स्वगते म्हटली नसती एवढेच. हे नाटक वाचताना नेहमी वाटते की, लेखकाने प्रथम स्वगतांच्या जागा निश्चित केल्या असाव्या आणि मग त्यांच्या अनुरोधाने संवाद रचले असावे. कारण कथानकाचा ओघ आणि स्वगते यांचा सांधा चपखलपणे जुळत नाही. संवाद कंटाळवाणे होऊ लागले की, एकदम ' रिलीफ 'सारखी स्वगते येतात आणि नाटक तारून नेतात. आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. पैसा नसणे हा बेलवलकरांचा दोष की, स्वगते म्हणणे, मग 'नटसम्राट ही शोकांतिका नटसम्राटाची की द्रव्यहीन माणसाची ? शिरवाडकरांच्या इतरही नाटकांत तोलामोलाची स्वगते आहेत पण ती नाटके यशस्वी झाली नाहीत. तेव्हा नटसम्राटाचे यश कशात आहे ? बाळ कोल्हटकर प्रणीत कौटुंबिक नाटकाचा मसाला आणि त्याला नटाच्या अभिनयाचा कस पाहतील अशा शेक्सपिअरच्या गाजलेल्या स्वगतांची फोडणी यात नटसम्राटचे यश आहे. मराठीतील नाटकाचा मसाला आणि शेक्सपिअरच्या स्वगतांची उसनवारी यांच्या सहाय्याने यश मिळविण्याची पाळी यावी ही मराठी सर्जनशीलतेची आणि नाट्यलेखनाची शोकांतिका आहे.

शिरवाडकर मराठीतील श्रेष्ठ लेखक. सॉमरसेट मॉम हा इंग्रजीतील ' कर्मशिअल ' लेखक. त्याने अशाच विषयांवर ' थिएटर ' ही कादंबरी लिहिली आहे. तिची नायिका एक नटी आहे. नाटकात ती निरनिराळ्या भूमिका करते. स्टेजवर करुण रसपूर्ण भुमिका करून विंगमध्ये आल्यानंतर ते सर्व विसरून नेहमीच्या मूडमध्ये येते. तिची नाटके पाहणाऱ्या मुलावर या बदलत्या मूड्सचा विपरीत परिणाम होतो आणि आपली आई घरी वडिलांबरोबर पत्नीची भूमिका आणि आपल्याबरोबर आईची भूमिका करत आहे असा

गंड त्याच्या मनात निर्माण होतो. आई–मुलात दुरावा निर्माण होतो. त्यातून नाट्य फुलते. ही शोकांतिका आहे 'नटीची'. एका स्त्रीची नव्हे. मराठीतील श्रेष्ठ लेखक आणि इंग्रजीतील दुय्यम लेखक यांच्या कलाकृतींची तुलना केली म्हणजे आपले लेखक कोठे आहेत याची यथायोग्य कल्पना येते.

जयवंत दळवी हे आणखी एक आघाडीचे नाटककार. आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर एक चटपटीत आणि तात्कालिक महत्त्व असलेले नाटक त्यांनी घेतले 'सूर्यास्त'. आणीबाणीत हलक्या आवाजात घरात, आणि आणीबाणीनंतर जोरदार शब्दात वर्तमानपत्रात, जे बोलले लिहिले जात होते त्याचा प्रतिध्वनी या नाटकात उमटतो. वस्तुत: आणीबाणी ही भारतीय संस्कृतीची अटळ अशी शोकांतिका होती. आज आणीबाणी नसली तरी आणीबाणी पुकारली गेली त्या वेळची आणि आजची परिस्थिती यात काही फरक आहे असे वाटत नाही. आणि यानंतर ती पुकारली जाणार नाही याचीही खात्री देता येणार नाही. अशा परिस्थितीत आणीबाणीतील सत्ताधाऱ्यांच्या सत्तेच्या दुरुपयोगाचे उथळ चित्रण न करता भारतीय संस्कृतीचा वेध घेऊन आणीबाणीच्या मूळाशी जाणाऱ्या नाटकाची जरुरी होती. पण त्यासाठी परिश्रम आणि चिंतन यांची गरज होती. पण ते करण्याची आपल्या लेखकांची तयारी आणि क्षमता आहे का ?

आणीबाणीनंतर बलात्काराचे युग सुरू झाले आणि त्याही विषयावर दळवी यांनी एक नाट्य पाडले– 'पुरुष'. नाटक लिहिताना निदान मानसशास्त्रीय किंवा वाङमयीन संकेतांच्या दृष्टीने 'पुरुष' ही काय संकल्पना आहे याचा विचार तरी त्यांनी करायला हवा होता. पण तेवढा वेळ पाहिजे ना. या नाटकाची प्रेरक नाट्य वगैरे म्हणून बरीच स्तुती झाली. पण ते आहे निव्वळ एक बोधप्रद नाटक आणि 'जशास तसे' हे नाव त्याला छान शोभून दिसेल. या नाटकाचे नाव 'पुरुष' असले तरी त्यात एकही पुरुष नाही. कारण यातील एकही पुरुष 'आक्रमक' नाही. अण्णांनी परित्यक्तेशी लग्न केले असले तरी ते पत्नीला बरोबरीचे स्थान देत नाहीत कारण ते सामाजिक संकेतांचे बळी आहेत. त्यातल्या हरिजन तरुणांच्या पौरुषावर दलितत्वाने मात केली आहे. गुलाबराव हाही पुरुष नाही कारण त्याला बलात्कार करण्यासाठीही दुसऱ्यांची मदत घ्यावी लागते. तो जर 'पुरुष' असता तर त्याने अंबूच्या तोंडात टोपीचा बोळा कोंबला नसता, तिचे चीत्कार ऐकून तो अधिकच उत्तेजित झाला असता. साहजिकच 'इंद्रिय असलेला तो पुरुष' या प्राथमिक, जाणीवेच्या पातळीवर नाटक उतरते. शोधायचे म्हटले तर एकच पुरुष या नाटकात सापडतो. तो म्हणजे बंडा. पण तो स्टेजवर केव्हाच येत नाही. आणि बंडाचा अमूर्त पर्याय सुचवून दळवींनी सामाजिक नवलाईवर नेमके बोट ठेवले आहे. मग हे प्रेरक नाट्य कसे ? दुसरे म्हणजे सत्तेचा माज असलेला माणूस बलात्कार करतो ही कल्पनाही अवास्तव आहे. कारण अमानुषीकरण झालेला माणूसच बलात्कार करू शकतो. सत्ता त्याला सहाय्यभूत होते एवढेच. नाहीतर सर्व सत्ताधारी बलात्कारच करीत राहिले असते.

अंबूवर बलात्कार झाल्याचे कळल्यानंतर या नाटकातील मथू आमच्या घरीही हेच

चालले आहे अशा आशयाचे उद्गार काढते. साहजिकच बलात्कार ही पुरुषाची सहज-प्रवृत्ती आहे असा अर्थ त्यातून निघतो. म्हणजे बलात्काराचा फक्त कायदेशीर अर्थ न घेता त्याकडे स्त्री-पुरुष संबंधांचे एक अंग या दृष्टीने दळवी पाहात असावे असे दिसते. माणूस हा अखेर प्राणीच आहे. पण तो अधिक प्रगत असल्यामुळे त्याने स्वतःला संस्कृती दिली आहे. स्त्री-पुरुष संबंधाचे त्याने उदात्तीकरण केले आहे व स्त्रीचा देवता म्हणून त्याने गौरव केला आहे. दुसऱ्या बाजूने शारीरिकदृष्ट्या त्याचे स्त्रीवर प्रभुत्व असून त्याच्यात बलात्काराची शारीरिक क्षमता आहे. या दोन परस्परविरोधी तणावांचा विचार करून बलात्कारासारख्या नाजुक विषयाला हात घालावयास हवा होता. त्याच्याच बरोबरीने ढासळत्या मूल्यांचा, सर्वंकष असुरक्षिततेचा त्यात वाटा किती याचाही विचार आवश्यक आहे. कारण युद्धकाळात सैनिकांकडून जास्तीत जास्त बलात्कार घडल्याची उदाहरणे आहेत. पण त्यासाठी एखाद्या विषयाने झपाटले जाण्याची गरज आहे. माझी आठवण नीट असेल तर मला वाटते ' ऑल द किंग्ज मेन ' या चित्रपटाच्या निर्मात्याने लिहिले होते की, ' हा विषय माझ्या मनात वीस वर्षे घोळत होता. ' याउपर जास्त लिहिण्याची गरज नाही.

एका काळी ' माणूस नावाने बेट ' लिहिणारे तेंडुलकर आता ' थ्रिल ' किंवा तंत्र यांच्या मागे असावेत असे वाटते. सुरुवातीची नाटके व्यवसायाच्या दृष्टीने फारशी यशस्वी न ठरल्यामुळे प्रेक्षकांच्या सद्भिरुचीला धक्का दिला म्हणजे तरी आपली नाटककार म्हणून दखल घेतली जाईल अशा अभिनिवेशाने ' सखाराम बाईंडर ' लिहिले असावे असे वाटते. ' सखाराम बाईंडर ' आणि ' गिधाडे 'मध्ये अत्यंत ओबडधोबड चित्रणे आहेत. याउलट ' अशी पाखरे येती ' या परकीय कल्पनेवर आधारलेल्या नाटकाचे वाचनदेखील समाधान देऊन जाते. ' घाशीराम कोतवाल 'मध्ये फक्त तंत्र आणि ' भट ' यांचा द्वेष आहे. नाना फडणवीसातील माणूस शोधण्याचा त्यात प्रयत्न नाही. ' नाना ही प्रवृत्ती आहे ' असे सांगितले जाते. असे असेल तर तिचा शोध घ्यावा लागेल. पण स्वतःची आणि नाटकातील पात्रांची जात विसरू न शकणारा लेखक मानवतावादाच्या पातळीवर जाऊन असा शोध घेऊ शकेल काय ? प्रेक्षकही नाटक पाहताना आपली जात विसरू शकत नाही याचा खेदजनक अनुभव ' दुर्गी ' नाटक पाहताना येतो. त्या नाटकात भटांच्याबद्दल जे विनोदी शेरे आहेत त्या वेळेला थिएटरमध्ये प्रचंड हशा होतो. पण सारस्वतांच्या लकबीबद्दल जे मार्मिक अभिप्राय आहेत त्यावेळी मात्र प्रेक्षकांकडून प्रतिसाद मिळत नाही. नाटक लिहिताना किंवा पाहतानादेखील आपण केवळ प्रेक्षक नसून भटं, सारस्वत किंवा आणखी कोणीतरी असतो.

' नाना ' ही जशी प्रवृत्ती आहे तशीच महंमद पैगंबर हीही प्रवृत्तीच आहे. स्वतःच्या दत्तक मुलाच्या बायकोशी लग्न करून नंतर तिची जरूर संपल्यानंतर त्याची त्याला परत करणे ही घटना कमी नाट्यमय आहे का ? पैगंबराचे स्त्रीविषयक जीवन वाचून ' आम्ही मक्केचे मौलवी ' असे पालुपद असलेले संगीतमय नाटक तेंडुलकरांनी लिहून दाखवावे

आणि जब्बार पटेल यांनी ते दिग्दर्शित करावे. ही हिंमत त्यांना होईल काय ? बोकॅशिओने अश्लीलतेकडे झुकणाऱ्या आपल्या 'डी कॅमेरॉन' या पुस्तकात ख्रिस्ती मठातील जीवनाची खिल्ली उडवताना जी निर्भयता दाखविली ती तेंडुलकर, पटेल आणि कंपनी दाखवू शकेल काय ? पण महाराष्ट्रात आज जी निर्भयता आढळते ती फक्त सोशीकांच्या बाबतीतच. मग्रूरांच्या बाबतीत लिहिताना लेखक स्वतःच भयग्रस्त असतो. वास्तविक पाहता नाना किंवा महंमद पैगंबर या दोघांनाही त्यांच्या वेळच्या समाजपरिस्थितीच्या संदर्भात समजून घेण्याची आवश्यकता आहे. चारित्र्यविश्लेषण हे मानवतावादात बसते. चारित्र्यहनन किंवा विकृतीकरण नव्हे. सहृदयता हा मानवतावादाचा आत्मा आहे. पण विक्रेत्यांची संस्कृती स्वीकारलेल्या समाजात सहृदयतेला स्थान कितीसे आहे ? अधून मधून 'बॅरिस्टर' किंवा 'लोककथा १९७८' सारखी बऱ्यापैकी नाटके लिहिली जातात. पण 'हिट आणि हॉट' नाटकांचा जो जमाना आता सुरू झाला आहे, त्यात यापुढे चांगल्या नाटकांची अपेक्षा करू नये हेच उचित.

तेंडुलकरांच्या अलीकडील काही नाटकांचे एक वैशिष्टय लक्षात घेण्यासारखे आहे. एखादी सारस्वतेतर जात समोर ठेवून कलेद्वारे तिला बदनाम करण्याचे नवे तंत्र त्यांनी अवलंबिले आहे. 'गिधाडे', 'घाशीराम कोतवाल' आणि 'कन्यादान' या नाटकात हे स्पष्टपणे जाणवते.

लघुकथांच्या क्षेत्रात त्या मानाने स्वातंत्र्योत्तर काळात थोडेसे वेगळे चित्र दृष्टीस पडते. गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर द्वय, कुलकर्णी आदी कित्येक समर्थ लेखकांनी लघुकथेचे दालन संपन्न केले. अर्थात ते बव्हंशी मध्यम वर्गाचेच चित्रण करतात व हेही त्यांच्या यशाचे एक कारण असू शकेल. माझ्या वाचनात आलेल्या पुस्तकांत याला अपवाद म्हणजे गोखले यांनी वेश्या जीवनावर एक पुस्तक लिहिले आहे त्याचा. कादंबरीच्या क्षेत्रात उल्लेखनीय असे विशेष काहीच घडत नसताना लघुकथेच्या क्षेत्रात मराठी लेखकांनी काहीतरी कामगिरी केल्याचे आढळते याचे रहस्य काय असावे असा प्रश्न सहजच उपस्थित होतो.

वर लिहिलेच आहे की, बऱ्यापैकी मराठी लेखक साधारण एक चांगली कादंबरी लिहू शकतो. कारण तेवढ्यातच त्याचा जीवनाचा अनुभव संपतो व नवीन अनुभव घेण्याची त्यांची क्षमता अत्यंत मर्यादित असते. कादंबरीच्याऐवजी लघुकथेचे क्षेत्र जे लेखक पसंत करतात ते आपला अनुभव अनेक लघुकथात विभागतात. त्यामुळे अनुभवाचा एकच पैलू निवडून तो प्रमाणबद्ध तऱ्हेने मांडता येतो. याउलट कादंबरीकार पुष्कळ वेळा केवळ लघुकथा होईल एवढाच अनुभव कादंबरीच्या स्वरूपात देता येईल एवढा सुजवितो. कादंबरी लिहिताना प्रत्येक पात्राच्या भूमिकेत शिरण्यासाठी जीवनाचा व्यापक अनुभव, सहृदयता आणि चिंतन यांची जरुरी असते. त्यांच्या अभावामुळे कादंबरी फसते. तर लघुकथेचा आवाका मर्यादित असल्यामुळे हे गुण मर्यादित असले तरी लघुकथा सजते. अर्ध्या वार कापडात लंगोट छान बसतो पण तेवढ्याच कापडात पायजमा बेतायला गेले म्हणजे

जो प्रकार होतो तो मराठी लघुकथा आणि कादंबरी यांच्याबाबतीत होत असावा असे वाटते. पं. महादेवशास्त्री जोशी यांनी कादंबऱ्या लिहिल्या असत्या तर त्यांचाही गो. नी. दांडेकर झाला असता.

यामुळेच असे दिसते की, स्वातंत्र्योत्तर कालात लघुकथा आणि कादंबरी या दोन्ही क्षेत्रात सव्यासचित्व दाखवणारे लेखक विशेष आढळत नाहीत. गोखले, गाडगीळ यांचे युग आता संपलेच आहे. जी. ए. कुलकर्णी प्रतिमांच्या इतके मागे लागले आहेत की, माझ्यासारख्या सामान्य वाचकाच्या डोक्यावरून त्यांच्या कथा जातात. नवीन लघुकथा लेखकांपैकी काही अपवाद वगळता बाकीच्यांना 'साक्षर' म्हणणेच योग्य ठरेल. एकंदरीतच सामाजिक जीवनाचा अधःपात चालू आहे त्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात पडले असल्यास नवल नाही.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते त्याची छाप काव्याच्या प्रांतातही आढळून येते. रोमॅन्टिसिझम संपला होता. स्वातंत्र्यानंतर काय लिहावे हे समजत नसल्यामुळे, किंवा भ्रमनिरासामुळे अथवा परकीय स्फूर्तीमुळे कवितेने निराशेचा सूर पकडला व त्यातूनच नवकाव्याच्या निर्मितीला सुरुवात झाली. पण ही निराशेची भावना वाचकांपर्यंत पोचविण्याची ताकद मर्ढेकर सोडले तर, आणि तीही त्यांच्या मृत्यूनंतर वीस–पंचवीस वर्षांनी, तर इतरांच्यात फारच कमी प्रमाणात आढळते. बाकीच्या काव्यात निराशेकरता निराशाच आढळते. कविता करणे ही आता फॅशन झाली आहे. मध्यंतरी वा. ल. कुलकर्णी यांनी असा अभिप्राय व्यक्त केला होता की, कविता गवतासारखी उदंड झाली आहे. पण कोणी उगवता तारा दिसत नाही. कवितांचे माझे वाचन बेताचे असल्यामुळे मला त्या बाबतीत निश्चित असे विधान करावयाचे नाही. पण एक विचार मांडावयाचा आहे. त्यांचे मूल्यमापन समीक्षकांनी करावे.

समाजाच्या अवनत अवस्थेत काही विशिष्ट प्रकारच्या कवितेला बहर येतो असे दिसते. उर्दू कविता बहराला आली ती मुघल साम्राज्याच्या ऱ्हास कालात तर लावणी वाङ्मय, हे पेशवाईच्या अखेरच्या कालात मुख्यतः लिहिले गेले. मध्ययुगात युरोपात 'बॅलडस' चे प्रस्थ होते. तर प्रबोधन कालातील कविता ही व्यक्तिगत भावना किंवा शारीरिक संबध यांचे उन्नतीकरण करते. त्या दृष्टीने आजच्या कवितेतील निराशेचा सूर हा समाजाच्या अवनत अवस्थेचेच प्रतिबिंब असेल काय? ज्या भारतीय कुटुंबव्यवस्थेचा अल्डस हक्स्ले आणि एच.जी. वेल्स सारख्यांनी गौरव केला ती मोडून पडत आहे. अर्थात हा औद्योगीकरणाचा नव्हे, तर त्याच्याच बरोबरीने आपण विक्रेत्याची जी संस्कृती पत्करली आहे तिचा हा अटळ परिणाम आहे. अशा समाजात मनुष्य केवळ स्व-अर्थी बनतो व त्यातून त्याच्यात एकटेपणाची भावना निर्माण होते. ती व्यक्त करण्यासाठी कथा किंवा कादंबरी लिहिण्याची कुवत नसल्यामुळे तो अधिक सोप्या म्हणजे कवितेच्या वाटेला जात असावा आणि त्यातून कविता ही फॅशन झाली असावी. यावर उपाय आपल्याच हातात आहे. तो म्हणजे आपल्या सामाजिक सद्भावाच्या कक्षा (रस्किनच्या शब्दात 'सोशल अॅफेक्शन.') विस्ता-

रणे. पण या गोष्टीकडे कोणाचेच लक्ष नाही. तीस-तीस वर्षे एकत्र काम करून अथवा शेजारी राहूनही वैयक्तिक संबंध निर्माण होऊ शकत नाहीत अशी दुर्दैवाने परिस्थिती आहे. 'इंटिमेट' या गोष्टीत व. पु. काळे यांनी त्याचे वर्णन केले आहे. आज कवितेत निराशा आढळते. हळुहळू चीड, संताप, द्वेष भावना आढळू लागतील व त्याचा परिणाम म्हणून कविता अधिकाधिक हिणकस होत जातील व शेवटी कवितेत फक्त कदाचित शिव्याच असतील.

भावकवितांचा बहर अजूनही ओसरला नाही. पण कवींच्या जाणीवा विस्तारत आहेत असे दिसत नाही. गाजलेल्या एकाच कवितेचा उल्लेख करतो. 'तोच चंद्रमा नभात' या कवितेत स्त्री ही जन्मभर 'कामिनी' राहते ही मध्यवर्ती कल्पना आहे. स्त्री–पुरुष संबंध बदलत जातात हा जीवनातला अनुभव इथे नाकारलेला आहे. स्त्री ही सखी, मैत्रीण, वैरीण, दावेदारीण, वृद्धापकाळी आईदेखील होऊ शकते ही जाणीव आढळत नाही. जीवनाकडे साचेबंद दृष्टीने पाहणे हे आजच्या भावकवितांचे वैशिष्टच वाटते. वाढ (ग्रोथ) हे जीवनाचे लक्षण आहे आणि ती खुंटणे हे ऱ्हासाचे लक्षण आहे आणि ते आजच्या कवीत प्रकर्षाने आढळते का ?

ललित लेखनाबद्दल विवेचन केले. पण वाचक व प्रेक्षक हा जो त्याचा अपरिहार्य दुसरा घटक तो लक्षात घेतला नाही तर हे विवेचन अर्धवट राहील. एकंदरीतच माणसाला असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासलेले आहे. जीवन विलक्षण धावपळीचे व संघर्षमय झालेले आहे. अशा परिस्थितीत माणूस हा मानवी जीवनातील खालच्या स्तरावरचा सहजसाध्य आनंद अथवा निव्वळ शारीरिक आनंद यांच्या मागे लागतो. बौद्धिक आनंद त्याला कष्टप्रद वाटतो व त्याचा आस्वाद घेणे त्याला शक्य होत नाही. लेखन हे अखेर वाचकासाठी असल्यामुळे गुन्हेगारी कथा, कौटुंबिक समस्या सपकपणे मांडणाऱ्या कादंबऱ्या, प्रणयप्रधान कादंबऱ्या, सिनेसृष्टीतील जीवन आणि नटनटयांचे निरनिराळ्या पोझेसचे प्रदर्शन करणारी साप्ताहिके, मासिके अशा तऱ्हेच्या वाङमयाचीच निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचप्रमाणे बलात्कार, प्रणय आदी दृश्यांनी भरलेली हिट व हॉट नाटके आणि सिनेमे यांना प्रचंड प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. अशा नाटकांना प्रतिबंध करावा या मताला वैचारिक व लेखन स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते विरोध करतात व अशी नाटके कालाच्या ओघात नष्ट होतील असे मत व्यक्त करतात. हा आशावाद खोटा नाही. कारण 'सौभद्र' नाटकाचे प्रयोग ज्याप्रमाणे जवळजवळ शंभर वर्षे होत आहेत त्याप्रमाणे या नाटकाचे होणार नाहीत हे निखालस सत्य आहे. पण त्याचे कारण काही दिवसांनी या नाटकांपेक्षा अधिक हीन अभिरुचीच्या नाटकांना मागणी येईल व त्यामुळे सध्याची नाटके मागे पडतील. प्रेक्षकांची अभिरुची उंचावल्यामुळे नव्हे. याबाबतीत अशी तोड काढता येईल की, अशी नाटके लिहिण्यावर बंदी घालू नये पण त्यांच्या प्रयोगांवर बंदी घालण्यात यावी.

मध्यंतरी एका नटीने कलेसाठी संभोगदृश्यांनाही आपली तयारी असल्याचे जाहीर केले होते. अर्थात तिची तयारी प्रत्यक्ष संभोगासाठीच असावी असे वाटते. संभोगाच्या

' नाटका ' करिता नसावी. कारण बलात्काराच्या प्रसंगात संभोग अभिप्रेत असतोच व तशी नाटके आज चालू आहेतच. तेव्हा तिची तयारी त्यापुढे जाण्याची आहे. पण हे जाहीर करताना सकाळी साहित्यसंघ, दुपारी शिवाजी मंदिर आणि रात्री दिनानाथ मंगेशकर नाट्य मंदिर असे तीन प्रयोग एका दिवशी करण्याची नट आणि नटी यांची शारीरिक क्षमता लक्षात घेतली होती की नाही ते माहिती नाही. एकाने तर आपल्या नाटकात हस्तमैथुन दाखविण्याची धमकी दिली होती.

याचा उल्लेख एवढ्यासाठीच केला की, लेखनस्वातंत्र्याच्या कैवाऱ्यांना वारे कसे वाहते याची व त्यातील धोक्याची जाणीव व्हावी म्हणून. याउपरही त्यांची लेखनस्वातंत्र्याची अतिरिक्त कळ कमी होणार नसेल तर व्यवसायस्वातंत्र्याच्या नावाखाली एल. एस. डी. च्या गोळ्या विकण्यासाठी शाळा–कॉलेजातून स्टॉल्स उघडण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी चळवळ उभारावी म्हणजे निदान विसंगतीचा आरोप त्यांच्यावर करता येणार नाही.

एकदा खालच्या स्तरावरील आनंदाची सवय झाली म्हणजे काही दिवसांनी त्यातीलही ' थ्रिल ' संपून मनुष्य केवळ शारीरिक सुखाच्या मागे लागेल. त्यानंतर शारीरिक सुखातीले ' थ्रिल ' कमी होऊन तो हिंसाचाराकडे वळेल. उच्चस्तरावरील बौद्धिक आनंद कष्टप्रद असल्यामुळे तो सहजसाध्य ऐंद्रिय सुखाच्या निरनिराळ्या प्रकारांकडे वळेल व शेवटी स्त्री-पुरुष संबंध मानवाच्या आदिम अवस्थेतील नर-मादी संबंधात आणि सामाजिक आयुष्य हिंसाचारात परिणत होईल. आज कॅबेरे, सोसायटी लेडीज या कल्पना आणि हिंसाचाराचे वाढते प्रमाण हे या प्रक्रियेचे द्योतक आहेत. मानवाने जे हजारो वर्षांच्या संस्काराने मिळविले ते खोट्या आधुनिकतेच्या मागे लागून गमावण्याची सुरुवात आपण केलीच आहे. मानवी भावनांचे उन्नतीकरण करण्याऐवजी त्याचे शारीरिक स्वरूपाच्या प्रदर्शनान रूपांतर करण्याची सध्याची प्रवृत्ती माझ्या दृष्टीने तरी अधःपाताचे लक्षण आहे. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील मुळातच असलेली अस्पष्ट रेषा आपण संपूर्णपणे पुसून टाकण्याच्या प्रयत्नात आहोत.

संगीत क्षेत्रात विशेषतः सिने–संगीतात जे नवे वारे वाहात आहेत त्यांचाही उद्देश खालच्या स्तरावरील आनंद देणे हाच आहे. लहान मूलही रडत असताना भांड्यावर जलद लयीने आवाज केला असता रडावयाचे थांबते. संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत मानवाला ड्रम, ढोल, इ. वाद्यांचे आकर्षण होते. जसजशी प्रगती होत गेली तसतशी तंतूवाद्ये वगैरे चित्तवृत्ती पुलकित करणारी वाद्ये प्रचारत आली. कर्णकर्कश वाद्ये चित्तवृत्ती बधीर करून शारीरिक स्फुरण देतात, हे प्राण्यांच्याही बाबतीत आढळते. त्यामुळेच युद्धाच्या वेळी अथवा बैलांच्या झुंझीच्या वेळी ढोल, झांजा, रणशिंगे, चौघडा इत्यादींचा उपयोग करतात. कर्णकर्कश वाद्ये आणि जलद लय यांचा ज्यात उपयोग केला जातो अशा सध्या प्रचलित असलेल्या सिनेसंगीताला शारीरिक प्रतिसाद मिळतो तर मृदू स्वर असलेले भावपूर्ण गीत किंवा शास्त्रोक्त संगीत श्रोत्याला एका तरल मानसिक अवस्थेत नेतात. एखादी रंगलेली गाण्याची बैठक ऐकल्यानंतर एकदोन दिवस ते सूर मनात कसे

रेंगाळत असतात याचा अनुभव रसिकांना आहेच. आज जे संगीत विशेष लोकप्रिय आहे त्यात वाद्यमेळ, जलद लय व कर्णकर्कश संगीत यांचा प्रादुर्भाव असल्यामुळे ते केवळ तात्कालिक शारीरिक प्रतिसाद निर्माण करते व हेही एक अवनतीचेच लक्षण समजावे लागेल.

चित्रकला, शिल्पकला, वास्तुशास्त्र, नगररचना या निरनिराळ्या क्षेत्रांत बदलल्या मूल्यांचे कितपत प्रतिबिंब पडले आहे याचे विवेचन त्या विषयातील तज्ज्ञांनीच करणे आवश्यक आहे. राहण्यासाठी घर बांधताना सौंदर्यदृष्टीपेक्षा चटईक्षेत्र निर्देशांकाचाच जास्तीत जास्त उपयोग करण्याकडे प्रवृत्ती आहे एवढे मात्र निश्चितपणे म्हणता येईल.

भारताच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या शोकांतिकेला सुरुवात गांधीयुगापासूनच झाली. त्यांनी राजकारणात धर्म आणला, अर्थकारणात जुनाट कल्पना उराशी बाळगल्या, समाजकारणात दयेचा अवलंब केला, सबंध समाजाला रोमँटिसिझमच्या कैफात बुडवून टाकले, विज्ञानपराङ्मुख राहण्यात अभिमान बाळगला, आध्यात्मिकतेचा वृथा अहंकार पोसला, आत्मक्लेशाला प्रोत्साहन दिले, रामराज्यासारख्या अर्थहीन कल्पना प्रसवल्या. पुराणात सहस्रार्जुनाने नदीचा प्रवाह अडवून धरल्याची कथा आहे त्याप्रमाणे प्रचंड शक्तीच्या या युगपुरुषाने राष्ट्राचा प्रवाह पंचवीस वर्षे एका ठिकाणी थोपवून धरला. या कालात राष्ट्र-उभारणीच्या दृष्टीने काय कार्य झाले हे कुणी मला समजावून दिले तर मी त्याचा ऋणी होईन. गांधींनी निर्माण केलेली आश्रमवासी आध्यात्मिक मंडळी कशी होती हे मी प्रत्यक्ष अनुभविले नाही. पण 'मी शेगावला काय पाहिले' या माडखोलकरांच्या लेखनावर ज्या तऱ्हेची टीका झाली त्यावरून त्याची कल्पना येते. या आश्रमवासीयांचे मुकुटमणी पूज्य विनोबांनी काशीला भेट दिली असता त्यांना कोणीतरी शाकुंतल नाटकाबद्दल विचारले असता 'मी देववाणी असली फालतू नाटके वाचण्याकरता शिकलो नाही' असे बाणेदार उत्तर त्यांनी दिले. कविकुलगुरूंची जी श्रेष्ठ कलाकृती गटे डोक्यावर घेऊन नाचला तिच्याबद्दल ही भाषा! विनोबा स्वत:ला अध्यात्माचे किरकोळ विक्रेते म्हणून घेत असत. या कालातील जीवन दंभ, भोळसटपणा, स्वप्नरंजन, भावविवशता, वस्तुस्थितीची अजाणता यांनी ते भारून गेले होते.

गांधीजींच्या पश्चात नेहरूंनी, विशेषत: पटेलांनी काही वस्तुनिष्ठता दाखवण्याचा प्रयत्न केला. पण गांधीयुगाचा प्रभाव इतका प्रचंड होता की, तिचा भ्रमनिरास हा अपरिहार्य परिणाम नेहरू–पटेलांची मर्यादित वस्तुनिष्ठता टाळू शकली नाही. राष्ट्राचे नेतृत्व लवकरच स्वार्थी, ध्येयशून्य आणि दिशाहीन पुढाऱ्यांच्या हातात गेले. असुरक्षित व भवितव्याबद्दल साशंक अशा वातावरणाने देशाला ग्रस्त करून टाकले. याचा अटळ परिणाम म्हणजे तांत्रिकांचे, मांत्रिकांचे, ज्योतिषांचे, देवाधर्माचे प्राबल्य वाढले. सामान्य माणूस शारीरिक अथवा हलक्या बौद्धिक स्तरावरील जीवन जगू लागला.

मागणी तसा पुरवठा या न्यायाने कला आणि वाङ्मय यांतील सर्जनशीलता नष्ट होऊ लागली. गावगन्ना कलाहीन पुतळे दिसू लागले. हिणकस वाङ्मयाची चलती सुरू झाली. ओंगळ नाटकांचे बीभत्स प्रयोग जनता चवीने पाहू लागली. प्रत्येकजण आपण समाजाचे

काहीच लागत नाही, समाज आपल्यासाठी आहे या वृत्तीने राहु लागला. नैतिक मूल्ये ढासळू लागली. व त्याबरोबरच नैतिक मूल्ये मानणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनाही राजकारणात टिकून राहण्यासाठी स्वत:चे नैतिक अवमूल्यन करून घेणे भाग पडले. विद्वान व विचारवंत यांना भाडयाने जाण्याची गरज भासू लागली. भ्रष्टाचार नुसताच शिष्टाचार झाला नाही तर तो गुप्तपणाने करण्याची गोष्ट आहे हीही जाणीव नष्ट झाली. मानवतावाद जीवनातून आणि वाङमयातून हद्दपार होऊ लागला.

दलितांना व असंघटित मजुरांना भूदाससदृश जीवन जगणे स्वातंत्र्यानंतरही भाग पडले. वेठबिगारी अजूनही काही ठिकाणी चालू आहे. त्यांच्या वाटयाला आश्वासनापलीकडे काहीच आले नाही. शैक्षणिक जीवनाचा अधिकाधिक ऱ्हास होऊ लागला. नोकरशाही भ्रष्ट व नीतीधैर्य खचलेली होऊ लागली. गुंडांचे सहाय्य भीतीग्रस्त राज्यकर्त्यांना घेणे भाग पडले.

आजच्या राज्यशकटाचे वर्णन एका पौराणिक कथेच्या अनुरोधाने देता येईल. भारतीय युद्ध संपल्यानंतर त्यावेळी असलेला संकेत मोडून सारथी कृष्णाने धनुर्धारी पार्थाला रथातून प्रथम उतरण्यास सांगितले. अर्जुनाला कारण समजले नाही पण कृष्णाची आज्ञा म्हणून तो उतरला. कृष्ण नंतर उतरला व त्याचबरोबर रथ कोसळून नष्ट झाला. रथावर इतक्या अस्त्रांचा मारा झाला होता की, तो नष्टावस्थेतच होता. पण कृष्णाच्या दैवी शक्तीमुळे तो बाह्यत: अस्तित्वात दिसत होता. इंदिरा काँग्रेसचे तसेच झाले आहे. ती आज जिवंत दिसत असली तरी वस्तुत: ती केव्हाच नष्ट झाली आहे. पण नेहरू घराण्याच्या संजीवनीने ती अस्तित्वात असल्याचे भासमान होत आहे. ते खाली उतरताच हा शकट मोडून पडणार आहे. प्रादेशिक पुढारी जिल्हा पुढाऱ्यांचे सहाय्याने निम-स्वतंत्र संस्थाने स्थापन करतील व मध्ययुगात युरोपमध्ये जी राजकीय परिस्थिती होती ती निर्माण होईल व तमोयुगाचे चित्र पूर्ण होईल.

पुनरुक्तीचा दोष पत्करून तमोयुगाची लक्षणे पुन्हा सांगतो. दुर्बल राजसत्ता, प्रबळ प्रादेशिक नेते, जमीनदारांचे प्राबल्य, विज्ञानपराङमुखता, धर्मभावनेचा पगडा, कला आणि वाङमयातील सर्जनशीलतेचा अभाव, मानवतावादाचा लोप, भूदासांची हलाखी आणि वैचारिक गुलामगिरी ही ती होत. त्यांतली आज बहुतेक दृग्गोचर होत आहेत. आपला अध:पात सुरू झाला आहेच. तो पूर्ण व्हावा व शक्य तितक्या लवकर पूर्ण व्हावा म्हणजे चक्रनेमिक्रमेण या न्यायाने या वातावरणाचा कदाचित उबग येऊन आपण पुन्हा आपल्या उद्धाराचा मार्ग जिद्दीने शोधू लागू.

मी निराशावादीही नाही किंवा 'प्यूरिटन' ही नाही. मनुष्य जीवनात शारीरिक, हलक्या बौद्धिक स्तरावरील, आणि निर्भेळ बौद्धिक आनंद या सर्वांनाच स्थान आहे. पण या तिन्ही स्तरांवरील सुखांचा योग्य तो मेळ घालणे व बौद्धिक आनंद श्रेष्ठ मानणे हे प्रगत समाजाचे लक्षण आहे. स्त्रीसहवास, मद्यसेवन, उत्तम वस्त्रालंकार, प्रणयदृश्ये, विदूषकांचे चाळे, गुन्हेगारी कथा, प्रणयरम्य कादंबऱ्या, बोकॅचिओ किंवा बाल्झॅक यांच्या

चावट कथा, बेभान करून टाकणारे संगीत, डिस्को डान्स, शारीरिक स्पर्धा, खेळ या सर्वांनाच स्थान आहे, पण त्यांच्याच बरोबरीने मानवतावाद, बौद्धिक चर्चा, तत्त्वज्ञान, उच्च अभिरुचीचे साहित्य व कला, शास्त्रोक्त संगीत यांनाही स्थान आहे आणि ते स्थान सर्वश्रेष्ठ आहे. जो समाज हे स्थान देत नाही व फक्त खालच्या पातळीवरीलच आनंदाचा आस्वाद घेऊ शकतो त्या समाजाची कितीही शास्त्रीय प्रगती झालेली असली तरी अधः-पात सुरू झालेला असतो. दुर्दैवाने भारतातच नव्हे तर थोडयाफार फरकाने हे चित्र जग-भरच दिसत आहे.

आदिम अवस्थेपासून मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर प्रगतीच आढळते. मध्ये चढउतार असतील. पण एकंदर आलेख प्रगतीचाच आहे. त्यामुळे सध्या जरी संगणकीय तमोयुगाकडे आपली वाटचाल चालू असली तरी त्यातून आपण बाहेर पडणार हे निश्चित. केव्हा हे सांगणे कठीण आहे. कारण ते आपल्यावरच अवलंबून आहे. मानवी संस्कृतीच्या इतिहासात दुसरेही एक सूत्र आढळते. ते म्हणजे सामर्थ्याचे सतत बदलते अधिष्ठान. सुरु-वातीला शारीरिक शक्ती व क्षमता हेच केवळ सामर्थ्याचे अधिष्ठान होते. त्याची जागा पुढे शस्त्रनैपुण्याने घेतली. आज जरी पैसा वर्चस्व गाजवीत असला तरी तो हळूहळू बुद्धीला जागा करून देताना दिसत आहे. यापुढील कालात व्यवस्थापनप्रेरित शासन सुरू झाल्यानंतर बुद्धिमंतांच्या हातातच सर्व सूत्रे जाणार आहेत. त्यानंतरचा टप्पा म्हणजे न्याय पायाभूत असलेल्या समाजात रूपांतर. तथापि न्याय आणि सत्य यांमध्ये अंतराय असल्यामुळे सत्याधिष्ठित समाज ही मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीची शेवटची अवस्था राहील. अर्थात सत्य ही अमूर्त कल्पना असल्यामुळे व्यावहारिक सत्याजवळ जाणारा न्याय असे त्याचे स्वरूप राहील. पुष्कळांना हे सर्व स्वप्नरंजन वाटेल. पण त्या दिशेने आपली वाटचाल चालू झाल्याची चाहूल लागली आहे. पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत साम्राज्यवादी गंड पोसणाऱ्या देशांना आज स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व यांचा उद्‌घोष करावा लागत आहे. शोषण करणारांनाही वरकरणी का होईना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय या संकल्पना स्वीकाराव्या लागल्या आहे. आणखी एक उदाहरण. आफ्रिकेतील कुठल्यातरी देशात दुष्काळ पडतो, तेथील लोकांच्या पुनर्वसनासाठी दूरदर्शनवर संगीताचा विश्वव्यापी कार्यक्रम होतो, त्यात लक्षावधी लोक सहभागी होतात आणि अनेक सेवाभावी संस्थांचे स्वयंसेवक तेथे प्रत्यक्ष जाऊन दुष्काळ निवारणाच्या कार्यात मदत करतात हे दृश्य मान-वाच्या सहानुभूतीच्या कक्षा विकसित होत आहेत याचेच विलोभनीय दर्शन घडवतात. याच वृत्तीचा विकास होऊन शेवटी मानव पृथ्वीवर सुवर्णयुग आणणार आहे. सुवर्णयुग किंवा सत्ययुग विसरल्या गेलेल्या भूतकाळाचा ठेवा नसून ते पुढे अवतरणार आहे. आणि शारीरिक शक्ती, शस्त्रनैपुण्य, संपत्ती, बुद्धी, न्याय व सत्य ही सामर्थ्याची बदलती अधि-ष्ठाने त्याची सोपान परंपरा आहे. El dorado ही निव्वळ कविकल्पना न राहता ती वास्तवात अवतरणार आहे.

मी एक सामान्य वाचक या नात्याने हा प्रदीर्घ लेख लिहिला आहे. मला सर्वच विष-

यात रस आहे. गती मात्र कोणत्याही विषयात नाही. तज्ज्ञ निरनिराळ्या विषयांवर विद्वत्ताप्रचुर लेख लिहितात. पण सामाजिक सद्भाव असलेल्या सामान्य वाचकाला आजच्या परिस्थितीबद्दल काय वाटते हे त्यांना समजावे म्हणून या लेखांचा प्रपंच. माझा अवाका सामान्य आहे. पण मांडलेल्या कोणत्याही मताबद्दल आत्मीयता न बाळगण्याइतकी माझी मानसिक वाढ झालेली आहे. माझी भूमिका विद्यार्थ्याची आहे. आणि चुका करून त्या सुधारून घेणे हा विद्यार्थ्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. अंतर्विरोध, अज्ञान अशासारखे जे दोष या लेखात असतील ते विचारवंतांनी दाखवून दिल्यास उपकृत होईन.

□ □

# सहा

साप्ताहिक सोबतमध्ये माझे 'महाराष्ट्राची शोकांतिका' या शीर्षकाखाली पाच लेख प्रसिद्ध झाले होते. त्यावर ज्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या त्यांच्या संदर्भात मला माझी लेखन–भूमिका स्पष्ट करणे अगत्याचे वाटते.

अगदी सुरुवातीलाच एक–दोन गोष्टींचा खुलासा करणे आवश्यक वाटते. पहिले म्हणजे रा. स्व. संघ किंवा भा. ज. प. यांच्याबद्दल मला खास आत्मीयता नाही. पूर्वी माझ्यालेखी हे टिंगलीचेच विषय होते. मी रा. स्व. संघात एकही दिवस गेलो नाही. भा. ज. प. चा माझा दुरान्वयानेच संबंध आहे. म्हणजे माझे काही परिचित भा. ज. प. चे आहेत. त्यांच्याशी मी हवापाण्याच्याच गप्पा मारतो, सवयीचा परिणाम म्हणा, पण संघ आणि भा. ज. प. यांच्या कार्यकर्त्यांशी बोलताना मला नेहमीच अवघडल्यासारखे होते. गप्पा मारायला समाजवादी चांगले. दुसरे म्हणजे पूर्वायुष्यात माझ्यावर जे संस्कार झाले ते गांधी, सेवादल, रॉयिस्ट, सोशालिस्ट आणि कम्युनिस्ट यांचे. आता कोणत्याच पक्षाबद्दल आत्मीयता नाही, कारण कोणत्याच पक्षाजवळ भारताला काही देण्यासारखे नाही हे अनुभवांती पटले आहे.

स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षे झाली तरी कोणताही प्रश्न सुटण्याच्या मार्गावर नाही. तर अधिकाधिक बिकट होत आहे. याचे कारण एका विकासशील राष्ट्राच्या समस्या असे नसून कपाळकरंटेपणा आहे. हे असे का, याच्यावर चिंतन करताना असे आढळले की, या शोकांतिकेला आपल्या सर्वांचाच हातभार लागलेला आहे व त्याचे मूळ आपल्या दुबळेपणात आहे. या दुबळेपणाचा डोळसपणे शोध घेतला तरच तो जाणीवपूर्वक नाहीसा करता येईल. हा शोध घेताना असे लक्षात आले की, देशाचे पुढारी, लेखक, कलावंत, विचारवंत, शास्त्रज्ञ हे या दुबळेपणाचेच प्रतीक आहेत. या शोकांतिकेचा खरा नायक आहे भारतीय समाज. पण समाजाला नायक समजून शोकांतिका रंगवता येत नाही. म्हणून त्यांचे प्रतिनिधित्व जे धुरीण करतात त्यांना माध्यम म्हणून वापरून हे लेख लिहिले आहेत. त्यात अनेक व्यक्तींवर टीका आली आहे. पण ती त्या व्यक्तीवरील नसून ते ज्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात त्या समाजावरील आहे, आपल्या सर्वांवरील आहे कारण आपलाच दुबळेपणा त्यांच्यात परावर्तित झाला आहे.

माझ्या लेखात गांधीयुगापासून भारताच्या अवनतीला सुरुवात झाली असे मी म्हटले होते. काही वाचकांना हा उल्लेख खटकला तर काहींना तो विशेष आवडला. काही मित्रांचे म्हणणे असे पडले की गांधीजींच्या राजकारणाचाच फक्त उल्लेख आल्यामुळे गांधींवर

अन्याय झाला आहे. कारण इतर क्षेत्रातही गांधीची कामगिरी आहे ती दुर्लक्षिण्यासारखी नाही. त्यामुळे लेखाचा तोल ढळला आहे. वास्तविक पाहता गांधी आणि गांधीवाद यावर लिहिण्याचा माझा हेतू नव्हता. गांधींचा उल्लेख निव्वळ अनुषंगाने आला होता. पण लेखांवरील विविध प्रतिक्रिया पाहता गांधी आणि गांधीवाद याबद्दलची माझी मते मांडणे पुढील चर्चेच्या दृष्टीने आवश्यक वाटते.

माझ्या लेखात गांधींच्यावर बरीच टीका आली आहे व आपल्या अवनतीची बरीचशी जबाबदारी त्यांच्यावर टाकली आहे. तेव्हा साहजिकच असा प्रश्न पडतो की, एकटा माणूस कितीही मोठा असला तरी एखाद्या समाजावर अशा तऱ्हेने प्रभाव पाडू शकतो काय ? या प्रश्नाचे उत्तर 'होय' आणि 'नाही' असे दोन्ही तऱ्हेने वेगवेगळ्या परिस्थितीच्या संदर्भात देता येईल. जगाच्या इतिहासात विलक्षण कर्तृत्व दाखवणाऱ्या काही असामान्य व्यक्तींमध्ये अलेक्झांडर, ज्युलिअस सीझर, शार्लेमेन, नेपोलियन आणि अलीकडील काळात गांधी आणि हिटलर या होत. सर्वांचे कर्तृत्व तपासून पाहिले तर सहसा असे आढळून येईल की, ते परिस्थितीसापेक्ष आहे. उदा. फ्रेंच राज्यक्रांती झाली नसती तर नेपोलियन काय होऊ शकला असता हा एक मनोरंजक प्रश्न आहे. किंवा गांधी इंग्लंड-अमेरिकेत आणि हिटलर भारतात जन्माला आले असते तर काय झाले असते ?

याचा अर्थ असा की, एखाद्या समाजाच्या किंवा त्यातील प्रबळ वर्गाच्या, एखाद्या विशिष्ट कालात, सहज प्रवृत्ती असतात त्यांना आवाहन करून त्या समाजाला कार्यप्रवृत्त करणे व त्यातून आपण जे ध्येय समोर ठेवले असेल ते साध्य करणे हा मार्ग जगाच्या इतिहासातील सर्वच यशवंत व्यक्तींनी स्वीकारलेला आढळतो. याउलट समाजाच्या पचनी न पडणाऱ्या गोष्टी मोडून काही विचारवंत समाजाला जागे करण्याचा प्रयत्न करीत असतात, त्यांचा प्रभाव समाजावर पडत नाही. आधुनिक भारतापुरतेच बोलायचे झाले तर राजा राममोहन रॉय, ज्योतिबा फुले, रानडे, आगरकर, सावरकर या वर्गात मोडतात. यांपैकी रॉय आणि रानडे यांच्या विचारात किंवा व्यक्तिमत्त्वात निदान काही भाग तरी असा होता की, त्याचा प्रभाव तत्कालीन समाजावर काही प्रमाणावर पडू शकत होता. याउलट फुले, आगरकर, सावरकर यांचे विचार समकालीन समाजाला पचणे सर्वथैव अशक्य होते. शिवाय रॉय आणि रानडे यांच्या बौद्धिक कर्तृत्वाला छेद देऊ शकतील असे विरोधक त्यांच्या काळात नव्हते. तर आगरकर आणि सावरकर यांना टिळक आणि गांधी या उत्तुंग व्यक्तींच्या विरोधात कार्य करावे लागले. त्यामुळे त्यांच्या समाजावरील प्रभावाला फार मोठ्या मर्यादा पडतात.

या प्रभावाचा कालसापेक्ष विचार करता असे आढळून येते की टिळकांच्या निधनापर्यंत हिंदू समाजाची जी वैगुण्ये आहेत ती दूर करण्याचा प्रयत्न होत होता. इंग्रजांपासून आपणाला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. त्याचा उपयोग करून राष्ट्रोद्धार करता येईल हा दृष्टिकोन रानडे याच्यापर्यंत आढळतो. राजकीय अधिकार मिळवण्यासाठी इंग्रजांचेच मार्ग वापरून त्यांच्याशी झगडणे व अशा तऱ्हेने राजकीय चळवळ राष्ट्राभिमानाच्या पायावर

करणे हा मार्ग टिळक व त्यांचे सहकारी यांनी चोखाळला. गांधींनी मात्र इंग्रजांपासून आपल्याला फारसे शिकण्यासारखे नसून आपणच इंग्रजांना किंवा पाश्चात्य संस्कृतीला काही शिकवू शकलो अशी भावना निर्माण करून राष्ट्रीय अहंकार जागृत केला. अहंकार जागृत झाला म्हणजे दुर्गुणांचे गुण दिसू लागतात व राष्ट्राची प्रगती खुंटते. टिळकांचा सुधारणांना जरी पाठिंबा नसला तरी टिळकयुग संपेपर्यंत हिंदुसमाजाच्या वैगुण्याचे, दौर्बल्याचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न झाला नाही एवढे तरी निश्चित म्हणता येईल. याउलट कित्येक शतकांच्या परंपरेने हिंदु समाजाची जी अधुस्थाने दृढमूल झाली होती त्यांचे उदात्तीकरण करून ती बलस्थाने आहेत असा भ्रम गांधींनी निर्माण केला.

सावरकरांनी राजकीय कार्य सुरू केल्यानंतर पुन्हा हिंदुसमाजाच्या वैगुण्यावर बोट ठेवून हिंदूंचे संघटन, संरक्षण, प्रतिकार, सैन्यभरती यावर भर देण्यास सुरुवात केली. हिंदु समाजाने या गोष्टी कधीच केल्या नसल्याने त्याला त्या मानवणाऱ्या नव्हत्या हे एक. आणि दुसरे म्हणजे तोपर्यंत राष्ट्रीय अहंकार इतका जागृत झाला होता की, आपल्या वैगुण्याचेच वत्सलांछनासारखे हिंदुलोक भूषण मिरवीत होते. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत सावरकरांच्या प्रखर बुद्धिवाद झेपणारा नव्हता. याच्याच बरोबरीने त्यांची हिंदुत्वाची व्याख्या वाचली म्हणजे सावरकरांना नेमके काय अभिप्रेत होते याची कल्पना येते. अवनत हिंदुत्व सोडून प्रगतीशील हिंदुत्वाच्या व्यापक पायावर त्यांना राष्ट्रउभारणी करायची होती. आणि हे हिंदूंना अंगवळणी पडण्यासारखे नव्हते. तेव्हा गांधींनी जनमानसावर प्रभाव गाजवावा व सावरकर दुर्लक्षिले जावे यात आश्चर्यकारक काहीच नव्हते.

उलट राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर हिंदुत्वाने कशी मात केली याचे खेदजनक उदाहरण गांधी हत्येनंतरच्या जाळपोळीत मिळाले. समाजवादी इ. पक्षांच्या सभा उधळण्यात कृतकृत्यता मानणाऱ्या संघीयांची घरे जेव्हा जाळली गेली तेव्हा, रोज संघस्थानावर लाठीकाठी फिरवणारे स्वयंसेवक मार खात होते किंवा लपून बसले होते. पाच-पन्नास शिस्तबद्ध स्वयंसेवकांनी जर प्रतिकार केला असता तर हजार-पाचशेच्या जमावालाही ते भारी गेले असते. पण हिंदू प्रतिकार करीत नाही. त्याची माजोरी दुबळ्यांच्या पुढे. काही स्वयंसेवकांना नंतर मी त्यांनी प्रतिकार का केला नाही असे विचारले तेव्हा त्यांनी जे उत्तर दिले ते हिंदुत्वाला साजेसेच होते. ते म्हणाले, रक्त सांडले असते आणि देशबांधवांचे रक्त आम्हाला सांडावयाचे नव्हते. याच हिंदुत्वाला गांधींनी नवे जीवन दिले होते.

एका दृष्टीने पाहिले तर हेतुतः म. गांधींचे कार्य युगप्रवर्तक होते. १९१५ सालपर्यंत राष्ट्रीय चळवळीची झालेली प्रगती भक्कम (कन्सॉलिडेट) करून प्रगतीच्या नव्या दिशा शोधणे आणि राष्ट्रीय चळवळीला अधिक व्यापक आशय प्राप्त करून देणे अशा तऱ्हेचे त्यांच्या कार्याचे संकल्पनात्मक रूप होते. तोपर्यंत राजकीय चळवळ आणि सामाजिक सुधारणा या समांतर पद्धतीने चालू होत्या. व्यवहारतः त्या तशाच चालू राहणे योग्य झाले असते का हा चर्चेचा विषय होऊ शकेल. पण तत्त्वतः गांधींचा मार्ग अचूक होता. राष्ट्रीय चळवळ निव्वळ राजकीय हक्कासाठी न चालवता, आर्थिक, सामाजिक, राजकीय

व धार्मिक सुधारणांचा सर्वसमावेशक कार्यक्रम आखून तिला राष्ट्रीय उत्थानाचे स्वरूप देणे हा तोपर्यंत झालेल्या प्रगतीचा अटळ असा पुढचा टप्पा होता. अशा तऱ्हेची 'मोठी उडी' घेण्यास राष्ट्राची मानसिक तयारी झाली होती व तिचे नेतृत्व करण्यास लागणारे असामान्यत्व गांधींच्यात निश्चित होते. पण गांधींच्या हिंदुत्वाने अखेर या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमावर मात केली. परिणामी गांधींनी भारताला पारतंत्र्याच्या तमोयुगातून बाहेर काढले ते सर्वकष आणि अधिक भयावह अशा दुसऱ्या तमोयुगात लोटण्यासाठीच.

हिंदूंचे प्रातिनिधिक विशेष म्हणजे व्यक्तिवाद, समर्थांशी तडजोड आणि दुबळ्यांशी मुजोरी, सामाजिक बेपर्वाई, चिकित्सक बुद्धीचा अभाव, विज्ञानपराङ्मुखता, उपचारांचे प्राबल्य, रूढीग्रस्तता, व्यवहारवादाचा अभाव आणि सैद्धांतिकता, यथार्थ दर्शनाबद्दल औदासिन्य, आध्यात्मिक अहंकार इ. थोडक्यात मध्ययुगीन समाजाची सर्व वैशिष्टये. या सर्व दोषांवर आपण किती मात करू शकतो याच्यावरच गांधींनी जी मोठी उडी कल्पिली होती तिचे यशापयश अवलंबून होते. १९२० पर्यंतच्या चळवळीचे स्वरूप समजणे सोपे होते. सुशिक्षित भारतीय समाजाला हिंदूंच्या वैगुण्याचे ज्ञान प्राप्त झाले होते. ती दूर करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. त्यासाठी त्यांनी जे मार्ग स्वीकारले ते परकीय होते' आपल्याला काय हवे आहे व त्यासाठी कोणते उपाय योजावेत याविषयी निश्चित जाण होती. थोडक्यात, कालबाह्य झालेले हिंदुत्व टाकून हळू हळू आधुनिक संस्कृतीचा अवलंब करणे या मार्गाने राष्ट्राची वाटचाल चालू होती. त्यात तडजोडी होत्या, पण आपद्धर्म म्हणून. तडजोडीला तत्त्वज्ञानाचे स्वरूप देण्याचा प्रयत्न नव्हता. 'सामाजिक सुधारणा राजकीय प्रगतीच्या व स्वाभिमानाच्या अनुषंगानेच झाली पाहिजे' असे लो. टिळकांचे मत होते. म्हणजेच आपल्या समस्या व आपली शक्ती यांच्या बुद्धिवादी आकलनातून राष्ट्रोद्धाराचे मार्ग चोखाळले जात होते. त्यात भव्य, दिव्य असे काही नव्हते. पण जे होतें ते बुद्धिगम्य होते.

याउलट गांधींचे ध्येय भव्य होते, स्तिमित करणारे होते. पण त्यांनी जे मार्ग चोखाळले ते त्या ध्येयाशी कितपत सुसंगत होते हा संशोधनाचा विषय ठरावा. यात जो विसंवाद निर्माण झाला त्यातून गोंधळाचे एक वातावरण निर्माण झाले. राष्ट्रापुढे समस्या कोणत्या व आपण काय करीत आहोत याचे भान नष्ट झाले. व अशा वेळी हिंदू समाज आज कित्येक वर्षे करीत आहे तेच करू लागला. आपण अधिकाधिक आपल्या कोषात शिरू शकलो. आपल्यापुरते लहानसे जग निर्माण करून त्यात रमू लागलो. कारण त्यात सुरक्षितता होती. परिणामी जात, पंथ, गाव, प्रदेश यांच्यापुरत्याच आपल्या सहानुभूती सीमित होऊ लागल्या. रॉय यांच्यापासून टिळकांच्यापर्यंत विकसित होत असलेल्या अखिल भारतीय दृष्टिकोनाची पीछेहाट होऊ लागली व स्वातंत्र्यानंतर त्याचा मागमूसही उरला नाही. माझे हे विधान उघड उघड विसंगत वाटेल. कारण गांधीयुगातच भारतीय एकमेकांच्या जास्तीत जास्त निकट आले होते ही गोष्ट खरी आहे. पण या कालात वाढला होता तो निव्वळ संपर्क. समज (अंडरस्टँडिंग) वाढली नव्हती. अखिल भारतीय दृष्टि-

कोन याचा अर्थ एकमेकांच्या समस्या समजावून घेऊन त्या सोडविण्यासाठी सहकार्याची क्षेत्रे शोधणे व कार्यरत होणे. असा प्रयत्न या कालात आढळत नाही.

हे का झाले याचा तपास घेताना असे लक्षात येते की, हिंदुसमाजाची जी वैशिष्टये होती त्यांचेच गांधींनी उदात्तीकरण केले. म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे जी अधुस्थाने होती ती बलस्थाने होती असा भ्रम निर्माण केला. असा भ्रम निर्माण व कायम होण्यास राजकीय परिस्थितीही कारणीभूत होती

पहिले महायुद्ध संपले होते. त्याचे विनाशकारी स्वरूप अभूतपूर्व आणि भयकारी होते. साहजिकच गांधींच्या अहिंसा मार्गाचे जगातील विचारवंतांना आकर्षण वाटणे अनिवार्य होते. शिवाय इंग्रज राज्यकर्त्यांच्या दृष्टिकोनातही फरक पडू लागला होता. युद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटनचे पंतप्रधान अँस्क्विथ यांनी भारतीय प्रश्नाकडे आता वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे असे उद्‌गार काढले होते. त्यामुळेच १९२० नंतर राजकीय कैद्यांना टिळकांच्या काळात जशा कडक शिक्षा दिल्या जात होत्या तशा झाल्या नाहीत. इतकेच नव्हे तर सावरकरांसारख्या क्रांतिकारकांच्या बाबतीतही सहानुभूतीचे धोरण स्वीकारण्यात आले. तिसरे एक कारण म्हणजे इंग्लंडमध्ये मजूर पक्ष ही एक शक्ती उदयास येत होती व तिच्या पुढाऱ्यांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सहानुभूतीचा होता. या सर्वाचा परिणाम इंग्रज सरकारच्या राष्ट्रीय चळवळीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर होणे अपरिहार्य होते व तो अधिकाधिक सौम्य होत गेला.

अर्थात याचा तितकाच वाटा गांधींच्या राजकारणाकडेही जातो. एकोणिसाव्या शतकात प्रबोधन फक्त वरच्या वर्गापुरतेच बौद्धिक पातळीवर मर्यादित होते, खालचा वर्ग अजून धर्म, परंपरा, रूढिग्रस्त होता. त्यांचा पाठिंबा मिळवायचा तर राजकारण त्यांच्या पातळीवर नेणे किंवा त्यांचे प्रबोधन करून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणणे आवश्यक होते. यातील दुसरा मार्ग लांबचा व बिकट होता. व पहिला मार्ग सुलभ होता. गांधींनी तो चोखाळला. त्यामुळे जनसामान्यांचा भरघोस पाठिंबा त्यांना मिळाला. अशा तऱ्हेने इंग्रजांचे भारताबद्दलचे धोरण व गांधींचा लोकसंग्रह या दोघांचाही एकमेकांवर परिणाम होत होता. याचा परिणाम असा झाला की, इंग्लंडमधील राजकारणामुळे आणि गांधींना असलेल्या लोकांच्या पाठिंब्यामुळे इंग्रजांच्या राज्य करण्याच्या पद्धतीत आणि भारतीय प्रश्नाकडे पाहण्याच्या भूमिकेत जो बदल घडून येत होता त्याचे श्रेय सर्वस्वी फक्त गांधींच्या राजकारणालाच दिले गेले. हिंदुस्थानची अधुस्थाने बलस्थाने आहेत असा भास, इंग्रज आणि भारतीय यांच्या बदलत्या संबंधाने आणि गांधींच्या यशाने, बळकट होण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. गांधीवाद राजकारणातील अक्सीर इलाज झाला व तोच गांधींनी त्यांच्या सर्वंकष कार्यक्रमाच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रातही करण्याचा प्रयत्न केला.

पहिल्या महायुद्धापासून दुसऱ्या महायुद्धापर्यंतचा काळ हा जगाच्या इतिहासात सर्वंकष तत्त्वज्ञानाचा (टोटॅलीटॅरिअॅनिझम) काल दिसतो. गांधी, हिटलर, मुसोलिनी, लेनिन, स्टॅलिन यांचे मार्ग भिन्न असले तरी राष्ट्रीय उत्थानासाठी सर्वसमावेशक कार्यक्रम व त्याचे

तत्त्वज्ञान हे त्यातील समान सूत्र होते, याउलट लोकशाहीवादी शक्ती आपल्यापुढील प्रश्न व्यावहारिक पद्धतीने सोडविण्याचा प्रयत्न करीत होत्या. हिटलर, गांधी, स्टॅलिन यांनी आपल्या देशासमोरील प्रश्न सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न एका वर्गात मोडतात तर अमेरिकेने आर्थिक अरिष्टातून सुटका होण्यासाठी 'न्यू डील' च्या स्वरूपात केलेले प्रयत्न हे दुसऱ्या वर्गात मोडतात. सर्वंकष तत्त्वज्ञान समाजाच्या पचनी पाडण्यासाठी समाजाला पछाडून टाकणे आवश्यक असते. रशियात मार्क्सवाद, जर्मनीत आर्यन श्रेष्ठत्व व ज्यूद्वेष आणि भारतात आध्यात्मिक आणि सांस्कृतिक अहंकार हे उपयोगी पडले हा अहंकार जनसामान्यात तर हास्यास्पद पातळीवर पोहोचला होता. तेव्हा कीर्तनकार कथेत नेहमी एक किस्सा सांगत असत. साहेबाला पुरणपोळी खायला बोलावल्यानंतर त्याला पोळीच्या आत पुरण कसे गेले याचा पेच पडतो, त्यासंबंधी तो असे. त्यानंतर आम्हा सर्वांना दोन दिवस भारतीय श्रेष्ठत्वाचा म्हणजे पुरणपोळीचा विलक्षण अभिमान वाटत असे. राजकारण बालांच्याही आटोक्यात आणले गेले होते.

रशिया, जर्मनी व भारत यांमध्ये एक प्रमुख फरक असा की, स्टॅलिन व हिटलर यांच्या हातात सर्वंकष सत्ता होती. सर्वंकष तत्त्वज्ञान अमलात आणण्यासाठी सर्वंकष सत्तेची जरुरी असते. सत्ता गांधींच्या हातात नव्हती. इंग्रजी राजवटीत ते शक्यही नव्हते. गांधींचा तसा प्रयत्न असावा असे मात्र वाटते. लेनिनने रशियातील कम्युनिस्ट पार्टीसाठी निर्मिलेली घटना व काँग्रेससाठी गांधींनी तयार केलेली घटना यांतील साम्यस्थळे लक्षात घेण्यासारखी आहेत. लेनिनच्या घटनेची लोकशाहीवादी केन्द्रीकरण (डेमोक्रॅटिक सेन्ट्रॉलिझम) म्हणजेच निवडून आलेल्या पॉलिट ब्यूरोचे सर्वाधिकार. मर्यादित सभासद संख्या आणि क्रियाशील कार्यकर्त्यापुरतेच मर्यादित सभासदत्व, अशी काही वैशिष्टये सांगता येतील. काँग्रेसच्या घटनेत अध्यक्ष निवडला जात असे. पण वर्किंग कमिटीच्या सर्व चौदा सभासदांची नेमणूक अध्यक्षच करीत असे. म्हणजेच काँग्रेसमधेही लोकशाहीवादी केन्द्रीकरणच होते. गांधींनी ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभासद संख्याही दोन हजारपर्यंत मर्यादित केली. तसेच कोणत्याही काँग्रेस समितीला निवडणूक लढविण्यासाठी सूतकताईची अट घातली. हा सर्व केन्द्रिकरणाचाच प्रकार होता. पण भारताने, नाही म्हटले तरी लोकशाहीची काही तत्त्वे आत्मसात केली होती. त्यामुळे राजकारणाच्या बाबतीत तरी सर्वंकष तत्त्वज्ञान रद्दबातल ठरले होते. अर्थात राष्ट्रीय काँग्रेसच्या बाबतीत अशी कर्वंकष सत्ता राबवणे अशक्य नव्हते.

असे सर्वंकष तत्त्वज्ञान आणि त्यावर आधारित कार्यक्रम यातील धोके यांची जाणीव रवींद्रनाथ टागोर यांना होती. १९२१ साली मॉडर्न रिव्हयूमध्ये लिहिलेल्या लेखात ते म्हणतात, 'एक बाह्य दडपण लोकांच्यावर आले असून त्याच्याखाली रगडले जाऊन सर्व लोक एकमुखाने बोलताना आणि चाकोरीबद्ध कार्यक्रम पार पाडताना दिसत होते. प्रत्येक ठिकाणी मला सांगण्यात आले की, संस्कृती आणि विवेक (रीझनिंग) यांना आता थारा नसून आज्ञा प्रमाण मानण्याचे युग सुरू झाले आहे. कुठल्यातरी बाह्य स्वातंत्र्याच्या नावा-

खाली आत्म्याचे खरे स्वातंत्र्य चिरडून टाकणे किती सोपे आहे, नाही!' मूळ धरू लागलेल्या प्रबोधनाची गांधीवादाने फार मोठी पीछेहाट केली होती.

सर्वंकष सत्ता हाती नाही याच्याच बरोबरीने येथील लोकांची मनोवृत्ती सर्वंकष सत्तेला अनुकूल नाही हाही एक अडचणीचा भाग होता. त्यामुळे गांधीवादाला फॅसिझमचे स्वरूप येणे अशक्य होते. शिवाय गांधींना जो समाज अभिप्रेत होता तो यंत्रयुगातील समाज समाज नसून कालबाह्य शेतकी तंत्रावर आधारीत शेतीप्रधान समाज होता. अशा समाजात सर्वंकष सत्तेचे स्वरूप अविभक्त कुटुंबाच्या कर्त्यांची सत्ता असू शकते व गांधींची राजकारणातील भूमिका तीच होती. हे लक्षात घेतले म्हणजे भारताच्या परागतीची मीमांसा योग्य तऱ्हेने करता येईल.

कालबाह्य तंत्रावर आधारित शेतीप्रधान समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आधुनिक यंत्रणा उपयोगी पडत नाही. त्यासाठी कालबाह्य कल्पनांचा आश्रय घ्यावा लागतो. अशा समाजाचे ध्येय प्रगती असत नाही, तर निव्वळ जगणे असते आणि त्यामुळे ऐहिक जीवनात जे आपण गमावतो त्याची भरपाई आत्मिक उन्नतीच्या अहंकाराने करावयाची असते. गांधींना अशा तऱ्हेचा भारत निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा असल्याने साहजिकच आपल्यापुढील प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी अवनत हिंदुत्वात आधार शोधला आणि त्याचे पुनर्वसन करून त्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. १९१५ पर्यंत जी भारताची वैगुण्ये म्हणून गणली गेली ती सामर्थ्यस्थाने असल्याचा साक्षात्कार झालेला महात्मा भारतात अवतरला होता. अवनत हिंदुत्वाचे पुनरुज्जीवन झाले होते. जवळजवळ शंभर वर्षे जे विचारमंथन चालू होते त्यातून हिंदुत्वाबद्दल निर्माण होणाऱ्या शंकांचे गांधीवादाने निरसन झाले होते. अवनत हिंदुत्वाचे आधुनिक भाषेत समर्थन करणारा प्रेषित मिळाला होता. जुन्या-नव्याचा पवित्र संगम झाला. जीर्णमतवादी आणि पुरोगामी दोघांचीही एकाच तत्त्वज्ञानात सोय झाली होती. गांधीवादाच्या नव्या बाटलीत अवनत हिंदुत्वाचा जुनाच सोमरस भरला होता.

सामान्य जनताही या पवित्र संगमावर स्नान करण्यास उत्सुक होती. कारण शतकानुशतके ती ज्या जीवनाला सरावली होती, तिच्याशी गांधीवाद सुसंगत होता. राजकारणात मार खाणे, समाजकारणात जातिव्यवस्थेला चिकटून रहाणे, आर्थिक जीवनात निव्वळ पोटासाठी धडपडणे आणि जीवनविषयक दृष्टिकोन सामाजिक बेफिकीरीचा, अशा तऱ्हेचे हिंदूंचे जीवन जगून होते. तसेच जीवन जगून राष्ट्राला स्वातंत्र्य मिळणार आहे. आणि स्वातंत्र्य म्हणजे सर्वच समस्यांची उकल, असा विश्वास जनसामान्यांना मिळाला होता. अवनत हिंदुत्ववादाचे पुनरुज्जीवन हे गांधीवादाचे फार मोठे सामर्थ्य होते व भारतीय जनतेला त्याची भुरळ पडली यात कोणतेच आश्चर्य नाही. टिळकांच्या निधनानंतर सावरकर जरी सक्रिय राजकारणात असते तरी त्यांच्या विचारांचा हिंदू समाजावर कोणताही परिणाम झाला नसता. कणाहीन समाजाला उभारी धरण्यास शिकविणे हे अत्यंत अवघड असते पण कणाहीनतेची सामर्थ्यस्थान म्हणून एखाद्याने प्रशंसा केली तर त्याचा

महात्मा होण्यास वेळ लागत नाही. हजार वर्षांत हिंदुसमाजाने जे केले नव्हते ते करण्यास सावरकर व हेगडेवार सांगत होते. अवनत हिंदुत्वापासून समाजाला दूर नेण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्यामागे समाज कसा जाणार ?

भारतीय राजकारणातील हा फार विरोधाभास आहे की, ज्यांना हिंदुत्ववादी म्हणून धोपटले जाते ते वास्तविक पाहता हिंदुत्वाचे दोर कापू पहात होते. आधुनिक समाज बनवू पहात होते, सामर्थ्यशाली राष्ट्र घडवू इच्छित होते आणि ज्यांना पुरोगामी म्हटले जात होते किंवा आहे ते अवनत हिंदुत्वाचे जतन करीत होते किंवा करीत आहेत. भारताची फाळणी झाली, कत्तली झाल्या, स्वातंत्र्य मिळून पस्तीस वर्षे झाली तरी अजूनही या वैचारिक गोंधळातून आपण बाहेर पडलो नाही आणि मौजेची गोष्ट म्हणजे सावरकरांच्यापासून ज्यांनी स्फूर्ती घेतली ते भा. ज. प. चे पुढारीही या गोंधळात आता सापडले आहेत. गांधीवादाने केलेले नुकसान भरून काढण्यासाठी त्याच्या विरोधात या पक्षाची स्थापना झाली पण आता तीच चूक पुन्हा नव्या जोमाने करण्यास हा पक्ष बद्धपरिकर झाला आहे. हिंदु समाजाचे जुने दुखणे म्हणजे तत्कालीन फायद्याकरिता राष्ट्रहिताचा बळी देणे. काही थोड्याशा मतांकरिता हा पक्ष मुस्लिम जातीयवादाकडे डोळेझाक करण्यास तयार आहे. अलीकडचीच गोष्ट. जातीयवाद्यांना घाबरून शासनाने आठवीच्या इतिहासाच्या पुस्तकातील दोन धडे रद्द केले. त्यासंबंधात या पक्षाची कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया वाचनात आली नाही. याही पक्षाला आता पुरोगामित्वाच्या झुलीचे आकर्षण वाटू लागले आहे. हिंदुत्व हिंदूंना सोडत नाही हेच खरे.

गांधीवादाला जे यश मिळाले त्याचे प्रमुख कारण म्हणजे इंग्रजांची सुसंस्कृत राजवट. एका पत्रलेखकाला हा उल्लेख खटकला व माझ्या विधानाची बेजबाबदार म्हणून त्याने संभावना केली. इतकेच नव्हे तर सुसंस्कृत या शब्दाचा अर्थ बदलला पाहिजे असेही उपरोधाने लिहिले. अर्थात याचे मला नवल वाटत नाही. कारण इंग्रज लेखक किंवा विचारवंतही गांधींच्या यशाचे श्रेय सर्वस्वी गांधींना देतात. माझ्या वाचनात आलेल्या लेखकांमध्ये लुई फिशर हा एकटाच, त्याचे श्रेय दोघांना देतो. भारतीय लेखक, विचारवंत यांपैकी कुणीहीही अशा तऱ्हेचा विचार मांडलेला माझ्या वाचनात आला नाही. त्यामुळे इंग्रजी राजवट सुसंस्कृत होती, तिचा गांधींच्या यशाशी घनिष्ट संबंध होता ही कल्पना, प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने तितकेसे आवश्यक नसले तरी विस्तारपूर्वक मांडणार आहे. कारण वस्तुनिठ आत्मपरीक्षणाच्या दृष्टीने यावर चर्चा होणे मला जरुरीचे वाटते. प्रथम सुसंस्कृत याचा अर्थ निश्चित करावा लागेल. सुसंस्कृत याचा अर्थ मानवी मूल्य (ह्यूमन डिग्नीटी) ओळखणे असा मी करतो व या दृष्टिकोनातून इंग्रजी राजवट कशी होती याचा तपास घेणे मला अगत्याचे वाटते. काही राजवटी उघडउघड असंस्कृत असतात. उदा. हिटलर, स्टॅलिन, रशियातील झार यांच्या राजवटी. तर इतर कमीअधिक सुसंस्कृत असतात. तुलनेसाठी मी भारतीयांची राजवट व इंग्रजाची राजवट घेतो व कोणती राजवट अधिक सुसंस्कृत याचा निर्णय वाचकांवरच सोपवितो. इंग्रजांचे राज्य स्थापन होण्या-

पूर्वी सती, बालहत्त्या अशा अमानुष प्रथा होत्या त्या इंग्रजांनी बंद केल्या. विधवा विवाहाचा कायदा त्यांनीच केला. ठगीचा नायनाट आणि पेंढाऱ्यांना नेस्तनाबूत करून सामान्य माणसाला सुरक्षित वाटावे अशी परिस्थिती निर्माण केली. त्यांच्या शरणागतीचे सोहळे केले नाहीत. मला पुष्कळ वेळा वाटते की, व्यक्तीचे आणि मालमत्तेचे संरक्षण हे सूत्र कारभाराचे बाबतीत इंग्रजांनी ठेवले नसते तर गांधींची चळवळ फार लवकर आटोपली असती. कारण त्यांच्या चळवळीचा साचा साधारण ठरलेला होता. हरताळ किंवा सत्याग्रह आणि पाठोपाठ जमावाची दंडेली. या दंडेलीला आळा न घालता एखादे गाव किंवा शहर इंग्रज-सरकारने जमावाच्या स्वाधीन केले असते तर मध्यमवर्ग चळवळीतून बाहेर पडून इंग्रजांनाच शरण गेला असता.

संमतिवयाचा कायदा भारतीयांच्या सुसंस्कृतपणाबद्दल बरेच काही सांगून जातो. त्यावेळी बालविवाह होत होते आणि अकरा–बाराव्या वर्षीदेखील काही वेळेला स्त्रिया गरोदर रहात असत. त्याबद्दल हिंदूंच्या भावना काय होत्या हे माहीत नाही. पण इंग्रजांना हा प्रकार अमानुष वाटत होता व त्याविरुद्ध त्यांनी संमतिवयाचा कायदा केला आणि त्याला लो. टिळकांनी विरोध केला हे मला माहीत आहे. मुस्लिम राजवटीत हिंदू स्त्रियांना बळजबरीने जनानखान्यात घातले जात असल्याबद्दल वाचले आहे. किती इंग्रज राज्यकर्त्यांनी भारतीय स्त्रियांचे अपहरण केले याचाही शोध व्हावा. इंग्रजी राजवटीपूर्वी किती किती बलात्कार झाले याची नोंद नाही. स्वातंत्र्यानंतर हल्ली बलात्काराबद्दल रोज वाचायला मिळते. पोलिसही बलात्कार करतात. इंग्रजी राजवटीत पोलीस व राज्यकर्ते यांनी बलात्कार केल्याची किती उदाहरणे आहेत ?

रशियातील तुरुंगात काय परिस्थिती असे याचे वर्णन वाचले आहे. इंग्रज राजवटीपूर्वी भारतातील तुरुंगात काय परिस्थिती असेल याची कल्पना करू शकतो. इंग्रजी राजवटीत कैद्यांचे डोळे काढलेले मात्र कधी ऐकले नाही. स्त्रियांनादेखील तुरुंगात सुरक्षित वाटत असे हे त्या राजवटीच्या सुसंस्कृतपणाचे सर्वात मोठे प्रशस्तिपत्रक. १९४२ च्या चळवळीत तुरुंगात जाऊन तब्येत सुधारून आलेल्या स्त्रियांना मी प्रत्यक्ष पाहिले आहे. गांधी, नेहरूंसारख्या मोठ्या पुढाऱ्यांना तुरुंगात 'अ' वर्ग देणारे इंग्रज अधिक सुसंस्कृत की, तुरुंगातील 'क' वर्गात अनेक देशभक्त खितपत असताना 'अ' वर्गाच्या सुविधा उपभोगणारे गांधी, नेहरू अधिक सुसंस्कृत. म्हणजे तुरुंगातही चातुर्वर्ण्य. १९४२ च्या चळवळीत आगाखान पॅलेसवर गांधींची केवढी बडदास्त होती. जालियनवाला हत्याकांडाच्या चौकशीचा निदान फार्स तरी का होईना पण करणारे इंग्रज आणि मुंबईत १०५ माणसांना मारून त्याची चौकशी न करणारे मोरारजीभाई, यशवंतराव चव्हाण इ. आणि त्याबद्दल मोरारजीभाईंना राष्ट्राचा ठेवा म्हणून गौरविणारे पं. नेहरू यात अधिक सुसंस्कृत कोण ?

ज्या राजवटीत न्या. ब्रूमफील्ड यांनी गांधींना शिक्षा देताना त्यांचा थोर देशभक्त म्हणून गौरव केला ती राजवट अधिक सुसंस्कृत की, जयप्रकाशांच्यावर होणाऱ्या हीन आरोपांना उत्तेजन देणारी राजवट ? निःशस्त्र सत्याग्रहींवर लाठीहल्ला केला म्हणून जर इंग्रजी

राजवट असंस्कृत ठरत असेल तर शासन या शब्दाचा अर्थ बदलावा लागेल. मनुष्य निःशस्त्र असला म्हणजे त्याला कायदा मोडायचा अधिकार असतो, असेही तत्त्व रूढ करावे लागेल. कोणतेही सरकार, स्वकीय अथवा परकीय, जे दोलायमान अवस्थेत असतात त्यांनी कायदा मोडू नये म्हणून दहशतीचा नेहमीच उपयोग करते. स्वातंत्र्यानंतर भारतात लाठीहल्ले कमी झाले काय ?

इंग्रजी राजवटीचा सुसंस्कृतपणा मला प्रकर्षाने जाणवतो तो सविनय कायदेभंगाच्या संबंधात, दांडी मोर्चाच्या नाट्यात, भारतीय राजकारणातील गांधी या अभिजात कलावंताला, नाट्याचा उत्कर्षबिंदू गाठण्यासाठी सहाय्यभूत झाली ती इंग्रजी राजवटच. या नाट्याला सुरुवात झाली, १२ मार्चला साबरमती आश्रमातून. त्याची सांगता झाली ८ एप्रिलला. या कालावधीत वर्तमानपत्रातून रोजच्या वाटचालीची बातमी दिली जात होती. जगभर या घटनेने औत्सुक्य निर्माण केले होते. वातावरण हळुहळू तापत होते. ज्याच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता असे महाप्रतापी इंग्रज सरकार व एक निःशस्त्र महात्मा यांच्यातील संघर्ष हे जगाच्या इतिहासातील रोमहर्षक नाट्य जन्माला येऊ घातले होते. 'विस्फारूनी जग नेत्र बघे मग' अशी अवस्था झाली होती. बायबलामधील डेविड आणि गोलियाथ किंवा पुराणातील प्रल्हाद आणि हिरण्यकश्यपू यांच्यातील संघर्षाचा आधुनिक रंगावतार रंगत होता. भारतीय जनता एका प्रचंड उत्साहाने आणि भावितेने भारली गेली होती. या सर्व नाट्याची खरेच जरुरी होती का असा प्रश्न स्वतःला विचारण्यांची तिला जरुरी भासत नव्हती.

आठ तारीख उजाडली. गांधींनी मीठ उचलले. दुसऱ्या दिवशी भारताच्या कानाकोपऱ्यात बातमी गेली. परदेशी वृत्तपत्रांत बातम्या झळकल्या. एका क्षुल्लक कृतीने या महात्म्याने इंग्रजी साम्राज्याचा पाया हादरवला होता अशी समजूत सगळीकडे पसरली. भाविक कृतार्थ झाले, माझ्या मनात नेहमी येते. ११ मार्चलाच गांधींना अटक करून वृत्तपत्रांवर संपूर्ण नियंत्रण बसवले असते. परदेशी वृत्तवार्ताहरांना व्हिसा नाकारला असता तर चार–दोन दिवस चुळबुळ झाली असती आणि मग भारतीय मनोवृत्तीला धरून 'सारं कसं शांत शांत' झाले असते.

त्यानंतर गांधी–आर्यविन तह. जित राष्ट्राच्या पुढाऱ्याबरोबर राजप्रतिनिधीने तह करणे ही माझ्या दृष्टीने एक अलौकिक घटना होती. त्याहीपेक्षा आश्चर्यकारक म्हणजे गोलमेज परिषद. जित राष्ट्रातील पुढाऱ्यांना बरोबरीच्या नात्याने वाटाघाटीसाठी बोलावणे हा मानवी मूल्यांचाच आविष्कार होता. आपण नेहमी विसरतो की, रशियातील जनतेला स्वदेशी राजवटीत जे अधिकार नव्हते ते भारतीय जनतेला परकीय राजवटीत होते. त्यामुळेच रशियन जनतेच्या नेत्यांना क्रांतीच्या मार्गाने जावे लागले तर भारत गांधींच्या मार्गाने जाऊ शकला. रशियातील तुरुंगात जशी वागणूक दिली जात असे तशी वागणूक इंग्रजांच्या तुरुंगात असती तर किती जणांनी सत्याग्रहात भाग घेतला असता हाही विचार करण्यासारखा प्रश्न आहे. इंग्रजी राजवटीत यश प्राप्त झाले याने गांधी एवढे भारावून

गेले होते की, जर्मनीतील ज्यूंना त्यांनी हिटलरपुढे आत्मसमर्पण करून यातनांना तयार राहण्याचा संदेश दिला होता. तो न मानणाऱ्या ज्यूंनी आज इस्राएलच्या वाळवंटात नंदनवन फुलवले आहे तर गांधींच्या मार्गाने जाणाऱ्या भारतात आज दैन्य आणि लाचारी यांचे साम्राज्य पसरले आहे. अंतर्गत कारभारात तर त्याने लोकहितवादींच्या भविष्याला प्रत्यक्षात उतरवले आहे. 'आमच्या लोकांच्या चालीरीती बदलल्याशिवाय या देशाचे हित होणार नाही. व या लोकांस स्वतः राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशातून गेले तरी उपयोग होणार नाही. पुनः गर्दी होईल व बेबंदी, अंदाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपी होतील आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहणार नाही. जो जबरदस्त त्याचे हाती जाईल व जो निर्बल असेल तो उपाशी मरेल. त्याचे सर्व हरण होईल.' भारतीयांना सत्याग्रहाची जरुरी नव्हती. तर राज्य कसे करावे हे शिकण्याची व ती संधी १९१९ च्या कायद्याने आली होती.

वर जे विवेचन केले आहे त्याचा अर्थ असा नव्हे की, इंग्रजी राजवटीत अत्याचार झाले नाहीत. पण असे अत्याचार करणाऱ्या वॉरन हेस्टिंग्जवर महाभियोग चालवण्यात आला. भारताच्या इतिहासात किती भारतीयांची अशा तऱ्हेने चौकशी झाली आहे? दुसरे म्हणजे मानवी मूल्ये ओळखायला आपल्याला इंग्रजांनीच शिकवले. त्यापूर्वी मानवी मूल्ये हा मक्ता फक्त संतांचाच होता, आणि तिसरे म्हणजे दलितांच्यावर सवर्णांनी जे अत्याचार शतकानुशतके केले आणि आजही करीत आहेत त्यांच्या तुलनेत इंग्रजी राजवटीतील अत्याचारांचा शोध आणि बोध व्हावा. आणि काही अत्याचार तर आपण आपल्या हातांनी ओढवून घेतले होते. सायमनसाहेब भारतात विरोध न होता आला असता तर आपले काय नुकसान झालें असते ते मला अजूनही समजत नाही. त्याला 'परत जा' म्हणून आरोळ्या द्यायच्या आणि मग पोलिसांनी मारले म्हणजे अत्याचार म्हणायचे याला आक्रस्ताळेपणाच म्हणता येईल. तेव्हा सर्वच दृष्टींनी इंग्रजांना असंस्कृत म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे का याचा विचार व्हावा पण त्याआधी आपले दुर्गुण तपासणे मला अगत्याचे वाटते.

गांधींचे यश वर सांगितल्याप्रमाणे सुसंकृत राजवट आणि सत्याग्रहाचा एक अभिनव प्रयोग यांचे संयुक्त यश होते. सुसंकृत राजवट हा त्यांचा अत्यंत आवश्यक भाग होता. हे विसरून त्याचे सर्व श्रेय सर्वस्वी गांधीवादाला देणे हे भोळसट हिंदुत्वाला साजेसेच होते. गांधी फक्त इंग्रज आणि आंबेडकर यांच्याविरूद्ध यशस्वी ठरले, कारण ते सुसंकृत होते. जातीयवादी मुस्लिम आणि सवर्ण हिंदू यांच्यापुढे मात्र ते हतबल ठरले. पण इंग्रजांच्या विरुद्धच्या त्यांच्या यशाने आत्मिक बलाचा एक नवा साक्षात्कार झाल्यासारखे लोकांना वाटले. राजकारणाचे आध्यात्मीकरण सुरू झाले. सूतकताई व दारिद्र्याचे प्रदर्शन हा त्या आध्यात्मिकतेचा आचार धर्म म्हणून घालून देण्यात आला. त्याच्याचबरोबरीने आत्मिकबलाची कुऱ्हाड वॉशिंग्टनच्या उत्साहाने प्रत्येक समस्येवर चालवण्यात येऊ लागली. लागली. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक सर्वच रोगांवर आत्मिकबलाचा जालीम

इलाज योजण्यात येऊ लागला. रॉयपासून टिळकांपर्यंत या हिंदुत्वातून सुटण्याचा जो प्रयत्न चालू होता त्याला खीळ बसली. त्यानंतर गांधींना मिळालेल्या यशाने हिंदुत्वाची जबरदस्त पकड हिंदूंच्यावर बसली. ते एक व्यसन झाले. आपण हिंदुत्वाच्या विळख्यात सापडलो आहोत ही जाणीवच नष्ट झाली. विकृती प्रकृती झाली. याविरुद्ध सावरकरांनी आवाज उठवला पण फार उशीर झाला होता. हिंदुत्वाचे व्यसन सुटण्याच्या पलीकडे गेले होते. आजही आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात हिंदुत्वाचे दर्शन घडते पण आपण त्याला पुरोगामी दृष्टिकोन म्हणतो, त्याच्याविरुद्ध जाणीवपूर्वक उपाय योजले नाहीत तर हिंदुत्व आपल्याबरोबर हिंदू समाज व त्याच्याबरोबरीने भारत नष्ट करून मगच नष्ट होईल अशी चिन्हे दिसू लागली आहेत. आणि हे टाळण्याचा हमखास मार्ग म्हणजे हिंदू, मुस्लिम, शीख, पारशी, ख्रिश्चन या सर्वांचे सक्तीने निधर्मीकरण करणे व सामाजिक सद्भावाच्या कक्षा विकसित करणे. आणि भारतात फक्त हिंदूच निधर्मी असल्यामुळे अशी सक्ती करणे सुलभ व्हावे म्हणून त्यांना संघटित करणे आवश्यक आहे हे ओघानेच येते.

या ठिकाणी रॉय यांच्यापासून टिळकापर्यंत हिंदुत्वातून बाहेर पडण्याचे जे प्रयत्न चालू होते त्याचा परामर्ष घेणे योग्य ठरेल. रॉय यांचा प्रयत्न समाज विज्ञानाभिमुख व्हावा असा होता. त्यासाठी इंग्रजीतून पाश्चात्य विद्यांचे विशेषतः विज्ञानाचे ज्ञान भारतीयांना दिले जावे यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले. पण वेद आणि उपनिषदांना ते अस्खलनशील समजत असत. पुढे देवेंद्रनाथ टागोर यांनी रॉय यांच्या विचारातील ही उणीव काढून शुद्ध बुद्धिवादाचा अंगीकार केला. त्यानंतर दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, रमेशचंद्र दत्त आदि विचारवंत आधुनिक दिशेने भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्नशील होते. आधुनिक भारत आर्थिक विकासाच्या पायावरच उभा राहील असा त्यांचा विश्वास होता. कारण हिंदू व मुसलमान यांच्या इतिहासात त्यांना एकत्र आणील असे काहीच नव्हते. हिंदु–मुसलमानातील संघर्ष, मुसलमानांचे अत्याचार, मराठ्यांची लूटमार, आणि पुंडावा यांच्यातून सर्व भारतीयांना एकत्र आणू शकणारे असे काहीच हाती लागण्यासारखे नव्हते. भावी काळातील आर्थिक विकासाच्या कार्यक्रमावरच सर्व भारतीय एकत्र येऊ शकले असते. भूतकाळाकडे पाहणे फक्त आत्मपरीक्षणापुरतेच मर्यादित ठेवणे आवश्यक होते. एका दृष्टीने भारतीयांच्यातील आर्थिक अल्पसंतुष्टता, ऐहिक सुखासाठी धडपड न करण्याची प्रवृत्ती या वैगुण्यांवर मात करण्यासाठी ते प्रयत्नशील होते असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. भारताचे औद्योगीकरण, धरण योजनांवर भर, भारतीय उद्योगधंद्यांना संरक्षण अशा तऱ्हेच्या, १९ व्या शतकातील विचारवंतांच्या मागण्या होत्या.

दयानंद सरस्वतींनी त्यांना हिंदू समाजाची जी वैगुण्ये आढळली ती नाहीशी करण्याचा प्रयत्न आर्यसमाज स्थापून केला. इतर वर्गीयांच्या तुलनेत हिंदू न्यूनगंडाने पछाडलेला असल्याने त्यांनी त्याला आक्रमक होण्याचा संदेश दिला. कुराण आणि बायबल यांना त्या त्या धर्मात जे स्थान आहे ते वेदांना आर्यसमाजात दिले. शिक्षणप्रसारासाठी संस्था काढल्या. विवेकानंदांनी अध्यात्म आणि आधुनिकता यांचा संयोग होण्याची आवश्यकता प्रतिपादन

केली. हिंदू संस्कृतीचा 'शिव नको' (डोंट टचिझम) संस्कृती म्हणून अधिक्षेप केला. हिंदुत्वातील एक फार मोठे वैगुण्य म्हणजे मानवतेची सेवा करण्याच्या वृत्तीचा संपूर्ण अभाव. त्यासाठी त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली.

लो. टिळकांनी गीतारहस्य मराठीत लिहिले तेव्हा त्यांना कुणीतरी सुचविले की, त्यांनी इंग्रजीत लिहिले तर जगभर प्रसार होईल. त्यावर टिळकांनी सांगितले की, पाश्चात्य समाज कर्मयोगी आहेच. त्यांना कर्मयोगाच्या संदेशाची जरुरी नाही. कर्मयोग शिकण्याची जरुरी भारतीयांना आहे व म्हणूनच कर्मयोग मराठी भाषेतच लिहिणे आवश्यक आहे. त्यांचे स्वतःचे जीवन म्हणजे कर्मयोगाचा वस्तुपाठच होता. त्यांनी भारतीयांना आपल्या हक्कासाठी झगडण्याची शिकवणूक दिली. गांधी स्वतः महान कर्मयोगी होते पण राजकारणात त्यांनी प्रचलित केला तो मात्र भक्तिधर्म. हजारो वर्षे परकीयांच्या आक्रमणाखाली दबलेल्या भारताने भक्तिधर्मात आसरा घेतला होता. त्याचा जोर १९ व्या शतकात कमी होत होता त्याला नवे जीवदान गांधींनी दिले.

१९२० पर्यंतच्या विचारवंतांची ठळक वैशिष्टचे म्हणजे हिंदुत्वाच्या वैगुण्यांचा, ते डोळसपणाने शोध घेत होते व आपापल्या परीने त्याची कारणे शोधून त्यावर उपाय सुचवित होते. साहाजिकच वैगुण्य आणि उपाययोजना यांच्यात बुद्धिवादावर आधारलेला (रॅशनल) संबंध होता. त्याच्या विश्लेषणाला मर्यादा असेल. ते चुकीचे असू शकत होते. काही ठिकाणी अतिरेकही होता. उदा. दयानंदांची वेदात सर्वकाही आहे ही भूमिका. पण त्याच्यात गूढ असे काही नसल्यामुळे समाज पछाडून जाईल असे काही नव्हते.

दुसरे वैशिष्टच म्हणजे आणि ते पहिल्यातूनच निघते, असा शोध घेताना ते आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करताना आढळतात. वाढ हा जीवनाचा नियम आहे. तो ते पाळताना दिसतात. उदा. पूर्वग्रह, संस्कार, नैसर्गिक कल यांना बाजूला ठेवून अनुभवाची नवी क्षेत्रे धुंडाळताना दिसतात. ब्राह्मोसमाजात ही वाढ रॉय, देवेन्द्रनाथ टागोर, केशवचंद्र सेन यांच्या विचारातून आढळते. लो. टिळकांनी प्रादेशिक पुढारी म्हणूनच आपल्या सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. सुरुवातीच्या त्यांच्या कार्यावरून ते हिंदुत्वात बंदिस्त झाले असावे असे दिसते. संमतिवयाच्या कायद्याला विरोध, शिवाजीउत्सव, गणेशोत्सव असा हिंदू मनाला भावणावराच त्यांचा कार्यक्रम होता. पण लवकरच ते यातून बाहेर पडले. त्यांचा अखिल भारतीय दृष्टिकोन विकसित होऊ लागला व त्याची परिणती होमरूल लीग व लखनौ करार यात झाली.

गांधीच्या जीवनाकडे पाहिले तर ते स्वतःतून कधीच मुक्त झाले नाहीत. 'सत्याच्या प्रयोगात' ते स्वतःशीच झगडताना आढळतात. आणि त्यांचे जे 'स्व'त्व होते ते अवनत हिंदुत्व होते. हिंदू समाजाच्या ऱ्हासाचे एक कारण असे सांगितले जाते की, तो नव्या वाऱ्यापासून बंदिस्त (इन्सुलर) राहिला. गांधींची तीच अवस्था होती. ते इंग्लंडला गेले. नंतर आफ्रिकेत होते. या सर्वच ठिकाणी ते नवा अनुभव घेताना आढळत नाहीत. तेथील घडामोडीकडे डोळसपणे पहात नाहीत. तर त्यांचे स्वतःचे मर्यादित अनुभवविश्व होते.

त्यातून ते जगाकडे पाहताना आढळतात. उदा. सत्याग्रह. आश्रमात त्यांनी आश्रमवासीयांसाठी जे नियम ठरवले ते पहावे. तसेच ' हिंदु स्वराज्य ' म्हणून त्यांनी पूर्वायुष्यात एक पुस्तक लिहिले होते. बऱ्याच वर्षांनी त्यांना त्या पुस्तकाबद्दल विचारले असता त्यांनी त्यात कानामात्रेचाही फरक करण्याची जरूर नाही असे सांगितले.

वाढ हा जीवनाचा नियम त्यांनी स्वतःकरिता नाकारला होता. साहजिकच त्यांचा दृष्टिकोन ' बाल ' राहिला. इतकेच नव्हे तर ' स्वतः ' आणि भारत यातला भेदच त्यांनीच नष्ट करून टाकला आणि त्यांचा आंतरिक झगडा होता तो जणू काय भारताचाच संघर्ष अशा समजुतीने भारतीयांच्यावर लादला. चौरीचौरा येथे असहकाराच्या चळवळीत २१ पोलिसांना जमावाने जाळले. साहजिकच गांधींच्या मनात एक संघर्ष उभा राहिला. वास्तविक एवढ्या मोठ्या चळवळीत अशा घटना घडतात. पण गांधींना तो आपल्या अहिंसा तत्त्वाचा पराभव वाटला आणि त्यांनी ती चळवळ मागे घेतली. त्याला मोतीलाल नेहरू वगैरेचा विरोध होता. पण त्यांनी तो व्यक्त करताच तुरुंगात असलेली माणसे ' लौकिक दृष्टया मृत ' असतात असे सांगून तो मोडून काढला. वास्तविक चळवळ राष्ट्राची होती व राष्ट्रीय पुढाऱ्यांनी निर्णय घेणे आवश्यक होते. पण गांधींनी त्यांचा आध्यात्मिक संघर्ष आणि राष्ट्रीय संघर्ष यातील भेद नष्ट करून टाकला होता.

गांधींच्या बालसुलभ अनुभवविश्वाचे एक मनोरंजक उदाहरण त्यांनी स्वतःच अत्यंत बालसुलक वृत्तीने राजगोपालाचारी यांना सांगितले होते. रौलट कायद्याविरुद्ध त्यांनी हरताळाचा आदेश दिला. त्यासंबंधात ते म्हणाले, ' देशाने सार्वजनिक हरताळ पाळावा असा संदेश देण्याची कल्पना मला काल रात्री स्वप्नात आली. सत्याग्रह हा आत्मशुद्धीचा मार्ग आहे आणि आपला संघर्ष पवित्र आहे. तेव्हा त्याची सुरुवात आत्मशुद्धीनेच करणे हे सर्वथा उचिव ठरेल. ' कोणताही निर्णय डोळसपणाने घ्यावयाचा असतो हे गांधींच्या लक्षात येऊ नये याचे आश्चर्य वाटत नाही. पण इतर पुढाऱ्यांनी त्याला पाठिंबा द्यावा याचे मात्र नवल वाटते. पण त्याचेही कारण मला वाटते हेच असावे की, ते सर्व हिंदू होते व आध्यात्मिक साक्षात्काराच्या परंपरेत वाढले होते.

गांधीच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे अभिजात धूर्तता. त्याला वकिलीच्या अभ्यासाची जोड मिळाली होती. अर्थात याची जाणीव त्यांना असावी असे त्यांच्या चरित्रावरून दिसत नाही. ती एक दैवी ' देणगी होती. ते ज्याला आतला आवाज म्हणत असत तो माझ्या समजुतीप्रमाणे त्यांचे धूर्तपणाचे सहावे इंद्रिय होते. असाच अभिजात धूर्तपणा जो समाज निव्वळ अस्तित्वासाठी शतकानुशतके झगडत असतो त्याचेही व्यवच्छेदक लक्षण असते. व्यावहारिक धूर्तपणा आणि अभिजात धूर्तपणा यांतील फरक याठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. पहिला धूर्तपणा व्यावहारिक बुद्धिवादावर आधारलेला असतो व त्याचा उद्देश जास्तीत जास्त फायदा मिळविणे हा असतो. तर दुसऱ्याचा उद्देश निव्वळ संरक्षण असून तो सहज प्रेरित असतो व त्याची प्रेरणा मनात खोल दडून बसलेली अनामिक भीती, आशंका, आत्मविश्वासाचा अभाव इत्यादीमध्ये असते.

मर्यादित अनुभवाविश्व व अभिजात धूर्तपणा ही दोन कवचकुंडले घालून गांधी राजकारणात उतरले. ते ज्या समाजाचे नेतृत्व करू पहात होते त्याचीही हीच वैशिष्टये होती. साहजिकच बहुजनसमाजाचा पाठिंबा गांधींना फार मोठ्या प्रमाणावर मिळाला. पण या प्रक्रियेत हिंदुत्वाच्या पुनरुज्जीवनाचा पाया घातला जात होता. मर्यादित अनुभवविश्व व अभिजात धूर्तपणा हे गांधींचे फार मोठे सामर्थ्य होते. मर्यादित अनुभवविश्वामुळे त्यांना कोणत्याही समस्या सोप्या वाटत असत व त्यांचे जटिल स्वरूप त्यांच्या लक्षात येत नसे. जनतेलाही असेच सुलभीकरण हवे असते. अंतःप्रेरणेने त्यांना तात्कालिक फायदा अचूक समजत असे. पण याचा राष्ट्राच्या दृष्टीने असा परिणाम झाला की, राष्ट्राचे दीर्घकालीन हितसंबंध व एखाद्या कृतीचे दूरगामी परिणाम यांचा विचार गांधींनी कधीच केला नाही व त्याचे परिणाम आपण आजही भोगत आहोत.

गांधींच्या राजकारणाचे स्वरूप, त्यांच्या यशाचे कारण आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व यांचे विवेचन येथवर केले. त्याच्या संदर्भात गांधींच्या नैतिक, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रमात हिंदुत्वाचा आविष्कार कसा आढळतो याचे विश्लेषण बोधप्रद होईल.

गांधींनी १९१५ साली अहमदाबाद नजिक सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली. त्यात आश्रमवासीयांसाठी सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह वगैरे तत्त्वे घालून दिली होती. याच्या अतिरेकानेच हिंदू समाजाचे पुष्कळ नुकसान केले आहे. त्याबद्दल जास्त लिहिण्याची जरुरी नाही. पण आश्रमाचे खरे स्वरूप जाणून घेणे मात्र आवश्यक आहे. हा आश्रम स्थापून समाजाच्या मदतीवर जगणाऱ्या आणि निष्फलतेत जीवन व्यतीत करणाऱ्या यतींचा आधुनिक संप्रदाय निर्माण केला. पूर्वीपासूनच हिंदू समाजात असा वर्ग होताच, पण १९ व्या शतकापासून स्वतःची स्वतंत्रपणे उपजीविका करून समाजसेवा करणाऱ्यांचा नवा वर्ग निर्माण होऊ लागला होता व सार्वजनिक जीवन शुद्ध राहाण्यासाठी त्याची अत्यंत गरज होती. पण गांधींनी जो नवीन संप्रदाय सुरू केला त्यामुळे धर्मार्थावर जगण्यामधे मानहानीकारक काही आहे ही भावना नष्ट झाली. याचा आदर्श गांधीनीच घालून दिला होता. सत्याग्रह आश्रमाला पैशाची चणचण भासू लागली होती तेव्हा अंबालाल साराभाई यांनी तेरा हजार रुपयांची मदत केली व गांधींनी तिचे स्वागत केले. म्हणजे अपरिग्रह, अस्तेय वगैरे असले तरी पैसे लागतात. फक्त ते आश्रमवासीयांखेरीज इतरांनी मिळवायचे असतात. आणि ते कशाही मार्गाने मिळवले असले तरी चालतात. श्रीमंतांच्या आणि गरिबांच्याही पैशावर जगणाऱ्या साधुसमाजाची स्थापना झाली होती. सुरुवातीला देणग्यांवर फक्त साधूच जगत असतील, नंतर साधू नसलेले आणि स्वातंत्र्यानंतर तर बदमाषही.

भारतीय राजकारणात गांधींनी सत्य आणि अहिंसा यांचा पुरस्कार केला. ब्रह्म आणि माया, पुरुष आणि प्रकृती यांच्या परंपरेत वाढलेल्या हिंदूंना हा प्रकार नवा नव्हता. शिवाय औपनिषदिक तत्त्वज्ञान, बुद्ध आणि महावीर यांनीही या तत्त्वांची शिकवण दिली होती. भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी काहीही संबध येत नसल्यामुळे त्याचा हिंदूवरील

तादृश परिणाम म्हणजे स्वार्थ वेगळा आणि परमार्थ वेगळा ही प्रवृत्ती आणि त्यातून निर्माण होणारी तत्त्व आणि व्यवहार यांची फारकत. याची अनेक उदाहरणे रोजच्या जीवनात मिळतात. तत्त्वाच्या संपूर्ण विरोधी जरी वर्तन झाले तरी तो जीवनाचाच अवि-भाज्य भाग आहे असा विश्वास असल्यामुळे हिंदूंच्यात क्रियाशील कार्यकर्ते कधीच निर्माण झाले नाहीत व हा दोष संबंध १९ व्या शतकातही आढळतो. ही प्रवृत्ती बळकट होण्याची आणखी दोन कारणे म्हणजे वैयक्तिक मोक्षवादाची संकल्पना आणि आचारधर्माचे प्राबल्य. वैयक्तिक मोक्षवादातून समाजाचे आपण काही लागत नाही अशी वृत्ती निर्माण होते, तर आचारधर्मामुळे धर्माची मूलतत्त्वे दुर्लक्षली जातात आणि आचारालाच धर्माचे स्वरूप येते. अशा परिस्थितीत गांधींनी जी दोन श्रेष्ठ तत्त्वे सांगितली त्यांचा, सत्य आणि अहिंसेचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडणे आवश्यक होते. पण ती गांधींनी अशा पातळीवर नेऊन ठेवली की, त्यांचे आचरण म्हणजे नेमके काय याचा बोध होणे कठीण झाले. साहजिकच गांधीवादात आचारधर्माला प्राधान्य आले. शिवाय गांधीच्या जीवनातील घटना तपासल्या तर त्याचा सत्य, अहिंसेशी कितपत संबंध येतो याचाही शोध घ्यावा लागेल. उदा. आंबेड-कर, सुभाषबाबू इ. राजकीय विरोधकांशी त्यांची वागणूक किंवा टिळक स्वराज्य फंडाच्या पैशाचा अपहार झाला त्याचे त्यांनी केलेले समर्थन. या सर्वातून हिंदू समाजाची मूळची दांभिक वृत्ती अधिकच बळावली. सार्वजनिक जीवनात दंभाला सुरुवात झाली. एवढेच नव्हे तर आध्यात्मिक अहंकार निर्माण झाला. गांधीवाद्यांच्या पुढे आचारधर्मापलीकडे कोणतेही निश्चित ध्येय राहिले नाही हिंदुत्वाची नेमकी हीच शोकांतिका होती.

गांधींना अहिंसा अभिप्रेत होती ती शूरांची. दुबळ्यांची नव्हती. आणि हे सांगून त्यांनी हिंदुत्वाच्या नेमक्या वैगुण्यावर बोट ठेवले. सर्वसाधारण हिंदू हा दुबळा होता व आहे. व त्याच्या दुबळेपणाचे मूळ त्याच्या एकटेपणात आहे. त्याला समाजाचा आधार देऊनच त्याचा दुबळेपणा घालवता येईल त्यासाठी हिंदूंचे संघटन करून त्याला शूर बनवणे अत्यंत अगत्याचे होते. विशेषतः इतर धर्मीय संघटित असल्यामुळे तर त्याची अत्यंत आवश्यकता होती. पण ते न करता नुसतीच अहिंसेची शिकवण दिल्यामुळे दुबळेपणाला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. दुबळ्याला अहिंसा नेहमीच आवडते, तशी हिंदूंनाही आव-डत होती. पण आता त्याचे समर्थन करणे शक्य झाले. स्वातंत्र्यानंतरचा भारताचा इतिहास जर पाहिला तर अशा दुबळेपणाची अनेक उदाहरणे मिळतील. गुंडापासून किंवा दरोडेखोर यांच्यापासून आपण आपले संरक्षण करू शकतो का याचा विचार केला म्हणजे आज जी सर्वंकष असुरक्षितता आढळते त्याचे कारण सापडेल.

गांधींनी राजकारणात भक्तिधर्म रूढ केला व हिंदुधर्माचे एक जुने दुखणे उलटले. हजारो वर्षे परकीयांच्या स्वाऱ्यांनी हैराण झालेल्या हिंदुसमाजाने अखेर भक्तिमार्गात आसरा शोधला होता. भक्तिमार्गाची प्रमुख शिकवण म्हणजे देवाला अनन्यभावाने शरण जा व त्याच्या कृपाप्रसादाने, स्वप्रयत्नाने नव्हे, मुक्ती मिळवा. भक्तिमार्ग माणसाला

...९

स्वत:वरचा विश्वास उडवायला लावून मानसिक दृष्टचा परावलंबी बनवतो. कर्मसिद्धांताने हिंदूंना दैववादी बनवले होतेच. मनुष्य स्वकर्तृत्वाने आपला उद्धार करू शकतो ही जाणीव नष्ट करून टाकली होती. त्यात भक्तिमार्गाची भर पडल्याने निष्क्रियता आली होतीच. या निष्क्रियतेला गांधींचे नेतृत्व भावणारेच होते. त्यामुळेच इंग्रजांच्या विरुद्ध जी आपली चळवळ चालू होती त्याला सामाजिक उद्धाराचे विधायक स्वरूप कधीच प्राप्त झाले नाही. भक्तिभावाने सामान्य माणूस कसा भारला गेला होता, याचे उदाहरण एका कवितेत आढळते. गांधीच्यावरील कवितेतील एका कडव्यात कवि म्हणतो,

म्हणे जगाला उठ, उठे जग। म्हणे जगाला डोळचांनी बघ ।।
विस्फारुनी जग नेत्र बघे मग। चहुकडेच करुणा करुणा । ऽ

हिंदूंच्यातील अंधश्रद्धेलाही गांधींनी उजाळा दिल्याचे जाणवते. बिहारमध्ये भूकंप झाला त्यावेळी हिंदूंच्या पापाचरणामुळे झालेला हा दैवी प्रकोप आहे असे उद्‌गार त्यांनी काढले होते.

गांधींनी राजकारणात नि:शस्त्र प्रतिकाराचे आणि सत्याग्रहाचे आयुध वापरले. हे पूर्वी नव्हते असे नाही. पण तो आपद्धर्म होता. त्याचे तत्त्वज्ञान नव्हते. वास्तविक हिंदूंच्या हातात शस्त्र दिले असते तरी त्यांनी नि:शस्त्र प्रतिकारच केला असता. एक तर शस्त्र वापरता येत नाही आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे मनाची जिद्द नाही. याच्या अभावामुळेच हजारो वर्षे हिंदू समाज मार खात आहे. पण मार खाण्याला तात्त्विक अधिष्ठान दिले म्हणजे नैतिक उन्नती झाल्यासारखे वाटते. गांधीवादाने ते केले. आत्मसंरक्षणाबद्दल बेफिकीर असलेला हिंदू समाज अधिकच बेफिकीर बनला. हिंदू–मुसलमान दंग्यात याची अनेक उदाहरणे मिळतात. सत्याग्रहाच्या सामर्थ्याचे मोठे रोचक वर्णन गांधीवादी आचार्य जावडेकर यांनी केले आहे.

'याच दिवशी स्वामी श्रद्धानंद यांनी गुरख्यांच्या रोखलेल्या संगिनीपुढे आपली छाती करून तीत आपल्या संगिनी भोसकण्यास आव्हान दिले आणि स्वामीजींचा हा अंतिम स्वरूपाचा सत्याग्रह यशस्वी होऊन गुरख्यांच्या अंत:करणातील परमेश्वर जागृत झाला. प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणात किंबहुना प्रत्येक भूतमात्राच्या अंत:करणात सत्यरूपी परमेश्वर अधिष्ठित आहे व तो अनासक्त बुद्धीने वाहिलेच्या आत्माहुतीने प्रकट होऊ शकतो हे सत्याग्रहाचे अधिष्ठान यावेळी सामान्य जनतेच्या प्रत्ययास आधुनिक भारताच्या इतिहासात प्रथमच आले. ब्रिटिशांची सेवा करणारे गुरखा सैनिक हेही 'ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठती।' या धर्मशास्त्रातील अगर अध्यात्माशास्त्रातील सिद्धांतास अपवाद नाहीत हे पाहून विचारी मनुष्यांचा त्या सिद्धान्तावरील विश्वास अधिकच दृढ झाला.

हा भाग वाचल्यानंतर सत्याग्रहाचे सामर्थ्य पटण्याऐवजी एवढेच पटले की गांधीवादी आचार्यांनी गडकऱ्यांचे पुण्यप्रभाव नाटक वाचले असून, त्यातील वसुंधरेने वृंदावनाला उद्देशून केलेले भाषण हा ग्रंथराज लिहिताना त्यांना आठवत होते. कारण याच श्रद्धानंदांचा पुढे एका मुसलमानाने खून केला. तेव्हा त्याच्या अंत:करणातील 'सत्यस्वरूपी

परमेश्वर ' लंच टाईमला गेला होता की, त्याला हृदयच नव्हते याचा खुलासा करायला आचार्य विसरले. गांधींची स्वतःची हत्या आणि जातीय दंगली हाही त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पराजयच होता. सत्याग्रह, निःशस्त्र प्रतिकार ही साधने माथेफिरूंच्यापुढे निकामी असतात आणि ती सुसंस्कृत माणसापुढेच फक्त उपयोगी असतात ही वस्तुस्थिती आहे. दुसरे कुठले सरकार असते, मोरारजीभाईंचेदेखील, तर दहावीस श्रद्धानंदांना मारायला त्याने मागे-पुढे पाहिले नसते. तसेच गुरख्यांना काय हुकूम होता हेही पाहिले पाहिजे. कारण ' नुसते शस्त्राचे प्रदर्शन करा. हत्यार प्रत्यक्ष चालवू नका ' असाही आदेश त्यांना असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

या सर्वाचा अर्थ हा की, निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह हे तत्त्वज्ञान नसून केवळ उच्च संस्कृती असणाऱ्या समाजातच वापरण्याचे ते एक साधन आहे. पण हे न कळल्यामुळे आणि सत्याग्रहाच्या सामर्थ्याच्या अनेक भाकड कथा प्रसृत केल्यामुळे हिंदुमन पुन्हा भक्ति-मार्गाकडे वळले आणि कुणाच्यातरी अंतःकरणात सत्यस्वरूपी परमेश्वर उभा रहावा म्हणून किंवा तसा उभा करू शकणाऱ्या तशाच तोलामोलाच्या भक्ताची वाट पहाण्यात कृतर्थता मानू लागले. विनोबा, जयप्रकाश यांच्याकडे या दृष्टीने जनता पाहू लागली. त्यांनीही भूदानयज्ञात जमीनदारांच्या हृदयात परमेश्वर उभा करण्याचा प्रयत्न केला पण जमीनदार सुसंस्कृत नसल्यामुळे त्याचा उपयोग झाला नाही.

सत्याग्रह वगैरेंचे सर्वसाधारण विवेचन येथवर केले. पण असहकाराची चळवळ ज्या परिस्थितीत सुरू करण्यात आली त्यावेळच्या सत्याग्रहाचे सत्यस्वरूप जाणून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. ते न केल्यास सत्याग्रह हा बाह्यतःचा फक्त कर्मयोग होता, प्रत्यक्षात तो पलायनवाद होता हे लक्षात येणार नाही. १९१९ चा कायदा मंजूर झाला होता. त्याचे स्वरूप लो. टिळकांनी अत्यंत मार्मिकपणे विशद केले होते. ' उजाडले, पण सूर्य कोठे आहे.' म्हणजे स्वातंत्र्याचा उषःकाल झाला आहे हे त्यांनी मान्य केले होते. पण स्वातंत्र्यरवी अजून दृग्गोचर व्हावयाचा होता असा त्याचा मथितार्थ. या कायद्यात पुष्कळ उणीवा होत्या. तसेच इंग्रजी नोकरशाही या सुधारणा राबविण्यात अडचणी निर्माण करू शकली असती हेही खरे आहे. पण ते एक आव्हान होते. ज्या खात्यांचा संबंध सामाजिक सुधारणांशी पोहोचतो अशी खाती भारतीय मंत्र्यांकडे सोपविली जाणार होती. भारती-यांना आधुनिक पद्धतीने जनतेच्या कल्याणासाठी राज्यकारभार कसा चालवावा याचे शिक्षण मिळण्याची ही संधी होती. तसेच संसदीय पद्धतीचा राज्यकारभार कसा चालतो याचाही अनुभव मिळणार होता. त्यात अडचणी आल्या असत्या. पण एक नवा प्रयोग होऊ घातला होता. भारतीयांच्या विधायक मुत्सद्देगिरीचा कस तेथे लागणार होता.

थोडीशी सत्ता असली तरी लोककल्याणाची कामे करता येतात व ती सत्ता त्यासाठीच कशी वापरावी याचा वस्तुपाठ मिळणार होता. पण असहकाराची चळवळ सुरू करून आपण निवृत्तीमार्गाकडे वळलो. हिंदुत्वाने अखेर आपल्यावर मात केली. आव्हान स्वीका-रून जीवनाला सामोरे जाण्याची प्रवृत्ती हिंदूत आढळत नाही. त्यापासून पळून जाण्याची

आपली वृत्ती. १९२० ची चळवळ अखेर पलायनवादच ठरली. स्वातंत्र्यानंतरही आपण तेच करणार आहोत. कोणत्याही आव्हानाला तोंड देण्याची आपली क्षमता आपण गमावली आहे. आसामचा प्रश्न, शिखांचा प्रश्न ही त्याची उदाहरणे होत. १९२० साली जबाबदारीपासून आपण पळालो आणि सर्वच सत्प्रवृत्त मंडळींना त्यानंतर जबाबदारीपासून पळण्यात भूषण वाटू लागले. जयप्रकाश, अच्युत पटवर्धन ही त्याची दोन उदाहरणे. पण लहान पुढाऱ्यांच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. ते विरोधात गेले. पण त्यांनी सार्वजनिक जीवनात कोणतीच विधायक जबाबदारी स्वीकारली नाही हे सत्य नाकारता येणार नाही. तसेच विनोबा, शंकरराव देव आणि इतर गांधीवादी मंडळी ही स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक जीवनातील नैतिक शक्ती राहू शकली नाहीत, त्याचेही कारण त्यांचा पलायनवादच. सत्याग्रह आणि निःशस्त्र प्रतिकार ही सार्वजनिक जीवनाचे उन्नयन करणारी साधने न ठरता गांधीवाद्यांच्या हातात त्या पलायनवादाच्या कुबड्याच ठरल्या. गांधींच्या मार्गाचे टॉलस्टॉयलादेखील आकर्षण वाटले, तो मार्ग अखेर निष्फळतेचा ठरला.

निव्वळ पलायनवादच नव्हे तर त्याच्याच जोडीने संघर्ष टाळण्यासाठी आणि तात्कालिक फायद्यासाठी, दीर्घकालीन हितसंबंधांचा बळी देणे ही हिंदूंची प्रवृत्ती असहकाराच्या चळवळीच्या मुळाशी आढळते. असहकाराची चळवळ ही मुख्यत: खिलाफत प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी सुरू करण्यात आली. वास्तविक पाहता भारतीय मुसलमानांचा या प्रश्नात कोणताही हितसंबंध गुंतलेला नव्हता. आणि अशिलापेक्षा वकिलाचा उत्साह दांडगा असावा त्याप्रमाणे गांधींचाच ही चळवळ सुरू करण्यात जास्त पुढाकार होता. असा पुढाकार घेऊन गांधींनी मुसलमान या देशात रहात असले तरी त्यांची निष्ठा भारताबाहेर असण्याला मान्यता दिली. हिंदू आणि मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत याचीच ही कबुली होती. भारताच्या फाळणीचा पाया घातला गेला होता. खिलाफतीबद्दल बरेच लिहिले गेले आहे. ती चळवळ सुरू करण्यात चूक झाली होती काय अशी शंका आता काँग्रेसवाल्यांनाच येऊ लागली आहे व ती मध्यंतरी अच्युतराव पटवर्धन यांनी बोलून दाखवली होती.

पण मला या प्रश्नाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहावयाचे आहे व तो चर्चेसाठी पुढे मांडत आहे. समाजशास्त्रीय दृष्ट्या खिलाफतीकडे व हिंदू–मुस्लिम प्रश्नाकडे पाहण्याचे विचारवंत टाळत असावेत असे वाटते. खिलाफतीच्या वेळची गांधींची भाषणे व लेख वाचले तर कोणत्याही राष्ट्रवादी माणसाला उबग येईल. त्यावेळी अफगाणिस्तानचा अमीर भारतावर स्वारी करणार अशी अफवा होती. त्याला उद्देशून मौ. महंमदअली यांनी असे उद्गार काढले होते की, अमीराने धर्मयुद्धासाठी भारतावर स्वारी केली तर त्यास मदत करण्यासाठी भारतीय मुसलमान बुद्धपरिकार आहेत. एवढेच नव्हे तर हिंदूंनी सहकार्य केले नाही तर त्यांच्याशीही मुसलमानांना लढावे लागेल. यावर गांधींची प्रतिक्रिया : 'एका तऱ्हेने मीही अमीराला निश्चितपणे मदत करीन. फक्त त्याने ब्रिटिशांविरुद्ध युद्ध केले पाहिजे.' 'खिलाफतीचे पाऊल पुढे पडण्याकरता आवश्यक असेल तर राष्ट्रीय चळ-

वळदेखील मी आनंदाने पुढे ढकलीन.' जीनांनी खिलाफत चळवळीविरुद्ध इषारा दिला होता. पण हिंदू पुढाऱ्यांना मात्र यात काही वावगे वाटले नाही हे कसे काय ? उलट खिलाफत चळवळीत मोठ्या उत्साहाने त्यांनी भाग घेतला याचे कारण काय असावे ? ते असे की, आत्मघातकी औदार्य आणि तात्कालिक फायद्यासाठी राष्ट्रहिताचा बळी देणे ही हिंदूंची जुनी परंपरा आहेच. पण मला वाटते त्याच्याही पलीकडे आणखी एक कारण असावे.

ऐतिहासिक आणि सामाजिक कारणांमुळे हिंदूंच्या मनात मुसलमानांबद्दल खोल कुठे-तरी एक अनामिक भीती दडलेली आहे. महाराष्ट्र सोडला तर त्यांनी दीर्घकालपर्यंत भारतावर राज्य केले होते; सामाजिक दृष्टचा हा समाज संघटित आहे तर धर्माच्या बाबतीत कडवा आहे. याच्या उलट परिस्थिती हिंदू समाजात असल्यामुळे मुसलमानांशी वागताना हिंदूंच्या मनात नेहमीच न्यूनगंड असतो. याची अनेक उदाहरणे रोजच्या जीवनात पहावयास मिळतात. मला आठवतंय की, माझ्या लहानपणी आमच्या गावात फक्त चार पठाण सावकारी करत होते. पण त्यांचा दरारा सबंध गावाला वाटत असे. चार मुसलमान जमले असले म्हणजे हिंदू त्यांच्याशी कसा वागतो हे पाहणे मोठे मनोरंजक असते. आपली मुसलमानांशी कशी मैत्री आहे याचे प्रदर्शन केल्याखेरीज त्याला रहावत नाही. हे करून स्वतःच्या सुरक्षिततेची तो स्वतःला खात्री पटवून देत असतो. बऱ्याच वर्षापूर्वी हिंदू–मुस्लिम मिश्र समाजापुढे बोलताना एका काँग्रेस मंत्र्याने मुसलमानांनी पाकिस्तानवादी असायला हरकत नाही, पण त्यांनी भारतविरोधी असू नये अशी आमची अपेक्षा आहे, असे सांगितले. हिंदू धर्मावर कडाडून टिका करणारे विचारवंत, इस्लाम म्हटले म्हणजे हताश होतात. पंढरपूरच्या विठोबाची शासनातर्फे पूजा होऊ नये म्हणणारे, हजरत बालचे नाव काढताच हतबल होतात. राजकीय पुढारी, नाटककार, कलावंत या सर्वांचीच ही अवस्था आहे. हीच परिस्थिती गांधीजींची होती का ? व त्यामुळेच त्यांनी खिलाफतीला पाठिंबा दिला असेल काय ? मुसलमानांच्या आंतरराष्ट्रीय निष्ठेबद्दल भारतीयांना रस असू शकत नाही हे सांगण्यापेक्षा इंग्रजांशी लढणे त्यांना कमी धाडसाचे वाटले काय ? व त्यामुळेच त्यांनी खिलाफतीला पाठिंबा दिला असेल काय ? एका ठिकाणी ते म्हणतात, 'मी प्रत्येक हिंदू आणि मुसलमानाला ठामपणे सांगतो की, ऐहिक हितसंबंधासाठी लढू नये.' खिलाफतीचा प्रश्न संपूर्णपणे ऐहिक स्वरूपाचा होता. आणि तरीही त्यासाठी राष्ट्रव्यापी चळवळ सुरू करण्यास ते तयार होते. याचे कारण काय ?

हिंदु–मुस्लिम दंग्याचे विश्लेषण करताना गांधींनी लिहिले आहे की, 'हिंदूंना आपण मुसलमानांच्या मानाने शारीरिक दृष्टचा दुर्बळ आहोत असे वाटते.' दुसरीकडे अहिंसे-बद्दल लिहिताना ते म्हणतात, 'शक्ती ही शारीरिक क्षमतेपासून मिळत नसून दुर्दम्य अशा इच्छाशक्तीतून मिळते.' तेव्हा हिंदूंच्याबद्दल 'मानसिकदृष्टचा दुबळे' असे म्हणायला हवे होते आणि तेच खरे होते. पण ते न करता त्यांनी शारीरिक दुबळेपणाचा का उल्लेख करावा ? हिंदू शारीरिकदृष्टचा दुबळा असतो हेही त्यांनी कशावरून ठरवले ? वर

दिलेल्या संदर्भाच्या बरोबरीने गांधी 'स्वतः' मध्ये भारत पहात होते ही गोष्ट लक्षात घेतली तर खिलाफतीचे कोडे उलगडते. सर्वसाधारण हिंदूंच्याप्रमाणेच गांधींच्या मनातही मुसलमानांच्याबद्दल दशहत असावी व तिचे मूळ त्यांच्या शारीरिक दुबळेपणात असावे. मुसलमानांच्या बाबतीत अतिरिक्त औदार्य दाखवून त्यांची मैत्री मिळवून या दहशतीतून त्यांनी सुटका करून घेतली असावी असे दिसते. या औदार्याचे हिंदूंनीही कौतुक केले. कारण तेही तशाच दहशतीखाली होते. इंग्रजांविरुद्ध मुसलमानांचे सहकार्य मिळाले ही भयगंडातून सर्वांचीच सुटका होती. वास्तविक पहाता हिंदु-मुस्लिम प्रश्न हा राष्ट्रीय चळवळीतील बाजूचा प्रश्न (साइड ईश्यु) होता. पण हिंदू व गांधी या भयगंडाने इतके पछाडले होते की, त्या प्रश्नानेच त्यांना व्यापले होते. या भयगंडाचा पुरावा म्हणजे गांधी जातीय मुस्लिमांच्याच बाबतीत अतिशय हळवे होते. राष्ट्रवादी जीनांना त्यांनी व हिंदूंनी नेहमीच अव्हेरले. दुसरे म्हणजे मॅक्डॉनल्ड निवाड्याने मुसलमानांप्रमाणे दलितांनाही स्वतंत्र मतदार संघ मिळाला. त्यावेळी गांधींनी फक्त दलितांच्या विरुद्ध उपोषण केले. त्याचा उद्देश या भयगंडाचे विरेचन असाच असावा. मानसशास्त्रीय विश्लेषण काहीही असले तरी एवढी गोष्ट खरी की, हिंदूंच्या मुसलमानांबाबतच्या भिरुतेचे संगोपन आणि पोषण गांधींनी केले. या भिरुतेचे सावट चढल्यामुळे १९ व्या शतकापासून सुरू असलेल्या हिंदूंच्या मानसिक मुक्ततेच्या प्रक्रियेला खीळ पडली. मौलवी चिरागअलीपासून सर सय्यद अहमद इक्बाल, जीना या सर्वांनाच हिंदूंची भीती वाटत होती. आणि त्याचे मूळ मुसलमानांची अल्पसंख्या आणि शैक्षणिक मागासलेपणा यात होते. सवर्ण हिंदूंच्या भीतीने दलितही असेच ग्रस्त झाले होते. १९२० ते १९४७ ह्या काळात भारतीय समाजाची वाटचाल इंग्रजांशी संघर्ष आणि निरनिराळ्या घटकांना एकमेकांबद्दल वाटणारी दहशत या वातावरणात झाली. त्याचे परिणाम आजही जाणवत आहेत.

आर्थिक क्षेत्रात गांधींची कामगिरी तपासायची म्हणजे प्रथम भारताचे आर्थिक प्रश्न काय होते हे जाणून घेणे आवश्यक आहे. पहिला प्रश्न आर्थिक विकासाचा. त्याच्यावर १९ व्या शतकातील सर्वच विचारवंतांनी भर दिला होता. दुसरा म्हणजे शेतकऱ्यांची परिस्थिती. तिसरा म्हणजे मालक-मजूर संबंध. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी शेतीत आधुनिक तंत्राचा उपयोग करणे आणि धरणाच्या योजनांचा पाठपुरावा करणे जरुरीचे होते. सरकारी महसूल हा फार मोठ्या प्रमाणात जमिनीवरील साऱ्याच्या रूपाने मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांवरील ओझे कमी करण्याकरता इतर मार्गांनी महसूल वाढेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या वाढत होती. ती कमी करणे अगत्याचे होते. हे सर्वच प्रश्न औद्योगिक विकासाशी संबंधित होते.तेव्हा भारताचे औद्योगिकरण झाल्याखेरीज भारताचे आर्थिक प्रश्न सुटणे अशक्य होते. पण त्याला गांधींचा विरोध होता. त्यांनी भारत खेड्यात राहतो या प्रश्नाकडे लक्ष वेधले खरे, पण तो सोडविण्यासाठी त्यांच्याकडे परिणामकारक कार्यक्रम नव्हता. खेड्यातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी उपाय शोधला तो सुतकताईचा जोडधंदा करण्याचा.

जमीनदारी, खोती किंवा तत्सम प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्याकडे ठोस असा कार्यक्रम नव्हता. अनेक धरणे व्हावी म्हणून ते सत्याग्रह करण्यास तयार नव्हते. शेतकरी गरीबच राहिला पाहिजे. त्याशिवाय त्याची नैतिक उन्नती होणार नाही अशी त्यांची धारणा होती. ख्रिस्ताच्या शिकवणुकीचे त्यांच्या मनावर खोल संस्कार झाले होते. आणि ख्रिस्ताने जवळ जवळ दोन हजार वर्षांपूर्वीच शिकवले होते की, एकवेळ सुईच्या नेढयातून उंट आरपार जाऊ शकेल. पण श्रीमंत माणसाला स्वर्गाच्या राज्यात प्रवेश मिळणार नाही. ख्रिस्ताची ही शिकवण विसरण्याची सुरुवात १६ व्या शतकातच युरोपात कॅल्व्हिनिस्टांनी केली. पण इ. स. च्या पहिल्या शतकातील शिकवणुकीचा उपयोग करून आधुनिक भारताचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न गांधी करत होते. मालक–मजूर संबंध सोडविण्यासाठी भारतातील औद्योगिक उत्क्रांतीनंतर नवीन यंत्रणा निर्माण करणे आवश्यक होते. पण अहमदाबादला गिरणीकामगारांनी संप केल्यानंतर तडजोड होऊ न शकल्यामुळे गांधींना उपोषण करून मार्ग शोधावा लागला. म्हणजेच आत्मिक बलाचा उपयोग करून यंत्रसंस्कृतीचे प्रश्न सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. वास्तविक पाहता गिरणी कामगारांच्या प्रश्नाबद्दल समाजातील इतर घटकांना विश्वासात घेऊन, त्यांची सहानुभूती मिळवून गिरणी मालकांविरुद्ध बहिष्कार पुकारला असता तर आधुनिक संस्कृतीला साजेसा असा नवा मार्ग देण्याचे श्रेय त्यांना मिळाले असते. गांधी कितीही श्रेष्ठ असले तरी घडयाळाचे काटे उलटे फिरविणें त्यांना अशक्य होते. औद्योगिक प्रगती थोपवून धरणे त्यांच्या कुवतीबाहेरचे होते. म्हणजे समस्या नव्या, पण त्या सोडविण्याचे उपाय मात्र कालबाह्य. यातून एक विसंवाद निर्माण झाला.

गांधींनी आर्थिक विकासाच्या बाबतीत जी उदासीनता दाखविली त्यामुळे दैन्याचे उदात्तीकरण झाले. अर्धनग्नता, दारिद्रय, ब्रह्मचर्य, दाढी वाढवणे म्हणजे नैतिक श्रेष्ठता असे समीकरण झाले. साधू, बैरागी, गोसावी यांचे प्राबल्य हिंदू समाजात होतेच. त्यात गांधीवादी कार्यकर्त्यांची भर पडली. कर्मसिद्धान्त हाडीमाशी खिळल्यामुळे दैन्य पचवलेल्या खालच्या जातीना दैन्याचे तत्त्वज्ञान शिकवण्यास गांधीवादी कार्यकर्ते सिद्ध झाले. त्यांनी भारलेला हिंदू समाज ऐहिक अभ्युदयाविषयी बेफिकीर बनला. मानवी शक्यतेची कल्पना, आपण काहीतरी करू शकतो ही जाणीव, नष्ट झाली. दैन्य ही मानवी अस्तित्वाची स्वाभाविक अवस्था आहे अशी मूळ हिंदू प्रवृत्ती दृढ झाली. आज भारताच्या असंख्य खेडयापाडयांतून असा समाज पसरलेला आहे. त्याची आर्थिक परिस्थिती, विशेषत: दैन्याबद्दलची निर्विकारता पाहिली म्हणजे मनुष्य काही करू शकतो याच्यावरचा विश्वास उडून जातो. दैन्य जगाच्या सुरुवातीपासून असून ते जगाच्या अंतापर्यंत टिकणार आहे आणि मागच्या जन्मी पुण्य केल्यामुळे या जन्मी आपली त्यापासून सुटका झाली आहे ही हिंदू प्रवृत्ती बळकट होते. त्याचबरोबर त्यांच्यासाठी काही करण्याच्या सामाजिक जबाबदारीपासून मी स्वत:ला मुक्त करतो.

गांधीचे महत्त्वाचे सामाजिक कार्य म्हणजे अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी केलेले

प्रयत्न. पण यांतही त्यांचा पारंपरिक हिंदू दृष्टिकोनच जास्त डोकावती. अस्पृश्यांकडे सवर्णांनी 'दुबळ्यांचे संरक्षण' आणि 'लक्ष पुरवणे आणि दयाळूपणा' या भूतदयावादी भूमिकेतून पाहावे अशी त्यांची शिकवणूक होती. म्हणजेच अस्पृश्यता नष्ट व्हावी पण अस्पृश्यवर्ग नष्ट होऊ नये अशी त्यांची धारणा होती. साहजिकच या वर्गाला त्यांनी हरिजन हे नाव दिले व तो वंशपरंपरा टिकेल अशीही खबरदारी घेतली. पण त्यामुळे अस्पृश्यांचा उद्धार होण्याऐवजी बिचाऱ्या हरीचे मात्र अवमूल्यन झाले. अस्पृश्य जे काम करतात ते हलके नसून कोणत्याही कामाची माणसाने लाज बाळगू नये अशीही त्यांची शिकवणूक होती. याचे दोन परिणाम झाले. पहिला गांधीवाद्यांवरील. आपण उच्च वर्णीय असूनही, ज्याला हलके समजले जाते असे काम करण्यातही आपल्याला कमीपणा वाटत नाही हा विचार, आत्मिक अहंकार सुखावणारा होता. त्यामुळे असल्या कामाचे 'प्रदर्शन' गांधीवादी नेहमीच करत असत. तसेच तत्त्वतः कोणतेही काम हलके नसल्याने मृत जनावरे फाडणे किंवा संडास साफ करणे यांसारखी कामे करायला चांभार किंवा भंगी यांना हलकेपणा वाटण्याचे कारण नाही असा विचारही गांधींच्या शिकवणुकींतूनच निघतो. म्हणजेच त्या जातीतच ही कामे वंशपरंपरा राहण्याची निश्चिती. गांधींनी जो मार्ग शोधून काढला त्यात सवर्णांनाही जाचणारे काहीच नव्हते. कारण अस्पृश्यता पाळू नका हा आदेश नकारात्मक होता. अधून मधून संडास साफ केले, रस्ते झाडले म्हणजे सदसद्‌विवेकबुद्धी सर्फने धुतल्यासारखी साफ.

गांधींच्यावरील हिंदुत्वाचे संस्कार इतके प्रबल होते की, अस्पृश्यतेचा प्रश्न गांधींना कधी समजलाच नाही. अस्पृश्यातील माणूस जागा करून त्याला आत्मविश्वास देणे हे सर्वात महत्त्वाचे होते. त्याला दया दाखवण्यातून त्याचा उद्धार होणार नव्हता. तसेच सवर्णांच्या आचारविचारातही क्रांतिकारक बदल घडवून आणणेही तितकेच आवश्यक होते. परिस्थितीच्या दडपणाखालीच समाजात क्रांतिकारक बदल होत असल्याने हलकी समजली गेलेली कामे करायला माणसेच मिळत नाहीत अशी अवस्था निर्माण करणे जरुरीचे होते. पण त्यासाठी अस्पृश्यांना उपजीविकेची पर्यायी साधने मिळवून देणे अगत्याचे होते. याच्याच बरोबरीने ज्याला अशी साधने मिळाली असतील त्याला कायद्याने सवर्ण बनण्याचा अधिकार प्राप्त करून देणे हा फार मोठा क्रांतिकारक बदल घडवून आणता आला असता. उदा. शिक्षकी पेशातल्या अस्पृश्याने ब्राह्मण जात लावणे वगैरे. कोणीही कोणतीही जात लावली असती म्हणजे सबंध जातिरचनाच विस्कळीत झाली असती व समाज एकसंघ होण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली असती. असा क्रांतिकारक विचार मांडण्याचे सामर्थ्य गांधींच्यात निश्चित होते. पण हरिजन असूनही एखादा माणूस महत्पदी चढू शकतो असा समाज त्यांना निर्माण करायचा होता. म्हणजे समाजात हरिजन राहणे हे त्यांच्या दृष्टीने तितकेच महत्त्वाचे होते. गांधींचे अस्पृश्यता निवारण म्हणजे अखेर हिंदुत्वाचाच आविष्कार ठरला. त्यांचा क्रांतिकारक संदेश आणि त्यांच्या कार्याचे फलित म्हणजे अस्पृश्याला शिवले तरी बिघडत नाही एवढेच निघते. दलित शेवटी होता तिथेच राहिला.

येथपर्यंत गांधीचा राष्ट्रीय उत्थानाचा कार्यक्रम, म्हणजे सत्य, अहिंसा, निःशस्त्र प्रतिकार, सत्याग्रह, सूतकताई, अस्पृश्यतानिवारण इत्यादी अवनत हिंदुत्वाचाच कसा आविष्कार होता याचे विवेचन केले. त्याचेच दर्शन आजच्या समाजजीवनात कसे घडते हे एक–दोन उदाहरणे घेऊन पाहणे बोधप्रद ठरेल.

वर लिहिले आहेच की, हिंदूंचा भयगंड गांधींनी जागवला व तो आता हिंदु समाजाचा स्थायीभाव झाला आहे. निधर्मी राज्याची संकल्पना हे याचे उत्तम उदाहरण आहे. वस्तुतः नव्या युगाला अत्यंत अनुरूप आणि आवश्यक असे हे तत्त्व आहे. पण भारतातील निधर्मी राज्याचा पाया हिंदूंचा भयगंड हा आहे. निधर्मी राज्य म्हणजे सहिष्णुता नव्हे. किंवा अल्पसंख्याकांना बेसुमार सवलतीही नव्हेत, तर व्यक्तिमत्वावर धर्माचा पगडा बसलेला असतो त्यातून बौद्धिक मुक्तता होय. ज्यावेळी धर्म व राष्ट्रहित किंवा मानवी मूल्ये यात संघर्ष निर्माण होईल त्यावेळी धर्माज्ञा किंवा धार्मिक संवेदना यांना न जुमानता निर्णय घेणे व त्याची कार्यवाही करणे हे ते तत्त्व होय. हे आपण कितपत पाळतो ? आज भारतासमोर जी प्रमुख समस्या आहे ती लोकसंख्येची आणि त्यासाठी सक्तीचे कुटुंबनियोजन व समान नागरी कायदा यांची नितांत आवश्यकता आहे. पण या बाबतीत मुसलमानांच्यावर सक्ती करायला निरनिराळ्या पक्षांचे हिंदू पुढारी घाबरतात. मुस्लिम लीग सोडता इतर सर्वच राजकीय पक्षाचे पुढारी हिंदूच आहेत. यापैकी एकही पक्ष अशी मागणी करीत नाही याचे इंगित काय ?

राजकारण्यांच्या बाबतीत निदान भयगंडाबरोबरच राजकीय फायदा आहे, असे तरी म्हणता येईल. पण या भयगंडाने विचारवंतांनाही ग्रासले आहे. हेही हिंदूच आहेत. पण आपल्याला कोणी जातीय म्हणेल या भीतीने ते इतके त्रस्त झाले आहेत की, त्यांचा सारासारा विचार सुटला आहे. हिंदु जातीय आहे पण धर्मवेडा नाही. त्याच्या धर्मवेडाची जास्तीत जास्त मजल इतर धर्मीयांचे फाजील लाड करू नका एवढे सांगण्यापुरतीच जाते. हे माहीत असूनही हिंदूंच्यावर उठता–बसता टीका करून पुरोगामी म्हणवून घेण्याचे खूळ राजकारण्याबरोबर विचारवंतांनाही लागले आहे. आणि ते पुरविण्यासाठी संघ आणि भा. ज. प. यापेक्षा जास्त सोयीचे काय आहे ? संघ फॅसिस्ट आहे. भा. ज. प. जातीय आहे म्हटले म्हणजे झाले. मौजेची गोष्ट म्हणजे भा. ज. प. लाही आता या खुळाची लागण झाली आहे. आपण जातीय कसे नाही हे पटविण्यासाठी तो बाटग्याच्या उत्साहाने प्रयत्नशील आहे. पण या सर्वांना मुस्लिम लीग किंवा मुसलमान कसे आहेत याबद्दल अवाक्षर काढण्याचे धाडस नसते. महमद किंवा इस्लाम याबद्दल स्पष्ट मत देणे त्यांना शक्य नसते. आगाखान टी. व्ही. वर आलेले त्यांना चालतात. युकॅरिस्ट काँग्रेसला सहकार्य दिलेले त्यांना चालते. मुस्लिम लीगबरोबर राजकीय समझोता त्यांना चालतो. मुस्लिमांचे बहुमत होईल अशा तऱ्हेने जिल्ह्यांची पुनर्रचना केलेली त्यांना रुचते पण हिंदूचे संघटन झालेले त्यांना जिव्हारी लागते. सर्वात शरमेची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रात मुसलमानांच्या भीतीने शिवप्रतिमेची मिरवणूक काढता येत नाही याबद्दल ते समाधानी असतात. हिंदूंच्यावरच फक्त

टीका करून आणि मुसलमानांची वाहवा मिळवून ते भयग्रस्ततेतून स्वतःची सुटका करून घेत असावेत असे वाटते. या वृत्तीचे एक उदाहरण नुकतेच निदर्शनास आले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मुंबईत एक व्याख्यान देऊन संघ फॅसिस्ट आहे व दुसऱ्या महायुद्धाचे वेळी हिटलर त्यांचा आदर्श होता असे प्रतिपादन केले. वस्तुस्थिती अशी आहे की, सुभाषबाबूंनी हिटलरशी मैत्रीच केली होती. पण एम्. एन. रॉय यांचा अपवाद वगळता गांधींसकट यच्चयावत भारतीयांना हिटलरचे आकर्षण होते. त्यामुळेच क्रिप्स योजना पुढे आली तेव्हा 'दिवाळे निघालेल्या बँकेवरील पुढच्या तारखेचा चेक' असे तिचे वर्णन गांधींनी केले. त्यावेळी शास्त्रीबुवांनी दिलेली व्याख्याने त्यांनी आठवून पाहावीत. खरी गोष्ट ही आहे की, दुबळा भारत हिटलरच्या पराक्रमाने भारून गेला होता व आपल्याला स्वातंत्र्य न देणाऱ्या इंग्रजांची हिटलर कशी 'जिरवीत' आहे हे पाहून हर्षोत्फुल होत होता. त्यात संघही सामील होता एवढेच. पण संघावर टीका केल्याबरोबर पुरोमामी विचारवंत म्हणून शास्त्रीबुवांच्या कीर्तीला केवढा उजाळा मिळाला. समाजात जे बदल होत आहेत त्यांचा डोळसपणे वेध घेणे, आत्मपरीक्षण करणे याऐवजी सर्वच विचारवंत पूर्वग्रहाच्या तुरुंगात खितपतण्यात समाधानी आहेत. आणि हे हिंदुत्वाचेच लक्षण आहे.

हिंदूंच्या या भयगंडाचे प्रतिबिंब परदेशनीतीतही आढळते. मुस्लिम जगताबरोबरचे आपले संबंध तपासून पाहिले तर भारतांतर्गत मुस्लिमांशी आपले जे संबंध आहेत त्यांचेच पडसाद उमटलेले तिथेही दिसतात. आर्थिक दृष्टचा अरब राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध ठेवणे आपल्याला आवश्यक आहे. पण अरबांचा कोणताही प्रश्न असला तरी आपण 'अरबाहूनही अरब' बनतो. या हिणकस पातळीवर आपली परराष्ट्रनीती उतरते याचे कारण हेच आहे. या चर्चेसाठी मला एक विचार मांडावयाचा आहे. आपल्या परराष्ट्र धोरणाचे एक सूत्र असे आढळते की, जी राष्ट्रे चिरेबंद आहेत, जिथे अंतर्गत लोकशाहीला स्थान नाही अशांच्या बाबतीत आपले धोरण अनुनयाचे असते. उदा० मुस्लिम देश, रशिया व त्याच्या पंखाखालील देश आणि चीन यांच्या बाबतीत काहीही बोलताना आपण भयग्रस्त असतो. याउलट ज्या देशात लोकशाही आहे त्यांच्या धोरणाबाबत आपण स्पष्ट मतप्रदर्शन करीत असतोच. हिंदूंना सघटित समाजाची भीती वाटते हे त्याचे कारण असू शकेल काय ?

अवनत हिंदुत्वाच्या प्रभावाने सर्वच राजकीय पक्षांना ग्रासले आहे. त्याबद्दल पुष्कळच लिहिता येण्यासारखे आहे. पण समाजवाद्यांच्या बाबतीत त्याने असाध्य स्वरूप धारण केले आहे, त्याचा शोध घेणे मनोरंजक ठरेल. पण येथे एक दोन वैशिष्टयांचाच फक्त उल्लेख करणार आहे.

हिंदुत्वात सोवळ्या–ओवळ्याचे प्रस्थ फार आहे. समाजवादी या शास्त्रातले तज्ज्ञ. भा. ज. प. व संघ हे यांच्या दृष्टीने ओवळे पक्ष. मध्यंतरी दुहेरी निष्ठेचे नाटक झाले त्यावेळी या सोवळ्याच्याच नादाने त्यांनी आपलेच सरकार पाडले. हिंदूंना खालच्या जातीतले लोक चालत नाहीत पण परधर्मीय चालतात या न्यायाने भारताच्या फाळणीला

कारणीभूत झालेली मुस्लिम लीग मात्र चालते.

हिंदूंची दुसरी भीती म्हणजे बाटले जाण्याची. त्याचाही प्रादुर्भाव या पक्षात पहिल्यापासूनच आहे. मी सेवादलात होतो त्यावेळची गोष्ट आहे. आमच्या शाखेत दोन स्वयंसेवकांनी येण्यास सुरुवात केली. आमच्यात केवढी घबराट उडाली. आपल्यातले काही स्वयंसेवक बाटवायला ते आले आहेत या शंकेने आम्हाला ग्रासले होते. दुसरा अनुभव आहे आचार्य अत्रे यांच्या बाबतीतला. त्यावेळी ते समाजवादी पक्षात होते. रा. स्व. संघाच्या एका कार्यक्रमाला त्यांना प्रमुख अतिथी म्हणून बोलावले होते. दुसऱ्या दिवशी अत्रे बाटले म्हणून आरडाओरडा झाला. आपण दुसऱ्याचे मतपरिवर्तन करू शकतो याचा विश्वास हिंदूंना कधीच नसतो. पण दुसऱ्यांच्या संगतीने आपण बाटू ही भीती मात्र सतत असते.

भारताच्या शोकांतिकेचे मूळ अवनत हिंदुत्वात आहे. त्याचे पुनर्वसन गांधींनी केले. हिंदु समाजात जेव्हा जोम होता तेव्हा भारत ही सुवर्णभूमी होती. विज्ञान, साहित्य, शिल्पकला इत्यादी क्षेत्रांत भारताने नेत्रदीपक प्रगती केली होती. नंतर आपण आपल्या ज्ञानाची कवाडे बंद केली आणि आपल्या अवनतीला सुरुवात झाली. आपण निव्वळ अस्तित्वासाठी धडपडू लागली. आजही पुन्हा त्या मार्गाने आपली वाटचाल चालू आहे. तमोयुग येऊ घातले आहे त्यापासून जर आपल्याला वाचवायचे असेल तर हिंदुत्वावर चढलेली पुटे खरवडून त्याच्या मूल तत्त्वाकडे, ज्ञानमार्गाकडे जाणे आवश्यक आहे. कारण हिंदुत्वात कितीही वैगुण्ये असली तरी भारतात विकासाची क्षमता फक्त हिंदु समाजातच आहे. हिंदूच फक्त आपल्या धर्मावरील टीका ऐकून घेतात. म्हणजेच त्याला आत्मपरीक्षणाचे वावडे नाही. पण त्यासाठी राजकारणी व विचारवंत यांनी वैचारिक निर्भयतेचा व त्याच्या अनुषंगाने कृतीचा अवलंब केला पाहिजे. आज वैचारिक निर्भयतेचे 'प्रदर्शन' चालू आहे ते थांबून विचारवंतांनी खरीखुरी निर्भयता आत्मसात केली पाहिजे. समाजाला पचणाऱ्या किंवा पटणाऱ्या गोष्टी सांगणे किंवा जो समाज टीका, टिंगल अथवा टवाळी सहन करतो त्याच्यावर ती करणे याला मी निर्भयतेचे प्रदर्शन करणे म्हणतो. उदा संघ, ब्राह्मण, यावरच फक्त टीका करणे व पुरोगामी म्हणून मिरवणे ही फॅशन झाली आहे. हे तर करायला हवेच. पण ज्या ज्या धर्मात अथवा समाजात असे प्रकार घडतात त्यावरही टीका व्हायला पाहिजे. मजुरांना, कामगारांना त्यांना न पटणाऱ्या गोष्टी विचारवंतांनी सांगायला पाहिजे. 'राजा, तू चकतोस' ही भूमिका त्यांनी घ्यायला पाहिजे. टीका, प्रतिटीका अशा तऱ्हेने मंथन चालू राहिले पाहिजे. तरच बौद्धिक मुक्तता होऊन देशाच्या प्रगतीचा पाया घातला जाईल. तमोयुगाकडे वाटचाल करीत असलेल्या आपल्या समाजाला, आता अटळ वाटत असलेल्या सर्वनाशापासून, वाचवता येईल.

माझ्या मगदुराप्रमाणे मी या लेखात माझी मते मांडली आहेत. ती बरोबरच आहेत असा माझा दावा नाही. ती पूर्वग्रहदूषितही असू शकतील. ती एकांगीही असण्याची शक्यता मी नाकारत नाही. पुढील चर्चेसाठी आवश्यक असा पूर्वपक्ष मांडला आहे. त्यावर

विचारवंतांनी टीका केली तरच मला समाधान वाटेल. भारतातील आजची परिस्थिती माझ्या दृष्टीने भयानक आहे, अशा तऱ्हेच्या विमर्षातून त्याची कारणे सापडण्याची शक्यता आहे.

□ □ □

REFBK-0025632

विचारवंतांनी टीका केली तरच मला समाधान वाटेल. भारतातील आजची परिस्थिती माझ्या दृष्टीने भयानक आहे, अशा तऱ्हेच्या विमर्षातून त्याची कारणे सापडण्याची शक्यता आहे.

□ □ □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0025632



महाराष्ट्राने, म्हणे, अटकेवर झेंडा फडकवला,
महाराष्ट्राने, म्हणे, दिल्लीचे तक्त फोडले,
महाराष्ट्राच्या भास्कर कोल्हटकर
या नागपूरकरांच्या सेनानीच्या
भीतीने बंगालच्या सीमेवर म्हणे,
मराठा डिच (खंदक) निर्माण झाला.
गुजरात, मध्य भारत, उत्तर कर्नाटक येथे, म्हणे,
नवी मराठी राजघराणी उदयाला आली.
५७ च्या बंडात गाजले, ते मराठे;
असंतोषाचा सागर उसळला, तो पुण्याच्या गायकवाडवाड्यात;
क्रांतिकारकांचे मुकुटमणी सावरकर महाराष्ट्राने दिले;
तोच का आताचा शरणार्थी महाराष्ट्र ?

# महाराष्ट्राची शोकांतिका